ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

भारतीय सौर ज्येष्ठ-अश्विन १९४१

जुलै-सप्टेंबर २०१९ / खंड ४३, अंक २

# महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व – डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश – संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला- के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज – श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३९१०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित:।।

# अर्थसंवाद

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१९/ खंड ४३ / अंक २

**प्रमुख संपादक**
**राहुल शं. म्होपरे**
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
**चंद्रकांत जाधव**
(य.च.वारणा महाविद्यालय,वारणा नगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०१८-२१)**
**जनार्दन काकडे**
**राजू शिंदे**
**अजय दरेकर**
**मोहन सदामते**

**संपादकीय पत्रव्यवहार**
**राहुल शं. म्होपरे**
विद्यापीठ क्वार्टर नं. डी-३४,
सायबरसमोर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ता. करवीर, जि. कोल्हापूर
पिन : ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. राहुल शं. म्होपरे :
संपादकीय ........ ८९

२. राजस परचुरे, ज्ञानदेव तळुले :
पैसा आणि सामान्य असमतोल: सैद्धांतिक आणि वास्तव परिस्थितीजन्य परिप्रेक्ष्य ........ ९१

३. ज्ञानदेव तळुले, राजस परचुरे :
लोकशाहीच्या आर्थिक सिद्धांताशी मतदार वर्तणुकीची फारकत : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक परिक्रमा व चलांवरील द्विदशक आकडेवारीचे तुलनात्मक निष्कर्ष ........ १२५

४. डॉली सनी :
स्टार्टअप उपक्रमांची भारतामधील आव्हाने : काही निरीक्षणे ... १४८

५. विलास आढाव :
डॉ. बाबासाहेब आंबेडकर - क्रांतिकारी विचारसरणीचे अर्थतज्ज्ञ ........ १५२

६. धनश्री महाजन :
बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची ५० वर्षे: सद्यस्थिती आणि भवितव्य ........ १६६

७. जी. एस. कांबळे :
सोलापूर जिल्ह्यातील दूध उत्पादकांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास ........ १६९

८. उमेश मधुकर राजदेरकर :
दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धी संकल्पना व वास्तव ........ १८०

९. रामदास यशवंतराव माहोरे :
भारतातील आरोग्यावरील खर्चाचे विश्लेषण ........ १८५

१०. सुभाष पाटील :
महाराष्ट्रातील महिलांची सद्यस्थिती व आव्हाने ........ २००

११. नंदकुमार बाबुराव बोधगिरे :
महाराष्ट्रातील बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक : वस्तुस्थिती आणि विशिष्ट समूहाचा दारिद्र्य निर्देशांक काढण्याची गरज ........ २०८

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ २०१९-२०

- **अध्यक्ष**

  **रामदास यशवंतराव माहोरे (नागपूर)**

- **कार्याध्यक्ष**

  **कैलास के. पाटील (परभणी)**

- **कार्यवाह खजिनदार**

  **रामदास बापूराव भांडवलकर (यवतमाळ)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  **राहुल शंकरराव म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

  **जगन्नाथ पाटील (सातारा)**
  **आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**
  **रामकृष्ण टाले (नागपूर)**

- **सदस्य**

  **महादेव पाटील (मिरज-सांगली)**
  **संतोष कदम (सोलापूर)**
  **सुभाष पाटील (पुणे)**
  **विनोद गावंडे (अमरावती)**
  **अशोकगीर गोस्वामी (भुसावळ)**
  **मारोती तेगमपुरे (अंबड)**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **स्नेहा देशपांडे (नागपुर)**
  **बळवंत कोरे (कराड)**
  **गणेश मांगडे (दापोली)**
  **माधव शिंदे (अहमदनगर)**

- **स्वीकृत सदस्य**

  **सुरेश भास्कर ढाके (भुसावळ)**
  **शिवाजी कारभारी ढगे (धुळे)**

- **स्थानिक कार्यवाह**

  **प्रितम प्रवीन कोठारी (सोलापूर)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **आर. बी. भांडवलकर**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६


**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

  आजीव सदस्य : रु.३०००/- (एकरकमी)
  इमारत निधी : रु.२०००/-
  सदस्य सूची : रु. १००/-
  एकूण : रु. ५१००/-

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

  शैक्षणिक संस्था : रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था : रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये : रु.१५००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.


टिप: म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.


हे त्रैमासिक, प्रकाशक आर. बी. भांडवलकर (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिद्ध केले.

# संपादकीय

संशोधक, अभ्यासक आणि वाचक मित्रहो, आपणा सर्वांस ज्ञात आहेच की, मागील ४० वर्षांपासून अर्थसंवाद तुम्हां-आम्हां सर्वांनाच दर्जेदार लेखांच्या माध्यमातून ज्ञानाची शिदोरी अविरतपणे पुरवित आहे. अर्थव्यवस्थेतील वर्तमानकालीन आर्थिक घडामोडींवर अर्थसंवादमधील संशोधनपर लेखांच्या माध्यमातून सातत्याने भाष्य केले जाते. अर्थसंवादचा प्रमुख संपादक म्हणून काम करण्यासाठी आपण दिलेल्या संधीला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सध्या करीत आहे. अर्थसंवादच्या सल्लागार मंडळावर काम करीत असल्यापासूनच माझ्या मनात अर्थसंवादबाबत विविध, चांगले प्रयोग करण्याचे विचार येत होते. तत्कालीन संपादकांशी मी या प्रयोगांबाबत चर्चादेखील करीत असे. परंतु सर्वच गोष्टी एकाचवेळी साध्य करणे शक्य होत नाही. कोणताही चिरस्थायी बदल हा काळानुरूप होत असतो. आजपर्यंतच्या अर्थसंवादच्या सर्वच संपादकांनी आपआपल्या क्षमतेने अर्थसंवादचा दर्जा उंचावण्याचेच काम केलेले आहे. सध्या प्रमुख संपादकपदाचे हे शिवधनुष्य पेलण्याचा प्रयत्न मी माझ्या क्षमतेनुसार करीत आहे. अर्थसंवादच्या संपादकपदाची जबाबदारी माझ्याकडे आल्यानंतर सर्वप्रथम कार्यकारणी व सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन अर्थसंवादसाठी रंगसंगती वगळता कायमस्वरूपी राहील, अशा पद्धतीचे योग्य व प्रतिष्ठित मुखपृष्ठ आपण तयार केले. ज्यामुळे अर्थसंवादची मुखपृष्ठावरून होणारी ओळख अधिक गडद होण्यास नक्कीच मदत झाली आहे. अर्थसंवादचा खर्च सातत्याने वाढत जाणारा आहे. जो भविष्यकाळ लक्षात घेता परिषदेला बिलकूल परवडणारा नाही. जी.एस.टी. व महागाई दर लक्षात घेता सध्याच्या परिस्थितीत अर्थसंवादचा खर्च कपात करून खर्च कमी करणे कठीण आहे. त्यामुळे सल्लागार मंडळ आणि कार्यकारणीच्या मदतीने अर्थसंवादच्या उत्पन्नात वाढ करण्याचा पर्याय आपण स्वीकारला आहे. याबाबतची काही पावले नजीकच्या काळात आपण उचलत आहोत. खर्च कपातीच्या दृष्टीने देखील सातत्याने प्रयत्न चालूच असतो.

मी प्रमुख संपादक म्हणून अर्थसंवादची जबाबदारी स्वीकारल्यानंतर एप्रिल-जून २०१८ चा माजी अध्यक्षांचा पहिला विशेषांक काढलेला होता. त्यानंतर जुलै-सप्टेंबर २०१९ चा हा दुसरा विशेषांक काढत आहे. या विशेषांकाचे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्रातील ज्या ज्या विद्यापीठात अर्थशास्त्र विभाग आहे त्या प्रत्येक विभागाच्या मा. विभागप्रमुखांनी सदर अंकात लेखरूपी आपले विचार मांडलेले आहेत. विशेष म्हणजे गोखले इन्स्टिट्यूट, पुणे आणि य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिकच्या सामाजिकशास्त्र विद्याशाखेच्या सन्माननीय संचालकांनी देखील या अंकात आपले संशोधनपर लेखांचे योगदान दिले आहे. अपवादात्मक परिस्थितीत खूप प्रयत्न करूनही ज्या विद्यापीठाच्या आजी विभाग प्रमुखांचा लेख मला प्राप्त होऊ शकला नाही, तेथील माजी विभागप्रमुखांचा दर्जेदार लेख प्राप्त करून घेऊन अंकाला पूर्णत्व आणण्याचा संपादक या नात्याने मी कसोशीने प्रयत्न केलेला आहे.

प्रस्तुत विशेषांक काढताना त्याची गर्भधारणा नेमकी कशी झाली, याबाबतचा ऊहापोह याठिकाणी करणे सुसंगत ठरेल. साधारणत: जानेवारी २०१९ मध्ये माझ्या डोक्यात ही कल्पना आली आणि लगेचच महाराष्ट्रातील विविध विद्यापीठे व त्यांच्या विभागप्रमुखांच्या नावाची यादी तयार करून घेतली. अर्थसंवादच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांच्या अर्थशास्त्र विभागप्रमुखांची तसेच संचालकांची नावे आणि त्यांचे लेखन सामर्थ्य संपूर्ण भारतात पसरविले जावे हा प्रमुख उद्देश डोळ्यांसमोर ठेवून या विशेषांकाचे काम मी हाती घेतले. उल्लेखनीय बाब म्हणजे ज्यावेळी मी भ्रमणध्वनीवर सर्व सन्माननीय लेखकांशी अंकाची कल्पना आणि उद्देश सांगून लेख लिहिण्याची विनंती केली त्यावेळी क्षणाचाही विलंब न करता प्रत्येक लेखकाने आपण लेख लिहिणार असल्याचे सांगितले. हा प्रयोग अत्यंत कौतुकास्पद आहे अशी शाबासकीदेखील काही जणांनी दिली. या शाबासकीमुळे निश्चितच मला प्रोत्साहन मिळून काम करण्याचा उत्साह खूप वाढला. प्रस्तुत अंकामधील काही विभागप्रमुखांचे लेख हे अतिथी लेख आहेत.

लवकरच त्यांनी देखील परिषदेचे आजीव सदस्य होऊन परिषदेच्या मुख्य प्रवाहात येण्याची विनंती मी त्यांना केलेलीच आहे. यातील काही विभागप्रमुखांची मराठी लेखनाची अडचण होती. परंतु त्यांनी ही अडचण भरपूर कष्ट घेऊन तसेच मराठी लेखकांची मदत घेऊन दूर केल्याचे मला दिसून आलेले आहे. अंकातील प्रत्येक लेख हा एका वेगळ्या धाटणीचा असून त्याला एक वेगळी उंची व वेगळे वजन आहे. अर्थसंवाद या दर्जेदार त्रैमासिकात कशा पद्धतीने लेख लिहावेत, त्यांचा दर्जा काय असावा, संशोधनपर लेख कसे असतात याचे दीर्घकालीन दिशादर्शन या अंकाच्या प्रत्येक लेखातून प्राप्त होते. या अंकातील प्रत्येक लेख अत्यंत परिश्रमपूर्वक व भरपूर वेळ खर्च करून तयार केलेला आहे, याची साक्ष अर्थसंवादच्या वाचकाला लेखाचे वाचन करताना निश्चितच पटेल.

अंकाच्या सुरुवातीचे राजस परचुरे (प्र.संचालक, गोखले इन्स्टिट्यूट, पुणे) व ज्ञानदेव तळुले (अर्थशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) या मातब्बर जोडगोळीने लिहिलेले दोन्ही संयुक्त लेख ज्यावेळी वाचक काळजीपूर्वक वाचतील त्यावेळी आपसूकच त्यांच्या लक्षात येऊन जाईल की, यांच्या दोन्ही लेखांना अत्यंत चांगल्या व सखोल संशोधनाचा आधार तर आहेच; परंतु संशोधक नेमका कसा असावा आणि त्याने संशोधनपर लेख कसा लिहावा याची जाणीव प्रत्येक वाचकाला परचुरे-तळुले यांच्या संयुक्त लेखांतून होईल.

सातत्याने इंग्रजी लेखनाची सवय असताना संपादकांच्या विनंतीला मान देऊन मुंबई विद्यापीठाच्या डॉली सनी यांनी एका अत्यंत चांगल्या विषयावर परिश्रमपूर्वक मराठीतून लेखन करून स्टार्टअप उपक्रमासंदर्भात एक सुंदर लेख वाचकांना दिलेला आहे. पुणे विद्यापीठाच्या विलास आढाव यांनी अर्थशास्त्रातील थोडी दुर्लक्षित असलेली आर्थिक इतिहासाची शाखा निवडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांवर प्रकाशझोत टाकलेला आहे. मराठवाडा विद्यापीठातून धनश्री महाजन यांनी त्यांच्या लेखाद्वारे बँकांच्या राष्ट्रीयीकरणाला पूर्ण झालेल्या अर्धशतकाचा मागोवा घेऊन त्याची सद्यस्थिती आणि भविष्य याबाबतचे सखोल गुणात्मक विवेचन केलेले आहे. सोलापूर विद्यापीठातून जी. एस. कांबळे यांनी त्यांच्या लेखातून सोलापूर जिल्ह्यातील दूध उत्पादकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा आढावा सांख्यिकीच्या आधाराद्वारे छान पद्धतीने मांडलेला आहे. य. च. म. मु. विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र शाखेचे संचालक उमेश राजदेरकर यांनी त्यांच्या छोटेखानी परंतु अत्यंत गुणात्मक दर्जाच्या लेखातून दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धीची संकल्पना आणि वास्तव मोजक्या शब्दांत वाचकांसमोर मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. व्यस्ततेमुळे नागपूर विद्यापीठाच्या आजी विभागप्रमुखांना लेख देता आला नाही. अशावेळी मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विद्यमान अध्यक्ष व नागपूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख रामदास माहोरे यांनी संकटमोचकाची भूमिका पार पाडून उत्तम लेख लिहिला. त्यांच्या लेखात त्यांनी योग्य सांख्यिकीचा आधार घेऊन भारतातील आरोग्य खर्चाचे विश्लेषण सुंदर पद्धतीने केलेले आहे. माहोरे यांच्या लेखाशिवाय प्रस्तुत अंकाला पूर्णत्व येणे केवळ अशक्य होते. एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख सुभाष पाटील यांनी त्यांच्या लेखाद्वारे महाराष्ट्रातील महिलांच्या सद्यस्थितीवर आणि आव्हानांवर उत्कृष्ट पद्धतीने भाष्य केलेले आहे. नांदेड विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख नंदकुमार बोधगिरे यांनी त्यांच्या लेखाद्वारे समूह दारिद्र्य निर्देशांक काढण्याची नाविन्यपूर्ण पद्धती अत्यंत चपखल शब्दांत लोकांसमोर मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे.

एकंदरित हा अंक म्हणजे संपादक म्हणून काम करताना मी पाहिलेले एक सुंदर स्वप्न होते. जे या अंकाच्या माध्यमातून पूर्ण होत आहे. या अंकातील जे काही चांगले आहे, ते सर्वस्वी तज्ज्ञांचे असून यातील ज्या काही उणिवा आहेत त्यांची जबाबदारी संपादक या नात्याने पूर्णतः माझी आहे. अर्थसंवादचा हा अंक मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांबरोबरच अर्थसंवादचे सर्व वाचक, संशोधक, विद्यार्थी इ. बरोबरच भविष्यकालीन पिढीला दीपस्तंभासारखा सदैव मार्गदर्शक ठरेल, असे मला मनापासून वाटते. त्यामुळेच हा अंक वाचकांच्या हाती सुपुर्द करताना मला आनंदाबरोबरच स्वप्नपूर्तीचे समाधानदेखील लाभत आहे. उपक्रमशीलता सातत्याने चालूच राहील, अशी मनस्वी इच्छा!

**- राहुल शं. म्होपरे**

# पैसा आणि सामान्य असमतोलः सैद्धांतिक आणि वास्तव परिस्थितीजन्य परिप्रेक्ष्य

**राजस परचुरे** † **ज्ञानदेव तळुले** ††

**प्राक्कथन**

स्थितीशील मुक्त लिऑनटिफ पद्धतीवर आधारित समग्रलक्षी प्रमेयाच्या संदर्भान्वये प्रस्तुत संशोधन टिपण भौतिक समग्रलक्षी समतोलाचे विश्लेषण करते. याची सुरुवात एक आदर्श अर्थव्यवस्था प्रमेय तयार करण्यापासून होते. ज्यामध्ये पैशाची आवश्यकता नाही असे प्रतिपादिले आहे. प्रस्तुत प्रमेय वालरसवादी ॲरो हान्ह प्रमेयाशी समतुल्य आहे की ज्यामध्ये पैशाला स्थान नाही. यानंतर पुढे जाऊन ते असे वास्तवावादी वस्तूविनिमयाचे प्रमेय प्रतिपादिते की ज्या अंतर्गत पैसा व्यवहार व्यय कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. तसेच उत्पादन व वास्तव उत्पन्न वृद्धीकामीही पैसा महत्त्वाची भूमिका पार पाडतो. अशी अट की ज्याअंतर्गत रोख व कर्जाऊ पैशाच्या कार्यकाळात पूर्ण रोजगार समग्रलक्षी समतोल स्थिती प्रस्थापित केली जाते. समग्रलक्षी समतोल अशा स्थितीत दाखविला आहे की जेव्हा वर्तमान उत्पन्न अथवा उत्पादिताचा काही भाग रोख रकमेच्या स्वरूपात बाळगण्याची प्रवृत्ती असते. अशा समयी बचती गुंतवणुकीपेक्षा अधिक असतात. यातून असेच ध्वनीमुद्रित होते की अपरिवर्तनीय पैसा आवश्यक व अतटस्थ असा दोन्ही प्रकारे दिसून येतो. गेली आठ दशके हिक्सच्या बचत-गुंतवणूक व पैशाची मागणी व पुरवठा (IS-LM) वक्रापासून प्रारंभ झालेल्या युक्तिवादापासून तर थेट केन्सवादी प्रमेयावर अनेक विश्लेषणे निर्माण झाली किंवा दिली गेली. अलीकडच्या काळात केन्सवादी विचारांनी अनेक वैचारिक बाबींच्या स्पष्टीकरणासाठी राजकोषीय उपायांचे प्रदर्शनच यातून मांडले. यानंतर प्रस्तुत संशोधन टिपण पुढे जाऊन संख्यात्मक सहजीकरण धोरणाच्या मर्यादांची कारणमीमांसा करते. अशा प्रकारची वैचारिक पार्श्वभूमी तपासून अंतिमतः २००७-०८ च्या दर्जाहीन आर्थिक संकट निर्मित महामंदीच्या पार्श्वभूमीवर देशोदेशींच्या आकडेवारीच्या

† रिझर्व बँक ऑफ इंडिया वित्त अध्यासन प्राध्यापक आणि प्रभारी संचालक, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, बी.एम.सी.सी. मार्ग, डेक्कन, पुणे, ४११००४ संपर्क +९१-९८२२२३९६४४
ई-मेल : rajasparchure@gmail.com
†† प्राध्यापक व विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ४१६००४
भ्रमणध्वनी : ९५२३७५०५५५. ई-मेल : dnyanshrinit@gmail.com

साहाय्याने परिस्थितीजन्य वास्तव तपासण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रास्ताविक**

समग्रलक्षी समतोल सिद्धांतावरील आधुनिक चर्चेचे उद्‌भव केन्सच्या (१९३६) सिद्धांतावरील विवादात सापडते. जेथे वित्तीय अर्थव्यवस्थेत श्रमिक बाजारसमेत इतर सर्व बाजारपेठांतील दोष दूर करणाऱ्या आपोआपी यंत्रणेचे अस्तित्व नसते म्हणूनच पूर्ण रोजगार समग्रलक्षी समतोल प्रस्थापित करण्यासाठी राजकोषीय धोरणाच्या माध्यमातून हस्तक्षेप करावा लागतो. पिगू (१९९३,पृष्ठ ३४३-३५१) आणि तद्‌नंतर पॅटिनकिन (१९६५) ने असे प्रतिपादन केले की केन्सचे प्रमेय सैद्धांतिकदृष्ट्या टिकावू नव्हते. कारण त्याने वास्तव संतुलन प्रभावाच्या कार्याकडे दुर्लक्ष केले की ज्याने चलनघटीच्या काळात समग्र मागणी समग्र पुरवठ्याबरहुकूम आपोआपी होण्याचे कार्य पार पाडले असते. तथापि, क्लोअर (१९६५, पृष्ठ १०३-१२५) आणि हान्ह (१९६५, पृष्ठ १२६-१३५) यांनी पॅटिनकिनचा आक्षेप अमान्य केला. कारण पॅटिनकिनच्या प्रतिपादनात पैसा व वस्तू मुळातच वेगवेगळ्या न मानल्यामुळे ‘एका वस्तूस दुसरी वस्तू खरेदी करण्याची परवानगी दिली गेली होती.’ तसेच पॅटिनकिनचा युक्तिवाद अशा भलत्या गृहीतकावर आधारित होता की अतिरिक्त मागणी फले अभिकर्त्यांमधील मुक्ततेशी अपरिवर्तनीय होती. यानंतर हान्ह (१९६५, पृष्ठ १२६-१३५) व ॲरो आणि हान्ह (१९७२) यांनी आणखी पुढे संशोधन करून पैशाला समाधानकारक उपचार देण्याचा प्रयत्न केला की ज्यात अतिरिक्त मागणी फल पैशाच्या वितरणात अपरिवर्तनीय नसल्यामुळे आधुनिक समग्रलक्षी समतोल सिद्धांतात पैशाला जागा नसल्याचे निष्कर्ष निकामी ठरतात की ज्यामध्ये असा युक्तिवाद केला जातो की त्या सिद्धांतात पैशाची आवश्यकता नसते. ऑस्ट्रॉयने (१९७३) नंतर मौद्रिक व मूल्य सिद्धांताचे समाकलन करण्याच्या दुविधांवर विवेचन केले आहे. यात त्याने मान्यताप्राप्त सैद्धांतिक विचार नाहीसे न होता पैसा कसा समोर असावा याविषयीचे विवेचन केले. हान्हने (१९७३) असा निष्कर्ष काढला की पैशासहित अर्थव्यवस्थेच्या समतोलाबद्दल आपण काहीच सांगू शकत नाही. तसेच बिगर वित्तीय अर्थव्यवस्थेबद्दलही कोणी काही युक्तिवाद करू शकत नाही. यानंतर साधारणपणे एक दशकानंतर हान्हने (१९८२) असे मत नोंदविले की, ‘‘अर्थव्यवस्थेच्या सर्वोत्तम विकसित सिद्धांतात पैशाला स्थान असूच शकत नाही’’ आणि पैशाच्या अस्तित्वाविषयी अर्थशास्त्रीय सिद्धांतकारांसमोर हे सर्वात मोठे आव्हान आहे.

गेल्या तीन दशकांतील भौतिक समग्रलक्षी समतोल सिद्धांताची मुख्य चिंता म्हणजे पैशाच्या अस्तित्वाची मूळ कारणे शोधून काढणे आणि समग्रलक्षी समतोल राखू शकणाऱ्या अटी निर्देशित करणे ही राहिली आहेत. या प्रश्नावर सखोल ऊहापोहाचे एक सामान्य वैशिष्ट्य म्हणजे पैसा जरी मूल्यहीन असला तरी मूळ समग्रलक्षी समतोलाच्या गृहीतकात बदल करून धनात्मक विनिमय मूल्य असलेल्या पैशासाठी विनिमयाचे माध्यम म्हणून पैशाला स्थान देण्याचा प्रयत्न केला. याचाच अर्थ असा की समग्रलक्षी समतोल सिद्धांत विवेचनात निर्बंध, भेदभाव, अपूर्णता, असमता, मर्यादा, अकार्यक्षमता इत्यादींचा समावेश करणे होय. समग्रलक्षी समतोल विश्लेषणाच्या प्रमुख व्यूहरचनांत प्रामुख्याने [क्लोअर (१९६७), शाप्ली आणि शुदिक (१९७१, पृष्ठ ९३७-९६८), सार्जेंट (१९८७)], असिम अभिकर्ता असिम क्षितीज प्रमेय, [बेवले

(१९८०), गेल आणि हेल्वींग (१९८४, पृष्ठ ८५-१०७)], अतीव्याप्ती पिढी प्रमेय, [ब्रॉक, (१९७४), वॅलेस (२००१)], क्रमबद्ध अर्थव्यवस्था [हान्ह (१९७१, पृष्ठ ४१७-४३९), लुकास आणि स्टॉकी (१९८७, पृष्ठ ४९१-५१३)], पतसत्यापन व्यय [(वुडफोर्ड (१९७३),(१९८६)], शोध आणि यादृच्छिक जुळणारे प्रमेय [ट्रेगार आणि राइट (१९९५)], सकारात्मक बोली तफावत [डिफी (१९९०)], वैयक्तिक व्यवहारांच्या विभक्त अंदाजपत्रकीय मर्यादा [स्टार्र (२००२)], अपूर्ण बाजारपेठ [मॅगील आणि क्वीनजी, (१९९२, पृष्ठ ३४२)], कास (२००६), अनिश्चितता [केवले (१९८०)], रोखतेची उपयोगिता [ब्रॉक (१९७४, पृष्ठ ७५०-७७७)], कर भरणाकामी पैशाची स्विकारार्हता [स्टारेट (१९७३, पृष्ठ ४३७-४४८)], पॅरेटो वैकल्पिक वाटपासाठी व्यापारावश्यकता इत्यादींचा समावेश होतो. उपरोल्लेखित सर्व सैद्धांतिक व्यूहरचनांचा मागोवा घेऊन गेल याने न्यू पालग्रेव्ह मध्ये (२०१०) 'पैसा आणि समग्रलक्षी समतोल' या लेखात ऑस्ट्रॉय (१९८७) चे अनुमान उद्धृत केले ते म्हणजे; ''आम्ही असा युक्तिवाद करू की वित्तीय व्यवहारांचे समीकरण समग्रलक्षी समतोल सिद्धांताच्या मर्यादांची चाचणी करते'' आणि पुढे असे अनुमान काढले की, ''हे मत जसे वर्तमानात सत्य आहे तसे ते तेव्हाही सत्य होते आणि म्हणून संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पातळीवर वित्तीय व्यवहार प्रक्रिया सिद्धांत विकास प्रक्रियेतील अर्थशास्त्रज्ञांसमोरील हे एक महत्त्वपूर्ण आव्हान ठरते.'' या सर्व वैचारिक मतमतांतरांचे मूळ असलेल्या केन्स प्रमेयावरील विचारमंथनाने एक महत्त्वपूर्ण प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे,''मौद्रिक अर्थव्यवस्थेचे कार्य वस्तुविनिमय अर्थव्यवस्थेपेक्षा मूलभूतरित्या भिन्न आहे काय?'' पैशाचा वापर पूर्ण रोजगार समग्रलक्षी समतोलाच्या अस्तित्वाशी अनुरूप आहे काय? पैसा तटस्थ असतो का? सामान्यत: समग्रलक्षी समतोल सिद्धांतावरील विचारमंथनांच्या पार्श्वभूमीवर या सर्व बाबींचा नक्कीच प्रभाव असणार अणि यावर भर देण्यासाठी योग्य कारणेही आहेतच. एक वस्तू समग्रलक्षी जगतात पैशाला मुळी जागाच नाही. त्यामुळे पैशाच्या आवश्यकतेचा प्रश्नच उद्भवत नाही. असे सहजपणे मानले जाते की लोक पैसे वापरतात. त्यामुळे समग्रलक्षी समतोलाच्या संदर्भात अनिवार्यतेचा प्रश्न निर्माण होतो. म्हणजेच पैशाच्या तटस्थतेच्या विश्लेषणापूर्वी जो घटक मूल्यहीन आहे त्याची मागणी का केली जाते अथवा प्रच्छन्नपणे वापर का केला जातो? परंतु मान्यताप्राप्त समग्रलक्षी समतोल सिद्धांत तेथपर्यंत पोहोचतच नाही. पैशाच्या तटस्थतेवर विवेचन करण्यापूर्वीच हे विश्लेषण अनिवार्यतेच्या प्राथमिक प्रश्नातच अडकले. पर्यायाने विविध विचारप्रणीत समग्रलक्षी विवेचनकारांच्या दृष्टिने तटस्थतेचा मुद्दा विवादास्पदच राहतो. अल्पकाळात अतटस्थतेच्या माध्यमातून पूर्ण तटस्थता परंतु दीर्घकाळात तटस्थता किंवा अपूर्णता आणि ताठरतेशी अतटस्थतेचे सहअस्तित्व असा युक्तिवाद केला गेला.

प्रस्तुत संशोधन टिपण पैशाची आवश्यकता व तटस्थता या दोन्हीही प्रश्नांशी संबंधित आहे. लिऑनटिफच्या खुल्या पद्धतीवर आधारित समग्रलक्षी समतोल सिद्धांताचा याकामी वापर केला आहे. याचे कारण म्हणजे मौद्रिक आणि मूल्य सिद्धांताच्या एकत्रीकरणाच्या विषयावरील जवळजवळ सर्व साहित्य स्थितीशील अर्थव्यवस्था या प्रमेयावर अवलंबून आहे. या धारणेमुळेच निर्मित साहित्यातील परिणामांची योग्य तुलना करता येऊ शकेल. तथापि, अशा फायद्याबरोबरच स्थिर अर्थव्यवस्थेची धारणाही

गंभीर मर्यादांना कारक ठरते. केन्सवादी अर्थशास्त्रातील परिणामकारक निव्वळ बचत आणि गुंतवणुकीची उपक्रमशीलता आणि विशेष म्हणजे गुंतवणुकीची चंचलता अनुपस्थित असली पाहिजे. येथे वाचकांना असे वाटणे नैसर्गिक आहे की अनेक अचल केन्सवादी समग्रलक्षी सिद्धांतांनी सकारात्मक बचत आणि गुंतवणुकीच्या अस्तित्वाशी कसे जुळवून घेतले असेल. याकामी त्यांनी अशी युक्ती वापरली की नवीन गुंतवणूक समग्र मागणीत भर घालू शकते; परंतु उत्पादन व पुरवठा करण्याची क्षमता मात्र धारण करत नाही. उदाहरणार्थ निव्वळ गुंतवणुकीमुळे नावीन्यात भर पडेल परंतु असे लक्षात येते की ते निष्क्रिय राहतील. अशा गुंतवणुकीची प्रक्रिया स्वत: नफा कमावू शकत नसल्यामुळे स्वत:लाच पराभूत करणार नाही का असा प्रश्न निर्माण होतो. कोणत्याही परिस्थितीत प्रस्तुत संशोधन टिपणात वापरल्या जाणाऱ्या लिऑनटिफ प्रमेयाच्या संदर्भात असे अनुमान मान्य केले जाऊच शकत नाही की ज्या अंतर्गत वस्तूंच्या माध्यमातूनच वस्तूंची निर्मिती केली जाते. याचे कारण नवीन गुंतवणुकीची प्रक्रिया आदानात प्रमाणबद्ध योगदान देते. परिणामे उत्पादन वाढ होऊन स्थितिशील अर्थव्यवस्थेच्या गृहीतकाचा पावित्र्यभंग होतो. परंतु लिऑनटिफ प्रमाणे गुंतवणुकीमुळे उत्पादनक्षमता व मागणी दोन्हीही बदलतात कारण वृद्धी अत्यावश्यक आहे. म्हणूनच निव्वळ गुंतवणूक शून्य असेल. तथापि, यावरून असे सहजपणे स्पष्ट होते की, जर अन्वेषणाचे उद्दिष्टच पैशाची आवश्यकता व तटस्थतेच्या तपासणीवर मर्यादित असेल तर निव्वळ गुंतवणुकीच्या अनुपस्थितीचे गृहीत यावर कोणतीही मर्यादा लादू शकत नाही. आणि जर स्थिर प्रमेयाचा प्रारंभिक परिणाम आश्वासक असेल तर अधिक समाधानकारक व गतिमान कथा लिखाणाचा मार्ग सुकर होईल. प्रस्तुत संशोधन टिपणाचे अंतरंग पुढीलप्रमाणे योजले आहेत.

नवअभिजात विवेचनाबरोबरच पैशाच्या अस्तित्वाचे कारण असू शकणाऱ्या किमान अटींचा संच शोधण्याचा प्रयत्न केला आहे. यानंतर विवेचन अशा अटी शोधण्याचा प्रयत्न करते की ज्यामध्ये पैसा जरी आवश्यक असला तरी तो तटस्थदेखील नसतो. प्रस्तुत टिपण एकूण सात भागात विभागले आहे. दुसऱ्या भागात वस्तुविनिमय अर्थव्यवस्थेचे समग्रलक्षी समतोल प्रमेय दर्शविले आहे की ज्यात पैशाच्या अस्तित्वाला स्थान नाही. प्रस्तुत प्रमेय ॲरो–हान्ह (१९७२) च्या पैसाविरहित नवअभिजात प्रमेयाचे समकक्ष म्हणून संबोधले जाऊ शकते. तिसऱ्या विभागात वस्तुविनिमय अर्थव्यवस्थेच्या निम्न आदर्श प्रमेयात पैशाच्या आवश्यकतेच्या अटी शोधण्याचा प्रयत्न केला आहे. चौथ्या आणि पाचव्या विभागात पैसा आणि पतपैशाच्या संदर्भात पैशाच्या तटस्थतेचा प्रश्न चर्चिला आहे. असे दर्शविले आहे की जर पैशाची संपूर्ण मागणी व्यवहार उद्दिष्टासाठीच असेल तर तो तटस्थ असणे आवश्यक आहे (आवश्यकतेबरोबरच).परंतु परिस्थितीमुळे आर्थिक अभिकर्त्यास सावधगिरी किंवा सट्टेबाजीचा उद्देश अतिरिक्त रोखता धारण करण्यास उद्युक्त करत असेल तर पैसा तटस्थ ठरतो. कोणत्या परिस्थितीत समग्रलक्षी असमतोल निर्माण होतो आणि कोणत्या परिणामांनी तो दुरुस्त केला जाऊ शकतो याविषयीचेही विवेचन केले आहे. सहाव्या भागात केन्सच्या सर्वसाधारण प्रमेयाच्या मतमतांतरावर सैद्धांतिक विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. २००७–०८ च्या दर्जाहीन आर्थिक संकट प्रभावित देशांच्या आकडेवारीच्या पुराव्याच्या साहाय्याने सातव्या भागात सैद्धांतिक व परिस्थितीजन्य तथ्यांच्या साहाय्याने अनुभवाधिष्ठित चाचणी घेऊन

एकूणच टिपणाचे निष्कर्ष व अनुमान मांडले आहे.

**२. समग्रलक्षी समतोल : आदर्श वस्तूविनिमयाची अर्थव्यवस्था**

अभिजात प्रमेयाची उत्पादन बाजू स्थिर मुक्त लिऑनटिफ प्रमेयाद्वारे वर्णन केली जाईल जी उद्योगांच्या पर्यायी आवश्यकता आणि कामगार कुटुंबाच्या अंतिम उपभोग्य मागण्या पूर्ण करण्यासाठी पुरेसे स्थूल उत्पादन निर्माण करते. यामुळे प्रस्तुत विषयावरील विविध आणि विशाल साहित्य उपलब्ध असलेल्या या संशोधन टिपणाचे संकुचन सुलभ होईल. अंतिम उपभोग्य मागण्या निश्चित एंजल्स गुणकाद्वारे व्यक्त केल्या आहेत. हे उपभोगत्यांच्या मागणीचे सर्वात सोप्या पद्धतीचे प्रतिनिधित्व आहे. कारण उत्पन्न व किमतीचे समान शून्य प्रमाण कार्य करते (पैशाविषयीचा भ्रम अनुपस्थित आहे). शास्त्रीयदृष्ट्या अधिक सामान्य अनुभवाच्या दृष्टीने अधिक संतोषजनक मागणी प्रणाली जसे की एकरेषीय व्ययप्रणाली किंवा अनुभवाधिष्ठित आदर्श मागणी प्रणाली वापरल्यास प्रस्तुत टिपणाच्या निष्कर्षावर भौतिकदृष्ट्या कोणताही प्रभाव पडणार नाही. असे दर्शविता येऊ शकते की, प्रस्तुत आर्थिक प्रणालीत पूर्ण रोजगार पातळीवर एक अद्वितीय सकारात्मक संतुलन आहे.

किंमत प्रणाली पुढीलप्रमाणे;

$$PA + wL = P \qquad (1)$$

जेव्हा A आदान-प्रदान गुणकांची सारणी आहे की जे आर्थिक व्यवहार अटींचे समाधान करते; L आणि P श्रम गुणांक राशी आहेत आणि w मजुरी दर आहे. किमतीपैकी एक अंकिय आणि सापेक्ष किमतीचे एक अद्वितीय सकारात्मक निराकरण म्हणून निश्चित केले जाऊ शकते व वास्तव वेतन दर समीकरण एक वरून प्राप्त होऊ शकते. L* प्रचलित किंमत यंत्रणेनुसार निश्चित वास्तव वेतन दराप्रमाणे म्हणजे एकूण श्रमिकांचा पुरवठा मानूयात. जर L* इतक्या श्रमिकांना रोजगार दिला तर वास्तव राष्ट्रीय उत्पन्न $Y=wL^*$ असेल. याप्रमाणे या वस्तूच्या अंतिम उपभोगाकरिताच्या मात्रा पुढीलप्रमाणे असतील.

$$Ci = \frac{\alpha i w l^*}{p_i} \qquad \Sigma\alpha_i = 1 \qquad (2)$$

उपरोल्लेखित उपभोग मागणीचे समाधान करणारे स्थूल उत्पादन निम्नउर्ध्वृतप्रमाणे असेल

$$X = (I - A)^{-1}C \qquad (3)$$

यामध्ये X आणि C स्तंभ राशी आहेत. वस्तूंसाठीची बाजारपेठ साफ निर्मित आहे. आता असे दर्शविण्याची आवश्यकता आहे की (P,w,X) पूर्ण रोजगार सुनिश्चितीकरण आवश्यक आहे. आणि हे सहजतेने केले जाते. उत्पादनाची X राशी उत्पादित करण्यासाठी आवश्यक श्रमसंख्या पुढीलप्रमाणे;

$$LX = L(I - A)^{-1}C$$

(१) वरून आपणास हे माहीत आहे $P=wL(I-A)^{-1}$ म्हणून

$$wLX = wL\,(I-A)^{-1}\,C = PC = \Sigma\,\frac{p_i\,\alpha_i\,wl^*}{p_i} = wL^*$$

आणि $LX = L^*$

म्हणजे सफल X इतके उत्पादित करण्यासाठी आवश्यक श्रमाची मागणी L* द्वारा पुरविल्या जाणाऱ्या श्रमाच्या बरोबरीने आहे. परिणामी १ आणि ३ मध्ये n किंमत समीकरणे आणि n1 उत्पादन समीकरणे आहेत जे 2n चले निर्धारित करतात. n-1 तुलनात्मक किमती, 1 वास्तव वेतन दर आणि n उत्पादन. (१), (२) आणि (३) चे निराकरण म्हणजे पूर्ण रोजगार बाजार समतोल.

(१), (२) आणि (३) मध्ये वर्णन केलेले आर्थिक जगत सत्य असणे हे खूपच उत्तम आहे. या

आर्थिक प्रणालीत पैशाच्या अस्तित्वाला कोणतेही स्थान नाही. सर्व वस्तू आणि श्रमाचा एक दुसऱ्यासाठी सातत्याने विनिमय केला जातो. प्रत्येक अभिकर्ता N उद्योगात काम करणारे F संयत्र किंवा H कुटुंबे की जे श्रमाचा पुरवठा करतात. कोणत्याही व्ययाविरहित वस्तूविनिमय करतात. संख्यामान प्रकाराचे प्रमाण सिद्धांत समीकरण पुढीलप्रमाणे;

$$M_d = \Sigma m_i p_i X_i + m_H w L^* = M^* \qquad (4)$$

जेव्हा mi आणि mH औद्योगिक विक्री आणि कौटुंबिक उत्पन्न/कमाईचे प्रमाण असते आणि M* पैशाचा पुरवठा यांना n पैशातील किमतीसाठी एकत्रित केले जाऊ शकतात. 1 पैशातील वेतन दर आणि n उत्पादित परंतु (१), (२) आणि (३) पासून मिळविलेले उत्तर कोणत्याही प्रकारे वेगळे असत नाही. पर्यायाने उपरोल्लेखित समीकरणातील पैसा असून नसल्यासम आहे. म्हणजेच पैसा अनावश्यक तर आहेच; परंतु त्याचबरोबर तो अर्थहीन तटस्थही आहे. परंतु हा पैसा कोणाकडूनही धारण केला जात नाही. हा पैसा उद्योगांच्या किमती अथवा कुटुंबांच्या मागणी समीकरणांत दिसून येत नाही. वास्तव आणि मौद्रिक क्षेत्रात अगदी अभिजात औपचारिकता दिसून येते. या व्यवस्थेत पैसाही एक आवश्यक भर आहे हे आश्चर्याचे नाही. व्यवहार व्ययाच्या अनुपस्थितीत ज्याची आवश्यकता व्यवहार व्यय कमी करण्याच्या क्षमतेतून मिळविली जाते. पैसा पूर्णपणे अनावश्यक असण्याबरोबरच तो पूर्णपणे तटस्थही आहे. पियेरो स्राफाच्या शब्दात (१९३२) ''.... अशी अवस्था की ज्यामध्ये पैसा तटस्थ आहे ती अवस्था अशा परिस्थितीसारखी आहे की जेथे पैसा अजिबात नाही.....''

## ३. पैसा का व कशासाठी?

आदर्शीकृत वस्तू विनिमयाची अर्थव्यवस्था अशा व्यवहारतंत्राचे संचलन करते की जे इतके कार्यक्षम आहे की त्यामुळे पैशासारख्या कमी कार्यक्षम माध्यमाची आवश्यकता भासत नाही (आपले असे स्वप्न असू शकते की कधीकाळी आपण अशा आदर्शवादी अर्थव्यवस्थेत राहणार आहोत). आवश्यक पैशाच्या उदयाचे विश्लेषण करण्यासाठी काय आवश्यक आहे ते (१), (२) आणि (३) पेक्षा कमी आदर्श जगासारखे आहे. म्हणूनच आर्थिक जीवनाची कठोर वैशिष्ट्ये की ज्याचे प्रतिनिधित्व अभिकर्ते वास्तव वस्तू विनिमयाच्या अर्थव्यवस्थेत करतात ते अर्थव्यवस्थेच्या प्रमेयात दिसून आली पाहिजेत. जर त्यातून पैशाचा उगम होणार असेल तर अखेर काय तर पैसाही एक व्यवहार व्यय कमी करून व्यवहार शक्य करणारी तांत्रिक संस्थात्मक व्यवस्था निर्माण केलेली आहे आणि म्हणूनच ती टिकाऊपणा, विभाजनक्षमता असे असामान्य गुणधर्म असलेली वस्तू असणे आवश्यक आहे. जी व्यवहार व्यय कमी करणे शक्य करेल आणि त्यामुळे ती व्यवहाराचे माध्यम म्हणून सर्वसामान्य स्वीकारार्ह पावेल तसेच मौद्रिक संरचनाही की ज्या मौद्रिक देयकांची व्यवस्था पाहतात त्यांनाही स्वीकारार्ह असेल. तर प्रथम आपण वस्तू विनिमय अर्थव्यवस्थेची कल्पना करूया की ज्यामध्ये वस्तूंचा वापर मौद्रिक कार्य करण्यासाठी केला जातो. इच्छेच्या/गरजांच्या दुहेरी संयोगाच्या अनुपस्थितीत प्रत्येक अभिकर्त्यास सर्वसाधारणपणे प्रत्येक वस्तूचा साठा वेगळेपणाने जवळ बाळगणे आवश्यक असेल $S_{ik}$ $(k=1---F+H)$ कारण जशा की त्या वस्तू फक्त व्यवहार शक्य करण्यासाठीच आहेत. समजा प्रत्येक वस्तूशी संबंधित साठवण, सुरक्षा, वाहतूक, बिघाड,

क्षय/घसारा, नुकसान, चोरी आणि अपव्ययाची वार्षिक किंमत $t_{ik}$ *(k=1 --- F+H)* अशी आहे व ती किंमत ही वस्तूच्या स्वरूपातच आदा केली जाते. तर K जनित्राचा योग $\Sigma t_{ik}S_{ik}$ ला जर उद्योग j च्या उत्पादनाद्वारे भागले तर तो गुणांक $t_{ij}$ असेल की जो j उद्योगाचा वर्षभरातील व्यवहार पार पाडण्यासाठीचा i च्या स्वरूपातील साठ्याचा खर्च दर्शविल. अशा परिस्थितीत वस्तूविनिमय अर्थव्यवस्थेकरिता स्थूल आदान-प्रदान गुणक निम्न उर्ध्वृतप्रमाणे असेल;

$$A_B = A + T = a_{ij} + t_{ij}, \qquad i, j=1....n$$

जी कुटुंबे व्यवहारहेतू वस्तू साठा करतात आणि त्यावर त्यांना तदानुषंगिक व्यय येतात त्यांचे निव्वळ व्ययशक्य वेतन उत्पन्नात निम्नउल्लेखित घट होईल....

$$w_N L^* = wL^* - \Sigma_i \Sigma_h t_{ih} S_{ih} p_i \qquad h=1....H$$

अशाप्रकारे (१), (२) आणि (३) पेक्षा वस्तूविनिमयाच्या अर्थव्यवस्थेचे अधिक यथार्थ विवेचन निम्नउर्ध्वृतप्रमाणे मिळते;

$$P_B = P_B A_B + wL \qquad (1')$$

$$C_{iB} = \frac{\alpha_i w_N L^*}{p_{iB}} \quad \Sigma \alpha_i = 1 \qquad (2')$$

$$X_B = (I-A_B)-1C_B \qquad (3')$$

जर $I + A_B$ सफल क्षमता अटी पूर्ण करते तर प्रस्तुत प्रणाली अद्वितीय सकारात्मक समतोल प्रादन करेल. परंतु प्रस्तुत प्रणाली अशी असेल की ज्याचे पर्यवसन प्रणाली (१), (२) आणि (३) पेक्षा जास्त किमती, न्यून उत्पादन आणि न्यून वास्तव उत्पन्नात होईल. कारण $A_B > A$ आणि $w_N < w$ म्हणजेच $P_B w > P/w$, $C_B < C$ आणि $X_B < X$.

अशी एखादी वस्तू (किंवा वस्तूंचा एक छोटा संच) सापडला तर की ज्याचा व्यवहार व्यय सर्वात कमी $t_{mk} < t_{ik}$ *(i#m)* असेल तर संपूर्ण अर्थव्यवस्थेत व्यवहारासाठी लागणाऱ्या वस्तूच्या साठ्याची संख्या *N(F+H)* पासून *F+H* पर्यंत कमी होईल. अर्थात २ च्या बलापासून (१) च्या बलापर्यंत कडक कपात आणि म्हणून अशी/ही वस्तू व्यवहार माध्यम म्हणून कार्य करू शकते. (अशी वस्तू की जी टिकावू, सोईस्कर, विभाज्य, निंदनीय असेल ती पैसा म्हणून कार्य करण्यास अधिक सोईची असेल. अर्थात जर ती व्यवहाराचे आदर्श/चांगले माध्यम असेल तर ती मूल्य संचयाचेही आदर्श/चांगले माध्यम असते). अशा प्रकारे वस्तू पैशाच्या अस्तित्वाची आवश्यक अट निम्नउर्ध्वृतप्रमाणे नमूद केली जाऊ शकते.

$$\Sigma t_{mk} p_m < \Sigma t_{ik} p_i \qquad k=1,....F+H$$

एक वस्तू पैसा अर्थव्यवस्थेत आदान-प्रदान सारणी $AM = A +$ स्तंभ $(t_{mi})$ आणि $w_n L^* = wL^* - \Sigma t_{mk} p_m$ अशी असेल. जर आपण सकारण असा विचार केला की; $A_B > A_M > A$ तर आपणास $C_B < C_M < C, P_B/w > P_M/w > P/w$ आणि $X_B < X_M < X$ मिळेल. येथे वास्तविक वस्तूविनिमय अर्थव्यवस्थेपेक्षा (१), (२) आणि (३) वस्तू पैसा अर्थव्यवस्था अधिक प्रभावी आहे परंतु ती (१), (२) आणि (३) पेक्षा आदर्श वस्तूविनिमयाच्या अर्थव्यवस्थेपेक्षा कमी प्रभावी आहे की ज्यासाठी $t_{ik} = 0$. समजा सोने (प्रामाणित प्रमाणात धातूचे प्रमाण आणि धातूच्या गुणवत्ता स्वरूपात) पैसा म्हणून कार्य करत असलेल्या धातू पैशाच्या अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता अधिक सुधारता येऊ शकते. साठवण, सुरक्षा आणि वाहतूक व्ययात अधिक कपात करण्यासाठी विकेंद्रितपणे बाळगलेला पैशाचा साठा *F+H* व्ययात अधिक कपात करण्यासाठी एका बँकेत केला जाऊ शकतो; परंतु असे करणेही कार्यक्षमतेच्या दृष्टिने योग्य नाही. कारण मग प्रत्येक अभिकर्त्यास दिवसभराचे व्यवहार पार

पाडण्यासाठीचे आवश्यक सोने काढण्यासाठी एकदा आणि दिवसाचे शेवटी जमा झालेले सोने बँकेत ठेवण्यासाठी पुन्हा एकदा अशा दिवसाकाठी दोन फेऱ्या बँकेत माराव्या लागतील. म्हणजेच एकूण 2(F+H) फेऱ्या ज्याचा वाहतूक आणि वाहतूक सुरक्षा व्ययात समावेश होईल. जर सोन्याच्या ठेवीच्या बदल्यात बँकेने धारक चलन नोटा जारी केल्या (आणि आवश्यकता भासेल तेव्हा परिवर्तनाची ग्वाही दिली) तर यामुळे व्ययात अधिक कपात होईल. अर्थात धनादेश पुस्तिका, सर्व वेळ, पैसा यंत्राची (ATM) स्थापना आणि ई-बँकींगच्या माध्यमातून या व्ययात अधिक कपात करता येऊ शकते. त्याचवेळी अनेक बँकांच्या ठेवी केंद्रस्थानी एकाच मध्यवर्ती बँकेत की जी बँक समान दर्जा असलेल्या चलनी नोटा पारीत करून वटनवळीची सुविधा देईल आणि त्याच्या माध्यमातून आंतरक्षेत्रीय देयकांचा व्यय कमी केला जाऊ शकतो किंवा पर्याप्त पातळीवर आणला जाऊ शकतो. या बिंदूवर मौद्रिक तंत्रज्ञान इतकी उच्चतम पातळी गाठते की अशावेळी सरकारने मध्यवर्ती बँकेचे राष्ट्रीयीकरण करून सर्व सोन्याचा साठा काबीज केला, चलनी नोटांचे सोन्यातील रूपांतरण रद्दबातल ठरविले आणि स्वाक्षरीच्या विशेषाधिकाराचा फायदा उठवत स्वत:च चलनी नोटा आदा केल्या तरी लोकांना अनुचित वाटत नाही. ही अशी मौद्रिक यंत्रणा आहे की ज्यामध्ये पैसा वस्तू आणि श्रमापासून पूर्णपणे अलिप्त आणि वेगळा केला जातो की ज्यांची वर्तणूक आधुनिक मौद्रिक अर्थशास्त्राची महत्त्वाची व प्रमुख चिंता होईल.

**४. चलनी पैसा**

या टप्प्यावर अगदी असे समजावे की बँका फक्त चलनी नोटांमध्येच देयक प्रणालीचे व्यवस्थापन करतात (पतपैशाविषयीचे विश्लेषण पुढील भागात केले जाईल). लेखा, सुरक्षितता, खात्यावरून नगद काढणे किंवा पूर्णवेळ पैसा यंत्रातून (ATM) पैसे काढणे, धनादेश पुस्तिका जारी करणे, वटनावळ सेवा, जीर्ण नोटा बदलून देणे इत्यादी सेवा पुरविताना बँकांना जो व्यय होईल तो प्रती रुपया ठेवीवर शुल्क लावून वसूल केला जाईल. किंमत यंत्रणेत अशा बिगरवस्तू पैशाची सुरुवात अत्यंत काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. वस्तूंचे उत्पादन सुकर करण्याकामी पैशाचा वापर केला जातो परंतु उत्पादन प्रक्रियेत त्याचा कोणताही वापर होत नाही. ॲडम स्मिथने आम्हाला अनेक वर्षांपूर्वी असे शिकवून ठेवले आहे की; ''पैसा ही समाजाच्या सर्वसाधारण साठ्याची शाखा आहे. परंतु तो काही असा पदार्थ नाही की ज्यावर काही प्रक्रिया करता येऊ शकेल. ना की तो एखादे हत्यार आहे की ज्याच्या साहाय्याने काही कार्य करता येऊ शकेल. असा तो विलक्षण आहे'' (स्मिथ, १७७६, खंड II, प्रकरण II). अशा प्रकारे फक्त मौद्रिक साठा धारण आणि मौद्रिक वापराशी संबंधित थेट व्ययांचाच प्रवेश किंमत समीकरणात होऊ शकतो. अर्थव्यवस्थेसाठीची किंमत समीकरणे निम्नउर्ध्वृतप्रमाणे आहेत;

$$p_C m_i p_i X_i + A_{jt} p_j + wL_i = p_i X_i \quad (5)$$

$$\Sigma A_{jc} p_j + wL_c = p_C M^* \quad (6)$$

$$\Sigma m_i p_i X_i + m_H wL^* = M^* \quad (7)$$

दुसऱ्या शब्दात आदानप्रदान गुणक सारणीचे वाचन $A_C = A + diag\,(p_c m_i)$ आणि असे गृहीत धरावे की $t_{ck} = 0$ (नोटा आणि ठेवी नगण्य किंवा शून्य नाशवंत असतात) $p_c m_i < t_{mi} p_m$ प्रत्येक उद्योगासाठी $i$ आणि $\Sigma p_c m_H wL^* < \Sigma t_{mk} p_m k = 1 --- H$ ज्यामध्ये pc प्रती रुपया बँक ठेवीवरील शुल्क आहे. येथे उत्पादन किंमत यंत्रणेत पैशाच्या अनिवार्यतेमुळे समीकरणात पैशाचा प्रवेश होतो की जो (१), (२) आणि (३)

मध्ये नव्हता. समीकरण (५) आणि (६) ची प्रत्येकी आवश्यकता अशी आहे की उद्योग आणि बँकांच्या विक्री मिळकतीतून त्यांचे व्यय पूर्ण झाले पाहिजेत आणि समीकरण (७) ची आवश्यकता अशी आहे की पैशासाठी बाजारपेठ तयार असावी. $L^* = \Sigma L_i + Lc$ हे आता एकूण श्रम आहेत. मग अंतिम मागणी आणि अंतिम मागणी पूर्ण करण्यासाठी आवश्यक एकूण उत्पादन निम्नउर्ध्वृतप्रमाणे आहेत;

$$Fi = \frac{\alpha_i(wL^* - p_c m_H wL^*)}{p_i} + A_{ic}\ \Sigma\ \alpha_i = 1 \qquad (8)$$

$$X = (I-A)^{-1}F \qquad (9)$$

हे लक्षात घेतले पाहिजे की बँक सेवांचे व्यय गुणांक किंमत समीकरणात दिसतात. परंतु उत्पादन समीकरणात ८(b) दिसणार नाहीत. अर्थात बँक सेवाशुल्क जे कुटुंबाचे निव्वळ उत्पन्न आणि त्यांच्या अंतिम उपभोग मागण्या कमी करते तसेच बँकींग क्षेत्रातील वस्तू आदान आवश्यकता कमी करते. यामुळे ८(b) मधील X निराकरणात प्रभावीत होईल. $p_c$ आणि $p_i$ दोन्हीही अज्ञात बाकी उत्पादने असल्यासारखे भासल्याने किंमत समीकरणे (५) अरेषीय बनतात. परंतु यामुळे काहीच समस्या निर्माण होत नाही. पुनरावृत्तीचे समाधान नेहमीच शक्य असते. समीकरणाची ५ ते ९ प्रणाली n वस्तूंच्या पैशातील किमती, n उत्पादने, $p_c$ बँक शुल्क आणि w पैशातील वेतन दराविषयीचे समतोल समाधान देते जर किंमत प्रणालीच्या मुख्य कर्णकोनात असणाऱ्या $p_c m_i$ अटी आर्थिक व्यवहार्यता सुनिश्चित करण्याकरिता पर्याप्तपणे कमी असतील.

उदाहरणार्थ $D = diag\,(p_c m_i)$ किंमत समीकरण (५) निम्नउर्ध्वृतप्रमाणे सारणीबद्ध लिहिले जाऊ शकते;

$$P(A + D)X + wLX + PX$$

$$wLX + P(I - A)X - PDX$$

समीकरण (९) मधून x ला पर्याय निवडता आपणास पुढील समीकरण मिळेल;

$$wLX = P\,(I - A)\,(I-A)^{-1}\,F - PDX$$
$$= PF - PDX$$

समीकरण (८) मधून आपणास हे माहीत आहे की;

$$PF = (\Sigma\ \alpha_i)[wL^* - p_c m_H wL^*] + PE_c$$

जेथे $E_c$ ही $A_{icl}$ ची सदिश आहे (७) ला $P_c$ ने गुणले आणि $p_c m_H wL^*$ ला पर्याय ठेवले तर असे मिळेल.

$$PF = (\Sigma\ \alpha_i)[wL^* - p_c M^* + PDX] + PE_c$$

आणि $p_c M^*$ चे पर्यायी मूल्य घेऊन समीकरण असे लिहिता येईल

$$= (\Sigma\ \alpha_i)[wL^* - PE_c - wLC + PDX] + PE_c$$

तथापि, आपणास हे अगोदरच माहीत आहे की;

$wLX = PF - PDX$ म्हणून

$$wLX = w(L^* - Lc)(\Sigma\ \alpha_i) + PE_c\ (\Sigma\ \ \alpha_i - 1)PDX$$

जर सर्व उत्पन्न n वस्तूंवर खर्च केले आणि i=1 तर समीकरणाचा बाधारहित पूर्ण रोजगारासहित मौद्रिक समतोल साध्य होतो.

$$LX + Lc = L^* \qquad (10)$$

म्हणजे उद्योग आणि बँकांकडून असणारी श्रमाची मागणी अगदी श्रम उपलब्धतेइतकीच असल्याने पूर्ण रोजगार सामान्य समतोल निर्माण होतो. हे स्पष्ट आहे की, समीकरण ५–९ पासून मिळविलेले मौद्रिक सामान्य समतोल हे (१), (२) व (३) आणि (१'), (२') व (३') द्वारा मिळविलेल्या समतोलांपेक्षा पूर्णपणे वेगळे आहेत. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे की किंमत आणि उत्पादन प्रणाली समीकरण (१) ते (३) आणि (१') ते (३') मध्ये जसे होते

तसे एकमेकांचे हुबेहुब द्विदलीय नाहीत. खरेतर असे म्हटले जाऊ शकते की किंमत आणि उत्पादन प्रणालीची द्विदलता हे आदर्श किंवा निम्न आदर्श वस्तुविनियम अर्थव्यवस्थेचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. मौद्रिक अर्थव्यवस्था या फरकाने अेळखल्या जातात की त्यांच्या किंमत आणि उत्पादन प्रणाली एकमेकांशी अचूक दुहेरी नसतात. आपण चर्चा करीत असलेल्या चलनी अर्थव्यवस्थेची उत्पादन निर्धारण सारणी A आहे; परंतु किमती निर्धारण सारणी A+d आहे. पैसा किंवा मौद्रिक संख्यांचा वापर व्यय हा व्यय-किंमत प्रणालीत अंतर्भूत आहे; परंतु वस्तुविनिमय अर्थव्यवस्थांच्या विभाग ३ प्रमाणे उत्पादन प्रणालीत ते दिसून येत नाही. याचा अर्थ असा की व्यवहारांसाठी मौद्रिक तंत्रज्ञानाच्या वापराने आर्थिक यंत्रणेने आपली उत्पादन तंत्रे पूर्ण कार्यक्षमतेने कार्यान्वित करण्यास सक्षम केले आहे. आता आपण असा विचार करू शकतो की;

$AB > Am > Ac = A$ म्हणून

$XB < Xm < Xc < X$, $CB > Cm > Cc > C$ आणि

$$\frac{P_B}{w} > \frac{P_m}{w} > \frac{P_c}{w} > \frac{P}{w}$$

चलनी अर्थव्यवस्था वस्तुविनियम अर्थव्यवस्थेपेक्षा जास्त आणि एक वस्तू मौद्रिक अर्थव्यवस्था कमी वास्तव किमतीस उत्पादन निर्गमित करते. नव वालरासवादी सिद्धांत मौद्रिक व्यवहारांचे वस्तुविनिमयाच्या तुलनेत असणारे फायदे कैद करण्यात अपयशी ठरतो; कारण त्यात व्ययाधारित किमती आणि उत्पादनाधारित उत्पन्नाच्या मांडणीचा अभाव आहे.

कल्याणार्थाने चलनी पैशासह पूर्ण रोजगार समतोल वस्तुविनिमय अर्थव्यवस्थेअंतर्गत (१'), (२') आणि (३') द्वारा विश्लेषित दुष्ट समतोलास सरस ठरतो. प्रस्तुत निष्कर्ष नववालरास निष्कर्षाचा विरोधाभास आहे ज्याने सकारात्मक विनियम मूल्यासह आवश्यक पैशाच्या ओळखीचे रूपांतर साधारण पॅरेटो अकार्यक्षम वाटपामध्ये होते (स्टार, २०१०). आवश्यक चलनी (ज्यात व्यवहार व्यय अंतर्भूत आहे) पैसा व्यवस्थेची तुलना (१), (२) आणि (३) मधील व्यवहार व्यय पूर्णपणे अनुपस्थित असलेल्या आदर्श वस्तुविनिमय समतोलाशी केली तरच हे अनुमान शाश्वत असेल. पण मग निष्कर्ष निश्चितपणे अनाठायी असल्याचे स्पष्ट आहे.

या यंत्रणेतील पैशाच्या तटस्थेबद्दल काय म्हणता येईल? याचे उतर पुढील बाबींवर निर्धारित असेल;

अ) ज्या पद्धतीने आणि उद्देशाकरिता पैशाच्या पुरवठ्यात बदल केला आहे आणि ब) देयक बँकाद्वारे वापरलेले तंत्रज्ञान. समजा, जर सरकारने हेलिकॉप्टरद्वारा पैसे टाकून पैशाचा पुरवठा दुप्पट केला आणि अशा परिस्थितीत देयक बँकाच नसतील तर पैशातील किमती आणि पैशातील वेतन हे दोन्हीही दुप्पट होऊन त्याचा काहीच परिणाम होणार नाही. परंतु जर देयक बँका अस्तित्वात असतील आणि सरकारने पैशाचा पुरवठा दुप्पट केला तर मग मात्र समसमान प्रभाव झाल्याचे निदर्शनास येईल. परंतु जर सरकारने एखाद-दुसरी वस्तू खरेदी करून अर्थव्यवस्थेत पैशाचा ओघ वाढवला तर उत्पादन रचनेत बदल होऊन ती तुटीचा अर्थभरणा सुरू आहे तोपर्यंत चालू राहील. परंतु जेव्हा खाजगी क्षेत्राद्वारा संपूर्ण पैसा शोषला जाईल तेव्हा किमती आणि वेतन दर दुप्पट होऊन संपूर्ण यंत्रणा पुन्हा मूळ समतोलावर परतेल. जर तेथे देयक बँका असतील पण त्या वाढलेल्या पैशाचा साठा कोणतेही अतिरिक्त आदाने किंवा मानवी श्रमविरहित त्याचे व्यवस्थापन करतील तर सर्व किमती व वेतने दुप्पट होतील. परंतु वस्तूंची

उत्पादने, भ्रमणवेग आणि बँक शुल्कात कोणताही बदल होत नाही. तथापि, बँकांना अतिरिक्त आदाने किंवा श्रम आवश्यक असतील तर तुलनात्मक किमती व वास्तव वेतन दर घट आणि उत्पादनासाठी उद्योगांना कमी श्रम उपलब्ध असलेल्या प्रमाणात उत्पादनात घट होऊन एक नवीन समतोल निर्माण होईल. तसेच बँक शुल्क वाढल्यामुळे उपभोगत्यांच्या व्ययशक्य शुल्कवाढीमुळे ज्या वस्तूंच्या उत्पादनात उद्योगांना प्रती नग उत्पादनाकरिता वस्तू आदाने व श्रमाच्या तुलनेत अधिक पैसा लागेल त्या वस्तूंच्या किमती बँक शुल्क वाढल्यामुळे वाढतील. अर्थात जेव्हा कोणत्याही वास्तविक अर्थव्यवस्थेत असे समजले जाते की, उर्वरित अर्थव्यवस्थेच्या तुलनेत बँकींग व्यवस्थेची एकूण आदाने आणि श्रमाची निकडही अत्यंत दुर्लक्षणीय आहे अशी अतटस्थतेपासूनची फारकत अनुल्लेखनीय ठरते.

पूर्वगामी चर्चेतून अभिजात मौद्रिक सिद्धांतकारांनी असा निष्कर्ष काढला की पैसा आवश्यक व तटस्थही आहे. अभिजात मौद्रिक विचारवंत यामुळे निश्चित भारावलेले होते. सरकारने वितरित केलेली अपरिवर्तनीय तरता पूर्णपणे कल्पित पदार्थ आहे. ती एक फक्त कल्पना आहे. पण कारण ती अशी कल्पना आहे की ज्यावर आर्थिक अभिकर्ते आपला सामूहिक विश्वास व्यक्त करतात म्हणून त्याचा वापर मोठ्या प्रमाणात ऐहिक आर्थिक कल्याण साधतो (अधिक उत्पादन आणि कमी किमती). जर या व्यतिरिक्त तो कोणत्याही आवंटीत प्रक्रिया विकृत करत नसेल तर तो तटस्थदेखील आहे. अर्थात बिगर हानीकारक होय. आधुनिक पैशाला अशा प्रकारे पूर्णपणे काल्पनिक कल्पना असल्याचे दर्शविण्यात आले होते. तरीही त्याने समाजाला बिगरव्ययी तथा धोकेरहित भरीव आर्थिक फायदे दिले. या संदर्भात पैशाच्या कल्पनेची कल्पना देवाच्या कल्पनेशी बरोबरी करताना जाणवली.

परंतु नंतर किंवा योग्यवेळी प्रश्न विचारले गेलेच. हा निष्कर्ष सामान्यत: वैध आहे का? हे सर्व वेळी आणि सर्व परिस्थितींमध्ये असते का? किंवा काल्पनिक परिस्थिती आहे ज्यामध्ये असे नसते? असे असल्यास ते काय आहे? समीकरणाच्या पूर्ण रोजगार समतोल (१०) अस्तित्वाच्या एका गृहीतकात असे आहे की, सर्व व्ययशक्य उत्पन्न पूर्णपणे उत्पादित वस्तूंवर खर्च केले जाते. परंतु असे होत नसेल तर काय? जर कमाई करणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या उत्पन्नाचा काही भाग फक्त पैशासाठी किंवा रोखतेसाठी म्हणून स्वत:जवळ ठेवण्याचा निर्णय घेतला तर? असे समजा;

$$\alpha_c[wL^*-p_c m_H wL^*]=\Delta c\ \Sigma\alpha_i<1 \qquad i=1\ldots4$$

याचा तात्काळ परिणाम असा आहे की, उत्पादनाची पूर्ण रोजगार उत्पादन पातळी टिकवून ठेवता येत नाही आणि पूर्ण रोजगार पातळीही टिकणार नाही. समीकरणात (१०) श्रमाची मागणी $(\Sigma\alpha_i)L^*$ अशी घटते की जी $\Sigma\alpha_i<1$ च्या संदर्भात $L^*$ पेक्षा कमी आहे. याचा परिणाम म्हणजे चलनघटीची फट की ज्याचा आकार;

$$w[L^*-(LX+Lc)=(1-\Sigma\alpha_i)[w(L^*-Lc)-PEc+PDX] \qquad (11)$$

........असा असेल.

व्यवहार करण्याव्यतिरिक्त समजा सावधगिरी किंवा सट्टेबाजीच्या उद्देशाने रोख जवळ बाळगण्यास स्पष्टीकरणाची आवश्यकता आहे. कारण वस्तू उपभोगाचा त्याग करून सामान्य आर्थिक परिस्थितीत निष्क्रिय रोख बाळगण्यास फारसा अर्थ असत नाही. परंतु अशा काही परिस्थिती असतात की, असा पैसा बाळगणाऱ्यांना पैशाचे मूल्यसंचय कार्य तात्काळ

व्यवहार माध्यमाच्या कार्यापेक्षा अधिक समाधान व सुरक्षा देऊ करते. सामान्यत: जेव्हा भविष्यातील व्यवहारांबद्दल भय निर्माण होते, व्यवहार कसुरीची भीती व वित्तीय आणि बिगर वित्तीय संस्थांच्या दिवाळखोरी, कामगार कपात व बेरोजगारीच्या भीती आणि मालमत्तेच्या मूल्यघटीची धास्ती इत्यादी बाबींमुळे उद्‌भवू शकणाऱ्या संभाव्य अडचणींवर मात करण्याकामी लोक पैसा जवळ बाळगतात. विंडबन हे आहे की याचे पर्यवसन आत्मनिर्भर भविष्याकडे वळते. निम्नउध्दृत अंकीय उदाहरण मौद्रिक सामान्य समतोलाचे स्वरूप विश्लेषित करते. तसेच ते कोणत्या परिस्थितीत सामान्य समतोल बिघडतो आणि त्यास पुनर्स्थापित करणारी योजना/धोरणही सुचविते.

$$\begin{pmatrix} 0.05 & 0.1 & 0.1 & 0.15 \\ 0.25 & 0.30 & 0.15 & 0.25 \\ 0.2 & 0.25 & 0 & 0.15 \end{pmatrix} \quad L=(0.5, 2, 1, 4) \quad mI=(0.05, 0.01, 0.025, 0.04)$$

$$0.1 \quad 0.05 \quad 0.075 \quad 0.1 \qquad m_H = 0.3$$

$A_{ic}$ = (0.5, 0.1, 0.15, 0.25) $L_C$= 5

L* = 100 M*= 100 ai = 0.25 (i=1…4)

सारणी क्रमांक एक (१) मध्ये समतोल किमती, बँक शुल्क, वेतन दर आणि समतोल पातळीवर निर्मित स्थूल उत्पादन दर्शविले आहे. चौथा स्तंभ असे दर्शवितो की; $LX+L_C = L^* = 100$ म्हणजे तो समतोल पूर्ण रोजगारासहित मिळविला आहे. K आणि Y चे मूल्य परिणाम भांडवल साठा आणि निव्वळ राष्ट्रीय उत्पादन दर्शवितात.

$K = P_c\Sigma m_i p_i X_i - \Sigma\Sigma A_{jt} p_j + \Sigma A_{jc} p_j + wL_c$

$Y = wL^* = \Sigma p_i X_i + p_c M^* - \Sigma m_i p_i X_i - \Sigma\Sigma A_{jt} p_j - \Sigma A_{jc} p_j$

आणि Vc व Vy देयक व्यवस्थापनासाठी पैशाचे व्यवहार व उत्पन्न भ्रमणवेग आहेत. जर पैशाचा पुरवठा दुप्पट झाला/केला परंतु बँकींग क्षेत्राला अधिकचे श्रम अथवा इतर कोणतीही अधिकची आदाने आवश्यक नसतील तर निम्नउध्दृत सारणी क्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे समतोल साधला जाईल.

जर असे मानले की; $\alpha_i = 0.2$ (i = 1....4) आणि ? $\alpha_C = 0.2$ चे संबंधित परिणाम सारणी क्रमांक २ मध्ये उध्दृत केले आहेत.

सारणी क्रमांक ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे स्थूल आणि निव्वळ उत्पादनाच्या संदर्भात पैशाच्या भ्रमणवेगात प्रचंड घट झाली आहे. वस्तू बाजारातील अडचणी दूर केल्या आहेत. परंतु श्रमाचा पुरवठा अतिरिक्त आहे. परिणामी श्रमाच्या संदर्भात मापण्यात येणारी चलनघट फट; १०० = ८१.५४९८ = १८.४५०२ आणि मूल्याच्या संदर्भात रुपये २.८५ X १८.४५०२ = रुपये ५२.५८३० इतकी आहे. येथे वॉलरास प्रमेय सिद्ध होते. असे दिसते की नगदीकरिता पैशाची अतिरिक्त मागणी; $\alpha_C\,(wL^* - p_c m_H wL^*)$, की जी (०.२) (२.८५) (१००) (१ – (०.२५८३) (०.३) अतिरिक्त श्रम पुरवठ्याच्या मूल्याइतकी $w(L^*\text{-}L_d)$ जी (२.८५) (१०० % ८१.५४९८) अशी आहे. जर दुसऱ्या बाजूला आपण सर्व उद्योगांत रोजगार १०० वर राहण्याची सक्ती केली तर एखाद्या किंवा सर्वच वस्तूंचा अतिरिक्त

**सारणी - १**

| | किंमत | उत्पादन | वास्तव वेतनदर $w/P_i$ | |
|---|---|---|---|---|
| $p_1$ | 8.3898 | 13.6759 | 0.3283 | $K = 634.7878$ |
| $p_2$ | 12.9347 | 18.8187 | 0.2129 | $LX + Lc = L^* = 100$ |
| $p_3$ | 6.9724 | 17.9489 | 0.3950 | $Y = wL^* = 275.46$ |
| $p_4$ | 18.6025 | 8.1439 | 0.1480 | $pcm_H wL^* = 20.6255$ |
| $p_c$ | 0.2495 | -- | | $V_G = 6.348$ |
| w | 2.7546 | -- | | $Vy = 2.751$ |

**सारणी - २**

| | किंमत | उत्पादन | वास्तव वेतनदर $w/P_i$ | |
|---|---|---|---|---|
| $p_1$ | 16.7796 | 13.6758 | 0.3283 | $K = 1269.5735$ |
| $p_2$ | 25.8682 | 18.8187 | 0.2129 | $LX + L_c = L^* = 100$ |
| $p_3$ | 13.9449 | 17.9489 | 0.3950 | $Y = wL^* = 550.9361$ |
| $p_4$ | 37.2051 | 8.1439 | 0.1480 | $p_c m_H wL^* = 41.2512$ |
| $p_c$ | 0.2496 | -- | | $V_G = 6.348$ |
| w | 5.5094 | -- | | $V_y = 2.751$ |

**सारणी - ३**

| | किंमत | उत्पादन | वास्तव वेतनदर $w/P_i$ | |
|---|---|---|---|---|
| $p_1$ | 8.6876 | 11.0482 | 0.3280 | $K = 529.4794$ |
| $p_2$ | 13.3869 | 15.1403 | 0.2129 | $LX + L_c = 81.5498$ = Demand for labour $< 100 = L^*$ |
| $p_3$ | 7.2178 | 14.4174 | 0.3948 | $Y = 232.414$ |
| $p_4$ | 19.2576 | 6.5819 | 0.1480 | $p_c m_H wL^* = 20.6255$ |
| $p_c$ | 0.2583 | -- | | $V_G = 5.2947$ |
| w | 2.8500 | -- | | $V_y = 2.324$ |

पुरवठा होईल. असे मानणे नक्कीच अधिक सोयीस्कर आहे की वस्तू बाजारातील दोष दूर केले आहेत आणि तसे करण्याकामी श्रमबाजारास अपयश येते. कारण ना नफा ना तोटा स्थिती टिकविण्यासाठी वस्तू पुरवठादार त्यांचा पुरवठा कमी करून जेवढी मागणी असेल तेवढाच पुरवठा करतील. परंतु अशी यंत्रणा श्रमबाजारास लागू होत नाही. चलनघटीच्या फटीला बेरोजगार समतोल संबोधले जाऊ शकते. ज्यायोगे

बेरोजगारीच्या परिस्थितीत वस्तूबाजारातील दोष दूर केले जातात. जसे केन्स म्हणतो (१९३६, पृष्ठ २३५)...

''बेरोजगारी निर्माण होते, कारण लोक चंद्राची इच्छा बाळगतात; जेव्हा मानवाची इच्छित वस्तू पैसा अशी आहे की ती उत्पादित केली जाऊ शकत नाही अणि ज्याची मागणी सहजपणे बंद केली जाऊ शकत नाही तेव्हा लोकांना रोजगार देता येऊ शकत नाही.'' केन्सने (१९३६, पृष्ठ २३५) त्याच्या अनुमानाचे स्वत:च उत्तर दिले आहे. ''............पैशाची दीर्घ आणि अल्पकालीन उत्पादन लवचिकता शून्य किंवा काहीही केले तरी अत्यंत कमी असते.........पैसा सहजपणे तयार केला जाऊ शकत नाही........ वेतन एककाच्या संदर्भात त्यांची किंमत वाढत असली तरी उद्योजकांना वाढीव पैशाच्या निर्मितीकामी इच्छेप्रमाणे श्रमिकांचा वापर करता येऊ शकत नाही. अपरिवर्तनीय व्यवस्थापित चलनाच्या बाबतीतही या अटीचे पूर्णपणे समाधान होते. फक्त एकच मार्ग आहे की, ज्याद्वारा असमतोल दूर केला जाऊ शकतो व तो म्हणजे सरकारने तुटीचा अर्थभरणा व नोटांची छपाई करून वस्तू व श्रमाची खरेदी करणे.

उदाहरणार्थ, समजा सरकारने चार उद्योगांमधून वस्तू खरेदीचा निर्णय घेतला तर सरकार प्रत्येकी $G_i$=1.0867 इतके चार वस्तूंचे नग खरेदी करते (यांचा समावेश समीकरण 8 (c) मधील अंतिम मागणी राशी F मध्ये केला आहे) यामुळे $\Sigma p_i G_i$ = रुपये ५१.०२९५ इतका खर्च संभवतो व त्यामुळे सारणी क्रमांक ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे समतोल साधला जातो.

असे आपल्या लक्षात येऊ शकते की (सरकारी खरेदीनिर्मित अतिरिक्त मागणीमुळे औद्योगिक उत्पादन वाढ) सर्व भौतिक गुणक एकपेक्षा अधिक आहेत. पैशाचे भ्रमणवेग सारणी १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे पुनर्रचित केले आहे. पैशाच्या अंत:क्षेपणाचा परिणाम अतटस्थ असल्याचे दिसून येते. त्यावेळी वास्तव चलांवर परिणाम होत नाही. मूल्यघटीची फट दूर करण्याकरिता तुटीच्या अर्थभरण्यास पर्यायी इतर अनेक मिश्रणे वापरली जाऊ शकतात. उदाहरणार्थ, सरकार तुटीद्वारा एखाद्या वस्तूवर खर्चाचे लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेऊ शकते. अशा परिस्थितीत तुटीच्या माध्यमातून विशिष्ट नगसंख्या ($G_i$=६.०८५) खरेदीसाठी रुपये ५०.२५७५ इतका खर्च येईल की जो सारणी ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण समतोल पुनर्स्थापित करेल किंवा सरकार मूल्यघटीची फट दूर करण्यासाठी सरळ 'खड्डे खणून ते परत भरण्याकामी' रोजगार देऊ शकते. या उदाहरणातून

**सारणी - ४**

| | किंमत | उत्पादन | वास्तव वेतनदर $w/P_i$ | |
|---|---|---|---|---|
| $p_1$ | 8.4010 | 13.1737 | 0.3283 | $K$=630.3187 |
| $p_2$ | 12.9511 | 18.7211 | 0.2129 | $Y$=275.8274 |
| $p_3$ | 6.9817 | 17.1297 | 0.3950 | $LX+L_c$ = 100 |
| $p_4$ | 18.6272 | 8.4603 | 0.1480 | $p_c m_H wL^*$=20.6796 |
| $p_c$ | 0.2499 | -- | | $V_G$ = 6.3032 |
| w | 2.7582 | -- | | $V_y$ = 2.7582 |

स्पष्टपणे असे ध्वनिमुद्रित होते की तुटीच्या अर्थभरण्यामुळे पैशाच्या पुरवठ्यात वाढ होऊन त्याचे भक्कम वास्तव परिणाम होतात. अर्थात पैसा निश्चितपणे अतटस्थ आहे.

**सारणी - ५**

| | किंमत | उत्पादन | वास्तव वेतनदर $w/P_i$ | |
|---|---|---|---|---|
| $p_1$ | 8.2595 | 18.3371 | 0.3284 | $K$=650.4941 |
| $p_2$ | 12.7358 | 18.7669 | 0.2130 | $Y$=271.2901 |
| $p_3$ | 6.8651 | 17.0034 | 0.3951 | $LX+L_c = 100$ |
| $p_4$ | 18.3159 | 7.8236 | 0.1481 | $p_c m_H wL^*$=20.0021 |
| $p_c$ | 0.2457 | -- | | $V_G = 6.5049$ |
| w | 2.7129 | -- | | $V_y = 2.7129$ |

जरी उपरोल्लेखित विश्लेषण स्थितिशील अर्थव्यवस्थेशी संबंधित असले तरी मूल्यघटीची फट आणि परिणाम व बेरोजगार समतोलाचे कारण उपभोक्ता खर्चातील घट आहे. गतिशील अर्थव्यवस्थेच्या संदर्भात मुख्य कारण कदाचित भविष्यातील नफ्याविषयी भयभीत झाल्यामुळे गुंतवणुकीतील घट असू शकते.

**५. पतपैसा**

समाजाच्या देय पद्धतीचे व्यवस्थापन करताना बँकांच्या असे लक्षात आले की, एका विशिष्ट वेळी त्यांच्याकडील पैशाच्या ठेवीमधील केवळ काही अंश इतकेच पैसे परत काढले जातात आणि म्हणून जर बँकांनी q (ठेवींमधील) मधील काही थोडा भाग विशिष्ट कालावधीत ठेवीदारांना पैसे काढण्याकरिता स्वत:जवळ बाळगला तर उर्वरित रक्कम बँका कर्जाऊ देऊन व्याजाच्या स्वरूपात उत्पन्न मिळवू शकतात. आता बँका एकाचवेळी दोन कामे करतात. त्या आता व्याज कमविण्याकरिता कर्ज देतात आणि त्यांच्याकडील ठेवींची देयकेही पार पाडतात. याच्या एका परिणामाची दखल घेतलीच पाहिजे. असाधारण देयक बँका ज्या आपल्या ठेवी शंभर टक्के आरर्गीं / राखीव ठेवतात आणि सर्व वेळी पूर्णपणे विलायक असतात तेव्हा अशी शक्यता असते की कर्जदेय बँका जर त्यांची मालमत्ता खराब झाली तर त्यांच्या ठेवीदारांना पैसे परत देण्यात कसूर करतील. म्हणून जर ठेवीदारांना बँक कसुरीची भीती वाटण्याचे काही कारण निर्माण झाले असेल तर ते त्यांच्या ठेवी परत घेऊन त्याऐवजी चलनी पैसा वापरण्यास प्राधान्य देतात. बँकेचा ताळेबंद सारणी ६ मध्ये दर्शविला आहे.

**सारणी ६ - बँकेचा ताळेबंद**

| दायित्व | मत्ता राखीव निधी |
|---|---|
| औद्योगिक ठेवी $M_I$ | $qM^*$ राखीव निधी |
| कौटुंबिक ठेवी $M_H$ | $(1-q)\ M^*$ कर्जे |
| एकूण दायित्व $M_I + M_H = M^*$ | $M^*$ एकूण मत्ता |

पूर्वीप्रमाणे $M_I = \Sigma m_i p_i X_i$ and $M_H = m_H wL^*$ जर आपण असे मानले की फक्त जनित्रेच कर्ज घेतात तर अर्थव्यवस्थेच्या समीकरणाची प्रणाली निम्नउर्ध्वृतप्रमाणे आहे.

$$\delta k(m_i p_i X_i + \Sigma A_{ji} p_j + wL_i) + \Sigma A_{ji} p_j + wL_i = p_i X_i \quad (12)$$

$$\Sigma A_{jB} p_j + wL_B = k\,(1 - q)M^* \quad (13)$$

$$\delta(\Sigma m_i p_i X_i + \Sigma\, \Sigma A_{ji} p_j + w\Sigma L_i) = (1-q)M^* \quad (14)$$

$$\Sigma m_i p_i X_i + m_H wL^* = M^* \quad (15)$$

$$Fi = \frac{\alpha_i wL^*}{p_i} + A_{iB} \quad (16)$$

$$X = (I-A)^{-1} F \quad (17)$$

जेव्हा $\delta$ हे उद्योगांचे कर्ज-राशीप्रमाण आणि k व्याजदर आहे.

समीकरण (१२) चे काळजीपूर्वक विश्लेषण करण्याची आवश्यकता आहे. स्थितिशील सामान्य समतोलानुसार असे म्हटले जाते की राशी भांडवलावरील नफ्याचा दर शून्य आहे.

$$(1-\delta)r(m_i p_i X_i + \Sigma A_{ji} p_j + wL_i) = 0$$

म्हणूनच समीकरणाची (१२) आवश्यकता अशी आहे की उद्योगांचा विक्री महसूल संपूर्ण आदान आणि वेतनव्यय व त्यांच्या कर्जावरील व्याजाच्या वसुली इतका असावा. नवीन गुंतवणुकीची सीमांत उत्पादकता अशा परिस्थितीत ऋणात्मक असायला हवी. कारण कोणत्याही वस्तूचे सीमांत उत्पादन उत्पादन खर्चापेक्षा कमी किमतीस विकले जाईल जी किंमत समतोल किमती इतकी असेल. हे लक्षात घेतले पाहिजे की, घटकव्यय आणि बाजारकिमतीनुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पादन सतत wL* असे राहील. म्हणजेच उद्योगांनी आदा केलेले निव्वळ व्याज यात दिसून येत नाही. हे समीकरण (१२), (१३) आणि (१४) चे डाव्या बाजूस प्रतिस्थापन करून आणि समीकरणात सर्व उद्योगांचा समावेश करून सहजपणे दिसून येते.

समजा की, बँका आता ठेवीदारांवर सेवाशुल्क आकारत नाहीत. परंतु कर्जदारांच्या व्याज देयकांतून त्यांचे मध्यवर्ती खर्च पुन:प्राप्त करतात. म्हणून वेतन उत्पन्नातून काहीही बाहेर काढले जात नाही. अर्थात संपूर्ण वेतन उत्पन्न व्ययशक्य उत्पन्न आहे. तसेच सर्व ठेवी मागणी ठेवी आहेत. त्यांना कोणतेही व्याज आदा केले जात नाही. समीकरण (१२) ते (१७) मध्ये समाविष्ट २n+३ शक्य तेवढे अज्ञात निश्चित करतात. ते म्हणजे वस्तूंच्या अनंत (n) किमती, अनंत (n) उत्पादने, एक (१) पैशातील वेतन दर, एक (१) व्याजदर (K) आणि एक (१) राशी कर्ज-राशीप्रमाण ($\delta$). समीकरण (१२) ची आवश्यकता अशी आहे की विक्री उत्पन्नातून उद्योगांचे खर्च वसूल झाले पाहिजेत. समीकरण (१३) ची आवश्यकता अशी आहे की व्याजदरातून बँकांचे मध्यवर्ती खर्च वसूल झाले पाहिजेत. समीकरण (१४) आवश्यक ठेवी व कर्ज बाजारातील दोष दूर करते. समीकरण (१५) हे संख्यामान सिद्धांत समीकरण आहे की जे पैसा बाजारातील दोष दूर करते आणि समीकरण (१६) व (१७) वस्तू बाजारातील दोष दूर करतात. पूर्ण रोजगार बाजारातील दोष विनाशी समतोलाचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी आपण निम्नउर्ध्वृतप्रमाणे मार्गक्रमण करतो;

समजा, $D = diag\,(\delta kmi)$ आणि $E_B$ म्हणजे $A_{iB}$ चा अंतर्भाव असलेल्या स्तंभ राशी आहेत. तर किंमत समीकरण (९) मधील सारणी संकेत निम्नउर्ध्वृतप्रमाणे आहेत;

$$Pd + (1+\delta k)\,PA + (1+\delta k)wL = P$$

म्हणून

$$(1+\delta k)wLX = P[I-A-\delta kA - d]\,(I-A)^{-1} F$$

$$= PF - \delta kPAX - PDX$$

समीकरण १३ मधून

$$PF= wL^* + PE_B$$
$$= wL^* + k(1-q)M^* - wL_B$$
$$= wL^* - wL_B + \delta k[\Sigma m_i p_i X_i+PAX+wLX]$$
$$= wL^* - wL_B + PDX + \delta kPAX + \delta kwLX$$

समीकरण १५ च्या दृष्टिकोनातून

$$(1+\delta k)\, wLX = wL^* - wL_B + \delta kwLX$$

म्हणून

$$LX + L_B = L^*$$

पूर्ण रोजगार दोषविरहित बाजारसमतोलाचा पुरावा पूर्ण करणे. जर आपण $\alpha_i=0.25 i=1\ldots4$ असे होऊ दिले तर वरील सांख्यिकीय उदाहरणात समतोल साधला जातो. सर्व आकडेवारी तशीच राहते $A_{iB} = A_{iC}$ आणि $L_B = L_C$ फक्त तेथे $L^*$=१०० आता ठेवी म्हणून समोर येते आणि q=०.१ हे बँकातील ठेवींचे राखीव निधीशी प्रमाण आहे. हे सारणी क्रमांक ७ मध्ये दाखविले आहे. अर्थात, जर तेथे पैशाची अतिरिक्त मागणी असेल तर चलनवाढीची फट निर्माण होईल ज्याचे आकारमान $\alpha_D wL^*=w(L^*-L_d)=w(LX+L_B)$ आहे. परिणाम निम्नउर्ध्वृत सारणी क्रमांक ७ मध्ये दर्शविले आहेत.

**सारणी - ७**

| किंमत | उत्पादन | वास्तव वेतनदर $w/P_i$ | |
|---|---|---|---|
| 9.0609 | 13.5735 | 0.2999 | $K = 675.8695$ |
| 13.8437 | 18.7658 | 0.1963 | $Y = 271.76$ |
| 7.4430 | 17.9130 | 0.3651 | $LX+L_B = 100$ |
| 19.5019 | 8.1921 | 0.1393 | $V_G = 6.7586$ |
| 2.7176 | -- | | $V_y = 2.7176$ |
| 0.2832 | -- | | |
| 0.1345 | -- | | |

बँकींग व्यवस्थेची भौतिक आणि श्रमविषयक मागणी जरी या अगोदरच्या विभागातील देयक बँकींग प्रणाली इतकीच असली तरी एकूण मध्यवर्ती व्यय अगोदरसाठी $k(1-q)\, M^*$ = रुपये २६.७३ इतके असतात तर नंतरच्यासाठी $p_c M^*$ = रु. २४.९५ इतके असतात. अर्थात, जोपर्यंत आपली उदाहरणे संबंधित आहेत पण प्रत्यक्षात ते उलटही असू शकते. तथापि, प्रत्यक्षात कर्ज बँकींग प्रणाली अधिक व्ययकार्यक्षम असण्याची शक्यता आहे. कारण;

अ) कर्ज बदल किंवा तात्काळ कर्ज सुविधेमुळे ही प्रणाली अभिकर्त्यांना त्यांचे रोख निधी प्रमाण (mi आणि mH) गुणोत्तर सांभाळण्यास मदत करू शकते, ब) अन्यथा निरुपयोगी राहणारी संसाधने मिळविण्याकामी ही प्रणाली उद्योगांना मदत करून त्यांचे उत्पादन प्रमाण विस्तारू शकते. पैशाच्या अतिरिक्त मागणीचे परिणाम आता विचारात घ्या. जर $\alpha_i = 0.2, \forall i =1\ldots4$ आणि $\alpha_i = 0.2, \forall i=1\ldots4$ आणि $\alpha_D= 0.2$ (अतिरिक्त ठेवींसाठी समर्पित कौटुंबिक उत्पन्नाचा भाग) परिणामी असमतोल निम्नउर्ध्वृत सारणी क्रमांक ८ मध्ये दर्शविला आहे.

**सारणी - ८**

| किंमत | उत्पादन | वास्तव वेतनदर $w/P_i$ | |
|---|---|---|---|
| 9.6792 | 10.7168 | 0.2909 | $K$ =566.5104 |
| 14.7023 | 14.7825 | 0.1915 | $Y$ = 225.312 |
| 7.9092 | 14.0856 | 0.3560 | $LX+L_B$ = 80 |
| 20.6279 | 6.4977 | 0.1365 | $V_G$ = 5.6651 |
| 2.8164 | — | | $V_y$ = 2.2531 |
| 0.2970 | — | | |
| 0.1620 | — | | |

समीकरण (११) मधील चलनघट फटीसंबंधीच्या काहीशा गोंधळलेल्या अभिव्यक्तीच्या तुलनेत आता हे श्रम अटींमध्ये $L^*-L_d$=२० म्हणून/असे व्यवस्थितपणे व्यक्त केले जाऊ शकते आणि मूल्य अटींमध्ये $\alpha_D wL^* = w(L^*-L_d) = w(LX + L_B)$ = रु. 56.328 असे व्यवस्थितपणे व्यक्त होईल. हे लक्षात घेतले पाहिजे की सारणी क्रमांक ८ मधील असमतोलात फक्त पैशातील किमतीच नाही तर संबंधित किमती आणि वास्तव वेतन दरातही बदल घडून आला आहे हे केवळ उत्पादने आणि रोजगाराचे स्थिर पैशातील किमती आणि भौतिक आणि वास्तव पैशातील वेतन दोन्हीही (तथाकथित केन्सादी संयोजन) संच व्याजदर k आणि कर्ज-राशी प्रमाणातील बदलामुळे लागू होतात. सारणी क्रमांक १० मध्ये दर्शविल्याप्रमणे विषमतोल दुरुस्त करून पूर्ण रोजगार समतोल प्रस्थापित करतानाही किमती आणि उत्पादन समायोजन करणे आवश्यक आहे. सारणी क्रमांक ३ आणि ८ मध्ये उर्ध्वृत केलेले चलन आणि पतपैसा व्यवस्थेसंबंधीचे चलनघट फटीचे विश्लेषण आक्षेपार्ह आहे. आम्ही तीन अंतर्भूत कल्पित स्थिरीकरण यंत्रणांना त्यांची भूमिका बजावण्यासाठी परवानगी दिली नाही.

चलनघट फट निर्मित वास्तव वेतन दरातील अवनतीमुळे श्रम पुरवठ्यात झालेली ऐच्छिक कपात ही पहिली यंत्रणा होय. वास्तव वेतन दरातील घटीमुळे काम करण्याची इच्छा कमी श्रमाचा परिणामकारक पुरवठा म्हणजे $L^*$ घटतो व पर्यायाने बेरोजगारीस $dL^*=L^*-L_d$ असा कारक ठरतो. $L_d = LX+L_B$ सुद्धा कमी होईल. असे जोपर्यंत असेल तोपर्यंत हा आक्षेप वैध ठरतो. परंतु मुद्दा असा आहे की तो फार पुढे जात नाही. विश्लेषणातून हे अगोदरच दिसून आले आहे. समजा, अशी आदर्श स्थिती प्राप्त होते की ज्यामध्ये वास्तव वेतन दरातील घट (वस्तू १ च्या दृष्टिने मोजलेले) अशी आहे की ती $L_d$ मध्ये घट करते की जी बेरोजगारी हटविण्यास पुरेशी असते म्हणजे $dL^* = L^*-L_d^*$ परिणामे सारणी क्रमांक ३ आणि ८ साठी श्रम पुरवठा कार्यन्वाचे उतार $dL^*/dw^*$($w^*$ हा वास्तव वेतनदर आहे) ६१५००.६६ आणि २२२२.२२ असे असावे लागतील. त्यांच्या लवचिकता $(dL^*/dw^*)$ $(w^*/L^*)$ अनुक्रमे २०१.९०६ आणि ६.६६४ अशा असाव्या लागतील. परंतु इकडे लक्ष द्या की सारणी क्रमांक ३ आणि ८ मधील अंतर्भूत आर्थिक प्रणाली अन्यथा एकसमान आहेत की अगोदरच्याकडे देयक आणि नंतरच्याकडे

देयक तथा कर्जदेय बँका आहेत. पृथ्वीवरील दोन राज्यांत/शासनांत या फरकामुळे श्रम पुरवठ्यातील वर्तणुकीवर परिणाम का व्हावा? हे म्हणजेच सर्वकाही नव्हे. बेरोजगारी हटविण्याकामी चलनघट फटीच्या विविध आकारांमुळेही विविध श्रम पुरवठा लवचिकता निर्माण होतात. वास्तवात मौद्रिक प्रणालीबरहुकूम श्रम पुरवठा लवचिकता बदलतील काय? तसेच त्या चलनघट फटीच्या आकारमानाबरहुकूम बदलतील का? आणि तसे असेल तर त्या इच्छित आकार प्राप्त करतील का? या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे अशक्यप्राय आहेत. अशा उत्तरांच्या अनुपस्थितीत निष्कर्ष काढणे उत्तम आहे की श्रम पुरवठा फलन बेरोजगारी समतोल सुधारण्यासाठी अंतर्भूत मार्ग प्रदान करीत नाही आणि या व्यतिरिक्त असे आहे की रोजगार पातळी प्रभावी श्रम मागणीवर की जी अंतिमत: उत्पादनांच्या प्रभावी मागणीवर निर्भर असते.

दुसरी अंतर्भूत यंत्रणा म्हणजे नवीन गुंतवणुकीची प्रेरणा. ज्यानंतर बचत व बँक ठेवींना चालना मिळते. सारणी ७ (पूर्ण रोजगार समतोलातील) आणि ८ मधील किमतीची तुलना असे दर्शविते की चार वस्तूंच्या नाममात्र किमती क्रमश: १.०६८२, १.०६२०, १.०६२६ आणि १.५७७ या पूर्णांकाने वाढल्या आहेत. सारणी ८ मधील नाममात्र व्याजदर ०.२९७० वरील पूर्णांकांनी घटविल्यास (वस्तूंसंदर्भात) आपणास क्रमश: ०.२७८०, ०.२७९६, ०.२७९५ आणि ०.२८०७ असे वास्तव व्याजदर मिळतील की जे (नाममात्र समान) सारणी ७ मधील ०.२८३२ या वास्तव व्याजदरापेक्षा कमी असतील. यामुळे नवीन गुंतवणुकीला प्रेरणा मिळावी. परंतु असे होणार नाही. कारण; १) मंदीच्या काळात आर्थिक प्रणाली सारणी ७ वरून ८ वर गेल्याने विद्यमान गुंतवणुकीवरील नफ्याचा दर नकारात्मक झाल्याने उद्योगांनी विनिवेश करण्याचा मार्ग पत्करला आणि २) नवीन अपूर्ण रोजगार समतोलांतर्गत गुंतवणुकीच्या साहाय्याने उत्पादनवाढीच्या प्रयत्नाचे पर्यवसन नफ्याचा दर ऋणात्मक होण्यात होणार. कारण उत्पादनाची सरासरी खर्चापेक्षा कमी अशा मागणी किमतीस विक्री करावी लागेल. समग्र मागणी पातळी पुनर्संचयित करण्याची क्षमता असलेली तिसरी अंतर्भूत यंत्रणा वित्तीय मध्यस्थी प्रक्रियेत आहे. ऋण/कर्ज बँकींग प्रणालीत बँका ठेवींचे कर्जात रूपांतर करतात आणि संयंत्रणांकडून आदाने व श्रम खरेदीकामी कर्जाचा वापर केला जातो. म्हणून जर बँकांना अधिक ठेवी प्राप्त झाल्या तर त्याच्या माध्यमातून अधिक कर्जे दिली जातात व संयंत्रे त्याचा वापर अधिक आदाने खरेदी व श्रम वापरून समग्र मागणी वाढवितील. परंतु बँका अतिरिक्त राखीव मधून कर्जे देऊ शकत नाहीत. अतिरिक्त निधी हे कर्जदाराची कर्ज काढण्याच्या आणि बँकांची कर्ज देण्याच्या असमर्थतेचे लक्षण आहे. प्रस्तुत यंत्रणादेखील स्वयंचलितपणे कार्यरत नसते. हे पाहण्यासाठी सारणी ७ पाहा. ते विरोधाभासी स्थिती दर्शविते. वास्तवात फक्त ८० कामगारांच्या साहाय्याने रुपये २२५.३१६ इतकी कमाई आणि (रुपये २.८१६ X ८०) खर्च करून वास्तव उत्पादन राशी (८.५७३४, ११.८२६०, ११.२६८४, ५.१९८२), पैशातील किमती आणि वास्तव वेतन दरासह सारणीत दर्शविल्या आहेत. या वास्तव उत्पादन व रोजगार पातळीवर पैशाची मागणी (समीकरण १२) ८८० इतकी आणि कर्जाची मागणी (समीकरण ११) रुपये ७२ इतकी आहे. तदान्वये बँकेचा लेखा निम्नउर्ध्वृत सारणी ९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे असेल.

**सारणी - ९**

| | दायित्व | मत्ता | |
|---|---|---|---|
| औद्यौगिक ठेवी<br>कौटुंबिक ठेवी | १२.४०५२<br>८७.५९४८ | आवश्यक राखीव<br>अतिरिक्त राखीव<br>कर्जे | ८<br>२०<br>७२ |
| एकूणदात्वि | १०० | एकूण मत्ता | १०० |

व्यवहारावश्यक घरगुती जमा (०.३) (रुपये २२५.३१६) = रुपये ६७.५९४८ इतके कमी होते. रुपये २० खबरदारी हेतू ठेवी असल्याने बँकांकडून त्या अतिरिक्त राखीव म्हणून ठेवल्या जातात. त्यांच्यासाठी मागणी नाही. म्हणून बँका अशा राखीव मधून कर्जे देत नाहीत. याचा स्पष्ट परिणाम म्हणजे पैसा गुणक की जे पैशाच्या पुरवठ्याचे राखीव निधीशी प्रमाण असते. सारणी ७ मधील सूत्रात ते १००/१० = १० असे परिभाषित केले आहे. सारणी ८ व ९ मधील मंदीच्या स्थितीत ते १०/२८ = ३.५७ असे परिभाषित होते.

चलनी पैशाच्या पूर्वीच्या बाबतीत वॉलरसच्या प्रमेयान्वये पैसा धारणाची अतिरिक्त मागणी $\alpha_D wL^*, w(L^*-L_d)$ अशी अतिरिक्त श्रमपुरवठ्याइतकी असते. म्हणून $\alpha_D L^* = L^*-L_d = 20$ जे मूल्यरूपाने रुपये ५७.६८१४ इतके आहे. या संदर्भावरून हे स्पष्ट आहे की येथे मौद्रिक धोरण काहीही करू शकत नाही. अशा चलनघट फटीच्या स्थितीत मौद्रिक धोरणाचे कोणतेही साधन सक्रिय नाही. त्यामुळे ही स्थिती फक्त रुपये ५४.४२२५ इतक्या तुटीच्या अर्थभरण्यानेच दूर केली जाऊ शकते. या तुटीच्या अर्थभरण्याद्वारा Gi = १.०८९५०५ एवढा चार वस्तू खरेदीवर प्रत्येकी खर्च करून सारणी १० मध्ये दर्शविल्याप्रमाणे पूर्ण रोजगार समतोल साध्य होऊ शकतो. यातून असे लक्षात येईल की मौद्रिक गुणक एकपेक्षा जास्त आहेत. यावरून असे म्हणता येईल की, १.०८९ इतक्या वस्तूंच्या अतिरिक्त खरेदीमुळे सकल उत्पादितातील वृद्धी १.०८९ जास्त आहेत. विस्तारित राजकोषीय धोरणाच्या साहाय्याने पूर्ण रोजगार समतोल मिळविण्याच्या मार्गावर चार वस्तूंच्या संदर्भात मापलेला वास्तव वेतन दर वाढलेला दिसतो. निरीक्षण करा की या प्रकरणात नवीन नोटा छापून संपूर्ण तूट भरून काढण्याची आवश्यकता नाही. जनता व बँकांना रोखे जारी करून त्यांच्याकडील निष्क्रिय पैसा मिळवून तूट अंशत: भरून काढली जाऊ शकते.

पतपैसा अर्थव्यवस्थेतील चलनघट फटीच्या परिणामाची वास्तविक कथा कदाचित भविष्यातील नाट्यमय परंतु आता ओळखीच्या स्थितीत समीप येऊ शकते. उद्योगांच्या विक्री महसुलातील तीव्र घटीचे रूपांतर नादारीत होणार. नादारीची प्रक्रिया साधारणत: बहुटप्पा क्रिया आहे. नादार त्याच्या मते ताबडतोबीने व परिणामकारक विरोध करण्याची शक्यता नसण्याच्या त्याच्या व्यवसायाशी संबंधित कामगार, पुरवठादार, बँका इत्यादी विरोधात आपल्या नादारीचा वापर करेल. अर्थात यात व्यवसायबरहुकूम तफावत असणार. काहींच्या बाबतीत पुरवठादारांच्या देयकापेक्षा कामगार वेतनाच्या बाबतीत नादारीचा वापर सहज शक्य होऊ शकतो. तर इतरांच्या बाबतीत

**सारणी - ७**

| | किंमत | उत्पादन | वास्तव वेतनदर $w/P_i$ | |
|---|---|---|---|---|
| $p_1$ | 9.0812 | 13.0895 | 0.2996 | K=671.5965 |
| $p_2$ | 13.8722 | 18.678 | 20.1961 | Y= 272.11 |
| $p_3$ | 7.4585 | 17.0987 | 0.3648 | $LX+L_B = 100$ |
| $p_4$ | 19.5396 | 8.5000 | 0.1392 | $V_G = 6.7160$ |
| w | 2.7211 | — | | $V_y = 2.7211$ |
| k | 0.2837 | — | | |
| δ | 0.1355 | — | | |

ते याउलट असेल. काहींच्या बाबतीत बँकांच्या तुलनेत पुरवठादारांवर नादारीचा वापर अधिक सहजपणे केला जाऊ शकतो. तर काहींच्या बाबतीत अगदी याविरुद्ध स्थिती असेल. ज्यांना नादारीचा फटका बसला आहे ते तसाच फटका इतरांना देण्याचा प्रयत्न करणार. यातून अशीच नादारीची चक्राकार साखळी तयार होईल. थोडक्यात असे की नादारीचा संसर्ग अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रात पसरणार. बँक कर्ज बुडितांचे प्रमाण वाढणार. आपल्या ठेवीदारांचा विश्वास राखण्यात बँका कमी पडणार व त्यांना सेवा देऊ शकणार नाहीत. आत्मविश्वास किंवा बँकांवरील विश्वासाचे संकट निर्माण होऊन त्याचे पर्यवसन बँक धाव्यात होईल. कदाचित सरकार राखीव निधीचा वापर करून व बँकांची दूषित मत्ता स्वत:कडे घेऊन (संख्यात्मक मार्ग) अडचण सोडविण्याचा प्रयत्न करेल. तथापि, बँकांनी अनुभवलेले असे वाईट कर्ज आणि मागणीतील सर्वदूर घटीमुळे अतिरिक्त कर्जाचे व्यवस्थापन करण्याची उद्योगांची अनिच्छा आणि अक्षमतेमुळे बँकांकडे अधिक मत्ता राहून ठेवीदारांचा आत्मविश्वास शाश्वत ठेवण्याइतकाच मर्यादित याचा परिणाम राहू शकतो. याच्या आधारेच क्रुगमनने (१९९८, पृष्ठ १३७, २०५) रोखतेचा सापळा कल्पनेचे पुनरुज्जीवन करण्याची कल्पना मांडली की ज्यामुळे बँकांच्या वित्तीय पाया मजबुतीचा परिणाम उत्पादन वाढ विरहित राखीव मत्ता वाढीत होईल. परंतु अशा प्रकारची तुटीच्या खर्चाची प्रवृत्ती हीच लनघटीच्या संकटावरचा उपाय ठरू शकत नाही. तुटीच्या खर्चाच्या माध्यमातून प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे वस्तू किंवा श्रम खरेदी केले तरच त्याचा अशा परिस्थितीवर धनात्मक परिणाम होऊ शकतो. अन्यथा शक्य नाही. जरी अगोदर नमूद केल्याप्रमाणे पैशाच्या अतिरिक्त मागणीचे असमतोलकारी परिणाम कुटुंबसंस्थेच्या बाबतीत स्पष्ट केले असतील तरी हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की हे उद्योगांकडूनही पैशाच्या अतिरिक्त मागणी संदर्भात सत्य असणार. पैशाची अशी अतिरिक्त मागणी, $m_{ie}p_iX_i$ उजवीकडील कोणत्याही संगत संकल्पनेव्यतिरिक्त किंमत समीकरणाच्या डाव्या बाजूस अधिकच्या रोखतेच्या स्वरूपात दाखविणे आवश्यक आहे. परिणामी निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न समीकरण निम्नउर्ध्वृतप्रमाणे असेल.

$$\Sigma m_{ie} p_i X_i + wL^* = \Sigma p_i X_i - \Sigma\Sigma A_{ji} p_j - \Sigma A_{jB} p_j \qquad (17)$$

समीकरण (१५) मध्ये संयंत्रे रोखतेकरिता त्यांच्या विक्री महसुलाचा काही भाग वापरत आहेत. या प्रकारात कुटुंबव्यवस्थेकडून पैशाची जास्त मागणी

नसली तरीही चलनघटीची फट निर्माण होईल. वैकल्पिकरित्या चलनघटीची फट निर्माण होऊ शकते. कारण राजकीय किंवा औद्योगिक अस्थिरतेच्या भीतीमुळे संयंत्रे त्यांच्याकडील वस्तूसाठ्याचा त्याग करतात आणि प्राप्त मिळकत ठेवींच्या स्वरूपात धारण करतात. परंतु अधिक कर्ज घेण्यापासून परावृत्त राहतात. परिणामे हा पैसा अधिकच्या राखीव निधीस्वरूपात बँकांकडे जमा होतो.

सारणी ३ आणि ८ मध्ये दर्शविलेल्या परिस्थितीस चलनघट फट असे संबोधले जाते. सामान्यत: चलनघटीच्या शब्दप्रयोगात अशी स्थिती अभिप्रेत आहे की ज्यामध्ये वेतन व किमती अशा निम्नस्तरापर्यंत कोसळतात की कोणत्याही सुधारणा त्यांना फक्त पुन्हा उच्चतम पातळीवर नेऊ शकतात. परंतु ते दिशाभूल करणारे आहे. जेव्हा तुटीच्या अर्थभरण्याने असे अंतर भरून काढले जाते तेव्हा सारणी ४, ५ आणि १० मध्ये उर्ध्वृत परिणामी परिस्थिती पैशातील वेतन व किमतीतील घट, वस्तू उत्पादनातील वाढ आणि वास्तव वेतनातील निश्चित वाढ दर्शविते. दुसऱ्या शब्दात असे सांगता येईल की, चलनघटीतील अंतर दुरुस्तीकामी निर्मित तुटीच्या अर्थभरण्याचा परिणाम उत्पादन आणि रोजगार वाढीच्या प्रक्रियेद्वारा वास्तव वेतनात वाढ असा असतो. वर्तमानकालीन उत्पादितांसाठी कुटुंबव्यवस्था अथवा उद्योगांनी पूर्वाधारित रोखता बाजारात आणल्यास चलनवृद्धीच्या अंतरासह असमतोल निदर्शनास येतो. त्या स्थितीत $LX + L_B > L^*$ आणि शिलकीच्या अर्थसंकल्पाद्वारा असमतोल दूर केला जाऊ शकतो. जर सरकारचा तूट व्यय आवश्यकतेपेक्षा अधिक असेल तर तुटीत कपात करून किंवा रोख शिल्लक प्रमाण यासारखे वित्तीय धोरण आयुध वापरून त्यात दुरुस्ती केली जाऊ शकते.

**६. दर्जाहीन आर्थिक संकट निर्मित २००७ च्या महामंदीकालीन परिस्थितीजन्य पुरावा**

विभाग (४) आणि (५) (पाहा सारणी ३, ८ आणि ९) मध्ये उर्ध्वृत केलेल्या सैद्धांतिक युक्तिवादांची पडताळणी २००७ मध्ये सुरू झालेल्या दर्जाहीन आर्थिक संकट निर्मित महामंदीकालीन परिस्थितीजन्य पुराव्यांच्या साहाय्याने पडताळणी करता येऊ शकते. ती विधाने पुढीलप्रमाणे आहेत;

१. बँक चालक/पेढीमालक व वित्तीय संस्था जर अपशयी झाल्या अथवा अपयशी होतील असे अपेक्षित असेल तर जनतेच्या रोखतेचे ठेवींशी असणारे प्रमाण वाढेल.

२. कारण काही प्रमाणात बँका व वित्तीय संस्थाबाबतचा दीर्घकालीन आत्मविश्वास कमी होतो आणि काही प्रमाणात संकट प्रादुर्भावी देशांतील मध्यवर्ती बँका व्याजदर अशा अकिफायतशीर पातळीपर्यंत कमी करतात की, ज्यामुळे लाभाच्या अपेक्षेने पैशाच्या रोखतेचा त्याग करणे अशक्य बनते. समयबद्ध ठेवींचे मागणी ठेवींशी प्रमाण घटेल (पाहा : आलेख २ आणि सारणी ११).

३. मंदीच्या काळात वृद्धिदर व कर्जाच्या मागणीतील घटीबरोबर पैसा गुणक घटायलाच हवा.


४. व्यवसाय परिस्थिती अस्वस्थता निर्मित पैशाच्या अधिक मागणीमुळे घसरणयुक्त स्थिती निर्माण झाली असेल तर पैशाचा भ्रमणवेग कमी होऊन बेरोजगारीचा दर वाढतो.

५. सर्वसाधारणपणे मौद्रिक धोरण साधने व संख्यात्मक सुलभीकरणाच्या साहाय्याने बँकांना अधिक धनराशी उपलब्ध करून दिल्याने संत्रस्त मत्ता वसुली कार्यक्रमामुळे बँक कर्ज वाढणार नाहीत व बँकांना अतिरिक्त राखीव निधी बाळगण्यापासून थोपविणार नाहीत.


६. समजा, जर उदार कल्याणाभिमुख श्रमबाजार हस्तक्षेपाचे धोरण अस्तित्वात नसेल तर बेरोजगारीचा दर घटवून प्रभावी मागणी वाढविण्याकरीता तुटीचा अर्थभरणा हा एकमेव मार्ग आहे (पाहा : आलेख ४). आलेख १/B (a) ते १/B(d) चलनाचे ठेवींशी प्रमाण वर्तणूक दर्शवितात. अमेरिका, इंग्लड आणि बँकांचे अपयश तीव्र नसणाऱ्या जपान वगळता युरोक्षेत्रात आलेख उर्ध्वगामी संक्रमण दर्शवितात. मध्यवर्ती बँकांनी व्याजदरात प्रभावी कपात केल्यानंतर संकट प्रभावी देशात समयबद्ध ठेवींचे मागणी ठेवींशी प्रमाण घटल्याचे आलेख २ (a) ते २ (d) मध्ये निदर्शनास येते (पाहा : सारणी १२).

**आलेख १ (अ): आर्थिक वृद्धिदर**


१(a) अमेरिका





१(b) इंग्लंड




१(c) युरोक्षेत्र





१(d) जपान




## आलेख १ (इ): चलनाचे मागणी ठेवींशी प्रमाण


१(a) अमेरिका १





(b) इंग्लंड




१(c) युरोक्षेत्र १





(d) जपान





## आलेख २: समयबद्ध ठेवींचे मागणी ठेवींशी प्रमाण


२(a) अमेरिका




२(b) इंग्लंड



२(c) युरोक्षेत्र




२(d) जपान




Source: Thomson Reuters

**सारणी ११ – परतावावक्र हालचाल**

**(a) अमेरिका**

| | 1 Year | 10 Year | 30 Year |
|---|---|---|---|
| 2005 | 3.59 | 4.28 | 4.38 |
| 2010 | 0.31 | 3.21 | 4.25 |
| 2015 | 0.32 | 2.14 | 2.84 |

http://www.yieldcurve.com marketyieldcurve.html

(b) **इंग्लंड**

| | 1 Year | 10 Year | 30 Year |
|---|---|---|---|
| 2005 | 4.29 | 4.35 | 4.32 |
| 2010 | 0.65 | 3.47 | 4.29 |
| 2015 | 0.45 | 1.81 | 2.52 |

http://www.treasury.gov/resource-centre

(c) **युरोक्षेत्र**

| | 1 Year | 10 Year | 30 Year |
|---|---|---|---|
| 2005 | 4.29 | 4.35 | 4.32 |
| 2010 | 0.65 | 3.47 | 4.29 |
| 2015 | 0.45 | 1.81 | 2.52 |

http://datamarket.com/euro-yield-curves-daily data

गुडहार्ट (२०१३, पृष्ठ १–१५) मधील सारणी (१२) ची पुनरुक्ती सारणी (८) आणि (९) च्या विश्लेषणातून प्राप्त उपरोल्लेखित विधान (२) आणि (३) चा भक्कम पुरावा दर्शविते. संख्यामान सवलती आणि संत्रस्त मत्ता वसुली कार्यक्रमामुळे वाढलेल्या उच्चशक्ती पैशाचा परिणाम अमेरिका आणि युरोक्षेत्र देशांतील बँक कर्जवाढीऐवजी राखीव निधीत धारण केल्यामुळे अपेक्षेप्रमाणे होऊ शकला नाही. परिणामत: युरोक्षेत्र देशांचा पैसा गुणक कोसळला. पैशाचा भ्रमणवेग आणि पैसा गुणकातील वेगवान घसरणीमुळे मंदीवरील उपाययोजनांसाठीच्या विस्ताराभिमुख वित्तीय धोरणांच्या प्रभावावर मर्यादा आल्या. संत्रस्त मत्ता वसुलीप्राप्त रकमांचा मोठा हिस्सा मुदतपूर्व कर्जखाती बंद करण्यासाठी व गहाण समभाग आणि कर्ज हमी खरेदीकरिता वापरूनही अशी परिस्थिती निर्माण झाली. या व्यतिरिक्त खाजगी क्षेत्रास बँक कर्ज देण्यास प्रोत्साहित करण्यासाठी 'कर्ज निधी योजना' सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत खाजगी क्षेत्राच्या कर्जास सार्वजनिक बँकींग क्षेत्राकडून स्वस्त दराने पूर्णवित्त सुविधा दिली जाऊ शकेल, अशी अपेक्षा होती. यापैकी काहीही कामी आले नाही. बँकांनी

अतिरिक्त ठेवी अडवून त्या मध्यवर्ती बँकांकडे ठेवल्या. युरोप, जपान आणि अमेरिकेमध्ये या राखीव परताव्याचा धोरणात्मक प्रतिसाद एक दुसऱ्यास विरोधाभासी बनला.

बँकांनी त्यांचे आरक्षित निधी मध्यवर्ती बँकांत ठेवण्याऐवजी त्याआधारे अर्थव्यवस्थेत कर्ज वाटपाचे धोरण स्वीकारण्याकरिता युरोप आणि जपानने ऋणात्मक व्याजाचे धोरण अंगिकारले. परंतु अमेरिकेने मात्र त्यावर बाजार प्रचलित व्याजदरापेक्षा अधिक व्याजाचे धोरण अंगिकारल्याने फेडरल समभाग बाजार कोसळला (सेलगीन, २०१७). पर्यायाने अमेरिकन मध्यवर्ती बँकेने स्वत:ला प्रथम तारक ऋणकोच्या स्वरूपात पुनर्स्थापित केले तर युरोप आणि जपान अंतिम तारक ऋणको बनले. हे काहीही असले तरी अतिरिक्त राखीव निधी आजही मध्यवर्ती बँकांकडेच ठेवले जातात.

**सारणी १२ : संख्यात्मक सवलती आणि संत्रस्त मत्ता वसुली कार्यक्रमाचे परिणाम**

**(a) अमेरिका**

| | **H** | **R** | **R/D** | **M3** | **बँकांची खाजगी क्षेत्रास कर्जे** | **m=M3/H** |
|---|---|---|---|---|---|---|
| 06 Q2 | 804 | 45 | 0.8% | 6784 | 5620 | 8.43 |
| 12 Q2 | 2619 | 1566 | 18% | 9892 | 7070 | 3.77 |
| %change | 226 | 3380 | - | 46% | 24% | - |

**(b) युरोक्षेत्र**

| | H | R | R/D | M3 | **बँकांची खाजगी क्षेत्रास कर्जे** | m=M3/H |
|---|---|---|---|---|---|---|
| 06 Q2 | 727 | 159 | 1.2% | 7344 | 8679 | 20.67 |
| 12 Q2 | 1756 | 1087 | 6.2% | 9604 | 11161 | 7.02 |
| %change | 142% | 584% | - | 31% | 29% | |

**(c) इंग्लंड**

| | H | R | R/D | M3 | **बँकांची खाजगी क्षेत्रास कर्जे** | m=M3/H |
|---|---|---|---|---|---|---|
| 06 Q2 | 68 | 23 | 2.44% | 1406 | 1761 | 20.67 |
| 12 Q2 | 295 | 232 | 17.6% | 2073 | 2308 | 7.02 |
| %change | 334% | 909% | - | 47% | 31% | |


आलेख ३(a) ते ३ (d) अमेरिका, युरोक्षेत्र, इंग्लंड आणि जपानमधील पैशाच्या भ्रमणवेगाची प्रवृत्ती दर्शवितात. त्यामध्ये सारणी (३) आणि (७) मध्ये विशद केलेल्या सर्व सैद्धांतिक प्रस्तावांशी सर्वथा आणि पूर्णपणे असहमती निदर्शनास येते.

## आलेख ३: विस्तृत पैशाचा भ्रमणवेग


३ (a) अमेरिका





३(b) युरोक्षेत्र




३(c) इंग्लंड




३(d) जपान





www.worldbank.org


आलेख ४ (a) ते ४(d) सन २००० पासूनचा तुटीचा अर्थभरणा आणि बेरोजगारी दराचा सहसंबंध दर्शवितात. २००७-२००८ नंतरच्या काळातील राजकोषीय धोरणात झालेल्या नाट्यमय बदलांची नोंद अॅरेस्टीस आणि सॉयर (२०१०, पृष्ठ ३२७-३४६) यांनी केली आहे. या काळात सार्वजनिक कर्जाचे स्थूल राष्ट्रीय उत्पादिताशी प्रमाण अनुक्रमे ०३.०० व ०६.०० टक्के मर्यादेत ठेवण्याविषयीचे स्वयंघोषित राजकोषीय बंधन पूर्णपणे झुगारले. यामुळे निर्माण होणारा तुटीचा अर्थभरणा व परिणामत: व्याजदरावरील उर्ध्वगामी ताण आणि खाजगी गुंतवणूक कमी होण्याच्या स्थितीकडे लक्ष दिले गेले नाही.

### आलेख ४: बेरोजगारी दर व राजकोषीय तुटीचे स्थूल राष्ट्रीय उत्पादिनाशी प्रमाण


४(a) अमेरिका





४(b) इंग्लंड





४(c) जपान




४(d) फ्रान्स




४(e)जर्मनी




www.worldbank.org, www.tradingeconomics.com

आर्थिक संकटाच्या काळात सरकारच्या तुटी दोन भागात विभागल्या होत्या. पहिल्या भागात वाईट मत्ता खरेदीकरिता साहाय्य निधी तर दुसऱ्या भागात गरीब/अल्प उत्पन्न कुटुंब साहाय्य, उपभोग अर्थसहाय्य व गुंतवणूक आणि पायाभूत खर्चाचा समावेश होतो (पाहा : नाचणे, २०१८,पृष्ठ १३४-१३६ आणि १४६-१४७). सारणी ४, ५ आणि १० मध्ये दर्शविल्याप्रमाणे दुसऱ्या भागाचा परिणाम बेरोजगारी कमी करण्यात झाला. अमेरिका, इंग्लंड आणि जपानच्या बाबतीत बेरोजगारीचा दर बहुत करून टप्प्याटप्प्याने राजकोषीय तुटीच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादिताशी प्रमाणाबरोबर राहिला.

**सारणी१३ – सरासरी बेरोजगार लाभ आणि किमान वेतन**

| देश | चलन | बेरोजगार लाभ (प्रत्येक आठवड्यात) | प्रतीकामगार किमानवेतन (प्रती ८तास x ७ दिवस) | तफावत |
|---|---|---|---|---|
| अमेरिका | $ | ३२३.७५ | ४०६ | ८२.२५ |
| इंग्लंड | £ | ६५.५ | ४२० | ३५४.५ |
| जपान | ¥ | ३७४७० | ४७४८८ | १००१८ |
| जर्मनी | • | ५३२.५ | ४९५.०४ | -३७.४६ |
| फ्रान्स | • | ५३२.५ | ५३८ | ५.५ |

ssa.gov/policy/docs/progdese/sspus/unemploy.pdf,wageindicator.co.uk/main/advice/ social-security/ unemployment benefits, oecd.org/ els/soc/29734836.pdf, ssa.gov/policy)docs/ progdesc/ssptw/2016-17/Europe/spain.html

याउलट अमेरिका, इंग्लंड आणि जपानच्या तुलनेत जर्मनी आणि फ्रान्सच्या बाबतीत मात्र तुटीच्या अर्थभरण्याचे बेरोजगारी कमी करण्याकरीता काहीही परिणाम झाले नाहीत, असा अनुभव आला. शक्यतो या दोन देशांमधील उदार बेरोजगार लाभ धोरणाचा हा परिणाम असावा. प्रचलित वेतनदराच्या संदर्भात बेरोजगार लाभाच्या सरासरी आकारमानाची कल्पना सारणी १३ वरून येते (सारणी १३ मधील याकामीच्या एकूण रकमा दर्शविल्या आहेत). यातील सापेक्ष आकारमानावरून असे स्पष्ट आहे की, इतर देशांप्रमाणे जर्मनी आणि फ्रान्समध्ये जीवनमानाच्या बाबतीत बेरोजगारीची समस्या फारशी गंभीर नाही. यामुळेच तुटीच्या अर्थभरण्याच्या साहाय्याने रोजगारसंधी निर्माण करूनही बेरोजगारी कमी होत नाही. कामगार कमी वेतनदरावर काम करण्यापेक्षा बेरोजगार लाभास प्राधान्य देतात. अशा प्रकारे जर्मनीतील बेरोजगारीच्या दरातील घट हा प्रामुख्याने हार्टझ् सुधारणा आणि वेतन प्रक्रियेच्या विकेंद्रीकरणाचा परिणाम आहे (पाहा : डस्टमन आणि इतर २०१४, पृष्ठ १६७-१८८). फ्रान्समध्ये मात्र अशा प्रकारच्या कोणत्याही सुधारणा अंगिकारल्या नाहीत; परंतु त्या दिशेने विचारविमर्श सुरू आहे.

हे स्पष्ट आहे की, चलनघटीच्या अंतरासहित बेरोजगार समतोलाच्या परिस्थितीला आधुनिक अर्थशास्त्रातील प्रभावी सिद्धांताच्या परिप्रेक्ष्यात नवअभिजात किंवा सहमती समग्रलक्षी अर्थशास्त्राप्रमाणे जागा नाही. या सर्व सिद्धांतात अशा आदर्श प्रचलाची निर्मिती झालेली नाही की ज्यामुळे

गंभीर स्वरूपाचे असमतोल निर्माण होऊ शकतात. प्रातिनिधिक प्रतिनिधी, आदर्श/पूर्ण बाजारपेठा आणि बाजारपेठेतील निरंतर दोष निर्मूलनाची गृहीतके असमतोलाची शक्यता दूर करतात. वित्तीय क्षेत्र गैरहजर आहे म्हणून मत्ता अवज्ञा आणि बँक धाव्याच्या शक्यता असतात. प्रातिनिधिक प्रतिनिधीकडून सर्वकाल अंतरकालखंडीय पर्याप्तीकरण म्हणजेच घसरण आणि जरी असे घडणार असेल तर ते इष्टतम आहेत जेणेकरून त्यात सुधारणार्थ कोणताही धोरणात्मक हस्तक्षेप परिस्थितीला उपपर्याप्तीकृत बनवेल.

**७. अनुमान**

आम्हास असे वाटते की, प्रस्तुत संशोधन टिपणाची मूळ उद्दिष्टे पूर्ण झाली आहेत. सुरुवातीस आम्ही असे दर्शविले आहे की, वास्तववादी वस्तू अर्थव्यवस्थेच्या सामान्य समतोल सिद्धांतात पैसा एक आवश्यक अंतर्भरण आहे. नव वालरसवाद सामान्य समतोलात पैशासाठी काहीही भूमिका आवश्यक नाही. कारण असे नाही की हान्हने (१९८२) सांगितल्याप्रमाणे हे 'अर्थव्यवस्थेचे एक अत्युत्तम विकसित प्रमेय आहे.' परंतु यामुळे हे अत्युत्तम विकसित अर्थव्यवस्थेचे प्रमेय आहे की ज्याने व्यवहार व्यय पूर्णपणे काढून टाकला आहे. या प्रमेयाने यथार्थवादी वस्तुविनिमयाची अर्थव्यवस्था प्रस्थापित करताना असे केले आहे. वस्तुविनिमय अर्थव्यवस्थेच्या तुलनेत पैशाचा वापर विनिमयव्यय कमी करून आर्थिक कार्यक्षमतेस चालना देतो व कमी वास्तव किमतीस (अधिक वास्तव वेतन दर) जास्त उत्पादनास चालना देतो. दुसरे असे की; जर वर्तमान उत्पादनाच्या विक्री उत्पन्नातून पैशाच्या स्वरूपात किंचितही रोख जवळ बाळगली नाही तरच मौद्रिक सामान्य समतोल निर्माण होतो, असे दर्शविले आहे. यात अपयश आले तर असमतोल निर्माण होतो ज्यामध्ये किमान एका बाजारात, प्रकर्षाने श्रम बाजारातील दोष दूर करणे अशक्य बनते. त्यामुळे अतिरिक्त श्रमाचा पुरवठा तयार होईल आणि मूल्याच्या दृष्टिने तो अगदी पैशाच्या अतिरिक्त मागणीइतका असेल. उत्पादन, उत्पन्न आणि रोजगार पातळी विक्री आकारमानावर प्रत्यक्षपणे अवलंबून असतात. पैशाच्या अतिरिक्त मागणीमुळे विक्रीत घट होऊन उत्पादन आणि रोजगारातही घट निर्माण करते. किंमत, उत्पादन, व्याजदर आणि वेतनातील कोणतीही लवचिकता (या सर्व बाबी प्रस्तुत संशोधन, टिपण, समीकरण यंत्रणेतील अज्ञात बाबी आहेत आणि म्हणून त्या पूर्णपणे लवचिक आहेत) समतोल सज्जतेस सक्षम नाहीत. यावर एकच उपाय म्हणजे तुटीचा अर्थभरणा. संपूर्ण संशोधन टिपण आणि सांख्यिकीय विश्लेषणे स्पष्टपणे नमूद करतात की पैसा अतटस्थ आहे. बँक ताळेबंदातील दोष दूर करण्याकामी संख्यात्मक सुलभतेची मर्यादा दर्शविली आहे. परंतु जर औद्योगिक मंदीच्या काळात संख्यात्मक सुलभता धोरण यापेक्षा पुढे जाऊ शकले तर ते आश्चर्याचे ठरेल. पैशाच्या भ्रमणवेगाची वर्तणूक, चलनाचे ठेवींशी प्रमाण, पैसा गुणक आणि संख्यात्मक सुलभता आणि संत्रस्त मत्ता सहाय्यता कार्यक्रमा अंतर्गत मोठ्या प्रमाणात पैशाचा पुरवठा करूनही बँकांची खाजगी क्षेत्रास प्रोत्साहन देण्याची हतबलता आणि सरतेशेवटी तुटीचा अर्थभरणा इत्यादी सैद्धांतिक प्रस्तावांची निरंतर वर्तणूक २००७ पासूनच्या काही अर्थव्यवस्थांमधील दर्जाहीन आर्थिक संकट निर्मित बेकारी व महामंदीवरील शून्य परिणामाच्या पार्श्वभूमीवर प्रायोगिक तत्त्वावर तपासून पाहिली. एकंदरीत प्राप्त पुरावा उपरोल्लेखित सैद्धांतिक प्रस्तावांच्या विरोधात सापडतो. चलनाचे ठेवींशी वाढते प्रमाण, पैशाचे घटते भ्रमणवेग, बँकांकडील अतिरिक्त राखीव निधी, बेरोजगारीचे चढते दर इत्यादी

महामंदीच्या काळात अनुभवलेल्या अनिवार्य घटनाक्रमांच्या अगदी उदारपणे व मोठ्या प्रमाणात नोंदी घेण्यात आलेल्या असल्यामुळे प्रस्तुत लेखात त्यांची दखल घेण्याची आवश्यकता नाही. अर्थात अपेक्षा नक्कीच आहेत. उदाहरणार्थ, जर्मनी आणि फ्रान्स मधील बेरोजगारीचा तुटीच्या अर्थभरण्याप्रति प्रतिसादाचा मुद्दा कक्षेबाहेरील आहे. परंतु त्यावर विश्वासार्ह विश्लेषण मिळते. प्रस्तुत लेखाची समाप्ती करताना याकडे अंगुलीनिर्देश करणे योग्य असेल की सिद्धांताचे स्थितिशील स्वरूप परिस्थितीजन्य चाचणीक्षम परिणाम मिळविण्यावर काही मर्यादा लादते. निश्चितच सिद्धांतातून; अ)जो सकारात्मक नवीन गुंतवणुकी आणि वृद्धी घडवून आणण्यास परवानगी देतो आणि ब) ज्यामध्ये व्याजदराची संरचना निधी आधारित विचारांव्यतिरिक्त व्ययाधारित विचारांसह निर्धारित असल्याने अधिक यथार्थवादी अंतर्दृष्टी प्राप्त होईल.

**संदर्भग्रंथ सूची**


1. Anderson R, M. Bordo M and J. Duca, (2017), “Money and Velocity during financial crises: from the great depression to the great recession”, Journal of Economic Dynamics and Control, 81, 32-49.
2. Arestis P. and M. Sawyer, (2010), “The Return of Fiscal Policy” Journal of Post-Keynesian Economics, 32, 327-46.
3. Arrow K.J. and Hahn, F.H.,1971, General Competitive Analysis, San Francisco: Holden-Day Inc.
4. Bewley T., 1980, “The optimum quantity of money’, in: J. Kareken and N. Wallace, eds., Models of monetary economics. Minneapolis: Federal Reserve Bank of Minneapolis.
5. Black F., 1974, ‘Uniqueness of price level in monetary growth models with rational expectations’, Journal of Economic Theory, 7: 53-65.
6. Brock W., 1974, ‘Money and growth: The case of long-run perfect foresight’, International Economic Review, 15: 750-777.
7. Brody A., 2000, ‘The Monetary Multiplier ’, Vol. 12, No. 2, pp. 215-219, Economic System Research.
8. Chick V., 1973, The Theory of Monetary Policy, 1stedn, Oxford: Blackwell.
9. Chick V., 1983, Macroeconomics After Keynes, London: Philip Allan.
10. Clower R., 1967, ‘A reconsideration of the micro-foundations of monetary theory’, Western Economic Journal, 6: 1-9.
11. Clower R.W., 1965, “The Keynesian Counter-Revolution: A Theoretical Appraisal,” in The Theory of Interest Rates, eds. F.H. Hahn and F.P.R. Brechling, 103-125, London: Macmillan.
12. Davidson P., 1978, Money and the Real World, 2nd ed. London: Macmillan.
13. Duffie D., 1990, Money in General Equilibrium Theory, Handbook of Monetary Economics, Volume I, Edited by B.M. Friedman and F.H. Hahn © Elsevier Science Publishers B.V.
14. Dustmann C., B. Filzenberger, H. Sonberg and A. Spitz-Dener (2014), “From Silk Man of Europe to Economic Superstar: Germany’s Resurgent Economy”, Journal of Economic Perspectives, 28: 167-188.
15. Friedman M., 1974, “A Theoretical Framework for Monetary Analysis” in Milton Friedmen’s Monetary Framework, ed. R. J. Gordon, p 1-62, Chicago, Chicago University Press.
16. Gale D., (2010), “Money and General Equilibrium”, The New Palgrave,, Dictionary of Economics Palgrave, Macmillan.
17. Gale D., 1982, Money; In Equilibrium, Cambridge: Cambridge University Press.
18. Gale D., 1983, Money; In Disequilibrium, Cambridge: Cambridge University Press.
19. Gale D. and M. Hellwig, (1984), ‘A gen-

eral-equilibrium model of the transactions demand for money', CARESS Working Paper 85-107, University of Pennsylvania.
20. Garegnani, (1983), "Two Routes to Effective Demand: Comment on Kregel", in J. A. Kregel (ed)., Distribution, Growth and International Economic Relations, London: Macmillan
21. Geanakoplos J. and H. Polemarchakis 1986, 'Existence, regularity, and constrained suboptimality of competitive portfolio allocations when the asset market is incomplete', in W.P. Heller and D.A. Starrett, eds., Uncertainty information and communication. Essays in honor of Kenneth J. Arrow, Vol. III. Cambridge University Press.
22. Goodhart C.A.E, (2013), "The Potential Instrument of Monetary Policy", Central Bank Review, 13, 1-15
23. Grandmont J.M. 1983, Money and Value: A Reconsideration of Classical and Neoclassical Monetary Theories, Cambridge: Cambridge University Press.
24. Hahn, (1978), "On non-Walrasian Equilibria" Review of Economic Studies, 45, 1-17.
25. Hahn F. H., (1977), "Keynesian Economics and General Equilibrium Theory: Reflections on Some Current Debates" in Microeconomic Foundations of Macroeconomics ed. G. C. Harcourt.
26. Hahn F.H., 1965, "On Some Problems of Proving the Existence of an Equilibrium in a Monetary Economy," in The Theory of Interest Rates, ed. F.H. Hahn and F.P.R. Brechling, 126-135, London; Macmillan.
27. Hahn F.H. 1971, "Equilibrium with transaction costs", Econometrica 39, 417-39.
28. Heller W.P. and Starr, R.M. 1976, Equilibrium with non-convex transactions costs: monetary and non-monetary economies. Review of Economic Studies 43, 195-215.
29. Hicks J.R., 1937, "Mr. Keynes and the Classics: A Suggested Interpretation", Econometrica, 5, 147-159.
30. Keynes J.M., 1936, The General Theory of Employment, Interest and Money, London: Macmillan.
31. Keynes J.M., 1937, "The General Theory of Employment" Quarterly Journal of Economics, 51, 209-223.
32. Kohn M. 1986, "Monetary Analysis, the Equilibrium Method, and Keynes' General Theory", Journal of Political Economy, 94, 1191-1224.
33. Krugman P., (2012), End this Depression Now! W.W. Norton and Co., New York.
34. Krugman P., (1998), "Its Baack: Japan's Slump and the Return of the Liquidity Trap". Brookings Papers on Economic Activity, 2, 137-205.
35. Krugman P., (2000), The Return of Depression Economics, W. W. Norton and Co., New York.
36. Krugman P., (2015), The Austerity Delusion. The Guardian, 29 April.
37. Kurz H. D., (2016), Economic Thought, A Brief History, New York: Columbia University Press.
38. Kurz M. 1974, "Equilibrium in a finite se quence of markets with transactions cost". Econometrica 42, 1-20.
39. Lavoie M., 1984a, "The Endogenous Flow of Credit and the Post Keynesian Theory of Money", Journal of Economic Issues, 18, 771-797.
40. Lavoie M., 1984b, "Credit and Money: The Dynamic Circuit, Overdraft Economy and Post Keynesian Economics", in Money and Macroeconomic Policy, ed. M. Jarsulic, 63-84, Boston: Kluwer Nijihoff.
41. Leijonhufvud A., (1968), On Keynesian Economics and the Economics of Keynes, London: Oxford University Press.
42. Leontief, W. and Andras Brody, 1993, 'Money-flow Computations', Vol. 5, No. 3, pp. 225-233, Economic System Re-

search.
43. Lucas R. and Stokey, N. 1983, "Optimal fiscal and monetary policy in a economy without capital". Journal of Monetary Economics 12, 55-93.
44. Lucas R. and Stokey, N. 1987, "Money and interest in a cash-in-advance economy". Econometrica 55, 491-513.
45. Magill M. and Quinzii, M. 1992. Real Effects of Money In General Equilibrium. Journal of Mathematical Economics, 21, 301-42.
46. Magill M. and Quinzii, M. 1996, Theory of Incomplete Markets. Cambridge, MA: MIT Press.
47. Nachane D., (2018), Critique of the New Consensus Macro-economics and Implications for India, New Delhi: Springer Nature.
48. Niehans J., (1971), "Money and Barter in General Equilibrium with Transaction Costs," American Economic Review, 61, 773-83.
49. Okuno M. 1973, 'Essays on monetary equilibrium in a sequence of markets', Technical Report 120, Institute for Mathematical Studies in the Social Sciences.
50. Ostroy J.M. and Starr, R.M. 1974, "Money and the Decentralization of Exchange", Econometrica, 42, 1093-1113.
51. Patinkin D., 1958, "Liquidity Preference and Loanable Funds: Stock and Flow Analysis", Economica, 25, 300-318.
52. Patinkin D., 1965, Money, Interest, and Prices: An Integration of Monetary and Value Theory, 2ndedn. New York: Harper and Row.
53. Pigou A.C., 1943, "The classical stationary state". Economic Journal, 53, 343-51.
54. Posner R., (2011), "Walras, Keynes and the 'Great Recession', in Bridels P. (ed.) General Equilibrium Analysis. A Century after Walras, New York: Routledge.
55. Rogers C., 1989, 'Money, Interest and Capital', Cambridge: Cambridge University press.
56. Sargent T., 1987, Dynamic Macroeconomic Theory. Cambridge, MA: Harvard University Press.
57. Shapley L. and Shubik, M. 1977, "Trade using one commodity as a means of payment". Journal of Political Economy 85, 937-68.
58. Shubik M., 1985, Review of 'Money: In Equilibrium', Journal of Money, Credit and Banking, 17, 126-128.
59. Smith A. 1776, 'The Wealth of Nations ' , J.M. Dent, London.
60. Sraffa P., (1960), "Dr. Hayek on Money and Capital", The Economic Journal, 42, 42-63.
61. Starr R., (2010), "Sequence Economies" in The New Palgrave, Dictionary of Economics, Palgrave Macmillan.
62. Starrett D., 1973, 'Inefficiency and the demand for 'money' in a sequence economy', Review of Economic Studies, 40: 437-448.
63. Szilard B, Gillman M and Kejak M., (2010), "A Banking Explanation of the US Velocity of Money: 1919-2004", Journal of Economic Dynamics and Control, 24, 765-779.
64. Tobin J. 'A General Equilibrium Approach to Monetary Theory' reprinted in J. Tobin, Essays in Economics, 1971, vol.I, 322-338, Amsterdam: North-Holland.
65. Tsujimura, K. and Masako Mizoshita, 2003, 'Asset-Liability-Matrix Analysis Derived from the Flow-of-Funds Accounts; The Bank of Japan's Quantitative Monetary Policy Examined' Vol. 15, No.1, pp. 51-67, Economic System Research.
66. Wallace N., 1980, "The overlapping generations model of money". In Models of Monetary Economics, ed. J.H. Kareken and N. Wallace. Minneapolis: Federal Reserve Bank of Minneapolis.
67. Yeager L., 1968, "Essential Properties of a Medium of Exchange", Kyklos, 21, 45-68.

**आकडेवारीचे स्त्रोत:**

- https://www.ssa.gov/policy/docs/progdesc/sspus/unemploy.pdf
- https://wageindicator.co.uk/main/advice/social-security/unemployment-benefits
- http://www.oecd.org/els/soc/29734836.PDF
- https://www.ssa.gov/policy/docs/progdesc/ssptw/2016-2017/europe/spain.html
- https://www.expatica.com/nl/about/Dutch-social-security-system-explained_100578.html
- http://www.yieldcurve.com/marketyieldcurve.html
- http://www.treasury.gov/resource-centre
- http://datamarket.com/euro-yield-curves-daily data

◆

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४३ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, सोलापूर

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४३ वे वार्षिक अधिवेशन अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅन्ड सोशल सायन्सेस, सोलापूर येथे दिनांक ३१ ऑक्टोबर व १ आणि २ नोव्हेंबर २०१९ रोजी आयोजित केले आहे. अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. रामदास माहोरे, नागपूर हे असून अधिवेशनातील चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचाराची समर्पकता.

२) भारतीय शेतीसंबंधी पारित करण्यात आलेल्या कायद्याचे पुनर्रावलोकन.

३) महाराष्ट्राच्या जडणघडणीत छत्रपती शिवाजी महाराजांचे योगदान.

**ऐनवेळी चर्चेचा विषय**

४) १४ व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे अर्धशतक आणि सद्य:स्थिती
प्रमुख वक्ते : प्रा. ज्ञानदेव तळुले, प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

५) प्रा. नी. वि. सोवनी स्मृती व्याख्यान (दि. ३१ ऑक्टोबर २०१९)
प्रमुख वक्ते : डॉ. राहुल सोलापूरकर, पुणे (सुप्रसिध्द नाटक व दूरदर्शन कलावंत)
विषय : छत्रपती शिवरायांची सुराज्य संकल्पना

६) प्राचार्य या. शि. महाजन, माजी अध्यक्ष सन्मानार्थ व्याख्यान
(दि. २ नोव्हेंबर २०१९, सकाळी ९.०० वा.)

अधिवेशनाबाबत संपर्क

**डॉ. व्ही. एस. मंगनाळे,** संचालक आणि स्थानिक कार्याध्यक्ष

**डॉ. प्रीतम कोठारी,** स्थानिक कार्यवाह, मो. ९९२३३०३९१३

ई-मेल - pritampkothari@gmail.com

**डॉ. ए. बी. नदाफ,** स्थानिक सहकार्यवाह, मो. ९४२२६४९३०९

ई-मेल - nadafab@yahoo.com

**स्नेहांकित**

**आर.बी.भांडवलकर**

कार्यवाह-खजिनदार

मराठी अर्थशास्त्र परिषद

# लोकशाहीच्या आर्थिक सिद्धांताशी मतदार वर्तणुकीची फारकत : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक परिक्रमा व चलांवरील द्विदशक आकडेवारीचे तुलनात्मक निष्कर्ष

**ज्ञानदेव तळुले †, राजस परचुरे ††**

**प्राक्कथन**

सन १९९२ मधील ७३ आणि ७४ व्या घटना दुरुस्तीनंतर दोन वर्षानंतर १९९४ मध्ये महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना झाली. तेव्हापासून राज्य निवडणूक आयोग ग्रामीण लोकशाही प्रणालीत कार्यरत जिल्हा परिषद, पंचायत समिती व गाव ग्रामपंचायत तर शहरी लोकशाही प्रणाली कार्यरत नगरपंचायत/पालिका आणि महानगरपालिकांच्या निवडणुका घेऊन स्थानिक लोकशाही सत्तेच्या स्वरूपाला दिशा देण्याचे काम करत आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका समांतर म्हणजे एकाचवेळी तर नगरपालिका व महानगरपालिकांच्या निवडणूक दर पाच वर्षांनी मुदत संपल्यानंतर पार पडतात. १९९४ मध्ये स्थापन झाल्यापासून महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग अनुक्रमे २७,७८१ ग्रामपंचायती, ३५१ पंचायत समिती, ३४ जिल्हा परिषदा, ३४० नगरपरिषदा/नगरपंचायती आणि २६ महानगरपालिका अशा एकूण २८,००० स्थानिक स्वराज्य संस्थाकरिता साधारणपणे २.५० लक्ष प्रतिनिधींच्या निवडणुकीची प्रक्रिया पार पाडत आहे. प्रस्तुत संशोधन टिपण हे आमच्या महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकरिता अनुक्रमे उपरोल्लेखित स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांवर पार पाडलेल्या चार अभ्यास अहवालांचे सार आहे. प्रामुख्याने हे सर्व अभ्यास अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त १९९३ ते २०१३ दरम्यानच्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक आकडेवारीवर बेतले होते. प्रस्तुत संशोधन टिपण प्रामुख्याने उपरोल्लेखित कालखंडातील आकडेवारीच्या साहाय्याने महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती अशा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे तुलनात्मक विश्लेषण करून महत्त्वाच्या निवडणूक चलांच्या वर्तणुकीवर प्रकाश टाकून अनुमान काढण्याच्या प्रयत्नावर बेतले आहे. प्रस्तुत संशोधन टिपण फक्त निवडणुकीतील परिवर्तनीय चलांच्या वर्तणुकीचे स्वरूप समजण्यासच मदत करत नाही तर भविष्यातील शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था

† प्राध्यापक व विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ४१६००४
भ्रमणध्वनी : ९५२३७५०५५५. ई-मेल : dnyanshrinit@gmail.com
†† रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया वित्त अध्यासन प्राध्यापक आणि प्रभारी संचालक, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, बी.एम.सी.सी. मार्ग, डेक्कन, पुणे, ४११००४ संपर्क +९१-९८२२२३९६४४
ई-मेल : rajasparchure@gmail.com


निवडणुकांकरिताचे धोरण निश्चित करण्याकामीही महत्त्वाचे आहे असे निश्चित. अभ्यास अहवालांत आम्ही मतदानाचे प्रमाण, राजकीय संरेखन, राजकीय पक्षांमधील परस्पर स्पर्धा, अनुसूचित जाती-अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय जागांच्या आरक्षणाची गतिशीलता तसेच अपक्ष उमेदवारांनी जिंकलेल्या जागांची गतिशीलता इत्यादी निवडणूक संबंधित चलांबाबत अंतर्दृष्टी निर्माण करण्यासाठीचे विशेष प्रयत्न केले आहेत. प्रस्तुत विश्लेषण परंपरागतदृष्ट्या नक्कीच लागू पडत असले तरीही याचा प्रमुख उद्देश निवडणुकांसंदर्भात माहितीतील दरी भरून काढणे हा आहे. जेणेकरून निवडणूक आयोगास भविष्यातील निवडणूकविषयक धोरण निश्चित करण्यास मदत करणे असा आहे.

## १. प्रास्ताविक

पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा देणारे ७३ आणि ७४ वे घटनादुरुस्ती विधेयक १९९२ मध्ये मंजूर करण्यात आले. याच विधेयकाने महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकरिता महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या निर्मितीचा मार्ग सुकर केला. तद्नंतर १९९४ पासून महाराष्ट्रातील सर्व ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगामार्फत आयोजित केल्या जातात. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांत महानगरपालिका व नगरपंचायत किंवा नगरपालिकांचा समावेश होतो तर ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थात जिल्हा परिषद, पंचायत समिती व गाव ग्रामपंचायतींचा समावेश होतो. स्थापनेनंतर १९९४ पासून राज्य निवडणूक आयोग ग्रामीण लोकशाही व्यवस्था टिकवून ठेवण्याकरिता जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत आणि शहरी लोकशाही सत्तेचे स्वरूप निश्चित करणाऱ्या महानगरपालिका व नगरपंचायत किंवा नगरपालिकांच्या निवडणुकांचे अविरतपणे आयोजन करत आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका एकाचवेळी तर महानगरपालिका व नगरपालिकांच्या निवडणुका दर पाच वर्षांनी नियमितपणे पार पाडल्या जातात. तसेच ग्रामपंचायत निवडणुकाही दर पाच वर्षांनी नियमितपणे पार पडतात. महाराष्ट्रात राज्य निवडणूक आयोगाच्या स्थापनेवेळी काही ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्था आधीच अस्तित्वात होत्या आणि लोकशाही प्रतिनिधींच्या माध्यमातून त्यांचे कार्य सुरू होते. अशा सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना काम करण्याची मुभा देण्यात आली आणि त्यांचा पाच वर्षांचा कार्यकाल जेव्हा पूर्ण होईल तेव्हा निवडणुका घेण्याचे धोरण स्वीकारले गेले. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकाचवेळी होत नाहीत. परिणामे राज्यातील वेगवेगळ्या ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्था त्यांचा पाच वर्षांचा कार्यकाल जेव्हा पूर्ण होईल, अशा वेगवेगळ्यावेळी निवडणुकांना सामोऱ्या जातात. १९९४ ते २०१३ या वीस वर्षांच्या काळात(ज्यावर प्रस्तुत संशोधन अभ्यास बेतला आहे) महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या चार परिक्रमा पूर्ण केल्या होत्या. अनुक्रमे पहिली निवडणूक परिक्रमा १९९४-१९९८ या कालखंडात, दुसरी परिक्रमा १९९९-२००३, तिसरी परिक्रमा २००४-२००८ आणि चौथी परिक्रमा २००९-२०१४ या काळात पार पडल्या. २०१४ पासून या सर्व ग्रामीण आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची पाचवी परिक्रमा सुरू झाली होती. २०१४ मध्ये आमचा प्रस्तुत अभ्यास सुरू असताना महाराष्ट्रातील ३६ पैकी २६ जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्या होत्या तर उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नोव्हेंबर

२०१६ ते मार्च २०१७ दरम्यान निश्चित केल्या होत्या. राज्य निवडणूक आयोगाने १९९४ पासूनच्या निवडणूक परिक्रमांवर आधारित मूलभूत निवडणूक चलांविषयीची आकडेवारी जतन केली आहे. ही आकडेवारी प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गतची लोकसंख्या, संबंधित लोकसंख्येतील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचे प्रमाण, स्थानिक स्वराज्य संस्थेतील प्रभाग संख्या, प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेत लढविल्या गेलेल्या जागा, अनुसूचित जाती-जमाती व इतर मागावर्गीय श्रेणीकरिता आरक्षित जागा, खुल्या प्रवर्गाअंतर्गत येणाऱ्या जागा, खुला प्रवर्ग, अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गातील स्त्रियांकरिता राखीव जागा, एकूण लोकसंख्येतील मतदारांची संख्या, पुरुष व महिला मतदारांची संख्या, झालेले एकूण मतदान, एकूण पात्र मतदान, मतदानाचे प्रमाण किंवा टक्केवारी आणि मतदान श्रेणी (एकूण वैध मतदान /लोकसंख्येतील एकूण पात्र मतदार), विविध राजकीय पक्ष आणि त्यांचे युती किंवा सहभागींना मिळालेल्या मतांचे प्रमाण तसेच अपक्ष उमेदवारांचे मतांचे प्रमाण आणि विविध राजकीय पक्ष, त्यांचे युती सहकारी व अपक्ष उमेदवारांनी जिंकलेल्या जागांचे विवरण इत्यादी निवडणूक चलांविषयी असल्याचे दिसून येते.

**आलेख क्र. १**




**२. सैद्धांतिक दृष्टिकोन आणि स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांतील मतदान प्रमाणाविषयी जागतिक अनुभव:**

ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासनाचे स्वरूप आलेख क्र. १वरून लक्षात येऊ शकते.

निवडणुकीतील मतदानाचे न्यूनतम प्रमाण ही फक्त भारतीय लोकशाहीसमोरीलच समस्या आहे असे नव्हे. अगदी अमेरिकन लोकशाहीनेही सार्वत्रिक निवडणुकांत मतदानाच्या न्यूनतम प्रमाण समस्येचा वारंवार अनुभव घेतला आहे (Bannett and Resnick, 1990, Sidney Verba, Schlozman and Brady,

1995). अमेरिकेतील जवळजवळ ५०.०० टक्के पात्र मतदार राष्ट्रपती निवडणुकीत आपला मतदानाचा अधिकार बजावत नसल्याचे अनेकदा दिसून आले आहे. ढोबळमानाने या घटनेला देशाच्या लोकशाहीसमोरील संकटाचा पुरावा मानले जाऊ शकते (Ruy A. Texeira, 1992, Rosenstone and Hanseon, 1993). गेल्या काही दशकांत काही अभ्यासकांनी व्यापकपणे अमेरिकेतील नगरपालिका पातळीवरील मतदान प्रमाणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. या सर्व अभ्यासकांनी असे सूचित केले आहे की, अमेरिकेतील राष्ट्रीय निवडणुकांच्या तुलनेत नगरपालिका मतदानाचे प्रमाण अर्ध्यावर आहे. काही शहरांत तर मतदान योग्य वयोमान लोकसंख्येच्या एक चतुर्थांशपेक्षाही कमी मतदान झाल्याचे निदर्शनास येते (Alford and Lee, 1968, R. L. Morian, 1984, Ruby Bridges, 1997). तथापि, भारतातील जिल्हा परिषदेसारख्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील मतदानाचे प्रमाण एकूण लोकसंख्येतील मतदार प्रमाणाच्या तुलनेत समाधानकारक असल्याचे निदर्शनास आले आहे. नगरपालिका पातळीवरील निवडणुकांतील मतदानाची कमी टक्केवारी अनेक समस्यांकडे अंगुलीनिर्देश करते. यातील महत्त्वाची समस्या म्हणजे नगरपालिका निवडणुकांतील लोकांच्या दृष्टिकोनाच्या गंभीर विकृतीकरणाचा धोका होय. लोकशाही शर्यतीत समाजातील वंचित घटक, गरीब, अशिक्षित आणि वांशिक अल्पसंख्यांकांचा कल प्रकर्षाने इतरांपेक्षा कमी नियमितपणे मतदान करणे असा असू शकतो. नव्हे तसा तो असतोही (Rosenstyone and Hansen, 1993, Sidney Verba, Schlozman and Brady, 1995). आणि म्हणून जर मतदानाचे प्रमाण न्यूनतम असेल तर असा पूर्वग्रह ठळकपणे जाणवण्याची शक्यता असते (Wattenberg, 1998).

परिणामे स्थानिक पातळीवर मतदारांचा लोकशाही प्रक्रियेतील न्यूनतम किंवा असहभाग आणि परिणामे मतदानाचे न्यून प्रमाण लोकशाही प्रतिनिधित्व प्रक्रियेचा विपर्यास करू शकते. म्हणून ग्रामीण व शहरी लोकशाही प्रक्रिया सशक्त करून स्थानिक पातळीवर लोकाभिमुख धोरणे आखून अंमलबजावणी करण्यासाठी लोकांचा सहभाग वाढविणे हे एक आव्हान आहे. वास्तविक पाहता स्थानिक पातळीवर मतदान करणे ही एक प्रकारे नागरिकांना लोकशाही प्रक्रियेतील सहभागाचे प्रशिक्षण देण्याची प्रक्रिया मानली जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नजिकतेमुळे आणि तुलनात्मकदृष्ट्या लहान आकारमानामुळे नागरिकांना महत्त्वाची लोकशाही कौशल्ये प्राप्त करून त्याबद्दल ओळख करून घेणे स्थानिक पातळीवरच शक्य होऊ शकते(Zoltan Hajnal, P. G. Lewis, Hugh Louch, 2002). मतदानाचे प्रमाण निवडणूक वेळ निर्भरही असल्याचे मानले जाते. निवडणूक वेळेचाही मतदानाच्या प्रमाणावर प्रचंड प्रभाव पडतो, असा अनेक देशांचा अनुभव आहे. याचे प्रमुख कारण असे की, अकालिक निवडणुकांतील मतदानाची टक्केवारी कालीक निवडणुकांतील मतदानाच्या टक्केवारीपेक्षा प्रकर्षाने कमी असल्याचे निरीक्षण मिळते. उदाहरणार्थ, कॅलिफोर्नियाच्या अनुभवावर दृष्टिक्षेप टाकता असे निदर्शनास आले की, अकालिक शहरी निवडणूक मतदानाची टक्केवारी राष्ट्रपती निवडणुकीबरोबर होणाऱ्या शहरी निवडणुकीपेक्षा ३८.०० टक्के कमी होती (Sarah F. Anzia, 2014). मतदानाची टक्केवारी वाढविण्यात सामाजिक भांडवलही महत्त्वाची भूमिका पार पाडताना दिसून येते. परिणामतः त्यामुळे राष्ट्रीय व स्थानिक पातळीवर राजकीय प्रतिनिधित्वात सुधार घडवून आणण्यात त्याचे पर्यवसन होते (Mathew D., Atinson and Anthony Fowler, 2012).

मतदानासाठी वेळ आणि माहितीची आवश्यकता असते. आणि एका मतामुळे निवडणुकीच्या निकालावरील परिणामाची शक्यता धूसर असते. पर्यायाने निवडणुकीतील मतदार सहभाग अभिजात संग्रहित कृतीची समस्या निर्माण करणारा ठरतो (Mancur Olson, 1965). समाजाच्या माध्यमातून राजकीय माहितीचे संप्रेषण करून सामाजिक भांडवल मतदानाचे प्रमाण वाढविण्यात मदत करू शकते. अलीकडच्या काळातील क्षेत्र सर्वेक्षणांचा असा अनुभव आहे की सामाजिक दबावामुळे मतदानाचे प्रमाण ३०.०० ते ३८.०० टक्के इतके वाढू शकते (Gerber et. al., 2008). तथापि, प्रतिदृष्टिकोन असाही आहे की, सामाजिक एकसंघपणा कदाचित मतदानाचे प्रमाण घटविण्यास कारणीभूत ठरू शकतो. असे तेव्हा घडू शकते जेव्हा वैयक्तिक सामाजिक जाळे अशी शक्ती तयार करते की, आपल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांना मतदानाची आवश्यकता भासत नाही (Diana C. Hutz, 2002). विविध समुदायांतर्गत सामाजिक भांडवलातील वाढ राजकीय दृष्टिकोनाबद्दल अनिश्चितता निर्माणकारी ठरते व त्याचे रूपांतर मतदान प्रमाण घटण्यात होते (Diana C. Hutz, 2002). थोडक्यात, ग्रामीण अथवा शहरी लोकशाहीच्या प्रत्येक स्तरावरील मतदान प्रमाणावर सामाजिक भांडवलाच्या धनात्मक अथवा ऋणात्मक परिणामावर विश्वास ठेवण्यासाठी प्रबळ कारणे उपलब्ध आहेत.

निवडणुकीत एकूण पात्र मतदारांपैकी आपला मतदानाचा अधिकार बजावणाऱ्या मतदारांचे प्रमाण म्हणजे मतदानाची टक्केवारी आणि हे नागरिकांच्या लोशाही प्रक्रियेतील सहभाग निदर्शकाचे एक महत्त्वपूर्ण संक्रमण मानले जाते. जागतिक पातळीवर १९४५ ते २००१ दरम्यान मतदानाच्या प्रमाणात लक्षणीय घट झाल्याचे निरीक्षण मिळते. यात प्रामुख्याने १९८० नंतर प्रभावी घट झाल्याचे दिसून येईल (Rafael Lopez Pintor, 2002, Maira Grastschew and Kate Sullivan, 2002). जेव्हा अनेक देश लोकशाहीकरण प्रक्रियेच्या लाटेवर आरूढ होते त्या १९८० च्या दशकात आफ्रिकेत लोकशाही प्रक्रिया सहभाग प्रकर्षाने वाढला. याच कालखंडात उत्तर आणि दक्षिण अमेरिकेतील मतदानाचे प्रमाण स्थिर राहिल्याचे निदर्शनास आले. असाच काहीसा अनुभव ओशियाना व पश्चिम युरोपचा राहिला. यादरम्यान मध्यपूर्वेत मतदान प्रमाणात सातत्याने चढ-उतारांनी आश्चर्यकारक उंचसखलपणा दर्शविला (Rafael Lopez Pintor, 2002, Maira Grastschew and Kate Sullivan, 2002). १९९० ते २००१ दरम्यान ओशियानातील मतदानाची सरासरी पातळी ७९.०० टक्के इतकी वर गेली. साधारणपणे ७८.०० टक्के मतदान प्रमाण असणाऱ्या पश्चिम युरोपपेक्षा हे प्रमाण काहीसे अधिक होते. याच काळात आशिया आणि मध्य युरोपचे सरासरी मतदान प्रमाण ७२.०० टक्के राहिले तर मध्य आणि दक्षिण अमेरिकेत ते ६९.०० टक्के अणि उत्तर अमेरिका व कॅलिफोर्नियातील मतदानाचे प्रमाण ६५.०० टक्के असल्याचे दिसून आले. या तुलनेत आफ्रिकेचे मतदान प्रमाण ६४.०० टक्के असे न्यूनतम पातळीवर राहिल्याचे दिसून आले. अर्थात, कोणत्याही मापकांच्यादृष्टिने भारतातील लोकसभा निवडणुकांच्या तुलनेत हे अधिकच आहे, असे दिसून येते (Rafael Lopez Pintor, 2002, Maira Grastschew and Kate Sullivan, 2002). मतदान प्रमाणाची आंतरदेशीय तुलना प्रचंड तफावतीची आकडेवारी सूचित करते. उदाहरणार्थ, शेजारच्या स्वित्झर्लंडमधील ५६.०० टक्के मतदानाच्या तुलनेत पश्चिम युरोपमधील लिचटेनस्टाइनमधील ९३.०० टक्के मतदान प्रमाणाकरिता तेथील सक्तीच्या मतदानाचा परिणाम मानावा लागेल. अर्थात, बहामासारख्या देशात मतदान सक्ती नसूनही हाइतीतील

सरासरी ४७.०० टक्के मतदानाच्या तुलनेत ९२.०० टक्के मतदान आश्चर्याचे मानावे लागेल (Rafael Lopez Pintor, 2002, Maira Grastschew and Kate Sullivan, 2002). १९७० पासून प्रस्थापित लोकशाही देशांत मतदानाच्या प्रमाणात संथगतीने परंतु सातत्याने घट झाल्याची नोंद मिळते. तथापि, याच कालखंडात इतर अनेक देशांत लोकशाही सहभागाची प्रक्रिया सशक्त होऊन मतदान प्रमाण ८०.०० टक्केपर्यंत असे प्रचंड प्रमाणात वाढले (Rafael Lopez Pintor, 2002, Maira Grastschew and Kate Sullivan, 2002). अर्थात, याविषयी विवाद असण्याचे काहीही कारण नाही की वाचन-लिखाणाची क्षमता, स्त्री साक्षरता प्रमाण (FLR), दरडोई उत्पन्न इत्यादींची सुसंगत अणि ज्ञानाधारित राजकीय निर्णयप्रक्रिया वाढीस लागण्याची आवश्यकता नाही. वास्तवात असे निदर्शनास आले आहे की साक्षरता दर जसा वाढतो तसे सुरुवातीस मतदान प्रमाणही वाढते परंतु साक्षरता दर जसा ९०.०० टक्क्याची सीमा पार करतो तसे मतदान प्रमाणही घटते (Rafael Lopez Pintor, 2002, Maira Grastschew and Kate Sullivan, 2002). जागतिक पातळीवर मध्यवर्ती किंवा लोकसभा निवडणूक प्रक्रियेत एकूण नऊ (९) प्रणाली वापरात आहेत. ऑस्ट्रेलिया, फिजी आणि नऊरमध्ये वापरात वैकल्पिक मतानुसार, मतदानाचे सरासरी प्रमाण ९०.०० टक्के आहे तर जॉर्डन आणि वानुअतूमधील एकतंत्र अहस्तांतरणीय मतप्रणालीसह मतदानाचे सरासरी प्रमाण ४३.०० टक्के असल्याचे दिसून येते. इतर मतप्रणालीमध्ये इतकी मोठी विचलना निदर्शनास येत नाही. एक हस्तांतरणीय मतदान प्रमाण ८०.०० टक्के आणि द्विफेरी प्रणाली ६३.०० टक्के वर आहे. आश्चर्यकारक निष्कर्ष असा आहे की प्रकर्षाने वापरल्या जाणाऱ्या दोन प्रणालीत तुलनात्मकदृष्ट्या कमी फरक दिसतो. याकरिता सातत्याने जे कारण सांगितले जाते ते म्हणजे शक्यतो जास्तीत जास्त लोकांना असे वाटते की, लोकशाही म्हणजे राजकीय पक्ष आणि निवडणुका यापलीकडे काहीही नाही. पाच वर्षांतून एकदा मतदान करण्याव्यतिरिक्त सामान्य नागरिकांची सरकारशी फारकतच झालेली असते. हे वास्तव आहे की, मतदान प्रमाण घटले आहे आणि जगातील प्रस्थापित लोकशाही देशांनी या अनुभवास 'राजकीय पक्षांचे संकट' म्हणून संबोधले आहे.

संयुक्त राष्ट्र सर्वसाधारण सभेच्या १९७९ च्या करारान्वये स्त्रियांसंदर्भात सर्व भेदाभेद दूर करून त्यांना सार्वजनिक जीवनात समान महत्त्व देऊ केले असल्याने याला एक महत्त्वपूर्ण निर्णय मानला जातो. तथापि, यामुळे वास्तव परिस्थितीत स्त्रियांचा मतदान प्रमाण वाढविण्याकामी खरोखरच सहभाग वाढला आहे काय हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. पश्चिम युरोप आणि उत्तर अमेरिकेतील मतदान स्वरूपाचा अभ्यास करणाऱ्या विविध अभ्यासकांनी असे सिद्ध केले आहे की, वयाबरोबरच लिंग आणि सामाजिक वर्ग देखील महत्त्वाचे लोकसंख्याविषयक आणि सामाजिक लक्षण होते की, ज्याचा वापर सार्वजनिक सहभाग, राजकीय क्रियाकलाप आणि मतदान प्रमाणविषयक अंदाज वर्तविण्याकामी केला गेला (Tingsten, 1937, Almond and Verba, 1963, Stein Rokkan 1970, Verba Sidney N. and Norman NH. Nie, 1972). अभ्यासांती असेही दिसून आले आहे की, स्वीडनसारख्या प्रगतशील औद्योगिक देशात १९५० च्या दशकात लैंगिक भेदाभेद कमी होत गेले (Martin Lipset, 1960). बहुतांश समाजात राजकीय क्रियाकलापाबाबत स्त्रियांपेक्षा पुरुष अधिक कार्यक्षम असल्याचे निदर्शनास आले आहे (Verba Sidney N., Nie Lekajcie Sieand and Kim Cattreal, 1978). शिक्षणाचा प्रभावी प्रसार होऊनदेखील असे लैंगिक भेदाभेद टिकून राहिले. संप किंवा निषेध चळवळीसारख्या अपारंपरिक लोकशाही संघटनात

स्त्रियांचा सहभाग नेहमीच कमी राहिल्यामुळे परिणामत: पारंपरिक लोकशाही प्रक्रियेतही त्यांचा सहभाग आपोआपच न्यूनतम राहिला (Barnes and Kaase, 1979). तथापि, अलीकडच्या काळातील स्त्रियांचा मतदानातील सहभाग पाहता अशा निरीक्षणास दुजोरा मिळत नाही. उदाहरणार्थ, १९८० नंतरच्या अमेरिकन राष्ट्रपती निवडणुकांतील मतदानाचा हक्क बजावलेल्या पात्र प्रौढ स्त्रियांचे प्रमाण मतदानाचा हक्क बजावलेल्या पात्र प्रौढ पुरुष मतदारांपेक्षा सातत्याने अधिक असल्याचे दिसून येते. १९८६ पासूनच्या बिगर राष्ट्रपती अकालिक निवडणुकांत अशाच घटनाक्रमाची पुनरावृत्ती झाल्याचे पुरावे मिळतात (CAWP, 2000). अमेरिकेतील महिला मतदानाचे एकंदरीत प्रमाण पाहता असे निदर्शनास येते की, प्रत्येक राष्ट्रपती निवडणुकीत पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदारांच्या मतदानाचे प्रमाण अधिक राहिले आहे. ब्रिटनच्या बाबतीतही असाच कल असल्याचे दिसून येते. १९७९ मध्ये तेथील मतदान लिंग दरी कमी झाल्याने १९९७ च्या सार्वत्रिक निवडणुकांत १५.८० दशलक्ष पुरुष मतदानाच्या तुलनेत महिला मतदानाचा आकडा १७.७९ दशलक्ष इतका राहिला (Rafael Lopez Pintor, Maria Gratschew and Kate Sullivan, 2002). मतदान प्रमाण प्रभावित करून नागरिकांना अर्थपूर्ण राजकीय क्रियाकलापाकडे आकर्षित करता येऊ शकते; परंतु त्याकरिता मतदानाची टक्केवारी वाढणे आवश्यक आहे (Rafael Lopez Pintor, Maria Gratschew and Kate Sullivan, 2002).

बार्बाडोस आणि स्वीडनसारख्या देशांत महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांपेक्षा सतत अधिक राहिली आहे. महिलांना राजकीय चौकटीत आणण्याच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांमुळे मतदान प्रमाण वाढण्याची संभाव्यता वृद्धिंगत होते. युवक मतदारांचे एकूण मतदारांशी प्रमाण, इंटरनेट मतदान, मतदान मुदतवाढ आणि कदाचित सक्तीचे मतदान इत्यादी बाबींचा मतदान प्रमाण वाढविण्यास कारणीभूत घटकांत समावेश होऊ शकतो. सक्तीचे मतदान ही काही नवीन कल्पना नाही. बेल्जियम (१८९२), अर्जेंटिना (१९१४) आणि ऑस्ट्रेलिया (१९२४) या देशांनी जगात पहिल्यांदा सक्तीच्या मतदानाचे कायदे केले होतेच (कित्ता).

## ३. सैद्धांतिक विवेचन

लोकशाहीत सरकारे आपली लोककल्याणकारी धोरणे ठरविताना मतदाराच्या मतावर लक्ष ठेवूनच ते काम करत असतात. पर्यायाने अशी धोरणे ठरविताना व त्यांची अंमलबजावणी करताना मतदाराचे मत आणि राजकोषीय अथवा इतर धोरणात कशा प्रकारचे सहसंबंध आहेत याचा शोधही राज्यकर्त्या पक्षाला व पर्यायाने सरकारला घ्यावा लागतोच. असे समजले जाते की नागरिकांची राजकारणाप्रति वर्तणूक तर्कसंगत असते. हा तर्क असा असतो की, नागरिक लोकशाही राजकारणात त्याच पक्षाला मतदान करतो की ज्यावर त्याचा विश्वास असतो. म्हणजेच जो पक्ष इतर पक्षांपेक्षा आपल्याला अधिक लाभ मिळवून देईल अशाच पक्षाला मतदान करण्याची प्रवृत्ती दिसून येते. नव्हे तसे ते अभिप्रेतही असते. लोकशाही मतदान प्रक्रियेबाबत असाच दंडक सर्वमान्य असला तरी तो समजून घेण्याची एकंदरीत प्रक्रिया मात्र गुंतागुंतीची व संभ्रमावस्थेत टाकणारी आहे. मतदान प्रक्रिया मुळातच देशातील नागरिकांचे लोकशाही व्यवस्थेशी संबंध अधोरेखित करते. तथापि, अनेक देशांतील मतदान प्रमाणावर दृष्टिक्षेप टाकल्यास असे निदर्शनास येते की, अल्प मतदान टक्केवारीस जगातील शक्यतो कोणताही लोकशाही देश अपवाद नाही. अर्थात, बहुतांशी नागरिकांना मतदान हा एकमेव मार्ग आहे, ज्याच्या माध्यमातून ते त्यांना कशा प्रकारची शासनव्यवस्था हवी आहे ते ठरविण्याचा प्रयत्न करतात. मतदानाची

अधिकतम टक्केवारी लोकशाहीचे महत्त्व व प्रभाव विशद करते याबद्दल शंका नसावी. याउलट मतदानाची कमी टक्केवारी नागरिकांचे लोकशाहीप्रति दुर्लक्ष तसेच लोकशाही प्रतिनिधींवरील अविश्वास अधोरेखित करते (Phadke, Parchure and Talule, 2018). याचा अर्थ असा निघतो की, मतदानाची कमी टक्केवारीतून; १)नागरिकांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यात राजकीय पक्ष एकतर अपयशी ठरतात किंवा त्यांना त्यात कमी रस आहे. २) निवडून आलेले प्रतिनिधी त्यांनी दिलेली वचने पूर्ण करण्यात अपयशी ठरतात किंवा ३) निवडणूक प्रक्रिया की ज्यामार्फत लोक आपले प्रतिनिधी निवडतात त्या प्रक्रियेवरील लोकांचा विश्वासच नाहीसा झाला आहे असे अर्थ ध्वनिमुद्रित होऊ शकतात. अर्थात, न्यून मतदान टक्केवारीचे काहीही कारण असो; परंतु लोकशाही देश विविध पातळीवरील निवडणूक प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणात संसाधने वापरून नागरिक निवडणूक प्रक्रियेत प्रभावी भाग घेऊन लोकशाही प्रक्रियेतील त्यांचे आद्यक्रम व्यक्त करतील अशी अपेक्षा बाळगतात. अर्थात, मतदान प्रमाणाचा आणखी एक महत्त्वाचा दृष्टिकोन आहेच, तो म्हणजे मतदान प्रमाणाचे 'प्रातिनिधिकत्व.' जर मतदार काही विशिष्ट समूहातील अथवा विशिष्ट लक्षणधारी असेल (उदा. लिंग, वय, उत्पन्न, शिक्षण, व्यवसाय इत्यादी) तर त्यांच्या मतदान प्रक्रियेतील एकंदरीत सहभागाचे पात्र मतदारांशी प्रमाण कमी असणार व त्यामुळे त्यांच्या प्रातिनिधिक लोकशाहीकडून असणाऱ्या अपेक्षा निवडणूक निकालातून ध्वनिमुद्रित होण्याची शक्यता कमी असणार पर्यायाने लोकशाही व्यवस्थेत निवडून आलेल्या प्रतिनिधींकडूनही अशा मतदारांचे हितसंबंध जपले जाण्याची शक्यता कमी असते. लोकशाहीत प्रातिनिधिक विषमतेमुळे प्रभावी नागरिकांचे हितसंबंध अधिक प्रमाणात जपले जातात (Lijphart, 1997). यामुळे लोकशाहीचे मूलभूत तत्त्वच नाकारले जाते. लोकशाही व्यवस्थेत देशाच्या संपूर्ण समाजाचे आद्यक्रम सार्वजनिक धोरणात ध्वनिमुद्रित होणे अपेक्षित आहे. म्हणून निवडणुका ही अशी प्रक्रिया आहे की, ज्याच्या माध्यमातून संसाधनांची उभारणी/ जुळवाजुळव आणि वापर कोण करणार याबाबत नागरिक निर्णय घेतात. म्हणूनच मतदानाचे न्यून किंवा अप्रातिनिधिक प्रमाण म्हणजेच सार्वजनिक विकास धोरणाबाबतचे नागरिकांचे अपयश होय. त्यामुळे ज्या प्रकारच्या सार्वजनिक धोरणांकरिता संसाधने वापरली जावीत अशी लोकांची इच्छा असते परंतु तसे घडत नाही.

लोकशाहीत मतदानाचा हक्क बजावताना नागरिक तारतम्यभावाचे प्रदर्शन करतात. येऊ घातलेल्या सरकारमुळे आपल्या उपयोगिता उत्पन्नावर काय परिणाम होणार याचा विचार करूनच मतदानाची दिशा ठरविली जाते. मतदार संभाव्य उपयोगितेचे मापन आपल्या मनात करूनच निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात मतदानविषयक आपला निर्णय घेत असतो. कारण नागरिकांना सरकारी योजनांपासून सतत लाभ पोहोचत असतात तर त्यातील काही नागरिकांना सरकारी योजनांमुळे आपले नुकसान होत असल्याची भावना असते. अशा नागरिकांचा विरोध मतदानाच्या माध्यमातून व्यक्त होणे सहज शक्य असल्याने लोकशाही व्यवस्थेत निर्णयप्रक्रियेची राजकीय अर्थव्यवस्था आणि त्याचे जनमानसातील संभाव्य लाभ-तोटे महत्त्वाचे असतात. म्हणून या राजकीय अर्थव्यवस्थेतील निर्णयप्रक्रियेचे मतदाराच्या उपयोगिता उत्पन्नावरील परिणाम कसे असतील याचा सहजी अंदाज येणे कठीण असते. ज्या देशात द्विपक्षीय लोकशाही कार्यरत असते अशा देशात दोन्ही पक्षांकडून मतदारास भिन्न अशा दोन उपयोगिता उत्पन्नाच्या कल्पना असतात. अर्थात तसे त्यांनी आपल्या मताशी ठामपणे ठरवून ठेवलेले

असते. म्हणून अशा अपेक्षित दोन उपयोगिता उत्पन्नानुसार नागरिकांचा संबंधित पक्षांकरिता आद्यक्रम ठरतो व तो आद्यक्रम पुढीलप्रमाणे व्यक्त होतो.

E(UAt+1)-E(UBt+1)

जर वरील सूत्ररचनेचे प्राप्त उत्तर धनात्मक असेल तर मतदार सत्तेत असलेल्या राजकीय पक्षास पुन्हा सत्तेवर आणेल आणि जर याचे उत्तर ऋणात्मक असेल तर मग मात्र विरोधी पक्ष सत्तेवर येण्याची शक्यता बळावते. तर्कसंगत मतदार आपले उपयोगिता उत्पन्न असे निश्चित करतो की, ज्याद्वारे तो आपला पक्षीय आद्यक्रम देऊ करतो. या प्रश्नाचे उत्तर शोधणे मात्र अवघड आहे. जेव्हा मतदार आपले सरकार निवडण्याकरिता मतदान करतो तेव्हा येत्या (t+1) कालखंडाकरिता त्याच्यावतीने कोण निर्णय घेणार याविषयी तो विचार करत असतो. त्यामुळे जिंकण्याकरिता स्पर्धा करणाऱ्या प्रत्येक पक्षाची भविष्यातील वर्तणूक कशी असेल याबद्दल तो काही अंदाज बांधत असतो. परंतु तो जर विवेकशील असेल तर कोणताही राजकीय पक्ष त्याच्या सर्वच अपेक्षा पूर्ण करू शकणार नाही, याविषयीची खात्री बाळगणार हे निश्चित. त्यामुळे अशावेळी तो पक्षीय कार्यक्षमतेचा विचार करण्यापेक्षा वास्तवात सत्तेत आल्यानंतर त्या पक्षाची बृहत वर्तणूक कशी असेल याचा विचार करेल. अर्थात, भारतासारख्या अपरिपक्व लोकशाही व्यवस्थेत असे काही घडेल याची अपेक्षा बाळगणे अवघड आहे. उदाहरणार्थ, भारतीय लोकशाहीच्या बाबतीत 'मध्यगा लोकशाही सिद्धांत' पूर्णपणे अपयशी ठरतो. याचे कारण निवडणूक प्रक्रियेतील पैशाचा प्रचंड वापर. त्यामुळे गरीब लोकसंख्येचे मध्यगा मूल्य अधिक असूनही करांचे दर कमी राहतात. परंतु गरीब मतदारांची संख्या जर तुलनेने जास्त आहे तर मग गरीब मतदार श्रीमंतधार्जिणे कर धोरण आखणाऱ्या पक्षांच्या हाती लोकशाही सत्तासूत्रे कशी देतात. याचे मुख्य कारण कदाचित निवडणूक प्रक्रियेतील पैशाचा प्रचंड वापर आणि मतदानाची किंमत असू शकते. एकंदरीत काय तर संख्येने जास्त असलेल्या गरीब मतदारांचे मत श्रीमंतांच्या पैशाने खरेदी करून सत्तेत आल्यानंतर श्रीमंताभिमुख कररचनेसारखी आर्थिक धोरणे ठरविण्याची क्लृप्ती राजकीय पक्षांद्वारा अवलंबिली जाते. यामुळे कदाचित भारतासारख्या मतदाराच्या तर्कसुसंगत लक्षणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ शकते. अर्थात, याव्यतिरिक्त इतर अनेक घटक निवडणूक काळात कार्यरत असल्याची उदाहरणे आहेत. त्या सर्वांची चर्चा येथे करणे अशक्य तसेच अप्रस्तुतही आहेच.

## ४. माहिती व आकडेवारी, चलव्याख्या आणि संशोधन प्रश्न

निम्नउर्ध्वृत आलेख क्र. २ मध्ये महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडे उपलब्ध असलेल्या निवडणुकांच्या चार परिक्रमांवरील आकडेवारीचे चित्रमय प्रदर्शन करतो. यानंतर या चार निवडणूक परिक्रमांना अनुक्रमे R1, R2, R3 आणि R4 असे संबोधले आहे. काही स्थानिक स्वराज्य संस्थांची R1 करिताची मतदान प्रमाणाची आकडेवारी उपलब्ध नाही. तथापि, R2, R3 आणि R4 करीताची सर्व निवडणूक चलांसंबंधीची आकडेवारी पूर्णपणे उपलब्ध आहे. प्रस्तुत आकडेवारी महानगरपालिका, नगरपालिका/नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती इत्यादी स्थानिक स्वराज संस्थासंबधी आहे. अर्थात, ग्रामपंचायत निवडणुकांवरील आकडेवारी जतन करून ठेवलेली नाही.

गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेत आम्ही १९९४ ते २०१३ या वीस वर्षांच्या कालावधीत पार पडलेल्या स्थानिक स्वराज संस्था निवडणुकांच्या चार

**आलेख २ : महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडील निवडणूक चलासंबंधीची आकडेवारी**

परिक्रमांवर चार वेगवेगळे अहवाल तयार केले. प्रस्तुत संशोधन टिपण त्या सर्व अहवालावंर आधारित एकत्रित सारांश सादर करण्याचा प्रयत्न करत आहे. याआधारे आम्ही महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांवरील माहिती संचातील रोचक साम्य व भेद स्थळांचे विवेचन करत आहोत. परंतु विविध स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या आकडेवारीवरील विस्तृत भाष्य उपरोल्लेखित चार वेगवेगळ्या अहवालांत उपलब्ध आहे की जे महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळी उपलब्ध आहेत. त्यावरून संपूर्ण आकडेवारीचे विविध कल सखोलपणे समजू शकतात.

टिपणाचा उपरोक्त विभाग निवडणुकांच्या विविध चलांसंबंधी राज्य निवडणूक आयोगाने जतन केलेल्या आकडेवारीची कल्पना देतो तर निम्नउर्ध्वृत विभाग उपलब्ध आकडेवारीतील कल समजण्यासाठी आम्ही तयार केलेल्या निवडणूक चलांचे विश्लेषण (व्याख्या) करतो.

**i) मतदान प्रमाण (VT)**

निवडणूक प्रमाणास यानंतर आपण VT असे संबोधू. निवडणूक निकालांच्या दृष्टिकोनातून VT चे महत्त्व दुर्लक्षित करता येणार नाही. VT प्रमाणातील बदल निवडणूक निकालांच्या दोलकाची दिशा बदलू शकतो. त्यामुळे VT कडे उमेदवार, राजकीय पक्ष तसेच राज्य निवडणूक आयोग इत्यादींचे कटाक्षाने लक्ष असते. अर्थात निवडणूक आयोगाच्या दृष्टिने VT हे कळीचे निवडणूक चल ठरते; कारण निवडणूक तेव्हाच पूर्णपणे वाजवी असू शकते जेव्हा VT 100.00 टक्के असेल.

आमच्या अभ्यासात VTला एक महत्त्वपूर्ण चल असेच संबोधले आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विविध निवडणूक परिक्रमेतील VTचे कल अधोरेखित

केले आहेत. अर्थपूर्ण अनुमानाच्या साहाय्याने राज्य निवडणूक आयोगास भविष्यातील निवडणुकांचे आयोजन करण्याकामी उपयोगी ठरण्यासाठी VT आणि इतर विविध निवडणूक चलांमधील सहसंबंध शोधले आहेत.

ii) **अनुसूचित जाती व जमातींचे प्रमाण** (SCST)

संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत येणाऱ्या एकूण लोकसंख्येशी अनुसूचित जाती-जमातीच्या प्रमाणास यानंतर SCST असे संबोधले आहे. SCST चा VT वर महत्त्वपूर्ण प्रभाव पडू शकतो. त्यामुळे प्रस्तुत चलाचे विश्लेषण करणे आवश्यक होते. राज्य निवडणूक आयोग आरक्षित उमेदवार/प्रभाग/मतदारसंघाची संख्या निश्चित करण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतील जनगणना निर्धारित SC आणि ST लोकसंख्येच्या प्रमाणावरील आकडेवारीचा उपयोग करतो. आरक्षित मतदारसंघाचाही VT वर परिणाम होतो, असे दिसून येते. अर्थात VT चा कल तपासण्याकरीता SCST चा प्रासंगिक चल म्हणून वापर करण्याऐवजी आरक्षणाच्या स्वरूपाचे निरीक्षण करणे अधिक समर्पक ठरेल. प्रस्तुत टिपणाच्या निम्नउर्ध्वृत विभागात RES चलांतर्गत आरक्षणाचे स्वरूप विशद केले आहे.

iii) **आरक्षित मतदारसंघाचे प्रमाण** (RES)

उपरोल्लेख केल्याप्रमाणे SCST लोकसंख्येचे प्रमाण जनगणना अहवालात दर दहा वर्षांनी घोषित केले जाते. त्यामुळे प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय SCST चे प्रमाण दहा वर्षाच्या कालखंडासाठी स्थिर असल्याचे गृहीत धरले जाते. तथापि, कोणत्याही/प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेत दहा वर्षांच्या काळात दोन निवडणुका होतात. अर्थात, मतदारसंघाचे आरक्षण चक्रीय पद्धतीने असल्यामुळे नमुनेदार स्थिती अनुभवास येते. जनगणनेप्रमाणे SCST ची लोकसंख्या दशकासाठी स्थिर गृहीत धरली असली तरी वेगवेगळ्या मतदार संघातील आरक्षणाची प्रक्रिया मात्र त्या काळात चक्रकार असते. यामुळेच मतदाराच्या वर्तणुकीवर गंभीर परिणाम होताना दिसून येतो. कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेत RES चे प्रमाण एकूण मतदार संख्येवर निर्भर असते. आम्ही मात्र आरक्षणाच्या धोरणामुळे आरक्षित मतदारसंघाच्या प्रमाणात बदल झाला तर त्याचे विविध स्थानिक स्वराज्य संस्थात VT च्या प्रमाणावर काही परिणाम होतात का हे तपासण्यासाठी RES चा प्रासंगिक चल म्हणून वापर केला आहे.

iv) **अपक्ष उमेदवारांनी जिंकलेल्या जागांचे प्रमाण** (IND)

प्रस्तुत चलास आम्ही IND असे संबोधन वापरले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत अपक्ष उमेदवारांना प्राप्त मताच्या प्रमाणास आकडेवारीच्या पृथक्करण व विश्लेषणात आम्ही IND असे संबोधले आहे. IND हे चल विश्लेषणाच्या दृष्टिने महत्त्वाचे आहे; कारण कोणत्या मतदारसंघात अपक्ष उमेदवार अधिक मते प्राप्त करतात याचा शोध घेणे शक्य झाले आहे. उपलब्ध आकडेवारीच्या साहाय्याने निर्मित चलांव्यतिरिक्त उपलब्ध आकडेवारीच्या कलाचे सखोल विश्लेषण करण्यासाठी अम्ही अधिकची काही चले विकसित केली होती. अशा प्रकारे उपलब्ध आकडेवारीचा उपयोग फक्त काही महत्त्वाची चले समजण्यासाठीच केला नाही तर विश्लेषणाचा अधिक विस्तार करून नवीन चलांची ओळख करून घेण्याचा/देण्याचाही प्रयत्न केला आहे. निम्नउर्ध्वृत चले आकडेवारीच्या साहाय्याने निर्मित नवीन चले आहेत असे आम्ही संबोधतो.

i) **राजकीय संरेखन** (POL):

विश्लेषणात प्रस्तुत चलास आम्ही POL असे संबोधले आहे. राजकीय संरेखन व्यक्त करणारे POL

हे एक बनावट चल आहे. जर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत जास्त जागा जिंकणाराच पक्ष राज्य पातळीवर सरकारात असेल तर बनावट चल POL साठीचे मूल्य १ असे निश्चित केले आहे. अर्थात, असे नसेल तर POLचे मूल्य शून्य (०)धरले आहे. विश्लेषणात POL हे चल याकरिता जोडले होते की, ज्यामुळे अशा स्थानिक स्वराज्य संस्थांचा समूह समजू शकतो की जो साधारणपणे प्रस्थापित राज्य सरकारशी अधिकचे राजकीय संरेखन दर्शवितो.

ii) **राजकीय पक्षांमधील स्पर्धेची मुखत्यारी** (REVERSE COMP)

विश्लेषणाच्या सोईने प्रस्तुत चलास आम्ही REVERSE COMP असे संबोधले आहे. REVERSE COMP हे असे राजकीय चल आहे की ज्याद्वारे विविध राजकिय पक्षांतील स्पर्धेची तीव्रता समजते. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीत वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी लढविलेल्या व जिंकलेल्या मतदारसंघाची माहिती होतीच. येथे जिंकलेल्या मतदारसंघाच्या न्यून प्रमाणित विचलनाचा अर्थ असा आहे की वेगवेगळ्या/संबंधित राजकीय पक्षांत तीव्र स्पर्धा होती. अशा प्रकारे REVERSE COMP चे न्यून मूल्य राजकीय पक्षांतील तीव्र स्पर्धा दर्शविते. राजकीय पक्षांमधील तीव्र स्पर्धा निकालाची तीव्र दोलायमानता (Swing) दर्शविते. म्हणजेच निवडणूक निकाल कोणत्याही एका पक्षाच्या बाजूने झुकू शकतो. म्हणजेच न्यून मूल्य REVERSE COMP मतदार संघात दोलायमानता भाग्य मूल्य अधिक असणार आणि स्पर्धा तीव्र स्वरूपाची असणार यात शंका नाही.

iii) **विकास घातांक** (DEV)

प्रस्तुत चलास आम्ही DEV असे संबोधन दिले आहे. राजकीय परिणाम नेहमी भिन्न नमुना आणि विकास प्रमाण दर्शवितात. सर्वसाधारणपणे अधिक विकसित भागांत राजकीय पक्ष किंवा सत्तेतील उमेदवारास मान्यता अथवा अमान्यता दर्शविण्याचा साधारणपणे मतदान हाच एकमेव मार्ग नसतो. वास्तविक पाहता अधिक विकसित भागांत की जेथे मतदारांना निवडून आलेल्या प्रतिनिधीस अथवा सरकारसमोर आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी पर्यायी मार्ग (वर्तमानपत्रे, दूरदर्शन, सामाजिक साधने) उपलब्ध असतात तेथे. मतदानाचे प्रमाण कमी असण्याची शक्यता वर्तविली जाते. तसेच अधिक विकसित भागांत असेही निदर्शनास येऊ शकते की, तेथे मतदार व उमेदवाराच्या स्वरूपात महिलांचा सहभाग अधिक असतो. त्यामुळे साधारणपणे मतदारांची वर्तणूक आणि विशेषकरून मतदान प्रमाण निश्चित करण्याच्या बाबतीत एखाद्या भागाची विकास पातळी (DEV) महत्त्वाची निर्देशांक मानावी लागेल. त्यामुळे प्रथम हे आवश्यक आहे की DEV हे प्रतिकात्मक चल विकसित करावे लागेल; अन्यथा VT चे समाधानकारक विश्लेषण करणे शक्य नाही.

## ५. आकडेवारी संकलन, पृथक्करण पद्धती व प्रस्तुत संशोधनासमोरील मूलभूत प्रश्न

२०११ च्या जनगणना अहवालात दरडोई उत्पन्नावरील आकडेवारी उपलब्ध आहे. ज्याचा वापर जिल्हा पातळीवरील विकास निर्देशांक म्हणून केला जाऊ शकतो. DEV ची बांधणी पुढीलप्रमाणे केली आहे.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या एकत्रित दरडोई उत्पन्नाशी संबंधित जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्न प्रमाणास DEV संबोधले आहे. ही आकडेवारी फक्त जिल्हा पातळीवर उपलब्ध असल्याने व तालुका पातळीवर उपलब्ध नसल्याने DEV च्या इतर निवडणूक चलांवरील परिणामाचे अन्वेषण फक्त जिल्हा किंवा एकत्रित विभाग पातळीवर केले आहे. दुसरे असे की,

प्रस्तुत आकडेवारी फक्त २०११ च्या जनगणनेपुरतीच मर्यादित असल्याने आर्थिक विकासाचा राजकीय गतिशीलतेवरील सर्वकाल परिणाम शोधणे शक्य झाले नाही. तथापि, आमच्या अभ्यासात DEV आणि राजकीय चलांतील परस्परसंबंध स्थितीशील परिस्थितीपुरते मर्यादित आहेत. वर्धित आकडेवारी संचाच्या साहाय्याने स्थानिक स्वराज्य संस्थावरील संशोधन प्रश्न निम्नउर्ध्वृतप्रमाणे अधोरेखित केले आहेत.

१. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या क्रमिक परिक्रमांत VT चा कल कसा आहे?
२. क्रमिक निवडणूक परिक्रमादरम्यान VT च्या सरासरीत बदल झाला का?
३. विशिष्ट भागातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीत उच्चतम VT चा इतिहास आहे काय?
४. SCST करीता अधिक आरक्षण प्रमाण असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था उच्चतम VT दर्शवितात काय?
५. चांगले विकास प्रभाग असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थात न्यूनतम VT निदर्शनास येतो का?
६. महाराष्ट्रातील कोणती स्थानिक स्वराज्य संस्था दोलायमानतेचे (Swing)प्रदर्शन करते? अर्थात अशा स्थानिक स्वराज्य संस्था की जेथे निवडणुकांत तीव्र स्पर्धा असते त्यामुळे निकाल कोणत्याही एका पक्षाच्या बाजूने झुकू शकतात.
७. तसेच कोणत्या स्थानिक स्वराज्य संस्था अशा आहेत की जेथे दोलायमानता (Swing) अत्यंत न्यून आहे?
८. अर्थात कोणत्या स्थानिक स्वराज्य संस्था एकपक्षीय प्राबल्य दर्शवितात?
९. दोलायमान स्थानिक स्वराज्य संस्था त्याच आहेत काय की ज्या उच्चतम VT दर्शवितात?
१०. विकास भागाकार आणि दोलायमानता वर्तणुकीत काही परस्पर सहसंबंध आहे काय?
११. कोणत्या स्थानिक स्वराज्य संस्था राज्य शासनाशी राजकीय संरेखनाचे उच्चपद दर्शवितात?
१२. कालानुरूप विविध स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांत अपक्ष उमेदवारांच्या विजयाचे प्रमाण वाढले आहे काय?
१३. असे आहे काय की अधिक विकसित भागांत अपक्ष उमेदवारांचे जिंकून येण्याचे प्रमाण अधिक आहे?

उपरोल्लेखित संशोधन प्रश्नांवर संपूर्ण आकडेवारीचे विश्लेषण बेतले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या भविष्यातील निवडणुकाकरिता काही व्यूहरचना आखण्याच्या दृष्टिने संपूर्ण आकडेवारीच्या विश्लेषणाचा केंद्रबिंदू आकडेवारीच्या कलाद्वारा काही निर्णायक अंतर्दृष्टी प्राप्त करणे हाच होता.

## ६. पृथक्करण व विश्लेषण

या विभागात महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती संबंधित दोन दशकांच्या (१९९३-२०१३) आकडेवारीच्या कलांचे विश्लेषण केले आहे.

i) **मतदान प्रमाण** (VT)

सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचा तीन निवडणुकांसंबंधीच्या आकडेवारीचा सारांश निम्नउर्ध्वृत सारणीत केला आहे.

महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकांकरिताचे सरासरी मतदान प्रमाण ४५.४० टक्के आहे तर तेच नगरपालिका किंवा नगरपंचायत निवडणुकांत ७१.०० टक्के असल्याचे निदर्शनस येते. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका समानवेळी आयोजित केल्या जातात. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती

**सारणी १: स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या क्रमिक परिक्रमांतील VT च्या कलाची तुलना**

| VT | R2 | R3 | R4 | सरासरीVT |
|---|---|---|---|---|
| | १९९९-२००३ | २००४-२००८ | २००९-२०१३ | |
| महानगरपालिका | ५५.७७ | ५८.५१ | ५५.०० | ५६.४० |
| जिल्हा परिषद/ पंचायत समिती | ६९.४४ | ६९.२४ | ६७.५४ | ६८.७० |
| नगरपालिका | ७०.८० | ७५.०१ | ६८.९० | ७०.७० |

**सारणी २: शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था VT ची तुलना**

| स्थानिक स्वराज्य संस्था प्रकार | सरासरी VT |
|---|---|
| शहरी | ६३.५५ |
| ग्रामीण | ६८.७० |

निवडणुकांची मतदान सरासरी ६९.०० टक्के अशी समान दिसून आली. विशेष म्हणजे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतील VT नगरपालिका व नगरपरिषद VTपेक्षा अधिक दिसून आला. याचा अर्थ असा होतो की, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांशी तुलना केली तर नगरपरिषद व नगरपंचायतीतील लोकांचे मतदानाचे प्रमाण कमी आहे. विशेष म्हणजे नगरपरिषद व नगरपालिका तुलनेने कमी व शहरी लोकसंख्येचे उत्तरदायित्व घेतात तर जिल्हा परिषद व पंचायत समिती अनुक्रमे अधिक लोकसंख्या व जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे उत्तरदायित्व घेतात.

महाराष्ट्रातील VT चा असा कल आश्चर्यकारक वाटतो. कारण अनेक देशांबाबत असे निरीक्षण मिळते की, राज्य व स्थानिक निवडणूकांत शहरी भागातील VT पेक्षा ग्रामीण भागातील VT उच्चतम पातळीवर असतो. याचा अर्थ असा आहे की, शहरी मतदार लोकशाही प्रतिनिधी व सरकारसंदर्भात मतप्रदर्शन करण्यासाठी मत देण्याच्या प्रक्रियेवर अवलंबून नसतो. सामाजिक समस्यांविषयीचे मतप्रदर्शन करण्यासाठी शहरी मतदार सामाजिक माध्यमे, वृत्तपत्रे, नागरिक समूह, बिगर सरकारी संस्था इत्यादींवर अधिक विश्वास ठेवतो. तथापि, ग्रामीण किंवा छोट्या शहरांतील मतदारांसाठी हे पर्याय किती प्रमाणात उपलब्ध आहेत याविषयी शंकाच असते. पर्यायाने जेव्हा महापालिकेकडून नगरपालिका व नगरपालिकेकडून जिल्हा परिषद अशा दिशेने दृष्टिक्षेप टाकता साधारणपणे VT च्या सरासरीत वाढ होत गेली पाहिजे, अशी अपेक्षा करणे रास्त ठरते. महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकांतील सरासरी VT ५६.४० टक्के दिसून येतो; तर तोच जिल्हा परिषद व पंचायत समितीकरिता ६९.०० टक्के आणि नगरपालिका व नगरपरिषदांकरिता ७०.७० टक्के इतका आहे. आकडेवारीचे कल अंतर्ज्ञानावर विश्वास ठेवतात. अशा प्रकारे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतील सरासरी VT नगरपालिका निवडणुकांपेक्षा कमी आहे. अशा प्रकारच्या कलास योगदान देणाऱ्या अनेक घटकांपैकी एक घटक स्थलांतर असू शकतो. जर ग्रामीण-शहरी स्थलांतराचे प्रमाण समशहरी-शहरी स्थलांतरापेक्षा अधिक असेल तर ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांतील VT कमी राहण्यात त्याचे पर्यवसन

होऊ शकते. हा कल असेही अधोरेखित करतो की, शहरीकरण आणि स्थलांतराचे वास्तव बदलत्या काळात राज्य निवडणूक आयोगाच्या धोरणाचा केंद्रबिंदू बनू शकते. स्थलांतरित मतदारांना दूरवरच्या अंतरावरून मतदान करण्यासाठी कसे प्रोत्साहित किंवा सुकर केले जाऊ शकते यावर अधिक विचार होणे आवश्यक आहे. सारणी क्रमांक एक मधील आकडेवारी असे दर्शविते की, महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या VT चे प्रमाण R3 मध्ये वाढल्याचे दिसून येते. कदाचित R3 च्यावेळी मतदार याद्या दुरुस्तीची मोठी मोहीम हाती घेतल्यामुळे VT वाढला असू शकेल. तथापि, असाच कल ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत मात्र अनुभवास आला नाही. याउलट गेल्या चार निवडणुकांत ग्रामीण स्वराज्य संस्था निवडणुकांतील VT सातत्याने खालावल्याचे चिंताजनक चित्र समोर येते. २००४-२००८ दरम्यान पार पडलेल्या R3च्या काळात महानगरपालिका व नगरपालिकांतील VT वाढल्याचे नि:संदिग्धपणे दिसून येते. तथापि, याच कालखंडातील जिल्हा परिषद निवडणूक आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकल्यास असे निदर्शनास येते की, VT मध्ये सातत्याने रेषात्मक घट झाली आहे. याचा अर्थ असा की, R3च्या काळात शहरी मतदारांप्रमाणे ग्रामीण मतदारांत VT च्या बाबतीत उत्साह जाणवत नाही. अनुमान असे की, वीस वर्षांच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांत शहरी VT ६३.५० तर ग्रामीण भागात ६८.७० टक्के असल्याचे निदर्शनास आले.

ii) **राजकीय संरेखन** (POL)

यापूर्वी विशद केल्याप्रमाणे राजकीय संरेखन (यानंतर POLअसे संबोधन) हे अतिरिक्त चल आकडेवारीच्या विस्तारित विश्लेषणाकरिता विकसित करण्यात आले होते. जर स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकीय पक्ष व राज्य सरकारातील सत्ताधारी पक्ष एकच असेल तर POLचे मूल्य '१' धरले होते. परंतु जर समजा, असे नसेल तर POLचे मूल्य '0' गृहीत धरले होते. राजकीय संरेखन या चलामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाचे राज्य सरकारशी राजकीय संरेखन समजण्यास मदत झाली. प्रस्तुत चल विकसित करण्याचा उद्देश काही विशिष्ट भागातील/जिल्ह्यामधील स्थानिक स्वराज्य संस्था राज्य सरकारशी विशेष घनिष्ट संबंध ठेवतात काय याविषयीचे परीक्षण करणे असा होता. या चलामुळे राज्य सरकारातील बदलाचा स्थानिक स्वराज्य संस्थावरील प्रभाव समोर येतो. कुणी याकडे 'अधोगामी राजकीय परिणाम झिरपा' स्वरूपातही पाहू शकते. आमच्या निदर्शनास आलेले POL उदाहरणार्थ १-०-०-०, १-१-१-०, १-०-१०, ०-१-०-१, ०-१-१-१ इत्यादी अतिशय आश्चर्यकारक आणि विविध राजकीय गतिशीलता प्रकट करणारे होते. जर एखादी स्थानिक स्वराज्य संस्था ०-१-०-१ किंवा १-०-१-० असा POLकल दर्शवित असेल तर अशा राजकीय संरेखनात अनेक चढउतार आहेत असे सूचित करते किंवा ०-०-१-१ असा कल असे सूचित करतो की ही वाटचाल संरेखनाच्या दिशेने आहे. जर POLची सरासरी गृहीत धरली तर सरासरी POL १ आणि ० च्या दरम्यान कोठेतरी असेल. १९९५ पासून २०१४ पर्यंतच्या काळात जर एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या POLची सर्व निवडणूक परिक्रमांची सरासरी शून्य असेल तर राज्य सरकारचा न्यून प्रभाव सिद्ध होतो. तर स्थानिक स्वराज्य संस्था की जिच्याबाबत १९९५-२०१४ दरम्यान सर्व निवडणूक परिक्रमांची POL सरासरी १ असेल तर स्थानिक स्वराज्य संस्था राजकारणावर राज्य सरकारचा प्रभाव दिसतो. आता असे समजा की, दोन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या POLची सरासरी ०.५ इतकी आहे. ही स्थिती अशा निष्कर्षाप्रत येते की, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या दोन परिक्रमांत राज्य सरकारशी संरेखित होती. तथापि, मूलभूत राजकीय

शक्ती/प्रभाव अगदी भिन्न असू शकतात. समजा, एका स्थानिक स्वराज्य संस्थेने १-१-०-० असा POL कल दर्शविला तर त्याचा अर्थ असा निघतो की, संबंधित संस्था R1 च्या काळात शिवसेना-भाजप (SS-BJP)राज्य सरकारशी संरेखित होती तर R2 च्या काळात INC-NCP (काँग्रेस-राष्ट्रवादी) राज्य सरकारशी संरेखित होती. परंतु गेल्या दोन निवडणूक परिक्रमांत ही स्थानिक स्वराज्य संस्था INC-NCP (काँग्रेस-राष्ट्रवादी) सरकारशी कोणतेही संरेखन दर्शवित नाही. समजा, दुसरी एखादी स्थानिक स्वराज्य संस्था POLचा ०-०-१-१ असा कल दर्शविते याचा अर्थ असा की, R1 च्या काळात SS-BJP(शिवसेना-भाजप) तर R2

**सारणी ३: विविध निवडणूक परिक्रमांतील राजकीय संरेखन (POL) कलांची तुलना**

| चल | नगरपालिका | महानगरपालिका | जिल्हा परिषद | पंचायत समिती |
|---|---|---|---|---|
| POL १ | ०.१३ | NA | ०.०६ | NA |
| POL २ | ०.४० | ०.६५ | ०.७३ | ०.७९ |
| POL ३ | ०.६५ | ०.५७ | ०.७६ | ०.६३ |
| POL ४ | ०.७४ | ०.६५ | ०.७९ | ०.७३ |
| सरासरी | ०.४८ | ०.६२ | ०.५८ | ०.७२ |

**सारणी ४: राजकीय संरेखनाची (POL) ग्रामीण-शहरी तुलना**

| स्थानिक स्वराज्य संस्था | संरेखन सरासरी (POL) |
|---|---|
| शहरी | ०.५५ |
| ग्रामीण | ०.६५ |

च्या काळात INC-NCP(काँग्रेस-राष्ट्रवादी) सरकारशी संरेखन नव्हते. परंतु R3आणि R4च्या काळात INC-NCP(काँग्रेस-राष्ट्रवादी) राज्य सरकारशी संरेखनात होती. अशा प्रकारे राज्य पातळीवरील सत्ताधारी पक्षांची विविध राजकीय समीकरणे राजकीय संरेखनाचे विविध संच निर्माणकारक ठरतात.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राज्य सरकारशी राजकीय संरेखनाचा समान धागा शोधणे कठीण आहे. R2 च्या काळात राज्यातील ६५.०० टक्के महानगरपालिका राज्य सरकारशी संरेखित होत्या (१९९९-२००३ या काळात INC-NCP (काँग्रेस-राष्ट्रवादी) राज्य सरकारात होते). संरेखनाचे प्रमाण R3 च्या काळात कमी झाले. या काळात ५७.०० टक्के महानगरपालिका तात्कालिन राज्य सरकारशी संरेखित होत्या. येथे याची आठवण ठेवणे आवश्यक आहे की R3 परिक्रमे दरम्यान VT सुद्धा वधारला होता. म्हणजेच R2 पेक्षा R3 निवडणूक परिक्रमादरम्यान VT वधारला असता तात्कालिक राज्य सरकारशी एकूण संरेखित महानगरपालिकांची संख्या घटली. राजकीय चलांमधील असाच सहसंबंध R4 परिक्रमे दरम्यान आला. VT घटला असला तरी R3 पेक्षा R4परिक्रमा दरम्यान राज्य सरकारबरोबरचे राजकीय संरेखन (POL) वधारते आहे. यातून अनौपचारिकरित्या VT आणि POLमधील परस्परविरुद्ध सहसंबंधाचा बोध होतो. कारण VT

न्यूनतम असतानाच्या निवडणूक परिक्रमांदरम्यान महापालिकांच्या राज्य सरकारशी संरेखनात उर्ध्वगामी बदल मिळतो. परिक्रमा R1 दरम्यान फक्त १३.०० टक्के नगरपालिका राज्य सरकारशी संरेखित आहेत. परंतु R4 च्या काळात ७४.०० टक्के नगरपालिका राज्य संरेखित असल्याचे दिसते. अर्थात, R1 पासून R4पर्यंतच्या काळात राज्य सरकारशी संरेखनात स्पष्टपणे वाढ झाल्याचे दिसते. हे कशाचे निदर्शक आहे? नगरपरिषद निवडणूक परिक्रमा R1 च्या काळात राज्यात SS-BJP (शिवसेना-भाजप) चे सरकार सत्तेत होते. या परिक्रमेच्या काळात राज्य सरकारशी राजकीय संरेखन न्यूनतम होते. तथापि, तद्नंतरच्या परिक्रमांदरम्यान POL मध्ये वाढ झाली. जेव्हा R2, R3 आणि R4 निवडणूक परिक्रमा पार पडल्या तेव्हा राज्यात INC-NCP (काँग्रेस-राष्ट्रवादी) चे सरकार सत्तेत होते. या काळातील POLच्या उच्चतम पातळीचा असाच अर्थ निघतो की, महाराष्ट्रातील नगरपालिकांवर INC किंवा NCP (काँग्रेस-राष्ट्रवादी) चा प्रभाव होता.

आकडेवारीवरून असेही दिसते की, R1 ते R2 दरम्यान राजकीय संरेखन प्रभावाने वधारले. परिक्रमा R1 आणि R2 च्या दरम्यान राज्य सरकार बदलले. जर INC-NCP(काँग्रेस-राष्ट्रवादी) गठबंधनाचा नगरपालिकांवर प्रभाव आहे हे सत्य मानले तर राज्य सरकारातील बदलामुळे POLमधील बदलाचे प्रभावी विश्लेषण मिळते. परिक्रमा R2 ते R3 दरम्यान POLमधील सुधार नगरपालिकांवरील INC-NCP(काँग्रेस-राष्ट्रवादी) चा प्रभाव दर्शवितो. परंतु परिक्रमा R3 ते R4 दरम्यानची वधारण घटत्या दराने दिसते हे विशेष. हे सुरुवातीस नोंदवलेल्या निरीक्षणाप्रमाणे कदाचित संपृक्तता किंवा सरकारविरोधी लहरीचे सूचक असावे. जिल्हा परिषद निवडणुकातील असाच काहीसा कल लक्षात घेणे आवश्यक आहे. R1च्या काळात फक्त ०६.०० टक्के जिल्हा परिषदा राज्य शासनाशी संरेखित होत्या तर R4 च्या काळात संरेखन ७९.०० टक्के झाले. R1 ते R2 च्या काळातील संरेखन वृद्धी महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांवरील INC-NCP (काँग्रेस-राष्ट्रवादी) चे प्रभूत्त्व दर्शविते. पंचायत समिती संरेखन मात्र पूर्णपणे वेगळे चित्र दर्शविते. आकडेवारीवरून असे लक्षात येते की, (सारणी ३) राज्यातील पंचायत समितींचे राज्य सरकारशी संरेखन कालानुरूप सौम्य झाले आहे. त्यामुळे प्रस्तुत घटनाक्रम असा अंगुलीनिर्देश करते की पंधरा वर्षांच्या काळात जेव्हा INC-NCP (काँग्रेस-राष्ट्रवादी) चा ग्रामीण शिखर स्थानिक स्वराज्य संस्थावरील (जिल्हा परिषद) प्रभाव वाढत होता त्याचवेळी या पक्षांचा दरम्यानच्या स्थानिक स्वराज्य संस्थांवरील (पंचायत समिती) प्रभाव घटत गेला. एकूणात काय तर ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तुलनेत राज्य सरकारशी अधिक संरेखित असल्याचे चित्र दिसते. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तुलनेत (५५.०० टक्के) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था (६५.०० टक्के) राज्य शासनाशी अधिक प्रमाणात संरेखित आहेत.

iii) **अपक्ष उमेदवारांनी जिंकलेले मतदारसंघ** (IND)

विविध निवडणूक परिक्रमांत IND चल अपक्ष उमेदवारांनी जिंकलेल्या जागांचे वर्णन करते. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या विविध परिक्रमांदरम्यान अपक्षांनी जिंकलेल्या जागांचे प्रमाण निम्नउर्ध्वृत आकडेवारीच्या साहाय्याने स्पष्ट केले आहे.

हे स्पष्ट आहे की, प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेत R3 परिक्रमा काळात अपक्षांनी जिंकलेल्या जागांचे प्रमाण वाढले आहे. आपणास कल्पना आहे की R3 काळात शहरी स्थानिक स्वराज्य संस्थातील VT च्या पातळीत वाढ झाली. म्हणूनच असे अनुमान निघते की, शहरी स्थानिक स्वराज्य संस्थातील अपक्षांच्या विजयाच्या प्रमाणाचा संबंध VT शी आहे. साधारणपणे

**सारणी ५: महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या लागोपाठ परिक्रमांमधील IND कलाची तुलना**

| **स्थानिक स्वराज्य संस्था** | R2<br>१९९९-२००३ | R3<br>२००४-२००८ | R4<br>२००९-२०१३ | **सरासरी** IND |
|---|---|---|---|---|
| महानगरपालिका | ५.६५ | १४.७२ | ७.३७ | ९.२४ |
| नगरपालिका | १३ | २८ | १० | १७ |
| जिल्हा परिषद | ४.४ | ७.२५ | ४.५१ | ५.३८ |
| पंचायत समिती | NA | ७.९२ | ४.६८ | ६.३ |

**सारणी ६: शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थामधील** IND **ची तुलना**

| **स्थानिक स्वराज्य संस्था** | **सरासरी** IND |
|---|---|
| शहरी | १३.१२ |
| ग्रामीण | ५.८४ |

जेव्हा VT अधिक असतो तेव्हा अपक्षांना जिंकण्याची खरी संधी प्राप्त होते. म्हणूनच निदान शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत असा युक्तिवाद होऊ शकतो की, मतदार जागरूकता कार्यक्रम फक्त वास्तव सहभागी निवडणुकांपुरते मर्यादित नाहीत तर अपक्षांना निवडणूक जिंकण्याची वास्तव संधी तसेच अधिक योग्य मैदान बहाल करण्याची प्रक्रिया आहे. याची नोंद घेणे रोचक आहे की नगरपालिकांतील (१७.०० टक्के) अपक्ष उमेदवारांच्या निवडून येण्याच्या प्रमाणाची एकंदरीत सरासरी महानगरपालिकांपेक्षा (०९.०० टक्के) साधारणपणे दुप्पट आहे. हे कदाचित महानगरपालिका निवडणूक लढविण्यासाठी आवश्यक अधिक आर्थिक क्षमतेचे द्योतक असावे. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाबाबतही असाच कल दिसून येतो. पंचायत समिती निवडणुकीत अपक्षांचे निवडून येण्याचे प्रमाण जिल्हा परिषदेपेक्षा काहीसे अधिक आहे. अनुमान असे की शहरी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत अपक्षांच्या विजयाचे प्रमाण ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थापेक्षा अधिक आहे.

iv) **आरक्षणाचे प्रमाण** (RES)

यापूर्वीच विशद केल्याप्रमाणे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे (SCST) एकूण लोकसंख्येतील प्रमाण जनगणना अहवालात दिले जाते. जनगणना अहवाल दर दहा वर्षातून एकदा प्रकाशित होत असल्याने आरक्षणाचे प्रमाण दशकासाठी स्थिर मानले जाते. तथापि, कोणत्याही आस्थापनेकरिता दहा वर्षांत दोनदा निवडणुका होतात. अर्थात, वेगवेगळ्या मतदारसंघाकरिता आरक्षण परिभ्रमण पद्धतीने निश्चित केले जात असल्याने यातून निवडणुकीसंबंधी रोचक नमुना निर्माण होतो. जरी जनगणनेप्रमाणे नगरपालिका हद्दीत SC आणि ST लोकसंख्येचे प्रमाण एका दशकाकरिता गोठवलेले असले तरी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विविध मतदारसंघाकरिताचे आरक्षण संबंधित दशकाकरिता परिभ्रमणानुसार ठरविले जाते. यामुळे VT मध्ये तीक्ष्ण स्वरूपाचे बदल होऊ शकतात. त्यामुळे SCST पेक्षा VT वर RES चलाचा अधिक प्रभाव असतो.

**सारणी ७: स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विविध निवडणूक परिक्रमांतर्गत आरक्षणाच्या प्रमाणातील कलांची तुलना (ठएड)**

| स्थानिक स्वराज्य संस्था | R1 १९९४-१९९८ | R2 १९९९-२००३ | R3 २००४-२००८ | R4 २००९-२०१३ | **सरासरी** RES |
|---|---|---|---|---|---|
| महानगरपालिका | NA | ४०.०६ | ३८.९४ | ३९.७८ | ३५.२९ |
| नगपालिका | ४५०.९० | ४३.०० | ४४.१० | ४४.०० | ४४.०० |
| जिल्हा परिषद | ५२.४१२ | ५२.९२ | ५२.५९ | ५१.४९० | ५२.३५ |
| पंचायत समिती | NA | NA | ५१.०२ | ५१.५० | ५१.२६ |

**सारणी ८: शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थामधील** RES **ची तुलना**

| स्थानिक स्वराज्य संस्था | RES **सरासरी** |
|---|---|
| शहरी | ३९.६४ |
| ग्रामीण | ५१.८० |

महानगरपालिकांतील आरक्षित जागांचे प्रमाण न्यूनतम असल्याचेच उपरोक्त सारणीवरून निदर्शनास येते. आरक्षित जागांच्या प्रमाणाचा लोकसंख्येतील SCSTच्या प्रमाणाशी थेटसहसंबंध असतो. महानगरपालिकांचे कार्यक्षेत्र तुलनेने मोठे असल्यामुळे SCST चे प्रमाण शहराच्या आकारमानाच्या तुलनेत कमी असू शकते. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत आरक्षित जागांचे प्रमाणही त्याप्रमाणात न्यूनतम राहते. परंतु महानगपालिकांच्या तुलनेत नगरपालिकातील आरक्षणाचे प्रमाण मात्र जास्त असल्याचे दिसून आले. अर्थात, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थामधील आरक्षणाचे प्रमाण सर्वात जास्त असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थामधील SCST व OBC ५१.८० टक्के तर शहरी स्थानिक स्वराज्य संस्थातील SCST आणि OBC ३९.९४ टक्के इतके आमच्या आकडेवारीच्या पृथक्करणावरून दिसून आले.

### ७. सर्व निवडणूक परिक्रमांदरम्यान महत्त्वाच्या निवडणूक चलांमधील सहसंबंध

अभ्यास कालखंडातील सर्व निवडणूक परिक्रमांदरम्यान महत्त्वाच्या निवडणूक चलांमधील परस्पर सहसंबंध स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय बदलताना दिसतात. म्हणून जर महानगरपालिका आकडेवारीवरून दोन चलांत अधिकतम सहसंबंध प्रस्थापित होत असला तरी त्या चलांत तसाच सहसंबंध नगरपालिका आकडेवारीवरून दिसून यावा किंवा येईल अशी आवश्यकता नाही. निम्नउर्ध्वृत सारणीत आम्ही विविध स्थानिक स्वराज्य संस्थाच्या बाबतीत वेगवेगळ्या निवडणूक चलांमधील सहसंबंध दर्शविले आहेत.

### ८. निरीक्षणे व अनुमान

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या स्थापनेनंतर १९९४-२०१३ या दोन दशकांच्या काळातील ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य स्थांच्या निवडणूक आकडेवारीवर आधारित विवेचन केल्यानंतर प्रामुख्याने

**सारणी ९: स्थानिक स्वराज्य संस्थामधील निवडणूक चलांमधील सहसंबंध**

| चल | महानगरपालिका | नगरपालिका | जिल्हा परिषद | पंचायत समिती |
|---|---|---|---|---|
| VT व REVERSE COMP | अधिकतम VT परिणामत: शक्तिशाली दोलक | अधिकतम VT परिणामत: शक्तिशाली दोलक | अधिकतम VT परिणामत: शक्तिशाली दोलक | अधिकतम VT परिणामत: शक्तिशाली दोलक |
| VTआणि IND | अधिकतम VT अधिक अपक्षांचा विजय | अधिकतम VT अधिक अपक्षांचा विजय | अधिकतम VT अधिक अपक्षांचा विजय | अधिकतम VT अधिक अपक्षांचा विजय |
| VTआणि RES | अधिक राखीव मतदारसंघ अधिकतम VT | सहसंबंध नाही | कमी राखीव जागा अधिकतम VT | सहसंबंध नाही |
| VT आणि DEV | न्यून विकसित विभाग अधिकतम VT | न्यून विकसित विभाग अधिकतम VT | न्यून विकसित विभाग अधिकतम VT | न्यून विकसित विभाग अधिकतम VT |
| REVERSE COMPआणि RES | सहसंबंध निदर्शनास आले नाही | अधिक राखीव मतदारसंघाच्या भागात राजकीय पक्षांचे अधिकचे अस्तित्व | अधिक राखीव मतदारसंघाच्या भागात राजकीय पक्षांचे अधिकचे अस्तित्व | अधिक राखीव मतदारसंघाच्या भागात राजकीय पक्षांचे अधिकचे अस्तित्व |
| REVERSE COMP आणि DEV | न्यूनतम DEVभागात राजकीय पक्षांचा तळागाळापर्यंत कळप | न्यूनतम DEVभागात राजकीय पक्षांचा तळागाळापर्यंत कळप | न्यूनतम DEVभागात राजकीय पक्षांचा तळागाळापर्यंत कळप | न्यूनतम 9 भागात राजकीय पक्षांचा तळागाळापर्यंत कळप |

VT संबंधी अनेक आश्चर्यचकित करणारे परिणाम प्राप्त झाले. वास्तविक पाहता लोकशाहीच्या आर्थिक सिद्धांतास अपयशी करणारे विवेचन आम्हास मिळाले. लोकशाही आर्थिक सिद्धांताच्या विवेचनानुसार मतदार आपले मत देताना प्रामुख्याने स्पर्धेतील राजकीय पक्षांच्या आर्थिक धोरणांचा विचार करतात. किंबहुना परिपक्व द्विपक्षीय लोकशाहीत निवडणूक अंदाजशास्त्रात अर्थशास्त्रातील गणितीय विश्लेषणाधारित खेळ सिद्धांताचा वापर केला जातो. किंबहुना असाही युक्तिवाद केला जातो की, लोकशाही प्रक्रियेत मतदार आपले मत राजकीय पक्ष अथवा उमेदवारास देत नसतो तर त्याचे मत संबंधित पक्षाच्या आर्थिक भूमिकांना असते. म्हणजेच एक आर्थिक धोरण दुसऱ्या आर्थिक धोरणाचा पराजय करत असते ना की राजकीय पक्ष किंवा उमेदवार एक दुसऱ्याचा पराभव करतात. अर्थात परिपक्व लोकशाहीचे हेच लक्षण असावयास हवे. परंतु सर्वसाधारणपणे भारताच्या आणि विशेषकरून महाराष्ट्राच्या बाबतीत मात्र हे अजिबात सत्य नाही असे आमच्या दोन दशकांच्या निवडणूक आकडेवारीच्या पृथक्करणावरून लक्षात आले.

महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक परिक्रमांतील मतदाराच्या वर्तणुकीस प्रस्थापित सैद्धांतिक विवेचन लागू पडत नाही असेच

आमच्या विश्लेषणावरून लक्षात येते. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील मतदारांची वर्तणूक व निवडणुकीतील राजकीय पक्षांचे बलाबल प्रकर्षाने VT वर अवलंबून असल्याचे दिसते. आणि VT हे चल इतर अनेक चलांचे परिणामस्वरूप असल्याचेही आमच्या विवेचनावरून सिद्ध होते. ही चले प्रामुख्याने SCST, RES, IND, DEV, REVERSE COMP, POL इत्यादी आहेत. निवडणूक आयोगाकडे उपलब्ध दोन दशकांच्या आकडेवारीच्या पृथक्करणातून आम्ही ही सर्व चले विकसित करून त्यांचे ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक परिक्रमांमधील परस्पर सहसंबंध व प्रामुख्याने निवडणूक निकालावंर प्रभाव टाकणाऱ्या VT शी सहसंबंध तपासून पाहता आम्ही उपरोक्त अनुमानापर्यंत पोहोचलो.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांत राजकीय संरेखन ही विशेष बाब मानावी लागेल. अर्थात राजकीय संरेखन हे चल विकासाशी संबंधित नसून राज्य पातळीवरील सत्तेशी संबंध दर्शविणारे आहे. विशेषकरून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था राजकीय संरेखनाच्या बाबतीत शहरी स्थानिक स्वराज्य संस्थापेक्षा अग्रेसर असतात हे निश्चित. कारण ग्रामीण राजकीय अर्थव्यवस्था राज्य पातळीवर सत्तेत किंवा राजकारणात असलेल्या नेत्यांवर अवलंबून असते. त्यामुळे यावरून राजकीय संरेखन आणि VT वरून निवडणूक निकालांची दोलायमानता ठरते. या सर्व विवेचनोपरांत आम्ही आणखी एका अनुमानापर्यंत पोहोचलो. आणि ते म्हणजे भारतीय लोकशाहीसंदर्भात मध्यगा मतदार सिद्धांताचे (Median Voters Theorm)अपयश. कारण ज्या देशात गरीबांची मध्यगा मूल्य अधिक त्या देशात प्रगतीशील कररचना असणे अपेक्षित आहे. परंतु भारतात मात्र गरीबी मध्यगा मूल्य अधिक असूनही प्रगतीशील कररचनेवर मर्यादा आल्याचे दिसून येते. पर्यायाने भारताच्या कर महसूलाचे स्थूल राष्ट्रीय उत्पादिताशी प्रमाण अंदाजपत्रकीय अपेक्षेपेक्षा (१६.०० टक्के) कमी असल्याचे (१२.०० टक्के) दिसून येते.

एकंदरीत अनुमान काय तर महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक परिक्रमांदरम्यान मतदानाचे प्रमाण (VT) आणि निवडणुकांचे निकाल ठरविण्याकामी किंवा त्याविषयी अचूक अंदाज वर्तविण्याकामी प्रस्थापित सैद्धांतिक विवेचन अपयशी ठरते. अर्थात, महाराष्ट्र देशातील एक मोठे आणि राजकीयदृष्ट्या जागृत राज्य असल्याने VT आणि निकाल ठरविण्याकामी जी इतर चले महाराष्ट्रात कार्यरत असतील तीच चले देशपातळीवरही कार्यरत राहून भारताच्या निवडणूक निकाल प्रक्रियेची क्लिष्टता वाढवतील असा युक्तिवाद संयुक्तिक ठरतो. हे मात्र सत्य आहे की जागतिक पातळीवरील VT चे प्रमाण कमीअधिक होत असते. त्यावर अनेक अभ्यास अहवालही उपलब्ध आहेत. परंतु संबंधित अभ्यास अहवालांच्या निष्कर्षांवरून जे अनुमान मिळते ते महाराष्ट्रातील व प्रकर्षाने भारताच्या निवडणूक प्रक्रियेस लागू पडत नाहीत हे निश्चित. असे आमच्या प्रस्तुत अभ्यासावरूनही सप्रमाण सत्यतेत उतरते. अर्थात, लोकशाहीच्या आर्थिक सिद्धांत विवेचनाच्या पार्श्वभूमीवर विचार केला तर भारतीय निवडणुकांची अंदाजप्रक्रिया क्लिष्ट आहे. कारण त्यास सैद्धांतिक विवेचन उपयोगी पडत नाही. या सर्व क्लिष्टतेतून मार्ग काढून लोकशाही प्रक्रिया परिपक्व करणे आणि भविष्यात राजकीय अर्थव्यवस्थेचे निर्णयप्रक्रियेतील स्थान वृद्धिंगत करणे हे लोकशाहीसमोरील मोठे आव्हान आहे असे मानावे लागेल.

**संदर्भ सूची :**


1. Alford R. R. and E. C. Lee (1968), Voting Turnout in American Cities, American Political Science Review 62:796-813.
2. Almond G. A. and S Verba (19630, The Civic Culture, Political Attitude and Democracy in Five Nations, Princeton,

N.J. Princeton University Press.
3. Balwantray Mehta (1957), Chairman, Balwantray Mehta, GoI.
4. Barnes S and Kaase M (1979), Political Action, Mass Participation in Few Western Democracies, Beverly Hills, Calif: Sage.
5. Bennett and Resnick (1990), The Implications of Nonvoting for Democracy in the United States, American Journal of Political Science 34:771-802; Verba, Schlozman and Brady (1995), Voice and Equity: Civic Voluntarism in American Politics, Cambridge, MA: Harvard Uni. Press.
6. Business Standard, 11.04.2016, Retrieved: 07.10.2016.
7. CAWP (2000), Women in State Legislature, Center for American Women and Politics, Eagleton Institute of Politics, Rutgers, The State University of New Jersey, 919, Ryders Lane, New Brunswick, NJ 08901 (732) 932-9384: www.cawp.rutgers.edu
8. Centre for Democracy and Governance, Decentralization and Democratic Local Governance Handbook, USAID, 20523-3100, PP. 05-06.
9. Coastaldigest.com: Retrieved: 07.10.2016.
10. Deccan Herald, 07.10.2016: Retrieved: 07.10.2016.
11. Diana C. Mutz (2002), The Consequences of Cross-Cutting Networks for Political Participation, American Journal of Political Science, 46(4):838-855.
12. George Mathew (2004), Local Democracy and Empowerment of the Underprivileged-An Analysis of Democratic Decentralization in India, Institute of Social Sciences, A Case Study-30826, Ministry of Rural Development, GoI, New Delhi.
13. Gerber, Alan, Donald Green and C. Larimer (2008), Social Pressure and Voter Turnout: Evidence from a Large-Scale Field Experiment: American Political Science Review, 102(1): 33-48.
14. J. Saharia (2016), Municipal Council Elections in Maharashtra: A Data Based Analysis-1994-2013 (Foreword), Rajas K. Parchure, Manasi Phadke and Dnyandev Talule, Gokhale Institute of Politics and Economics, Pune, A Study for the State Election Commission of Maharashtra.
15. Mancur Olson (1965), The Logic of Collective Action, HUP.
16. Maria Gratschew and Kate Sullivan (2002), Compulsory Voting, ARENA, Association of Electoral Administrators, Oxonian Rewley Press Ltd. United Kingdom.
17. Martin Lipset (1960), Political Man: the Social Bases of Politics, Garden City, New York, Doubleday.
18. Mathew D. Atkinson and Anthony Fowler (2012), The Effect of Social Capital on Voter Turnout: Evidence from Saint's Day Fiestas in Mexico, University of California, Los Angeles and Harvard University.
19. Morlan R. L. (1984), Municipal Versus National Election Voter Turnout: Europe and the United States, Political Science Quarterly 99:457-70.
20. Olson Mancur (1965), The Logic of Collective Action, Harvard University Press, US.
21. Parry, G., Mosley, G. and Day N. (1992), Political Participation and Democracy in Britain. Cambridge: Cambridge University Press.
22. Rafael Lopez Pintor (2002), Voter Turnout Since 1945: A Global Report, Stockholm, Sweden: International Institute of Democracy and Electoral

Assistance.
23. Rafael Lopez Pintor, Maria Gratschew and Kate Sullivan (2002), Compulsory Voting, ARENA, Association of Electoral Administrators, Oxonian Rewley Press Ltd. United Kingdom.
24. Rajas Parchure, Manasi Phadke and Dnyandev Talule (2016), Two Decades of Local Body Elections in Maharashtra: A Data Based Analysis (1994-2003), Maharashtra State Election Commission Study, Gokhale Institute of Politics and Economics, Pune.
25. Robert Putnam (1995, Tuning In, Tuning Out; The Strange Disappearances of Social Capital in America. PS: Political Science and Politics 28(4): 664-683.
26. Rosenstone S. J. and J. M Hansen (1993), Mobilization, Participation and Democracy in America, New York: Macmillan; Verba, Schlozman and Brady (1995), Voice and Equity: Civic Voluntarism in American Politics, Cambridge, MA: Harvard Uni. Press.
27. Rosenstone S. J. and J. M Hansen (1993), Mobilization, Participation and Democracy in America, New York: Macmillan; Verba, Schlozman and Brady (1995), Voice and Equity: Civic Voluntarism in American Politics, Cambridge, MA: Harvard Uni. Press
28. Ruby Bridges A. (1997), Morning Glories: Municipal Reform in the Southwest, Princeton, NJ: Princeton Uni. Press.
29. Ruy A. Teixeira (1992), The Disappearing American Voter, Washington DC: Brooking Institutions; Rosenstone S. J. and J. M. Hansen (1993), Mobilization, Participation and Democracy in America, New York: Macmillan.
30. Sarah F. Anzia (2014), Timing and Turnout: How Off-Cycle Elections Favor Organized Groups, University of Chicago Press.
31. Sidney Verba, Schlozman and Brady 1995), Voice and Equality, Cambridge, Mass: Harvard University Press.
32. Sidney Verba, Schlozman and Brady 1995), Voice and Equality, Cambridge, Mass: Harvard University Press.
33. Stein Rokkan (1970), Citizens, Elections, Parties: Approaches to the Comparative Study of the Processes of Development Oslo: Universitiesforiaget.
34. The Pioneer, 07.10.2016, Retrieved: 07.10.2016.
35. Times of India, 16.02.2012, Retrieved: 26.09.2016.
36. Tingsten H.L.G. (1937), Political Behaviour, Studies in Election Statistics: London: P.S. King.
37. Verba Sidney N, and Norman H. Nie (1972), Participation and Social Equality, Cambridge, Mass: Harvard University Press.
38. Verba, Sidney N, Nie Lekajcie Sieand Kim Cattreal (1978), Participation and Social Equality, Cambridge, Mass: Harvard University Press and Verba SK and N, Nie (1972), Politicization in America, Political Democracy and Social Equity, New York, Harper and Raw.
39. Wattenberg M. P. (1998), Turnout Decline in the US and Other Advanced Industrial Democracies. Irvine, CA: Centre for the Study of Democracy.
40. Zolta Hajnal, Paul George Lewis and Hugh Louch (2002), Municipal Elections in California: Turnout, Timing and Competition, Public Policy Institute of California.

◆

# स्टार्टअप उपक्रमांची भारतामधील आव्हाने : काही निरीक्षणे

**डॉली सनी** †

**प्रस्तावना**

स्टार्टअप उपक्रमांचे लक्ष्य हे नावीन्यपूर्ण उत्पादने किंवा सुविधा पुरवणे होय. असे उपक्रम नवनवीन व्यावसायिक मॉडेल ठरतात. सध्याच्या औद्योगिक क्रांतीमध्ये आधुनिक आणि कार्यक्रम उत्पादनांच्या पद्धती स्टार्टअपला कारणीभूत ठरू शकतात; जसे नवीन उदयास येणारे तंत्रज्ञान, ब्लॉक चैनी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इन्टीलिझन्स). अमेरिकेच्या लघु व्यवसाय प्रशासनानुसार (स्मॉल बिझिनेस ॲडमिनीस्ट्रेशन) स्टार्टअप उद्योग हे संभावत: तंत्रज्ञानभिमुख असतात, ते पण संभाव्य महसूल वाढीच्या रूपात. पारंपरिक दृष्टिकोनाच्या हे विरोधात्मक ठरते. स्टार्टअपची परिपक्वता ही महसूल वाढीने निर्मितीनुसार आपण मोजू शकतो.

अनेकदा, स्टार्टअप तात्पुरत्या संस्थांच्या रूपात स्थापन केली जाते; जेणेकरून त्याचे रूपांतर किंवा प्रगती वस्तूच्या बाजारात योग्य आणि व्यावसायिक मॉडेल मध्ये करणे सोपे होते. हे सर्व करत असताना स्टार्टअप व्यावसायिक वेगवेगळ्या उत्पादनाच्या तांत्रिक पद्धतीमध्ये प्रयोग करत असतात. या दरम्यान बऱ्याच स्टार्टअपसला अपयशाला सुद्धा तोंड द्यावे लागते. नंतर कुठे ते कायमस्वरूपी यशस्वी संस्था म्हणून नावारूपास येतात.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये**

आयसीएसएसआर प्रायोजित संशोधकाचे संशोधन सध्या चालू आहे. या संशोधनपर लेखाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत; १. स्टार्टअपची उत्पत्ती आणि वाढीची संधी सविस्तर अभ्यासणे २. स्टार्टअपसला भेडसावणाऱ्या समस्यांचे विश्लेषण करणे. प्रस्तुत शोध निबंधात काही निरीक्षणे सध्याच्या संशोधनातून घेण्यात आली आहेत.


**स्टार्टअप जीवन चक्राच्या अवस्था**

मुखर्जी (१९९२) म्हणतात, संस्थेच्या जीवन चक्र सिद्धांतानुसार, व्यावसायिक उपक्रम हे साधारणपणे क्रमश: तीन चरणांमधून जाते ती चरणे म्हणजे, बीजरूपी चरण, स्टार्टअप चरण व विस्तार चरण.

प्रारंभिक चरण ज्याला बीजरूपी चरण असे म्हटले जाते. यामध्ये काही गोष्टींचा समावेश होतो. जसे- संकल्पना उदयास पावणे किंवा कल्पनेस सादर करणे आणि त्यासंबंधित लागणाऱ्या विविध प्रक्रिया ओळखणे. दुसऱ्या चरणामध्ये म्हणजेच स्टार्टअप चरणामध्ये व्यावसायिक मॉडेलची परिभाषा सुरू होते. यापुढे उद्योजक संभाव्य ग्राहकांशी संपर्क प्रस्थापित

† प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, मानद संचालक, पश्चिम प्रादेशिक केंद्र, आय.सी.एस.एस.आर.
ई-मेल : dollys@economics.mu.ac.in, dosresearch@gmail.com

|संस्थेचे जीवनचक्र




स्त्रोत: मुखर्जी (१९९२)

करण्याचे किंवा कमीत कमी संभाव्य ग्राहकांबद्दल माहीत करून घेण्याची सुरुवात करतो. शेवटच्या चरणात जिथे स्टार्टअपचे विस्तारण होत असते त्या दरम्यान उद्योग जास्तीत जास्त लाभ घेण्याच्या स्थितीत पोहोचतो. या चरणामध्ये स्टार्टअपची एकतर विस्तार करण्याची आवश्यकता अभ्यासली जाते आणि त्याची वाढत जाणाऱ्या उद्योगाची भूमिका उचल खाते.

**भारताची सद्यस्थिती**

वर्ल्ड बँकेच्या २०१६च्या अहवालानुसार, नवीन व्यवसाय सुरू करण्यासंबंधित भारताचा १५५ वा नंबर येतो. या अहवालानुसार, भारतीय व्यावसायिक, कर भरणा करताना दर वर्षी तासन्तास घालवतात. भारतीय व्यवसायांना दरवर्षी ३३ वेळा कर भरणा करावा लागतो. ज्याच्या प्रक्रियेसाठी सुमारे २४३ तास खर्च करावे लागतात. अमेरिका आणि चीनमध्ये व्यावसायिकांना वातावरण उत्साहवर्धक आहे. चीनमध्ये हीच कर भरणा प्रक्रिया वर्षात ९ वेळा आहे. तर अमेरिकेमध्ये जास्तीत जास्त ११ वेळा अशी मर्यादा करण्यात आलेली आहे.

भारत हा जगामध्ये तिसरा सगळ्यात मोठा स्टार्टअप हब आहे. स्टार्टअप हा असा व्यवसाय संबोधला जातो; ज्याची आरंभापासून तीन वर्षे सुद्धा पूर्ण झाली नाहीत. ५० पेक्षा कमी कर्मचारी यात काम करतात आणि जास्तीत जास्त रुपये ५ कोटींचा महसूल जमा करतात.

अंदाजे स्टार्टअप संस्थापकाचे सरासरी वय २८ वर्षे असते. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे स्टार्टअपमधील अंदाजे १० टक्के उपक्रम हे महिलांनी स्थापित केलेले आहेत. एन.ए.एस.एस.सी.ओ.एम.च्या(२०१५) मते, ग्रामीण भागातील स्टार्टअप उपक्रमातील सहभाग हा खूपच महत्त्वाचा आहे. कारण, शहरांमध्ये असणाऱ्या खूप साऱ्या संधीची ग्रामीण भागांना उपलब्धतेची उणीव भासते. भारत सरकारच्या (२०१६) अहवालानुसार, भारतामध्ये २०१५ मध्ये १९००० पेक्षा जास्त तंत्रज्ञानसक्षम स्टार्टअप आणि आर्थिक सुविधा

स्टार्टअपस होत्या. भारतीय स्टार्टअपने २०१५ च्या पहिल्या अर्ध कालावधीत रुपये ३.५ अब्ज निधी जमवला, आणि सक्रिय गुंतवणूकदारांची संख्या सुद्धा भारतामध्ये २०१४ साली २२० होती ती २०१५ साली ४९० झाली.

**स्टार्टअप उपक्रमांसाठी भारत सरकारचे कार्यक्रम**

भारत सरकारने स्टार्टअप उपक्रमांच्या प्रगतीमध्ये योगदान करण्याच्या दृष्टिकोनातून खूप साऱ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना अंमलबजावणीत आणण्यास सुरुवात केली आहे. जसे - स्टार्टअप इंडिया, मेक इन इंडिया आणि स्किल इंडिया. या योजनांकडून असे अपेक्षित आहे की, ह्या देशाच्या आर्थिक वाढीस मदत करतील आणि मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करतील.

'मेक इन इंडिया' हा नावीण्यपूर्ण कार्यक्रम भारत सरकारने तयार केला आहे. त्याचे उद्दिष्ट असे आहे की, भारतीय उत्पादन क्षेत्रामध्ये गुंतवणूक वाढविणे. त्यासाठी व्यावसायिक अनुकूलित वातावरण तयार करणे; जेणेकरून थेट विदेशी गुंतवणूक वाढेल. या दृष्टिकोनातून विविध उपाय आधीच लागू करण्यात आले आहेत. जसे, औद्योगिक परवाने सहजतेने मिळणे आणि बौद्धिक मालमत्ता अधिकार संरक्षण.

२०१६ मध्ये 'स्टँडअप इंडिया' कार्यक्रम राबवण्यास सुरुवात झाली. स्टार्टअप उपक्रमांना बँकेचा निधी उपलब्ध करून देऊन मदत करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. जेणेकरून तरुण उद्योजक पुढाकार घेऊन गुंतवणूक करतील. या कार्यक्रमांतर्गत कर प्रोत्साहन देणे सुद्धा समाविष्ट आहे. डिजिटल इंडिया हा कार्यक्रम राबविण्यात आला आहे; जेणेकरून सरकारच्या विविध सुविधा ऑनलाईन तरुण गुंतवणूकदारांना उपलब्ध असतील. खूप साऱ्या मंजुरी आणि नियामक प्रक्रिया आता एकाच ऑनलाईन क्लिअरन्स प्रणाली द्वारे लागू करण्यात आल्या आहेत; ज्यानुसार ऑनलाईन मंजुरी खिडकी २०० परमिटस प्रदान करते; ज्यांची गरज वेगवेगळ्या उद्योगांना असते आणि पूर्वी विविध सरकारी विभागाद्वारे ही परमिट्स मिळवावी लागत.

**आव्हाने**

उद्योजकता हा बेभरवशाचा व्यवसाय आहे. उद्योजक किंवा गुंतवणूकदार त्यांच्या यशाची खात्री देऊ शकत नाहीत. काही वेळा अपयश येते; पण त्यातून बाहेर पडण्याचे सामर्थ्य असणे गरजेचे आहे. या सोबतच अजून कठीण कामे सुद्धा यात सामील असतात. उदाहरणार्थ, वित्त व्यवस्था, कामगार सुरक्षा, तांत्रिक माहिती, मंजुरी, परवाना आणि बाकीच्या गरजेची मंजुरी किंवा परवाने होय.

जे उद्योजक अपयशी झालेत, त्यांच्या मते, त्यांना जर पुरेसे मार्गदर्शन वेळेत मिळाले असते तर त्यांना यश मिळाले असते. या व्यतिरिक्त भारतीय ग्राहकांची अप्रत्यक्ष किंवा बदलती वागणूक खूप मोठे आव्हान उभे करते आणि खूपदा स्टार्टअप उपक्रम बंद होतात. असे पण निदर्शनास आले आहे की, स्टार्टअप उपक्रम हे अनन्यपणे सहसंबंधित आहेत. स्थानिक फायद्यासोबत स्टार्टअप उपक्रमांना ग्रामीण भागात काहीच वेग दिसून येत नाही. सद्यस्थितीमध्ये गुंतवणूकदारांना आणि स्टार्टअपला सूचीबद्ध प्रणालीत नोंद करून घेणेच कठीण झाले आहे. त्यामुळे असे गुंतवणूकदार भारताबाहेर स्थानांतरित होत आहेत.

खूप साऱ्या आर्थिक समस्या स्टार्टअप उपक्रमांशी निगडित आहेत. उदाहरणार्थ, वित्त तुटवडा. सध्या खूप सारे स्टार्टअप उपक्रम कार्यरत आहेत. कारण उद्योजकांनी स्वत:चे वित्त लावले आहे. यासोबत रोडावलेली कामगार संस्था स्टार्टअपच्या कार्यक्षमतेस क्षीण करत आहे.

**निष्कर्ष**

दररोजच्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी स्टार्टअप उपक्रमांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण प्रदान करणे सुरू केले पाहिजे. त्यांना आर्थिक, राजकीय आणि सायबर संबंधित धोक्यांची जाणीव आणि पुरेसे कौशल्य देणे गरजेचे आहे. अशा समस्यांना तोंड देण्यासाठी ते कार्यक्षम रोख व्यवस्थापक असणे काळाची गरज आहे. स्टार्टअप उपक्रमांना वेळ आणि खूप सारे प्रयत्न लागतात. परिपक्व होण्यास म्हणून अत्यंत सावधानता आवश्यक आहे. जगातील पुढील प्रमुख स्टार्टअप क्षेत्र बनण्यात भारत आघाडीवर असून अत्यंत सावधानता बळगणे गरजेचे आहे. स्वयंचलित, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोट कामगारांसारखे वापरले जाऊ शकतात; जे स्टार्टअप उपक्रमांवर प्रवेगकाचे किंवा त्याच्या विरुद्ध प्रभाव पाडू शकतात. उद्योजक जगातील विविध पैलूंवर विश्लेषण करण्यासाठी विचार गटाची आवश्यकता आहे. जो गट नीती रचनाकारांना चांगले विचार, माहिती आणि नाविन्यता (Input) देण्यास मदत करेल

**अ) संदर्भग्रंथ यादी**

१. भारत सरकार आर्थिक सर्वेक्षण (२०१५-१६) नवी दिल्ली.

२. ग्रॅण्ट थोरींतो (२०१६), स्टार्टअप इंडिया - एन ओव्हरवीव,२० जानेवारी २०१६.

३. हिंदू बिझनेस लाईन(२०१८), इंडिया लॅक्स इनफ एंजेल इन्वेस्टर्स टू फंड स्टार्टअप्स, २९ ऑक्टोबर.

४. मुखर्जी टी. के. (१९९२) फायनान्सिंग दि थ्री स्टेजेस दि स्मॉल बिझनेस लाईफ सायकल : अ सर्वे, जर्नल ऑफ बिझनेस अँड इंटरप्रेनरशिप, ४, ३३-४३.

५. NASSCOM (२०१५), स्टार्टअप इंडिया - मोमेंटोस राईज ऑफ दि इंडियन स्टार्टअप इको सिस्टिमस.

६. रामकृष्णन ऐन (२०१८), सीड-फंडिंग अँड नारत्यरिग्र स्टार्टअप्स, हिंदू बिझनेस लाईन, नोव्हेंबर, २०१२.

**ब) संकेत स्थळे**

१. https://www.nasscom.in/knowledge-center/publications/start-report-momentous-rise-indian-start-ecosystem

२. www.grantthorinton.in /insights / articles/startups-India.

◆

**निवेदन : अर्थसंवाद**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर - क्रांतिकारी विचारसरणीचे अर्थतज्ज्ञ

**विलास आढाव** †

**प्रस्तावना :**

डॉ. आंबेडकर हे निःसंशय एक उच्च दर्जाचे अर्थतज्ज्ञ होतेच; पण त्याहीपेक्षा जास्त, समाजातील समस्यांची सूक्ष्म जाण असणारे एक कुशल समाजशास्त्रज्ञ होते. त्यांच्या कल्पना कायमच काळाच्या पुढे असत आणि त्यांच्या विचारांचा गाभा क्रांतिकारक. विविध विषयांच्या निबिड अरण्यात एखाद्या हंसाच्या सहजतेने संचार करून अभिनव आणि विलक्षण पद्धतीने विचार करणारा त्यांच्यासारखा समाजशास्त्रज्ञ विरळाच. विद्यापीठीय प्रशिक्षण हे अद्वैतवादावर आधारित असल्यामुळे त्यातून निर्माण होणाऱ्या समाजशास्त्रज्ञांमध्ये लघु दृष्टिकोन दिसून येतो आणि ते त्यांच्या काल्पनिक विद्याशाखीय सीमांमधून क्वचितच बाहेर पडू शकतात, त्यामुळे सामाजिक शास्त्रामध्ये बहुलवादी असणे फारच कठीण असते. सामान्यतः सर्व नवीन कल्पनांचा उगम (बहुतकरून पश्चिमेकडे) एका विशिष्ट विषयाच्या बंद दरवाजाआड होतो आणि त्या विषयाच्या सीमारेषा क्वचितच सोडल्या जातात. ज्ञानाच्या बाजारीकरणाच्या प्रक्रियेमध्ये जेव्हा एखाद्या विषयाचे प्रभावी तज्ज्ञ निर्माण होतात तेव्हा त्या विशेषज्ञांचे वर्गीकरण करून व त्यांच्याभोवती तटबंदी उभारून सत्ता समीकरणे दृढ केली जातात. ही प्रक्रिया पाश्चिमात्य राष्ट्रात उगम पावली आणि एकत्रितरीत्या विद्याशाखीय जाचक बंधनांनी ती प्रबळ केली. त्यामुळे सामाजिक शास्त्रे ही एक बहुवचनी संकल्पना ठरली आणि सामाजिक समस्यांची जाणीवही वर्गीकृत व विषयानुसार पूर्वग्रहदूषित झाली. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे याला अपवाद होते. क्रांतिकारक असल्यामुळे त्यांनी या काल्पनिक सीमारेषांमध्ये मर्यादित राहायला नकार दिला. वर उल्लेख केल्याप्रमाणे, सामाजिक शास्त्रांच्या समग्र सागरात हंसाच्या सहजतेने विहार करणाऱ्या दुर्मिळ समाजशास्त्रज्ञांपैकी ते एक होते. मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, विधी, विकास सिद्धांत, कृषी अर्थशास्त्र, धार्मिक अभ्यास, वित्तीय अर्थशास्त्र, कायदे अभ्यास व पौर्वात्य अभ्यास अशा अनेक विषयांमधील ते एक अस्सल अभ्रष्ट बुद्धिवादी होते. त्यांच्या विचारांचा आवाका आकलनापलीकडील असल्यामुळे आपल्या हातून काही विषय सुटलेही असतील. या ठिकाणी आपण डॉ. आंबेडकर यांना काळाच्या पुढे असणारी व क्रांतिकारी प्रवृत्ताची वैचारिक

† प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ. भ्रमणध्वनी : ९८५०९१०९१७
ई-मेल : adhavvb@gmail.com

भूमिका असलेले अर्थतज्ज्ञ म्हणून समजून घेण्याचा प्रयत्न करत आहोत.

अनेक महत्त्वाच्या कल्पनांचे उद्‌गाते असूनदेखील डॉ. आंबेडकरांचे लिखाण व विचार त्यांनी हाताळलेल्या कोणत्याही विषयाच्या वर्गांमध्ये आजपर्यंत कोणत्याही विद्यापीठ किंवा महाविद्यालयामध्ये समाविष्ट करण्यात आलेले नाहीत हे विचित्र नाही का? ही घटना प्रासंगिक आहे की हेतुपुरस्सर? अशा नजरचुका हेतुपुरस्सर झाल्या व त्यांचे विचार बाजूला सारण्याचे प्रयत्न उघडपणे झाले असे समजण्यास पुरेसा वाव आहे. आपण जाणतो की आजच्या भूमिकेतून डॉ. आंबेडकरांना अर्थतज्ज्ञ म्हणून समजून घेणे कठीण आहे. आज अर्थशास्त्रामध्ये चार प्रखर प्रस्थापित प्रवाह दिसतात. प्रथम भागामध्ये असे लोक येतात जे व्यामिश्र अशा सामाजिक तथ्यांचा अर्थ लावण्याकरिता, त्यावर भाष्य करण्याकरिता क्लिष्ट गणिताचा अथवा संख्याशास्त्राचा वापर करतात. अर्थशास्त्राचे गणितीकरण आज नित्याचेच झाले आहे आणि अशा किचकट अर्थतज्ज्ञांना सर्वसाधारणत: नोबेल पारितोषिके प्राप्त होतात. दुसऱ्या गटामधील अर्थतज्ज्ञांचे अस्तित्व एका विशिष्ट वैचारिक चौकटीमधील त्यांच्या वैचारिक प्रवृत्तीमधून दिसून येते. अशा गटांबरोबर वाद घालणे किंवा त्यांना विरोध करणे खूप कठीण असते. आणि असे विरुद्ध दिशांना उभे असलेले गट जेव्हा एखाद्या बाबीचे विश्लेषण करतात तेव्हा त्यांच्याशी होत असलेल्या चर्चेमधून तथ्य हाती लागत नाही. तिसऱ्या गटामध्ये प्रयोगवाद्यांचा समावेश होतो आणि तिथे प्रचंड प्रमाणातील माहिती अगदी घुसळून काढून सामाजिक तथ्यांची प्रमाणभूत तत्त्वे मिळवली जातात. हे अर्थतज्ज्ञ काही संख्याशास्त्रीय तंत्रे व साधने वापरून मूळच्याच परिस्थितीचा फक्त पुनरुच्चार करतात. शेवटच्या प्रवाहामध्ये असे अर्थतज्ज्ञ, असे बुद्धिवादी येतात की जे सामाजिक शास्त्रांच्या शाखांमधील विविध अमूर्त रचनांमधील छोट्या छोट्या प्रवाहांमधून विहार करून शुद्ध सैद्धांतिक ज्ञानाप्रत पोचतात. हा सर्वात दुर्मिळ असा गट आहे आणि यामध्ये अतिशय कमी तज्ज्ञ मोडतात. डॉ. आंबेडकरांच्या वेळेस आधीचे तीनही गट अत्यंत प्रचलित होते, मात्र अतिशय कमी प्रमाणावरील संशोधक चौथ्या गटाला प्राधान्य देत असत (जे. सी. कुमारप्पा, जस्टिस रानडे, दादाभाई नौरोजी इ.). पण त्याही काळामध्ये डॉ. आंबेडकर व त्यांच्या समकालीनांमध्ये मोठे फरक दिसून येतात. क्रांतिकारक व बहुलवादी अर्थतज्ज्ञ असल्यामुळे डॉ. आंबेडकर यांनी अर्थशास्त्राकडे मानवी विकारांवर काम करणारे शास्त्र म्हणून बघितले. ऐरणीवर असलेले प्रश्न समजून घेण्यासाठी अर्थशास्त्राची ऐहिक साधने वापरण्यापेक्षाही मानवी व्यथांमध्ये त्यांना जास्त रस होता. अर्थशास्त्राच्या सर्वच शाखांमध्ये ते सहजतेने वावरत. मात्र माहितीचा वापर करून त्यांनी वित्तीय अर्थशास्त्र, सार्वजनिक अर्थशास्त्र, स्थुल अर्थशास्त्र, कृषि अर्थशास्त्र आणि सामाजिक अर्थशास्त्रामध्ये जास्त काम केले.

कोलंबिया विद्यापीठामध्ये त्यांनी त्यांचे शिक्षण प्रसिद्ध अमेरिकन तत्त्वज्ञ प्रा. जॉन ड्यूई यांच्या प्रभावाखाली सुरू केले. करियरच्या सुरुवातीच्या जडणघडणीच्या काळामध्ये डॉ. आंबेडकरांच्या विचारप्रक्रियेवरील प्रा. गोल्डन वाईजर व प्रा. जॉन ड्यूई यांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. डॉ. आंबेडकरांना कायमच दबलेल्या जातीजमातींची दयनीय अवस्था, राज्यकारभाराचे अपयश व भारतातील आर्थिक परिस्थिती यामध्ये रस होता. म्हणूनच त्यांचा पदव्युत्तर प्रबंध, जो त्यांनी डॉ. एडविन सेलिगमन यांच्या मार्गदर्शनाखाली लिहिला, तो सार्वजनिक वित्त याविषयी असणे अगदी अपेक्षितच होते. त्यावेळी प्रा. सेलिगमन कोलंबिया विद्यापीठामध्ये मैकविकर प्रोफेसर ऑफ

पोलिटिकल इकॉनॉमी म्हणून काम करत होते. डॉ. आंबेडकरांचा एम.ए. चा प्रबंध ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्तव्यवस्था याविषयी होता व तो त्यांनी कोलंबिया विद्यापीठास १९१५ मध्ये सादर केला होता. त्यानंतर डॉ. आंबेडकरांनी आपल्या प्रबंधावर काम केले - The Evolution of Provincial Finance in British India - - Study in the Provincial Decentralisation of Imperial Finance (पी.एस.किंग ॲण्ड सन्स यांच्याकडून १९२५ मध्ये प्रकाशित). त्यानंतर लगेचच त्यांनी भारतातील लहान धारणाक्षेत्रे व त्यावरील उपाययोजना यावर एक अतिशय सुंदर लेख लिहिला आणि तो 'द जर्नल ऑफ इंडियन इकॉनॉमिक सोसायटी'च्या १९१८ च्या प्रथम खंडामधे प्रकाशित झाला. त्यांचा डॉक्टर ऑफ सायन्स (डी.एस्सी.) चा प्रबंध The Problems of the Rupee: Its Origin and Its Solution, जो बटलर व टैनर लिमिटेड, लंडन तसेच पी. एस. किंग ॲण्ड सन्स, लंडन यांनी १९२३ मध्ये प्रकाशित केला, तो तर सुप्रसिद्धच आहे. त्यानंतर त्यांनी त्यात सुधारणा केल्या व १९४७ मध्ये तो History of Indian Currency and Banking म्हणून प्रकाशित केला. हे त्यांचे प्रमुख लेखन प्रत्यक्षपणे अर्थशास्त्रावर आधारित होते. पण याव्यतिरिक्तही त्यांनी आपल्या बौद्धिक क्षमतांचा वापर आपल्या प्रत्येक लेखनामध्ये बहुल-विद्याशाखीय विश्लेषक म्हणून वावरताना केला.

आपण या ठिकाणी डॉ. आंबेडकरांच्या अर्थशास्त्रीय लेखनाचा परिचय करून देण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि त्याचबरोबर डॉ. आंबेडकरांची एक वेगळ्या प्रकारचे अर्थतज्ज्ञ म्हणून, विशेषत: ज्या काळात ज्यांना अगदी पार करता येणार नाहीत अशा आव्हानांचा सामना करावा लागला, अशा प्रकारचे एक अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. उच्चशिक्षण घेण्यापूर्वी भारतीय समाजामधील भेदभावाच्या वातावरणाने तसेच भारतातील ब्रिटिश राजवटीमुळे निर्माण झालेल्या व्याधींमुळे ते अक्षरशः गलबलून गेले होते. भारतातील दबलेल्या जातीजमातींच्या बाबतीत घडणारा भेदभाव आणि भारतीय समाजातील समस्या त्यांना ब्रिटिशांना तसेच भारताबाहेरील अर्थतज्ज्ञ बंधूंना पटवून देता येतील, असा विश्वास त्यांना होता. दुर्दैवाने त्यावेळी भारतातील बहुतेक अर्थतज्ज्ञांनी व इतर समाजशास्त्रज्ञांनी त्यांच्या लेखनाची दखल घेतली नाही. हे कदाचित चुकूनही घडले असेल, परंतु हे दुर्लक्ष हेतुपुरस्सर केले गेले असे समजण्यास पुरेसा वाव आहे. आपण डॉ. आंबेडकरांच्या अर्थशास्त्रावरील लेखनाचा कालक्रमानुसार आढावा घेऊ. परंतु त्यातील प्रमुख विचारधारांवर चर्चा करून त्यांचा परस्परसंबंध या भाषणाच्या अखेरीस लावण्याचा प्रयत्न करू. या बहुशाखीय बुद्धिवादी सामर्थ्यवान व्यक्तिमत्त्वाचे अर्थशास्त्रीय विचार जाणून घेऊन त्यांचा मागोवा घेण्यासाठी आमची क्षमता किती खुजी आहे याची आम्हाला कल्पना आहे, पण तरीही एक छोटासा प्रयत्न आम्ही इथे करणार आहोत.

**१. ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्तव्यवस्था**

डॉ. आंबेडकरांचे हे लेखन ढोबळमानाने सार्वजनिक वित्त या विषयाखाली मोडते. हा विषय डॉ. आंबेडकरांच्या हृदयाच्या अगदी समीप असल्यामुळे त्यातूनच डॉ. आंबेडकरांचे सार्वजनिक वित्त व्यवस्थेबद्दल असलेले प्रेम उगम पावले आहे. सर्वसामान्य जनसमुदायाच्या कल्याणावर परिणाम करणाऱ्या राष्ट्रीय धोरणे व कोषागाराचे कामकाज या दोन गोष्टींशी सार्वजनिक वित्तव्यवस्था निगडित असल्याने त्यांनी प्रथम या विषयाला हात घातला. लोककल्याण तसेच राष्ट्रीय व्ययाचे घटक या दोन्ही

गोष्टी डॉ. आंबेडकरांच्या हृदयाच्या अगदी समीप होत्या. कदाचित भारतीय उपखंडामधे आपली पोलादी पकड बसवण्याकरिता वसाहतवादी राज्यकर्त्यांनी कोणती आर्थिक साधने वापरली हे समजून घेण्याकरिताच त्यांनी आपला एम.ए.चा प्रबंध -Administration and Finance of East India Company या विषयावर लिहिण्याचा निर्णय बहुधा घेतला असावा. त्याकाळी इंग्लंडमधील अनेक जणांना त्यांच्या ईस्ट इंडिया कंपनीकडे टाकलेल्या या छिद्रान्वेषी दृष्टिक्षेपाचा रागही आला असेल. ईस्ट इंडिया कंपनी आर्थिक व्यवस्था अतिशय परिणामकारकरित्या वापरून भारतीय अर्थव्यवस्थेमधून कमाल नफा मिळवण्याचा प्रयत्न करीत होती. डॉ. आंबेडकरांना या घटनेची पूर्ण जाणीव होती आणि आपल्या प्रबंधाच्या प्रारंभीच त्यांनी असे अधोरेखित केले आहे की वसाहतवादी राज्यकर्त्यांचा मानस भारतातील सर्व साधनसंपत्ती पिळून घेण्याचा आहे. ते लिहितात, भारताने इंग्लंडकरिता दिलेल्या योगदानाच्या अफाटपणाइतकेच इंग्लंडने भारताला दिलेल्या योगदानाचे शून्यत्व हे उघडपणे आश्चर्यकारक आहे. ईस्ट इंडिया कंपनीने भारतातील साधनसंपत्ती ज्या पद्धतीने संपुष्टात आणली त्याबद्दल त्यांचे मत स्पष्ट होते आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासकीय पद्धतीचे विश्लेषण करताना ते कंपनी नियंत्रित करणाऱ्या बोर्डाचे वर्णन कोर्ट ऑफ प्रोप्रायटर्स आणि कोर्ट ऑफ डायरेक्टर्स असे करतात. गव्हर्नर जनरलचे वर्णन ते असे करतात की, एकाच हाती सर्व सत्ता एकवटलेला असा स्वायत्त अधिपती म्हणजे गव्हर्नर जनरल. आपल्या प्रबंधाच्या सुरुवातीच्या काही पाठांमध्ये डॉ. आंबेडकरांनी ईस्ट इंडिया कंपनीमध्ये एक व्यापारी संस्था ते एक स्वायत्त अधिपती प्रमुखपदी असलेली राजकीय सत्ता नियंत्रण करणारी हुकूमत असा झालेला बदल अधोरेखित केला आहे. ईस्ट इंडिया कंपनीने वापरलेल्या आर्थिक पकडीचे विस्तृतपणे विश्लेषण करून त्यांनी भारतातून महसूल कशा प्रकारे जमा केला जात होता हे दाखवून दिले आहे. जमीन महसुलातील जमीनदारी व रयतवारी पद्धतींचे वर्णन करीत त्यांनी ब्रिटिश भारतातील महसूल पद्धतीचे सखोल विश्लेषण केले आहे. त्यापुढे अफूवरील कर, मिठावरील कर, कस्टम्स, तंबाखूवरील कर, वाहनांवरील कर, अबकारी ड्युटी, स्टँप ड्युटी आणि इतर गोष्टींवरील महसुलाच्या तपशीलांमध्येही ते पुढे गेलेले दिसतात. या सगळ्यामुळे स्थानिक जनतेचे नुकसान होऊन कंपनीचा महसूल मात्र वाढत राहिला. प्रबंधामध्ये डॉ. आंबेडकर ब्रिटिश भारतामध्ये ईस्ट इंडिया कंपनीने मिळवलेल्या महसुलाची खूप मोठ्या प्रमाणावरील माहिती परिश्रमपूर्वक गोळा करतात; तसेच गव्हर्नर जनरलच्या आदेशान्वये ईस्ट इंडिया कंपनीने केलेले खर्चही ते दाखवून देतात. साधने आणि पिण्याच्या पाण्याच्या कमतरतेबाबत जॉन ब्राईट यांचे उद्‌गार वापरताना डॉ. आंबेडकर दाखवून देतात की, केवळ स्थानिक प्रधानांच्या आणि संस्थानांच्या अधिपत्याखालील प्रदेशातच केवळ उपयुक्त कामे केली जात होती. याकरिता आधार म्हणून ते डॉ. स्प्रेज यांचे लेखन मॉडर्न इंडिया, जे १९३७ साली प्रकाशित झाले होते, त्याचा संदर्भ देतात (पान २६). ब्रिटिशांनी लादलेले जमिनीवरील व इतरही कर निश्चितच शोषण करणाऱ्या स्वरूपाचे होते. हाच मुद्दा अधोरेखित करण्याकरिता डॉ. आंबेडकर कर्नल ब्रिग्ज यांचे शब्द उद्‌धृत करतात की, भारतामध्ये सध्या अस्तित्वात असलेला जमीन कर, जो जमीनदारांचे सर्व भाडे सामावून घेतो, तो यापूर्वी भारत किंवा आशियातील कोणत्याही सरकारच्या कारकिर्दीमध्ये अस्तित्वात नव्हता (पान २९). ते त्यानंतर लिहितात, महसूल अधिकाऱ्यांनी श्रमांमधील आकर्षकता संपूर्णपणे संपवून टाकली. सूज्ञ वाचकास डॉ. आंबेडकरांच्या लेखनामध्ये

मार्क्सिझमचा सूक्ष्म भास होईल. आणि आपण जाणतो की त्यानंतर त्यांनी मार्क्स आणि बुद्ध यांच्यामधील समानशीलता दाखवण्याकरिता इतर ठिकाणी अधिक सखोल विश्लेषण करून लिहिलेही आहे.

डॉ. आंबेडकराचे हे लिखाण एकीकडे मोठ्या प्रमाणावरील ऐतिहासिक वाङ्मय व दुसरीकडे १७९२ पासून पुढील ब्रिटिश भारतातील महसूल आणि खर्च यांची परिश्रमपूर्वक जमा केलेली माहिती या दोन्हीवरील त्यांचे प्रभुत्व जाणून घेण्याच्या दृष्टीने वाचणे मनोरंजक ठरते. डॉ. आंबेडकरांनी अतिशय तपशीलवार कोष्टकांमधून हे दाखवून दिलेले आहे की, विविध साधनसंपत्तीवर विविध समयी वसूल केलेले कर हे शोषण स्वरूपाचे होते. त्यांनी ही वास्तविकता दाखवून दिली आहे की भारतीय उपखंडाचा वसाहतवादी राज्यकर्त्यांनी महसुलाच्या रूपाने प्रचंड संख्येने कर गोळा करून पराकोटीचा फायदा करून घेतला. खर्चाच्या बाजूने विचार करता त्यांनी हेही दाखवून दिलेले आहे की ब्रिटिश सरकारने भारतातील संरचना व इतर घटकांकरिता अत्यंत मामुली खर्च केलेला आहे. त्यांनी वापरलेल्या कोष्टकातून हे सिद्ध होते की १८१०-११ पासून एकंदरित ४६ वर्षांमध्ये, महसुलाची आवक व खर्चाची जावक यामधील दरी खूप मोठी होती; कारण कंपनीला खूपच मोठ्या प्रमाणावर प्राप्ती होत होती. ४६ वर्षातील ३२ वर्षे महसूल हा खर्चापेक्षा जास्त होता आणि जमा झालेला अतिरिक्त पैसा इंग्लंडला परत पाठवला गेला. या दोन्हीतील तूट एकूण कालावधीतील केवळ १४ वर्षे दिसून आली आणि तीदेखील उर्वरित वर्षामध्ये जमा केलेल्या अतिरिक्त रकमांच्या मानाने फारच छोटी होती. ही अतिरिक्त आवक कित्येक वर्षे ३ दशलक्ष पौंडापेक्षाही जास्त राहिली. आवक व जावकाचा हा ताळेबंद मांडल्यानंतर डॉ. आंबेडकर लिहितात, बंगालच्या अखेरच्या महंमदी राज्यकर्त्याने त्याच्या प्रशासकीय कारकिर्दीच्या शेवटच्या वर्षी, १७६४ साली, ८,१७,५५३ पौंड एवढा जमीन महसूल जमा केला. ३० वर्षामध्ये ब्रिटिश राज्यकर्त्यांनी २६,८०,००० पौंड एवढा जमीन महसूल त्याच प्रदेशामधून वसूल केला (पान २९). यातून जमीन महसूल पद्धतीचे शोषण स्वरूप दिसून येते. त्याचप्रमाणे त्यांनी हेही दाखवून दिले की, १७९२ मध्ये भारताला असलेले कर्ज ७ दशलक्ष पौंड होते व ते १८५७-५८च्या सुमारास ६० दशलक्ष पौंडांपर्यंत वाढले. अफगाण युद्ध आणि शिपायांच्या बंडामुळे, बंडाची किंमत म्हणून ४०,०००,००० पौंड याव्यतिरिक्त, भारताच्या होम बॉंड्स कर्जाची रक्कम वाढून ३८,९४,४०० पौंड एवढी झाली. डॉ. आंबेडकरांनी मद्रास परगण्याचे कारभारी असलेले एक ब्रिटिश अधिकारी मि. मार्टिन यांचे शब्द उद्धृत केले आहेत, जेव्हा त्याच्या कचेरीतून गाड्या भरभरून चांदी बाहेर जात होती तेव्हा त्याला परगण्यातील कानाकोपऱ्यातील गरिबांची आठवण झाली (पान ३१). त्यानंतर ते १८५८च्या कायद्याची चर्चा करतात की, ज्यावेळी भारताचे प्रशासन संपूर्णत आणि अंतिमरित्या ब्रिटिश गव्हर्नर जनरलच्या ताब्यात दिले गेले, ते ही अशा वेळी की जेव्हा भारतावरील कर्जे ही अतिप्रचंड होती. भारतामधील महसूल आणि कर वाढवूनच या रकमेची प्राप्ती करता येणार होती आणि ब्रिटिश सरकारने कालांतराने तेच केले. कंपनीला निर्माण झालेल्या कर्जावर प्रतिक्रिया देताना डॉ. आंबेडकर मेजर विंगेट यांचे उद्गार मोठ्या प्रमाणावर उद्धृत करतात. ते या मुद्द्यावर जोर देतात की भारतीय कर्ज हे खरे तर या देशाच्या सरकारने निर्माण केलेले कर्ज आहे, आणि मग अशा वेळी आपण भारताची जबाबदारी कशी झटकून टाकू शकतो? (पान ४१)

आपल्या या प्रबंधामधून डॉ. आंबेडकरांनी

भारतातील वसाहतवादी राजवटीतील राजकीय अर्थकारणाच्या पद्धतीवरील आपले प्रभुत्व सिद्ध केले. एवढेच नव्हे; तर ईस्ट इंडिया कंपनीचे कमालीचे शोषण स्वरूप दाखवून दिले. या ठिकाणी त्यांनी सार्वजनिक वित्त हे व्यासपीठ व राजकीय अर्थशास्त्राची तत्त्वे वापरून ब्रिटिश पत्रकारांनी ईस्ट इंडिया कंपनीची कल्याणाभिमुख अशी जी प्रतिमा निर्माण केली होती ती प्रभावीपणे मोडून काढली. या ठिकाणी आपल्याला डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे तीन पैलू दिसून येतात. १) एक सच्चा राष्ट्रभक्त, ज्याने ईस्ट इंडिया कंपनीसमोर भारतीय अर्थव्यवस्थेचे निष्क्रिय स्वरूप उघड केले. २) महसूल व व्यय यांच्या स्रोतांचे विश्लेषण करून त्यांचा विकासाशी संबंध जोडणारा सार्वजनिक वित्त व्यवस्थेतील एक तज्ज्ञ. ३) देशांतर्गत व्ययाकडे बघणारा एक सक्षम कल्याणाभिमुख अर्थशास्त्रज्ञ. ते असा निष्कर्ष काढतात की यामध्ये लोक प्रचंड संख्येने भरडले गेले. मात्र काही मोजक्याच लोकांचा फायदा झाला आणि भारतामध्ये आपले पाय रोवलेल्या कायमस्वरूपी गरिबीची बीजे तिथेच रोवली गेली. ते म्हणतात की, शिपायांच्या बंडानंतरची भारतातील अतिशय भयंकर अशी शांतता ही खरेतर ब्रिटिश राजवटीमध्ये भारताला अधिकच पिचवणारी भीतीदायक शांतता होती. भारत केवळ मोठ्या कर्जाखाली होता एवढेच नव्हे; तर तो वसाहतवादी राज्यकर्त्यांच्या घट्ट पकडीमध्ये आयताच सापडला. त्यानंतर डॉ. आंबेडकर असा निष्कर्ष काढतात की, मूक शांतता अधिक चांगली की आर्थिक हलाखी. हा निर्णय प्रत्येकाने आपापला घ्यायचा आहे (पान ४७). या ठिकाणी डॉ. आंबेडकरांमध्ये दडलेला क्रांतिकारी आपल्याला दिसून येतो आणि तो म्हणतो की, भारत ज्या भयंकर अशा आर्थिक अनुभवातून गेलेला आहे त्याबद्दल बोलणे आवश्यक आहे. या निष्कर्षातूनच डॉ. आंबेडकरांचे खरे भारतीयत्व आणि त्यांच्यामध्ये लपलेला एक उच्चकोटीचा क्रांतिकारक अर्थशास्त्रज्ञ आपल्याला दिसून येतो. या प्रबंधामध्ये जरी उघडपणे ईस्ट इंडिया कंपनीच्या वित्तीय समस्यांचा आढावा घेण्यात आलेला आहे तरी प्रत्यक्षात राजकीय अर्थशास्त्रीय विश्लेषणाची तत्त्वे वापरून त्यामधून खरे तर द्विदल राज्यपद्धती आपल्यासमोर मांडली आहे. त्यानंतर ते दाखवून देतात की, द्विदल राज्यपद्दती ही शासनाची चांगली पद्धत नाही आणि त्यातून केवळ समाजस्वास्थ्य बिघडते.

### २. लहान धारणाक्षेत्रे व शेतकीक्षेत्रास जडलेले विकार

दबलेल्या सामाजिक गटांचे कल्याण कायमच डॉ. आंबेडकरांच्या हृदयाच्या समीप राहिले. त्यांनी समाजाच्या उच्चभ्रू वर्गाबद्दल क्वचितच लिहिले, आणि त्यांच्या वेळेस अत्याधुनिक पाश्चिमात्य अर्थशास्त्रज्ञ ज्या उच्च अशा अर्थशास्त्रीय वर्तुळामध्ये वावरत असत, त्यामध्ये प्रवेश करण्याचा त्यांनी कधीही प्रयत्न केला नाही. त्यांनी कायमच स्वत:ला पददलितांच्या आणि 'नाही-रे' वर्गाच्या समस्यांशी जोडून ठेवले आणि क्लिष्ट समस्यांची उकल करण्याचा प्रयास केला. लहान व किरकोळ धारणाक्षेत्रातील दारिद्र्याने भारत पिडला गेला होता. आजही हीच समस्या शेतकी समस्यांमध्ये प्राधान्याने आढळून येते. भारतीय शेतकरी अनेक शतके त्यांच्याकडील धारणाक्षेत्र आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे कायम दुर्लक्षित राहिले आहेत. वसाहतवादी राजवटीमध्ये हीच परिस्थिती चिघळली आणि या ठिकाणी आपल्याला नक्की आठवेल की, घृणास्पद अशा १८७५च्या दख्खनच्या दंगलींच्या वेळी जमीनदारांच्या कर्जामध्ये शेतकरी प्रचंड प्रमाणामध्ये अडकलेला व त्रस्त झाला होता. लहान आणि किरकोळ शेतकऱ्यांच्या परिस्थितीबद्दल डॉ. आंबेडकरांना मनस्वी कळवळा होता. भारतामध्ये लहान व अर्थहीन अशा

जमीनधारणांमध्ये झालेली वृद्धी त्यांनी निदर्शनास आणून दिली आणि हीच समस्या या शेतकऱ्यांना अधिक अर्थप्राप्ती होण्यामध्ये मोठा अडथळा कशी ठरत आहे ते दाखवून दिले. ते म्हणतात की, यामुळे या क्षेत्राच्या विकासावरही परिणाम होतो. या विषयाचे विश्लेषण केल्यानंतर त्यांनी लहान शेतकऱ्यांची एकत्रित शेती ही कल्पना मांडली, जी आता भारत सरकारच्या (आता निरस्त) १२ व्या योजनेमधील एप्रोच पेपरमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. मात्र त्यांचा सर्वात मर्मभेदक युक्तिवाद शेती आणि उद्योगक्षेत्रांच्या परस्परसंबंधाबाबत होता आणि हाच मुद्दा सर आर्थर लुईस यांनी Economic Development and Unlimited Supplies of Labour या विषयावरील त्यांचा प्रबंध १९५४ साली मँचेस्टर स्कूल जर्नल मध्ये प्रकाशित केल्यानंतर निर्माण झालेल्या वादामध्ये प्रामुख्याने समोर आला होता. डॉ. आंबेडकरांच्याच विचारधारेस समांतर पद्धतीने आर्थर लुईस यांनी ऐतिहासिक विश्लेषणाची विकासप्रक्रियेशी सांगड घालून अर्थहीन भूधारणा व श्रमांचे हस्तांतरण याबद्दल चर्चा केली आहे. लुईस असेही मत मांडतात की, वारसा कायदा हा एक अतिशय गोंधळात्मक विषय आहे आणि पुढे जाऊन औद्योगिक, म्हणजेच भांडवलदारी, क्षेत्र व अविकसित असे शेतकी क्षेत्र यांच्यातील परस्परसंबंधांवरती उपाय शोधून काढण्याचा प्रयत्न करतात. भांडवलाचे हस्तांतरण आणि श्रमामधील हस्तांतरण हे दोन बदल ते गृहीत धरतात. १९१८ च्या त्यांच्या लेखात डॉ. आंबेडकर यांनी असे प्रतिपादन केले आहे की, या लहान व विखुरलेल्या धारणक्षेत्रांमुळे आपल्या देशातील या मोठ्या उद्योगाकरिता खरेच काळजीचे कारण निर्माण झाले आहे. तुलनात्मक अर्थशास्त्र विचारात घेता, भारतातील आर्थिक जीवनाबद्दल दोन अतिशय उल्लेखनीय पण दारुण अशा वास्तविकता समोर आल्यामुळे ही भावना अधिकच वाढीस लागते, १) की भारत हा प्रामुख्याने शेतकी देश आहे, आणि २) त्याचे शेतकी उत्पादन हे सर्वात कमी म्हणजे किमान आहे. पण त्याचवेळी ते एकत्रीकरण, म्हणजेच जमीन सुधारणा कायद्यातून जी संकल्पना पुढे येते, तिचा पुरस्कार करीत नाहीत. ते अतिशय गांभीर्याने एकत्रीकरण हा उपायच नाही असे नमूद करतात. त्याऐवजी, जमिनीचे राष्ट्रीयीकरण हा देशातील दुर्लक्षित शेतकऱ्यांना वाचवण्याकरिता एक संभाव्य उपाय म्हणून सुचवतात. ते लिहितात, एकत्रीकरणाच्या या प्रकल्पांवर अधिक घणाघाती टीका याकरिता होते आहे की एकत्रित केलेले धारणाक्षेत्र हे विस्तृत धारणाक्षेत्रच असलेच पाहिजे याकडे कानाडोळा होत आहे. जर आपण असे म्हटले की भारतीय शेतकी व्यवस्थेला छोट्या आणि विखुरलेल्या धारणाक्षेत्रांपासून धोका आहे तर आपण केवळ एकत्रीकरण करून चालणार नाही, त्यांचे विस्तारीकरणही केले पाहिजे. तसेच हे ध्यानात घेतले पाहिजे की एकत्रीकरणामुळे कदाचित विखुरलेल्या धारणाक्षेत्रांपासून असलेला धोका टळेल; पण जर ते एकत्रित केलेले धारणाक्षेत्र आर्थिकदृष्ट्या फायद्याचे, म्हणजे विस्तृत धारणाक्षेत्र, नसेल तर लहान धारणाक्षेत्रांचे तोटे दूर होणार नाहीत. यावरून ग्रामीण शेतकी समस्यांविषयीच्या त्यांच्या भेदक विचारसरणीची प्रचिती येते.

खरे तर डॉ. आंबेडकरांचे काही युक्तिवाद हे प्रा. थिओडोर शुल्ट्झ यांनी बऱ्याच नंतर आपले सुप्रसिद्ध पुस्तक Transforming Traditional Agriculture यामध्ये मांडलेल्या मुद्द्यांसारखेच आहेत. अतिरिक्त श्रमांचे हस्तांतरण अधिक वेतन देणाऱ्या क्षेत्राकडे करून त्याच्या मदतीने कमी उत्पादनक्षमतेच्या सापळ्यातून किंवा निम्नस्तर समतोलाच्या पकडीमधून सुटण्याची शिफारस शुल्ट्झने केली होती व त्याकरिता त्याला नोबेल पारितोषिक

प्रदान करण्यात आले. शुल्ट्झ भांडवलाच्या ओघामध्ये वृद्धी करण्याबद्दलही लिहितो की, ज्यामध्ये मानवी संसाधनाच्या दर्जाचा समावेश होतो. डॉ. आंबेडकर यांनी अनेक वर्षांपूर्वी (१९१८मध्ये) शेती क्षेत्रामध्ये भांडवलाची तीव्रता वाढवली पाहिजे, अशी शिफारस केली होती. ते लिहितात, त्यामुळे शेती क्षेत्रातील अस्वस्थतेचा प्राथमिक इलाज हा विस्तारलेली धारणक्षेत्रे हा नसून वाढीव भांडवल व भांडवली माल हा आहे. भांडवल हे बचतीमधून उभे राहाते व बचत तेव्हाच शक्य होते जेव्हा अतिरिक्तता असते, हे राजकीय अर्थशास्त्राचे एक सामान्य तत्त्व आहे. पुढे जाऊन डॉ. आंबेडकर औद्योगिकीकरण हा असा एक महत्त्वाचा उतारा मानतात की, ज्यामुळे लहान धारणाक्षेत्रांच्या वृद्धीचे जे तोटे असतील ते दूर होतील. औद्योगिकीकरण हा एक नैसर्गिक व प्रभावी उपाय आहे आणि वर आपण विचार केलेल्या इतर अनेक वाईट कल्पनांपेक्षा त्याला प्राधान्य दिले पाहिजे. कायदा केल्यास आपल्याला एक खोटे आर्थिक धारणाक्षेत्र व त्याच्या बदल्यात अनेक सामाजिक तोटे पदरात पडतील. पण जर औद्योगिकीकरण केले तर एक मोठे आर्थिक धारणाक्षेत्र आपल्याला निव्वळ फायदा मिळेल अशी सक्तीच करेल. ते पुढे जाऊन असे म्हणतात, एकत्रीकरणाच्या इतर दुसऱ्या अंगाचा विचार केल्यास हाच निष्कर्ष निघतो की, औद्योगिकीकरण हे एकत्रीकरणाच्या आधीच झाले पाहिजे. या ठिकाणी डॉ. आंबेडकरांचा एक अर्थतज्ज्ञ म्हणून असलेला समग्र दृष्टिकोन दिसून येतो व परिस्थितीकडे पाहाण्याची बंदिस्त अशी दृष्टी दिसत नाही.

या युक्तिवादांव्यतिरिक्त डॉ. आंबेडकरांनी जगामध्ये इतरत्र घडत असलेल्या बदलांचीही नोंद घेतली आणि याकडे लक्ष वेधले की भारताने पुरोगामी औद्योगिकीकरणाकडे वाटचाल केली पाहिजे की, ज्यामुळे भारतातील शेतकी वेतन व दारिद्र्य यांवर सकारात्मक परिणाम घडून येतील. आर्थर लुईस यांच्यापासून पुढे रानिस, फे, दीक्षित व मार्गलिन यांपर्यंत हीच कल्पना दुहेरी अर्थव्यवस्थेच्या आदर्शांची प्रमुख संकल्पना ठरली. ते लिहितात, एकीकडे यूएसए सारखे देश शेतकीप्रधानतेपासून उगम होऊन क्रमशः औद्योगिक होत चालले आहेत, तर त्याचवेळी भारत मात्र एका अशा दुःखदायक प्रक्रियेमधून चालला आहे की, ज्यामध्ये शहरीकरण कमी होऊन गरजेपेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण भागामध्ये वाढत चालली आहे. हा अनिष्ट कल आपण जितक्या लवकर मोडून काढू शकू तितके चांगले. त्यांना औद्योगिक विकासाची शेतीबरोबर सांगड घालायची होती व शेती क्षेत्राला भांडवल व भांडवली मालाने आधार मिळवून द्यायचा होता आणि हे प्रतिपादन त्यांनी थिओडोर शुल्ट्झ आणि सर आर्थर लुईस यांच्या बरेच पूर्वी करून ठेवले होते. त्या दोघांना एकत्रितरित्या Transforming Traditional Agriculture (१९६४) या कामाकरिता नोबेल पारितोषिक प्रदान करण्यात आले की, जे काम शेती व औद्योगिक क्षेत्रामधील परस्परसंबंध दर्शवण्याच्या याच प्रकारच्या कल्पनेवर आधारित होते व ज्यामध्ये हाही मुद्दा अधोरेखित केला होता की, शेतीच्या मागासलेपणावर शिक्षणाद्वारे मानवी भांडवलाची वृद्धी हा एक मोठा उपाय ठरू शकतो. आपल्या संपूर्ण लेखनामधून डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाद्वारे मानवी भांडवलाच्या वृद्धीचे महत्त्व अधोरेखित केले आणि अत्यंत पददलित गटातील लोकांकरिता ते प्रत्यक्षात आणणाऱ्या संस्थाही सुरू केल्या (पीपल्स एज्युकेशन सोसायटी).

### ३. रुपयाची समस्या

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये प्रवेश घेतल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रावरील त्यांच्या डॉक्टर ऑफ सायन्सच्या शोधप्रबंधावर काम केले. हे

लेखन म्हणजे मौद्रिक अर्थशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना तर आहेच; पण त्याला राजकीय व संस्थात्मक अर्थशास्त्राचीही जोड आहे. सोने व चांदी यांच्या मानकांविषयी वाद निर्माण करून मौद्रिक अर्थशास्त्राला धक्का देणाऱ्या वादंगामधून The Problem of Rupee याची निर्मिती झाली. तोपर्यंत एक अर्थशास्त्रज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांना मुख्यत: सार्वजनिक वित्त व त्यासंबंधी विषयांमध्ये रस होता. आणि कदाचित डॉ. एडविन केनन यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे डॉ. आंबेडकरांचा कल सार्वजनिक वित्ताकडून मौद्रिक अर्थशास्त्राकडे वळला. आपण आधीचे प्रबंध आणि The Problem of Rupee हे वाचलेत तर एक तज्ज्ञ राजकीय अर्थशास्त्रज्ञ आणि मौद्रिक व संस्थात्मक अर्थशास्त्र यांचे एकत्रीकरण झाल्याचे चित्र आपल्याला दिसून येईल. त्यांनी मौद्रिक अर्थशास्त्रामधील सिद्धांत व वाङ्मय यामध्ये अतिशय सहजतेने विहार केला आणि हा शोधप्रबंध अत्यंत कुशलतेने लिहिला. आपले मुद्दे मांडण्याकरिता ते माहिती व मोठ्या प्रमाणावर वाङ्मयाचा वापर करतात. भारतामध्ये इंग्लंडच्या तुलनेने किमतीमध्ये लक्षणीय वाढ झाली होती. या ठिकाणी क्रयशक्तीच्या समतेशी सुसंगत अशा प्रत्यक्ष विनिमय दराचे तत्त्व चर्चेसाठी आले. Indian Currency and Finance या त्यांच्या पुस्तकामध्ये प्रो. केन्स यांनी हा मुद्दा लावून धरला की, विनिमय मानकामध्ये भविष्यातील आदर्श मानकाचा एक आवश्यक घटक उपस्थित असतोच. डॉ. आंबेडकरांचा युक्तिवाद असा होता की प्रत्यक्ष विनिमय दर दोन देशांच्या क्रयशक्तीच्या समतांशी संबंधित आहे. प्रत्यक्ष विनिमय दर हे दोन चलनांच्या दोन वेगवेगळ्या क्रयशक्तीच्या समतांचे गुणोत्तर आहे.

त्यावेळी चर्चेमध्ये असलेल्या सोने व चांदी यांच्या मानक/विनिमय मानकाच्या तुलनेच्या विषयावर The Problem of Rupee हा शोधप्रबंध आधारित होता आणि हा विषय भारत व इंग्लंड यांच्यामधील मूल्याची असमानता की ज्याचा फायदा इंग्लंडला मिळत होता, त्याच्याशी प्रत्यक्ष संबंधित होता. त्यांनी या शोधप्रबंधाची सुधारित आवृत्ती १९४७ मध्ये प्रकाशित केली व त्याला History of Indian Currency and Banking असे नाव दिले. मूळ शोधप्रबंध १९२३ मध्ये बटलर एंड टेनर लि., लंडन, यांनी प्रकाशित केला होता. दोन्ही खंडांच्या मूळ कल्पना हातात हात घालूनच चालतात. डॉ. आंबेडकरांनी हा शोधप्रबंध लिहिण्याआधी सोने मानकावर फारसे काही लिखाण उपलब्ध नव्हते, केवळ लॉर्ड केन्स यांचे लेखन उपलब्ध होते. डॉ. आंबेडकरांनी लॉर्ड केन्स यांनी केलेल्या विधानांना पाठिंबा दिला नाही, तर प्रत्यक्षात त्यांनी लॉर्ड केन्स यांना तीव्रपणे विरोधच केला. डॉ. आंबेडकर लिहितात, हा मतभेद एका मूलभूत तथ्यावर आधारित आहे, की ज्याकडे प्रोफेसर केन्स यांचे संपूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे आणि ते असे की आपण रुपयाची सर्वसामान्य क्रयशक्ती जोपर्यंत स्थिर करत नाही तोपर्यंत रुपया स्थिर होणार नाही. विनिमय मानक ते करीत नाही. ते मानक केवळ लक्षणांवर लक्ष केंद्रित करते पण मूळ व्याधीकडे दुर्लक्ष करते. एवढेच नव्हे तर त्यामुळे व्याधी विकोपासच जाते (डॉ. आंबेडकर्स रायटिंग्ज, खंड ६, पान २८).

या अत्यंत महत्त्वाच्या लेखामधे डॉ. आंबेडकरांनी समोर ठेवलेले प्रमुख युक्तिवाद आता आपण पाहू या. १८९३ पर्यंत भारतीय चलन हे चांदीच्या मानकावर आधारित होते, म्हणजेच रुपयाच्या नाण्याचे मूल्य त्यामधील चांदीच्या घटकाबरोबर होते. वसाहतवादी राज्यकर्त्यांनी १८४१मध्ये सोन्याच्या मुद्रा चलनात आणल्या व त्या १५ रुपये इतक्या मूल्याच्या वैध चलन मुद्रा ठरल्या. ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेमधील खाणींमधे प्रचंड प्रमाणात उत्पादित झालेल्या सोन्यामुळे

सोन्याचे सापेक्ष मूल्य घसरले आणि १८५३ पर्यंत वसाहतवादी राज्यकर्त्यांनी ते थांबवले. सोने मानक पुन्हा सुरू करण्याबाबत अनेक सूचना आल्या; कारण त्याच्या अनुपस्थितीमुळे रुपयाच्या विनिमय मूल्यावर मोठा परिणाम होत होता. परिणामी भारत व इंग्लंड यांच्यातील व्यापाराचा इंग्लंडला फायदा झाला. १८७२ ते १८९३ या दरम्यान भारतीय रुपया मोठ्या प्रमाणावर कोसळला आणि त्याचबरोबर भारतीय निर्यातीचे मूल्यही गडगडले. १८९३ मध्ये ब्रिटिश सरकारने चांदीचा रुपया बंद केला व १.०४ पौंड प्रति रुपया या मूल्याचे सोन्याचे नाणे चलनात आणले. भारतीय रुपयाच्या सातत्याने होणाऱ्या अवमूल्यनाचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झाला. निर्यात वाढली मात्र भारताला इंग्लंडवर जास्त रक्कम खर्च करावी लागली, व तीदेखील सोन्याच्या रूपामध्ये. १८९३ मध्ये सरकारने चांदीचे रुपये घडवणे बंद केले व सोन्याच्या बदल्यामध्ये रुपयाची नाणी घडवण्याची तयारी दर्शवली. विनिमय व्यवस्था सरकारच्या हातात होती. श्री. फाऊलर यांच्या अध्यक्षतेखालील करन्सी कमिटीने चांदीच्या रुपयांबरोबरच सोन्याची नाणी निर्माण होतील अशा टांकसाळींची शिफारस केली. १९०६ पर्यंत विनिमय मानक सुस्थापित झाले व चांदीच्या रुपयाला एका निश्चित दराने त्याच्या सोन्याच्या मूल्यावर आधारित स्टर्लिंग पौंडमधील परिवर्तनीयता मिळेल याची हमी दिली गेली. १९१६ मध्ये ही पद्धत मोडकळीला आली कारण चांदीच्या किमतीमध्ये प्रचंड मोठी वाढ झाली. तोपर्यंत ही पद्धत चांदीचे मानक बनली. भारतामधील या संपूर्ण विनिमय प्रणालीचे व्यवस्थापन वसाहतवादी राज्यकर्त्यांनी करण्याच्या प्रश्नाबाबत डॉ. आंबेडकर चर्चा करतात. डॉ. आंबेडकरांचा प्रमुख युक्तिवाद हा ब्रिटिशांनी रुपयाचे बेपर्वा पद्धतीने चलन व्यवस्थापन केले या विरोधात होता. त्यांची वचनबद्धता भारतीय अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत स्थिरतेशी होती व ते केवळ सोने मानक किंवा सोन्याच्या चलनानेच शक्य होते. हिल्टन-यंग कमिशन, १९२५, यांना दिलेल्या मेमोरेंडममध्येही त्यांनी हाच मुद्दा उपस्थित केला होता. सरकारकडून गैरव्यवस्थापन होण्याची शक्यता मोठी होती; कारण विषय पैशाचा होता अशी त्यांना भीती होती. अशा कुठल्याही गैरव्यवस्थापनामुळे किमतीचा विस्फोट होईल व त्यामुळे अनर्थ ओढवेल. ब्रिटिश सरकारवर टीका करताना त्यांनी अतिशय कडवे शब्द वापरले व ते पुढे जाऊन असेही म्हणाले की सरकारने नाणेपद्धतीचा गैरफायदा घेतला आहे. डॉ. आंबेडकर लिहितात, जे लोक पैसा वापरतात त्यांना त्या पैशाची सोन्यामध्ये किंमत किती आहे यामध्ये रस नसतो तर सर्वसामान्यतः वस्तूंमध्ये (की ज्याचा सोने हा अत्यंत छोटा भाग आहे) त्या पैशाची किंमत किती आहे यामध्ये असतो. म्हणूनच सगळीकडे पैसा हा सर्वसामान्यतः वस्तूंच्या रूपामध्ये स्थिर ठेवण्याचा प्रयत्न होत असतो आणि तेच योग्य आहे. कारण लोककल्याणामध्ये मौल्यवान धातूची नव्हे तर प्रत्यक्ष उपयुक्तता असलेल्या वस्तू व सेवांचीच जास्त मदत होते (डॉ. आंबेडकर्स रायटिंग्ज, खंड ६, पान ५६३). सर्वसामान्य लोकांना चलन मानकांच्या गैरव्यवस्थापनामुळे प्रचंड प्रमाणात महागाईचा सामना करावा लागेल याची त्यांना जास्त भीती होती. इतरत्र त्यांनी हे मत मांडले आहे की चलनाचे व्यवस्थापन हे पूर्णपणे टाळलेच पाहिजे. त्यांना जुन्या पद्धतीच्या व स्वयंचलित आर्थिक व्यवस्थापनाद्वारे मिळवलेल्या मूल्यस्थिरतेमध्ये जास्त रस होता.

**४. वर्गीकृत असमानता**

अनेक समाजशास्त्रज्ञांनी जात या विषयाची चर्चा केली आहे; पण जातीची उत्पत्ती व त्याचे समाजातील चिरस्थायीकरण हा समाजशास्त्र किंवा अर्थशास्त्र

यामधील चर्चेचा मुद्दा कधीच नव्हता. वास्तविकत: अर्थशास्त्रज्ञांनी स्वत:ला जात या मुद्द्यापासून कायम दूर ठेवलेले दिसते आणि अगदी अलीकडे जॉर्ज ए एकरलॉफ्ट यांच्या लेखनानंतरच कदाचित जात हा मुद्दा अर्थशास्त्रज्ञांच्या पंडिती लेखनामध्ये चर्चिला गेलेला दिसतो. दीपक लाल (१९८८) यांनी त्यांचे पुस्तक Hindu Equilibrium यामध्ये म्हटल्याप्रमाणे व इतर काही लेखकांच्या मते जात ही श्रमविभागणीदेखील करते आणि सुसंस्कृत समाजाला श्रमविभागणीची गरज असते. आधुनिक उत्पादन कार्य विश्लेषणाद्वारे हे दाखवून दिले गेले की, जर जातींनी त्यांना परंपरेने नियुक्त केलेली आर्थिक कार्ये केली तर समाज समतोल राहातो. मात्र कोणत्याही सुसंस्कृत समाजामध्ये या श्रमविभागणीसोबत कामकऱ्यांची अशा अनैसर्गिक पद्धतीने एवढी कडेकोट वर्गवारी केली गेलेली नाही. म्हणूनच हा असा श्रेणीक्रम आहे की ज्यामध्ये श्रमविभागणीबरोबर कामकऱ्यांची प्रतवारी केली जाते. यामध्ये वैयक्तिक क्षमतांचा विकास करण्यास वाव नाही. उलट यामध्ये पालकांचे सामाजिक स्थान हेच मुलांसाठीही कायम राहाते व त्यामुळे मुलांना वारसाहक्काने मिळालेले उद्योगच करावे लागतात. वैयक्तिक भावना व प्राधान्यक्रम याला यामध्ये स्थान नाही व ही व्यवस्था पूर्वनियोजनाच्या शिकवणुकीवर आधारित आहे (आंबेडकर १९३६:४७).

जातीव्यवस्थेवरील बऱ्याच संशोधकांनी या व्यवस्थेची ठरावीक वर्णने केली आहेत व बाहेरच्या जगाला सामाजिक व्यवस्थांचे बरेचसे गुंतागुंतीचे तपशील माहिती नसल्याने त्याकडे पाश्चिमात्य विद्वानांचे लक्ष वेधले गेले. परंतु या अशा संशोधनाची एक विचित्र बाह्यता अशी की त्यामुळे संशोधनाचे लक्ष रोगसूचक व वर्णनात्मक विश्लेषणावरून हलून वैधानिक विश्लेषणाकडे गेले. मात्र डॉ. आंबेडकरांनी यापुढे जाऊन या पद्धतीचा उदय व चिरस्थायीकरण याचा सखोल अभ्यास केला आणि अमानवीय चालीरीतींपासून सुटका होण्यासाठी बुद्धिझम हा उपाय म्हणून समोर ठेवला. ते लिहितात की, जातीव्यवस्था ही वांशिक भेद दाखवून देत नाही तर ती एकाच वंशाच्या लोकांची सामाजिक वर्गवारी करते (आंबेडकर १९३६:४९). जातीमुळे आर्थिक कार्यक्षमता वाढत नाही व त्यामुळे वंशामध्ये सुधारणा होऊ शकत नाही व झालेली नाही. याउलट त्यामुळे भारतीयांमधील व्यवस्थापन व नैतिकता पूर्णपणे खालावलेली आहे (आंबेडकर १९३६:५०). या व्यवस्थेमुळे वास्तविकत: समाजामध्ये गरिबीचे चिरस्थायीकरण घडते.

डॉ. आंबेडकरांच्या मते आदर्श समाज हा स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यावर आधारित असला पाहिजे. तो सतत हलता असला पाहिजे व एका भागामध्ये घडणारे बदल इतर भागांना कळण्याकरिता त्याच्यामध्ये अनेक माध्यमे उपलब्ध असली पाहिजेत. आदर्श समाजामध्ये अनेक फायद्यांची, आवडींची जाणीवपूर्वक देवाणघेवाण झाली पाहिजे व ते संप्रेषित झाले पाहिजेत. इतर पद्धतीने संघटित होण्याकरिता अनेक प्रकारची संपर्क माध्यमे अस्तित्वात असली पाहिजेत. सर्वात शेवटी, समाजामध्ये सहजतेने सामाजिक अभिसरण घडले पाहिजे (आंबेडकर १९३६:५७).

त्यांच्या विश्लेषणानुसार जातीला दोन पैलू असतात. १) ती लोकांचे वेगवेगळ्या समुदायांमध्ये विभाजन करते. २) ती या समुदायांच्या सामाजिक स्थानाची प्रतवारी लावून त्यांना एकावर एक असे स्थान देते. प्रत्येक समुदायाला स्वत:चा अभिमान असतो व याचा आनंद असतो की जातिश्रेणी व्यवस्थेमध्ये तो इतर काही जातींच्या वर आहे. या प्रतवारीची बाह्य लक्षणे म्हणून काही सामाजिक व धार्मिक अधिकारही श्रेणीनुसार नेमून दिले जातात, ज्यांना तांत्रिकदृष्ट्या अष्टाधिकार व संस्कार म्हटले जाते. म्हणूनच जितकी

उच्च जात तेवढे हे अधिकार जास्त व जितकी निम्न जात तेवढी या अधिकारांची संख्या कमी. सर्वचजण जातीव्यवस्थेखाली भरडले जातात पण सर्वांचे स्थान समान नसते (आंबेडकर १९३६:७२). पददलितांमध्ये दारिद्र्याचे चिरस्थायीकरण होण्याचे कारण म्हणजे या श्रेणीव्यवस्थेमधील अर्थव्यवस्था असे डॉ. आंबेडकर सांगतात.

त्यांच्या मते, जातीव्यवस्थेचे मूलभूत तत्त्व म्हणजे वर्गीकृत असमानता. यामुळे वर्गांची रचना समांतर नव्हे तर उभी झाली. ते केवळ एकमेकांपासून भिन्न आहेत असे नाही तर त्यांची स्थिती असमानही आहे. जीवनाचे असे कुठलेही अंग नाही की जे वर्गीकृत असमानतेने नियंत्रित केले गेलेले नाही (आंबेडकर १९८९:१०७, खंड ३). वर्गीकृत असमानतेच्या प्रक्रियेमध्ये खालील गोष्टींचा समवेश होतो. (१) श्रेणीबद्धतेनुसार व्यवसायांची निश्चिती (२) वर्गीकृत वेतनव्यवस्था - ब्राह्मणांकरिता कामाच्या प्रति एकक अधिक वेतन तर शूद्रांकरिता कमी वेतन (३) श्रम व वेतन यामधे सक्तीची अचलता (४) कौशल्यवृद्धीसाठी विरोध व ज्ञानाची बंदिस्त केंद्रे (५) समाजाच्या निम्नस्तरांनी या व्यवस्थेचे पालन करावे, यासाठी श्रेणीबद्ध शिक्षेची व्यवस्था.

वर्गीकृत असमानतेच्या सामाजिक व्यवस्थेमध्ये दुखावलेल्या पक्षांनी एकत्र येऊन एक सर्वसामान्य विरोध किंवा हल्ला करणे हे घडतच नाही कारण ते एका पातळीवर कधीच नसतात. या पद्धतीच्या सामाजिक व्यवस्थेमध्ये उच्चतम, उच्चतर, उच्च, निम्नतर आणि निम्नतम असे स्तर असतात. म्हणूनच सर्वांचीच उच्चतम जातींविषयी तक्रार असते व त्यांचा पाडाव व्हावा, अशी इच्छा असते पण ते कधीच एकत्र येत नाहीत. उच्च जातीला उच्चतर जातीचा पाडाव करायचा असतो; कारण ती त्यांच्या वर असते, पण त्याकरिता त्यांना निम्न आणि निम्नतर जातीशी हातमिळवणी करायची नसते. वर्गीकृत असमानतेच्या पद्धतीमध्ये या सामाजिक पिरेमिडच्या अगदी तळाशी असलेल्या वर्गाव्यतिरिक्त कोणताही वर्ग सर्वार्थाने दुर्लक्षित नसतो. मिळणाऱ्या विशेषाधिकारांचीही श्रेणी लावलेली असते. प्रत्येकच वर्ग विशेषाधिकृत असल्यामुळे प्रत्येक वर्ग ही सामाजिक व्यवस्था चालू राहावी यासाठी प्रयत्नशील असतो (आंबेडकर १९८९:१०२, खंड ४). या ठिकाणी डॉ. आंबेडकर एक कुशल सामाजिक अर्थशास्त्रज्ञ म्हणून समोर येतात की ज्यांनी अर्थशास्त्रीय तत्त्वे एका सामाजिक घटनेचे चिरगामी परिणाम दाखवण्याकरिता वापरली.

### ५. डॉ. आंबेडकर एक अर्थशास्त्रज्ञ म्हणून

एक अर्थशास्त्रज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांचे प्रशिक्षण जगातल्या दोन उत्कृष्ट संस्थांमध्ये झाले होते - कोलंबिया विद्यापीठ व लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स. अनेक अडथळ्यांचा सामना केल्यानंतर त्यांचे व्यक्तिमत्त्व तावूनसुलाखून निघाले होते व त्यांनी त्यावेळी त्यांच्या बालपणी समाजामध्ये असलेली विदारक सत्ये बघितलेली होती. त्यांना त्यांचे शिक्षण परिश्रमपूर्वक व आर्थिकदृष्ट्या तणावाच्या परिस्थितीत मिळवावे लागले. अनपेक्षित ठिकाणांहून भेदभावच हाती लागल्यामुळे ते अत्यंत व्यथित झाले होते. म्हणूनच डॉ. आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व एक अर्थशास्त्रज्ञ म्हणून समजून घेताना आपल्याला सामाजिक दुष्प्रवृत्तींबद्दलचे त्यांचे विचार व त्या पार्श्वभूमीवर जडणघडण झालेले त्यांचे व्यक्तित्व यांचा विचार केला पाहिजे. डॉ. आंबेडकरांची नाळ ही कायमच भारतातील पददलित सामाजिक गटांच्या छळवणुकीशी व दयनीय अशा भारतीय आर्थिक परिस्थितीशी जोडलेली राहिली. त्यांच्या विचारांमागे कायमच सामाजिक संरचना व या सामाजिक संरचनेचे बळी हे राहिले आणि म्हणूनच

त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू म्हणजे राज्य आणि राज्याची धोरणे हा राहिला. त्यामुळे नैसर्गिकरित्या त्यांचा कल सार्वजनिक वित्त या विषयाकडे झुकला; कारण त्याचा संबंध राज्याची धोरणे आणि लोककल्याण यांना स्पर्श करून जातो. डॉ. आंबेडकरांना एक कुठलेही साचेबद्ध व्यक्तिमत्त्व म्हणून समजून घेणे निश्चितच कठीण आहे आणि अशाच एका प्रयत्नामध्ये अंबिराजन हे त्यांच्या ईपीडब्ल्यू लेखामधे लिहितात, आंबेडकर निश्चितपणे जुडिओ-ग्रीक ज्ञानप्रसार परंपरेमधील होते आणि ते एक उदयोन्मुख आधुनिकतावादी होते. हे त्यांच्या अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, विधी, समाज याबाबतीत असलेल्या दृष्टिकोनातून व अगदी त्यांच्या कपड्यांच्या सवयींमधूनसुद्धा दिसून येते (पान ३२८५). आपण या बहुलवादी बहुआयामी व्यक्तिमत्त्वाकडे जनकल्याणाच्या दृष्टिकोनातून बघितले पाहिजे आणि याचकरिता सार्वजनिक वित्त, कल्याणकारी अर्थशास्त्र, संस्थात्मक रचना, वसाहतवादी राजवट आणि मौद्रिक अर्थशास्त्र यामध्ये त्यांनी उडी घेतली आणि त्यावेळी त्यांच्या हृदयात राष्ट्रीय कल्याणाचाही विचार होताच.

त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या वित्तीय धोरणांकडे बघितल्यानंतर महसूल पद्धतीचे विश्लेषण केले आणि त्यातून जमीन कर कसा अत्यंत शोषण स्वरूपाचा आहे व त्यामुळे देशातील रयतेचे कंबरडे कसे मोडले आहे हे स्पष्ट करून दाखवले. त्या ठिकाणी त्यांनी दारिद्र्याचे मूळ कशात आहे त्याकडे लक्ष वेधले. भारताच्या वसाहतवादी राज्यकर्त्यांनी अतिरिक्त नफा मिळवण्याकरिता महसूल खर्चापेक्षा कसा जास्त ठेवला हे त्यांनी दाखवून दिले. प्रांतिक वित्तव्यवस्थेबद्दल चर्चा पुढे चालू ठेवून त्यांनी भारतातील वसाहतवादी राजवटीचे राजकीय अर्थशास्त्र उघड करून दाखवले. भारतामध्ये ब्रिटिश राजवट ऐनभरात असताना एक भारतीय विद्वान ब्रिटिश सरकारच्या शोषण स्वभावाबद्दल अतिशय स्पष्टवक्तेपणाने लिहीत होता आणि त्यातील काही भाग तर इंग्लिश भूमीवरून लिहीत होता. ज्या काळी जगभरात कुठेही भारतीयांविरुद्ध राजद्रोहाचा कायदा सर्रासपणे वापरला जात होता त्या काळी ही बाब निश्चितच क्रांतिकारक म्हणावी लागेल. कोलंबिया येथे अर्थशास्त्राचा अभ्यास करताना त्यांनी प्रो. गोल्डनवाईजर यांच्या उपस्थितीमध्ये मानववंशशास्त्रावर एक परिसंवाद आयोजित केला व तो अर्थशास्त्राच्या कोणत्याही विषयाशी संबंधित नसून भारतातील जाती या विषयावर होता हे आपण विसरता कामा नये. या निबंधामध्ये त्यांनी जातींची आर्थिक पाळेमुळे कुठेपर्यंत पोचली आहेत याचा संपूर्णपणे मागोवा घेतला व हा विचार नमूद करण्याजोगा आहे. विचार करण्याची ही प्रवृत्ती संपूर्णपणे वेगळी होती व ती अशा प्रकारच्या विषयांवर काम करणाऱ्या जगातील इतर कोणालाही सुचली नव्हती. सामाजिक किंवा आर्थिक कोणत्याही प्रकारच्या शोषणाचा - विशेषत: या दोन्हीच्या एकत्रीकरणाचा त्यांना तिटकारा होता.

त्यांनी तीनही शोधनिबंध एकापाठोपाठ लिहिले व परंपरागत विद्याशाखीय परिभाषेमध्ये ते सार्वजनिक वित्त किंवा मौद्रिक अर्थशास्त्र यामधील होते. मात्र आपण हे लेखन व त्यांचे त्यानंतरचे अर्थशास्त्रावरील लेखन थोडे अधिक सखोलपणे वाचले तर वाचकाच्या लक्षात येईल की, याला राजकीय अर्थशास्त्राचा आधार आहे व यामध्ये चर्चिलेली तत्त्वे ही परंपरागत सिद्धांताच्या मर्यादेत राहात नसून त्यांचा अतिशय नवीन मूलगामी अर्थ लावला गेलेला आहे. आम्हाला कल्पना आहे की, डॉ. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय विचार एका निबंधामध्ये एकत्र करण्याचा विचार करणे कठीण आहे आणि यापूर्वीही तसे प्रयत्न झालेले आहेत (अंबिराजन १९९९, जाधव १९९१ व इतर अनेक). परंतु या एकमेवाद्वितीय अर्थशास्त्रज्ञाचे व्यक्तिमत्त्व आतापर्यंत

समर्थनीयरीत्या समजून घेतले गेलेले नाही. तसा उद्देश नव्हता असे नाही पण डॉ. आंबेडकरांचे लेखन व त्यांच्यातील क्रांतिकारी छटा या खरोखर समजण्यास अत्यंत कठीण आहेत. आम्ही इथे त्या दृष्टीने एक अतिशय सूक्ष्म प्रयास केलेला आहे.

**संदर्भसूची**


१. आंबेडकर बी. आर., (१९९५), अॅड्मिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी, युनिव्हर्सिटी ऑफ कोलंबिया, यूएसए (१९८१ मध्ये पुनर्प्रकाशित) डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग अँड स्पीचेस, खंड ६, महाराष्ट्र सरकार.

२. आंबेडकर बी. आर., (१९१७) कास्टस् इन इंडिया : देअर मेकॅनिझम, जेनेसिस अँड डेव्हलपमेंट, न्यूयॉर्क : इंडियन एंटिक्करी.

३. आंबेडकर बी. आर., (१९२५), द इव्होल्यूशन ऑफ प्रॉव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया : अ स्टडी इन द प्रॉव्हिन्शियल डीसेंट्रलायजेशन ऑफ इंपीरियल फायनान्स, पी. एस. किंग अँड सन्स लि., वेस्टमिन्स्टर, ग्रेट ब्रिटन, (१९८९ मध्ये पुनर्प्रकाशित) डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग अँड स्पीचेस, खंड ६, महाराष्ट्र सरकार.

४. आंबेडकर बी. आर., (१९२३), द प्रॉब्लेम ऑफ रूपी : इट्स ओरिजनल एंड इट्स सोल्यूशन, पी. एस. किंग अँड सन्स लि., वेस्टमिन्स्टर, ग्रेट ब्रिटन, (१९८९ मध्ये पुनर्प्रकाशित) डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग अँड स्पीचेस, खंड ६, महाराष्ट्र सरकार.

५. आंबेडकर बी. आर., (१९३९), फेडरेशन व्हर्सेस फ्रीडम, आर. आर. काळे मेमोरियल लेक्चर, गोखले इन्स्टिटट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे.

६. अंबिराजन एस., (१९९९), आंबेडकर कॉन्ट्रिब्यूशन टु इंडियन इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल वीकली, खंड ३४, क्र. ४६/४७ (नोव्हें २०-२६, १९९९), पृ. ३२८०-३२८५.

७. जाधव नरेंद्र, (१९९९), निग्लेक्टेड इकॉनॉमिक्स थॉटस् ऑफ बाबासाहेब आंबेडकर, इकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल वीकली, खंड २६, क्र. १५, १३ एप्रिल १९९१.

८. थोरात सुखदेव, (२००६), आंबेडकर्स रोल इन इकॉनॉमिक प्लॅनिंग वॉटर अँड पॉवर पॉलिसी, क्षिप्रा प्रकाशन.


◆

---

**चुक दुरूस्ती**

एप्रिल-जून २०१९ च्या अंकात 'अर्थ शब्दांची वाट पाहे' (पृ. ८१) यामध्ये जे. एफ. पाटील यांच्या सस्टेनेबल डेव्हलपमेंट या शब्दाबाबतच्या मांडणीमध्ये पोषण करणे याला इंग्रजीत Hourish or sustonmance असे छापले गेले आहे. त्याऐवजी कृपया Hourish or sustaining असे वाचावे ही विनंती.

**- संपादक**

---

# बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची ५० वर्षे: सद्यस्थिती आणि भवितव्य

**धनश्री महाजन** †

**प्रस्तावना**

१९ जुलै, १९६९ रोजी तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी १४ प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतात घेतला गेलेला हा सर्वात महत्त्वपूर्ण आर्थिक निर्णय म्हणून गौरविण्यात आला.

उपलब्ध साधनसामुग्रीचे समन्यायी वितरण, वाटप आणि स्थैर्य ही सार्वजनिक (शासकीय) धोरणाची तीन प्रमुख उद्दिष्ट्ये असतात. तसेच धोरणाच्या यशस्वितेचे हेच तीन निकष देखील असतात. भारतात १९६९ पर्यंत बँकांच्या शाखांच्या अभावी ग्रामीण भागात सावकारांची पतपुरवठ्याबाबत नैसर्गिक मक्तेदारी होती. आर्थिक वृद्धीसाठी वित्तीय साधनसामग्रीचे समन्यायी वितरण आणि वाटप महत्त्वाचे असते. तसे झाल्याखेरीज देशाच्या एकूण आर्थिक /सामाजिक व्यवस्थेत स्थैर्य येऊ शकत नाही.

वित्तीय साधनसामग्रीच्या संचयासाठी तसेच तिच्या समन्यायी वितरण आणि वाटपाच्या दृष्टीने सुमारे ५० वर्षांपूर्वी शासनाने बँकाच्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णय घेतला. कोणत्याही देशात बँकिंग व्यवसायाचा सर्वदूर प्रसार झाल्याखेरीज आर्थिक व्यवस्था मजबूत होऊ शकत नाही. १९ जुलै १९६९ रोजी प्रमुख व्यापारी बँकाच्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णय त्या काळातील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आर्थिकदृष्ट्या जसा युक्त होता तसा तो राजकीयदृष्ट्या देखील युक्त होता. त्याचबरोबर नियोजनबद्ध विकासाच्या प्रारूपाला देखील सुसंगत होता.

१९६९ च्या बँक राष्ट्रीयीकरणाच्या निर्णयामुळे राज्यकर्त्यांना (शासनाला) बँकांचे नियंत्रण आपल्या हातात ठेवून समन्यायी वितरणासह आर्थिक वृद्धीचे लक्ष्य प्राप्त करण्याची संधी मिळाली. त्यातून भारतात सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांची एक प्रकारची मक्तेदारीच तयार झाली. राष्ट्रीयीकरणापूर्वी देशातल्या मोठ्या उद्योग समूहांच्या मालकीच्या खासगी बँका जनतेकडून ठेवी स्वीकारून त्यातून आपल्या उद्योगात गुंतवणुकीसाठी निधी उभारत असत. राष्ट्रीयीकरणानंतर लघुउद्योग, कृषी, घरबांधणी, वाहन खरेदी, प्रवास, शिक्षण या कार्यांसाठी कर्ज उपलब्ध होऊ लागले. ग्रामीण भागातल्या सावकारांऐवजी राष्ट्रीयीकृत बँकांचा पर्याय प्रथमतःच देशातल्या शेतकऱ्यांना मिळाला. याचा अर्थ १९६९ पूर्वी खेड्यांमधून जी सावकारी चालत असते. तशीच सावकारी शहरी भागात खासगी मालकीच्या बँकांची होती, असे म्हणता येईल. ती १९६९ पासून बंद झाली.

†प्राध्यापक व विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
आजीव सभासद क्र. ८४४, भ्रमणध्वनी : ९८८११३१०९३, ई-मेल : dhmahajan7@gmail.com

१९ जुलै, १९६९ मध्ये १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करताना रिझर्व्ह बँकेचा सल्ला घेण्यात आला नव्हता. परंतु दुसऱ्यांदा एप्रिल १९८० मध्ये ६ बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यापूर्वी रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नररांचा (आय.जी. पटेल) सल्ला घेण्यात आला.

राष्ट्रीयीकरणामुळे बँकांच्या शाखांचे जाळे ग्रामीण भागात पसरू शकले. बँकाजवळील एकूण ठेवींमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा वाटा १९८० नंतर ९२ टक्के इतका वाढला. या बँकांच्या व्याजदराचे प्रशासन रिझर्व्ह बँकेच्या हातात आले. त्यासोबतच या बँकांची मालकी हाती आल्यामुळे आपोआपच शासनाचे नियंत्रण/ हस्तक्षेप सुरू झाला.

१९९१ मध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून भारताने कर्ज घेतल्यानंतर खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारणे अपरिहार्य झाले. भारताच्या सार्वजनिक धोरणाची दिशाच यामुळे बदलली. अर्थात, भारताच्या राजकीय कार्यक्रमपत्रिकेवर उदारीकरणाचा मुद्दा त्यापूर्वीच म्हणजे राजीव गांधी पंतप्रधान असताना १९८५ पासून आला. उदारीकरण म्हणजे शासनाचा बाजारातील हस्तक्षेप टप्प्या-टप्प्याने कमी करीत जाण्याची प्रक्रिया होय. या अंतर्गत प्रथमत: १९८८ मध्ये व्याजदराच्या उदारीकरणाची प्रक्रिया रिझर्व्ह बँकेने चक्रवर्ती समितीच्या शिफारसीनुसार सुरू केली होती. त्यानंतर १९९१ मध्ये नव्या जागतिकीकरणाच्या व्यूहरचनेला पूरक असे बदल वित्तीय क्षेत्रात करण्याच्या हेतूने १९९१ मध्ये नरसिंहम समिती नेमण्यात आली. या समितीने भारतीय वित्तीय क्षेत्राचे बँकाच्या राष्ट्रीयीकरणापासूनचे १९९१ पर्यंतचे सिंहावलोकन केले. १९६९ नंतर व्यापार आणि विकास अधिकोषणात झालेल्या लक्षणीय वाढीची नोंद घेतली. नरसिंहम समिती (१९९१) नुसार, भारतात बँकिंग क्षेत्रात पुढील बदल झाले:

१. व्यापारी बँकांनी ग्रामीण आणि अर्धनागरी भागात अधिकोषण कार्यात वृद्धी केली.
२. एकूण कर्जामध्ये प्राधान्य क्षेत्राच्या दिल्या जाणाऱ्या कर्जाचे प्रमाण वाढले.
३. शासकीय रोख्यांमध्ये (अंदाजपत्रकीय तूट भरून काढण्यासाठी) बँकांची गुंतवणूक वाढली.
४. नफा मिळवण्याची बँकांची क्षमता कमी झाली.

या निरीक्षणांच्या आधारे नरसिंहम समितीने बँका नफाक्षम होण्यासाठी व्याजदराचे नियंत्रण, बँकाजवळील रोखता वाढीसाठी वैधानिक रोखता आणि रोख राखीव निधीचे प्रमाण कमी करणे या शिफारसी केल्या.

नरसिंहम समितीने बँका नफाक्षम होण्यासाठी त्यांना स्वायत्तता देण्याची शिफारस केली. तसेच आता पुन्हा सरकारने खासगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करू नये. उलट खासगी बँकांना वाढण्याची संधी देणे नव्या धोरणांना सुसंगत राहील, असे सुचविले.

राष्ट्रीयीकृत बँकांवर शासनाचे आणि रिझर्व्ह बँकेचे असे दुहेरी नियंत्रण असणे हा राष्ट्रीयीकृत बँकांवर अन्यायच आहे. कारण खासगी बँकावर केवळ रिझर्व्ह बँक नियंत्रण ठेवते. अशा प्रकारचा दुजाभाव न करता राष्ट्रीयीकृत बँकांवरील शासनाचे नियंत्रण काढून त्यांना न्याय्य स्वायत्तता देणे योग्य राहील असे देखील नरसिंहम समिती (१९९१) ने सुचविले.

पुन्हा दुसऱ्यांदा एम. नरसिंहम यांच्याच अध्यक्षतेखाली वित्तीय सुधारणांसाठी १९९८ मध्ये समिती स्थापन करण्यात आली. या समितीने सार्वजनिक क्षेत्रातल्या २८ बँकांची पुनर्रचना पुढीलप्रमाणे सुचविली:

१. दोन किंवा तीन मोठ्या बँकांमध्ये काही बँकांचे विलीनीकरण करावे. या बँकांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी सक्षम करावे.
२. चार किंवा पाच मोठ्या राष्ट्रीय बँकांमध्ये लहान बँकांचे विलीनीकरण करावे आणि त्यांना अंतर्गत बाजारातील स्पर्धेसाठी तयार करावे.
३. प्रादेशिक पातळीवर कार्य करण्याच्या दृष्टीने उर्वरित

बँकांची पुनर्रचना करावी.

या शिफारशींवर शासनाने मौन पाळले तसेच बँक व्यवस्थापनात शासनाचा हस्तक्षेप नष्ट व्हावा ही शिफारस सोयिस्करपणे दुर्लक्षिली.

१९९१ नंतरच्या उदारीकरणानंतर आलेल्या तेजीच्या काळात उद्योगगृहांनी एकाच वेळेला अनेक बँकांकडून कर्ज उचलले आणि बँकिंग क्षेत्राकडून एकेका उद्योगगृहाने एकूण किती कर्ज घेतले आहे हे माहिती होणे कठीण आहे. म्हणजे ज्या कारणाकरिता बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले होते तो उद्देशच धोक्यात आला. बँकांमधल्या सामान्य ठेवीदारांचे पैसे पुन्हा मोठ्या उद्योगांना मिळू लागले आणि त्या कर्जांची वसुली होत नसल्यामुळे बँकांची नफाक्षमता घटू लागली.

२०१४ मध्ये जे. पी. नायक समितीने राष्ट्रीयीकृत बँकांमधील शासनाचे भाग भांडवल बँक गुंतवणूक समिती स्थापून तिच्याकडे वर्ग करावे असे सुचविले. या समितीमध्ये व्यावसायिक बँक अधिकारी असावेत. अशा व्यावसायिक अधिकाऱ्यांच्या हातात बँक गुंतवणूक गेल्यास त्यातून बँकांची कामगिरी सुधारेल, असे नायक समितीने सुचविले. अशाच प्रकारची शिफारस २००७ मध्ये पर्सी मिस्त्री समितीच्या अहवालात करण्यात आली होती. नायक समितीने राष्ट्रीयीकृत बँकांचे खासगी कंपन्यांमध्ये रूपांतर करून त्यांना कंपनी कायदा लागू करावा, अशी शिफारस केली.

बँका, मग त्या सार्वजनिक असोत वा खासगी - अथवा सहकारी त्या कार्यक्षमतेने चालल्याच पाहिजेत यात काही वाद असायचे कारण नाही. परंतु मालकीच्या स्वरूपानुसार त्यांची कार्यक्षमता अवलंबून असते असे गृहित मुळात चूक आहे. खरा प्रश्न व्यवस्थापन कौशल्याचा तसेच विवेकशील नियंत्रणाचा आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या ठेवींमधला वाटा कमी होत असला तरी अजूनही महत्त्वपूर्ण आहे. या बँका अंदाजपत्रकीय तूट भरून शासनाने काढण्याकरता जारी केलेल्या (कमी व्याजदराच्या) रोख्यांचे हक्काचे (सरकारच्या ताब्यातले) खरेदीदार आहेत. त्यामुळे शासनाला बँकांच्या खासगीकरणात रस असेल असे वाटत नाही.

**संदर्भ**


१. कुरुलकर र. पु. (१९७९), 'बँकिंगची तत्त्वे आणि बँकिंग पद्धती', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, भारत मुद्रक आणि प्रकाशक लि., औरंगाबाद पृष्ठ क्र. 391-404.

२. Business Standard (2019) "50 years of Nationalization", Volume XIV No 15 July 19, 2019 Pune pp. 9.

३. Datar M. K. (1999) A Primer on Financial Sector Reforms, 5, Think Line Nashik.

४. Datar M. K. (2018) "Future of Public Sctgor Banks in India", Dada Purao Research and Training Institute, Annapurna Pariwar, pp 23-3-, 43-52, 54-58.

५. Gupta Poonam (2014) "Financial Sector Reform under G-20 and the Indian Bank", The G-20 Macroeconomic Agenda, Ed. Parthasarathi Shome, Cambridge, pp. 57-90.

६. Mohan Ram TT (2014) "Bank Privatization by the Backdoor", Economic & Political Weekly, June 7 2014, Vol XLIX No 23 pp. 12-15.

७. Ninan T. N. (2019) "Beyond the half-century", Business Standard, Volume VI, No. 51 20/2, July 2019, Pune, pp. 9.


◆

# सोलापूर जिल्ह्यातील दूध उत्पादकांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास

**जी. एस. कांबळे**†

**प्रस्तावना**

भारतासारख्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत जनावरांची आणि शेती उपयोगी जनावरांची आणि पाळीव प्राण्यांची उपयुक्तता खूप आहे. पशुपालन हा दूध उत्पादनाचा पाया आहे व भारतात शेती व्यवसायाबरोबरच पशुपालन व्यवसाय महत्त्वाचा मानला जातो. दूध व्यवसाय हा शेतकऱ्याचे आणि देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्याचा एक महत्त्वपूर्ण मार्ग आहे. कृषी क्षेत्रातील यांत्रिकीकरणामुळे पशुंकडून जी शेतीशी संबंधित कामे केली जात असत, त्यांचे प्रमाण कमी झाले, म्हणजेच शेतीक्षेत्रातील विविध कार्यांसाठी होणारा पशूंचा वापर कमी झाला. याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांच्या प्राधान्य क्रमात बदल झाला; तो असा की, सामान्यतः शेतीसाठी जनावरे पाळण्याऐवजी दूध उत्पादन देणारी जनावरे पाळण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला व त्याचेच पडसाद भारतातील पशुधनावर पडलेले दिसून येतात. स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारतातील दूध व्यवसायाचा विकास वेगाने झाला. खाजगी आणि सहकारी अशा दोन्ही क्षेत्रांत हा व्यवसाय सुरू असून देशाला दूध उत्पादन, दूध प्रक्रिया आणि दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन करून देत आहे व त्याच बरोबर देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील दुधाची विक्री व्यवस्था होत आहे व यामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारात आमूलाग्र बदल झालेले दिसून येत आहेत व याचे महत्त्वाचे कारण 'दुधाचा महापूर' ही योजना असून यामुळे देशात धवलक्रांती (White Revolution) घडून आली. पशुधन विकास, दूध व्यवसाय, दूध उत्पादन, पशुवैद्यकीय सेवा यांबाबत सरकारी धोरण हे या क्षेत्रातील उत्पादकता वाढविण्यास कारणीभूत ठरते. सहकारी क्षेत्राकडून पशुखाद्य पुरवठा, कर्ज पुरवठा आणि पशू सेवांचा पुरवठा यामुळे पशुधन क्षेत्राच्या विकासाला चालना मिळाली. दुधाचा महापूर योजना कार्यक्रम सरकारने सहकाराअंतर्गत राबविल्याने या क्षेत्राचा विकास अधिक गतीने झाल्याचे दिसून येते.

**भारतातील दुग्धोत्पादन**

भारतात फार पूर्वीपासूनच दुधाचे उत्पादन केले जाते व स्वातंत्र्योत्तर काळानंतर नियोजन काळात सरकारने विशेष प्रयत्न करून सहकारी दूध उत्पादन संस्थांची संख्या वाढवून दूध उत्पादन वाढीसाठी विविध कार्यक्रम राबविले. सन २००१-०२ नंतर दूध उत्पादन व त्याची दरडोई उपलब्धता तक्ता क्र. १ मध्ये दर्शविली आहे.

† संचालक, सामाजिक शास्त्रे संकुल पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
भ्रमणध्वनी :९८५०२४८०९४ ई-मेल : gskamble74@gmail.com

**तक्ता क्र. १ भारतातील दुग्धोत्पादन**

| वर्ष | उत्पादन (दशलक्ष टन) | दरडोई उपलब्धता (ग्रॅम प्रतिदिन) |
|---|---|---|
| २००१-०२ | ८४.४ | २२५ |
| २००२-०३ | ८६.२ | २३० |
| २००३-०४ | ८८.१ | २३१ |
| २००४-०५ | ९२.५ | २३३ |
| २००५-०६ | ९७.१ | २४१ |
| २००६-०७ | १०२.६ | २५१ |
| २००७-०८ | १०७.९ | २६० |
| २००८-०९ | ११२.२ | २६६ |
| २००९-१० | ११६.४ | २७३ |
| २०१०-११ | १२१.८ | २८१ |
| २०११-१२ | १२७.९ | २९० |
| २०१२-१३ | १३२.४ | २९९ |
| २०१३-१४ | १३७.७ | ३०७ |
| २०१४-१५ | १४६.३ | ३२२ |
| २०१५-१६ | १५५.५ | ३३७ |
| २०१६-१७ | १६५.४ | ३५५ |
| २०१७-१८ | १७६.३ | ३७५ |

**स्त्रोत-** NDDB चे विविध अहवाल

तक्ता क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे भारतातील दुग्धोत्पादनामध्ये सन २००१-०२ ते सन २०१७-१८ मध्ये उत्पादन आणि दुधाची दरडोई उपलब्धता यामध्ये लक्षणीय बदल झाल्याचे दिसून येते. सन २००१-०२ मध्ये दुधाचे उत्पादन हे ८४.४ दशलक्ष टनहून सन २०१७-१८ मध्ये ते १७६.३ दशलक्ष टन एवढे झाले. त्याचबरोबर दुधाची दरडोई उपलब्धता सन २००१-०२ मध्ये २२५ ग्रॅम प्रतिदिन होती, ती सन २०१७-१८ मध्ये ३७५ ग्रॅम प्रतिदिन एवढी झाली. सुरुवातीच्या काही वर्षांमध्ये तुलनात्मकदृष्ट्या दुधाचे उत्पादन आणि दरडोई उपलब्धता यांचा वृद्धीदर काहीसा कमी असला तरी नंतरच्या काळात तो वेगाने वाढलेला दिसून येतो.

दूध उत्पादनाच्या बाबतीत देशात स्वयंपूर्णतः निर्माण करण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागात दूध उत्पादकांच्या सहकारी संस्थांना चालना देऊन त्यांच्यामार्फत दुधांवर विविध प्रकारच्या प्रक्रिया करून दूध आणि दुग्धजन्य पदार्थ निर्माण करण्यात आले व त्यांना शहरी भागापर्यंत पोहोचवून शहरी बाजारपेठ मिळवून देण्यात आली आणि त्यांच्यात साखळी निर्माण झाली.

**तक्ता क्र. २. महाराष्ट्रातील दुग्धोत्पादन**

| वर्ष | उत्पादन ('००० टन) | दरडोई उपलब्धता (ग्रॅम प्रतिदिन) |
|---|---|---|
| २००१-०२ | ६०९४ | १७२ |
| २००२-०३ | ६२३८ | १७२ |
| २००३-०४ | ६३७९ | १७२ |
| २००४-०५ | ६५६७ | १७६ |
| २००५-०६ | ६७६९ | १७८ |
| २००६-०७ | ६९७८ | १८१ |
| २००७-०८ | ७२१० | १८४ |
| २००८-०९ | ७४५५ | १८८ |
| २००९-१० | ७६७९ | १९० |
| २०१०-११ | ८०४४ | १९७ |
| २०११-१२ | ८४६९ | २०६ |
| २०१२-१३ | ८७३४ | २१३ |
| २०१३-१४ | ९०८९ | २१९ |
| २०१४-१५ | ९५४२ | २२८ |
| २०१५-१६ | १०१५३ | २३९ |
| २०१६-१७ | १०४०२ | २४३ |
| २०१७-१८ | १११०२ | २५६ |

**स्त्रोत -** NDDB चे विविध अहवाल

तक्ता क्र. २ वरुन असे दिसून येते की, महाराष्ट्रातील दुग्धोत्पादन आणि दुधाची दरडोई उपलब्धता सातत्याने वाढत आहे. सन २००१-०२ मध्ये दुधाचे उत्पादन हे ६०,९४,००० टनहून सन २०१७-१८ मध्ये ते १,११,०२,००० टन पर्यंत पोहोचले. त्याचबरोबर दुधाची दरडोई उपलब्धता सन २००१-०२ मध्ये १७२ ग्रॅम प्रतिदिन होती, ती सन २०१७-१८ मध्ये २५६ ग्रॅम प्रतिदिन एवढी झाली.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये**

१) सोलापूर जिल्ह्यातील दूध उत्पादनाचा अभ्यास करणे.

२) अभ्यास क्षेत्रातील दूध उत्पादकांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

३) अभ्यास क्षेत्रातील दूध उत्पादकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पद्धती**

सोलापूर जिल्ह्यातील दूध उत्पादकांचा अभ्यास वरील उद्दिष्ट्ये समोर ठेवून करण्यासाठी वापरलेल्या संशोधन पद्धतीचे विवेचन पुढीलप्रमाणे-

**विश्लेषण**

सोलापूर जिल्ह्यातील दूध उत्पादनाच्या आर्थिक विश्लेषणाचा अभ्यास करीत असताना प्राथमिक तसेच दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केला आहे. दुय्यम तथ्य संकलन करीत असताना जागतिक स्तरावरील, राष्ट्रीय पातळीवरील व त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील दूध उत्पादन आणि उत्पादकता इत्यादी अभ्यास करताना दुय्यम माहिती संकलन स्त्रोतांचा वापर केला आहे. जसे, विविध संदर्भ ग्रंथ, अहवाल, मासिके, आणि वर्तमान पत्रे इत्यादी माध्यमांतून माहिती गोळा केली आहे. यामध्ये विषय संशोधन अहवाल, शासनाचे अहवाल, संशोधक मासिकातील प्रकशित शोधनिबंध, भारताचा आर्थिक पाहणी अहवाल, नाबार्डचा वार्षिक अहवाल, महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल, सोलापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन विविध वर्षातील अहवाल इत्यादी संदर्भाचा वापर केला आहे.

**नमुना निवड**

सध्याचा अभ्यास महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील दोन तालुके व त्या तालुक्यातील प्रत्येकी दोन गावांची निवड करून त्यांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. प्रत्येक गावातील दहा या प्रकारे दोन तालुक्यातील ४० दूध उत्पादकांची माहिती निवडक यादृच्छिक नमुना पद्धतीचा वापर करून प्रश्नावलीच्या आधारे माहिती घेण्यात आली आहे.

प्रत्येक वर्षी जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात दूध उत्पादन होते. मोहोळ तालुक्यात चांगले दूध उत्पादन होते. त्याचबरोबर उत्तर सोलापूर तालुका हा तुलनेने कमी दूध उत्पादन देणाऱ्या तालुक्यांच्या गटामध्ये समाविष्ट आहे, या कारणाने अधिक दूध उत्पादन देणारा तालुका आणि तुलनेने कमी दूध उत्पादन करणारा तालुका अशा प्रकारे या दोन तालुक्यांची यामध्ये निवड सदर अभ्यासासाठी करण्यात आली आहे.

**नमुना गावांची निवड**

अभ्यासासाठी दोन तालुक्यांची निवड केल्यानंतर या दोन्ही तालुक्यातील प्रत्येकी दोन गावांची अभ्यासासाठी निवड करण्याचे निश्चित केल्याप्रमाणे ही दोन्ही गावे तालुक्यातील इतर गावांना दूध पुरवठा करतात. सोलापूर जिल्ह्यातील दूध उत्पादन संघाच्या जास्त दूध उत्पादन करणाऱ्या गावांमध्ये या गावांचा समावेश आहे. अशा प्रकारे, सोलापूर जिल्ह्यातील दोन तालुक्यातील प्रत्येकी दोन गावे याप्रमाणे एकूण चार गावांची अभ्यासासाठी निवड करण्यात आली आहे.

**सांख्यिकी साधने आणि तंत्राचा वापर**

सदर अभ्यासासाठी निश्चित केलेली उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी योग्य सांख्यिकीय साधनांचा व तंत्राचा वापर करण्यात आला आहे. प्रश्नावलीच्या आधारे मिळालेल्या संबंधित आकडेवारीचे विश्लेषण केले आहे त्यासाठी सरासरी, टक्केवारी इत्यादी सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात आला आहे. प्राप्त माहितीचे विश्लेषण करताना कॉम्प्युटरच्या एक्सेल सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला आहे व त्यानंतर सांख्यिकीय साधनांचा वापर करून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**तथ्यांचे विश्लेषण**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सोलापूर जिल्ह्यातील दूध उत्पादकांच्या स्थितीचा संशोधनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. त्यासाठी दूध उत्पादकांच्या मुलाखती घेऊन त्या आधारे संबंधित विविध घटकांचा अभ्यास

करण्यात आला आहे.

**जनावरांच्या संख्येनुसार दूध उत्पादकांचे वितरण**

जनावरांच्या संख्येनुसार अभ्यास क्षेत्रातील दूध उत्पादकांचे वितरण तक्ता क्र. ३ मध्ये करण्यात आले आहे.

तक्ता क्र. ३ मध्ये दूध उत्पादकांकडे असणाऱ्या दुभत्या जनावरांची संख्या दर्शविली आहे. दूध उत्पादकांकडे असणाऱ्या दुभत्या जनावरांची संख्या विचारात घेता ५२.५ % दूध उत्पादकांकडे ३ ते ५ इतकी जनावरे आहेत. २ पेक्षा कमी जनावरे असणाऱ्या


**तक्ता क्र. ३**

| अनु. क्र. | जनावरांची संख्या | दूध उत्पादक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | < २ जनावरे | ७ | १७.५ % |
| २ | ३-५ जनावरे | २१ | ५२.५ % |
| ३ | ६-१० जनावरे | ९ | २२.५ % |
| ४ | ११-१५ जनावरे | २ | ५ % |
| ५ | > १५ जनावरे | १ | २.५ % |
| | एकूण | ४० | १०० % |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

दूध उत्पादकांची आकडेवारी १७.५ % इतकी आहे आणि ६ ते १० जनावरे असणाऱ्या कुटुंबांची संख्या २२.५ % इतकी आहे. म्हणजेच ११ पेक्षा जास्त जनावरे असणाऱ्या दूध उत्पादकांची संख्या ही ५ % आहे व १५ पेक्षा जास्त जनावरे असणाऱ्या दूध उत्पादकांची संख्या ही २.५ % इतकी कमी असल्याचे दिसून येते.

**आलेख क्र. १**



आलेख क्र. १ मध्ये दूध उत्पादकांकडे असणाऱ्या दुभत्या जनावरांची संख्या दर्शविली आहे. त्यानुसार ३ ते ५ जनावरे असणाऱ्या दूध उत्पादकांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

**दूध व्यवसायाचा अनुभव**

दुग्ध व्यावसायिकांना दूध व्यवसायाच्या असलेल्या अनुभवाचे वर्गीकरण तक्ता क्र. ४ मध्ये केले आहे.

**तक्ता क्र. ४**

| अनु. क्र. | दूध व्यवसायाचा अनुभव | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | < ५ वर्षे | ४ | १० % |
| २ | ५-१० वर्षे | १० | २५ % |
| ३ | १०-१५ वर्षे | ९ | २२.५ % |
| ४ | १०-२० वर्षे | १० | २५ % |
| ५ | > २० वर्षे | ७ | १७.५ % |
| | एकूण | ४० | १०० % |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

तक्ता क्र. ४ मध्ये दूध उत्पादकांचा दूध व्यवसाया संबंधितचा अनुभव दर्शविला आहे. त्यानुसार ५ ते १० वर्षे अनुभव असणाऱ्या दूध व्यावसायिकांची संख्या अधिक म्हणजे २५ % आहे व त्याच बरोबर १० ते २० वर्षे अनुभव असणाऱ्यांची टक्केवारी देखील २५% आहे आणि त्याच पाठोपाठ १० ते १५ वर्षे अनुभव असणाऱ्या व्यावसायिकांची आकडेवारी २२.५ % दर्शविली आहे. पाच वर्षां पेक्षा कमी आणि २० वर्षां पेक्षा जास्त अनुभव असणाऱ्यांची आकडेवारी अनुक्रमे १० % व १७.५ % अशी आहे.

**सरासरी दूध उत्पादन, घरगुती उपभोग आणि विक्री**

अभ्यास क्षेत्रातील दूध उत्पादकांचे दैनंदिन दूध उत्पादन, दुधाचा घरगुती वापर, दूध विक्री प्रमाण आणि त्याची एकूण उत्पादनाशी असलेली टक्केवारी तक्ता क्र. ५ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ५**

| अनु.क्र. | जनावरांची संख्या | दैनंदिन दूध उत्पादन (लिटर) | दूधाचा घरगुती वापर (प्रति दिन लिटर) | दूध विक्री (प्रति दिन/लिटर) | टक्केवारी (एकूण विक्री केले जाणारे दूध) |
|---|---|---|---|---|---|
| १ | < २ जनावरे | ७.२ | १ | ६.२ | ८६.११ % |
| २ | ३-५ जनावरे | २०.९ | १.५ | १९.४ | ९२.८२ % |
| ३ | ६-१० जनावरे | ३८.७ | २.३ | ३६.४ | ९४.०५ % |
| ४ | ११-१५ जनावरे | ५२.२ | ३ | ४९.२ | ९४.२५ % |
| ५ | >१५ जनावरे | ८५.५ | ३ | ८२.५ | ९६.४९ % |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

तक्ता क्र. ५ मध्ये अभ्यास क्षेत्रातील प्रतिदिन दूध उत्पादन लिटरमध्ये दर्शविले आहे. प्रतिदिन २ पेक्षा कमी जनावरे असणारे दूध उत्पादक सरासरी ७.२ लिटर दूध उत्पादन घेतात, त्यापैकी सरासरी १ लिटर दूध हे घरगुती वापरले जाते व ६.२ लिटर दूध हे विकले जाते. यावरून असे दिसून येते की, २ पेक्षा कमी जनावरे असणारे उत्पादक हे एकूण सरासरी दूध उत्पादनातून ८६.११% दुधाची बाजारामध्ये विक्री करतात. प्रतिदिन ३-५ जनावरे असणारे दूध उत्पादक सरासरी २०.९ लिटर दूध उत्पादन घेतात, त्यापैकी सरासरी १.५ लिटर दुधाचा वापर हा घरगुती वापरासाठी होतो व १९.४ लिटर सरासरी दूध हे विकले जाते. यावरून असे दिसून येते की, ३-५ जनावरे असणारे उत्पादक हे एकूण सरासरी दूध उत्पादनातून ९२.८२% दुधाची विक्री करतात. त्याच बरोबर ६-१० जनावरे आणि ११-१५ जनावरे असणाऱ्या कुटुंबातील एकूण दूध उत्पादन अनुक्रमे ९४.०५% आणि ९४.२५% दूध हे बाजारामध्ये विकले जाते व घरगुती उपभोगासाठी १.५ लिटर आणि २.३ लिटर दुधाचा वापर होतो. यावरून दुधाच्या उपलब्धते सोबतच दुधाच्या उपभोगामध्ये देखील वाढ होत असलेली दिसून येते.

**दूध उत्पादनाची विक्री**

दूध उत्पादकांनी जे दूध उत्पादन केले आहे त्याची विक्री ही सहकारी दूध डेअरी, खाजगी दूध डेअरी आणि स्थानिक पातळीवर केली जाते, त्याप्रमाणे त्याचे वर्गीकरण तक्ता क्र. ६ मध्ये केले आहे.

**तक्ता क्र. ६**

| अनु. क्र. | दूध विक्री | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सहकारी | २७ | ६७.५ % |
| २ | खाजगी | ९ | २२.५ % |
| ३ | स्थानिक विक्री | ४ | १०.० % |
| | एकूण | ४० | १०० % |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

दूध उत्पादक जे दुधाचे उत्पादन करतात त्यापैकी प्रामुख्याने ६७.५ टक्के दूध उत्पादक प्रामुख्याने दुधाची विक्री सहकारी संस्थेला करतात. सहकारी संस्था दूध उत्पादकांना प्रति दहा दिवसांना दुधाचे पैसे देतात. दूध उत्पादकांच्या दुधाच्या विक्रीचा विचार करता २२.५ टक्के दुधाची विक्री खाजगी संस्थांना करतात. तर उर्वरित उत्पादक त्यांच्या दूधाची स्थानिक विक्री करतात, त्यांची संख्या १० टक्के इतकी आहे. यावरून दूध उत्पादक हे दूध विक्रीसाठी सहकारी संस्थांना अधिक प्राधान्य देत असल्याचे दिसून येते.

**भांडवलाचे स्त्रोत**

तक्ता क्र. ७ मध्ये दूध उत्पादकांनी दूध व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज घेतले आहे किंवा नाही व जर घेतले आहे तर ते त्यासाठी कोणते भांडवल स्त्रोत वापरले आहेत, याचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

**तक्ता क्र. ७ : कर्ज पुरवठा**

| अनु. क्र. | कर्ज पुरवठा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | २८ | ७० % |
| २ | नाही | १२ | ३० % |
| | एकूण | ४० | १०० % |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

तक्ता क्र. ७ नुसार दूध व्यवसाय सुरू करण्यासाठी ज्या दूध उत्पादकांनी कर्ज घेतले आहे अशा एकूण ३० % दूध उत्पादकांनी वैयक्तिक भांडवलावर हा व्यवसाय सुरू केला आहे; तर ७० % दूध उत्पादकांनी यासाठी कर्ज घेतले आहे.

दूध उत्पादकांनी त्यांचा व्यवसाय सुरू करण्यासाठी विविध ठिकाणाहून कर्ज घेतले आहे; त्यापैकी सर्वात जास्त कर्ज हे दूध डेअरीमार्फत घेण्यात आले असून, त्याचा आकडा २३.३३ % आहे व त्यानंतर सहकारी बँकांचा क्रमांक लागतो, त्याची संख्या १६.६७ % इतकी आहे. यानंतर बचतगट (६.६५ %), शासकीय


**तक्ता क्र. ८ : भांडवलाचे स्त्रोत**

| अनु. क्र. | भांडवलाचे स्त्रोत | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | वैयक्तिक खर्च | ३०.०० % |
| २ | व्यापारी बँक | ३.३३ % |
| ३ | सहकारी बँक | १६.६७ % |
| ४ | दूध डेअरी | २३.३३ % |
| ५ | बचतगट | ६.६५ % |
| ६ | शासकीय योजना | ६.६९ % |
| ७ | इतर | १३.३३ % |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

योजना (६.६९ %) आणि व्यापारी बँक (३.३३ %) यांचा क्रम लागतो. यावरून असे लक्षात येते की, दूध डेअरीमार्फत कर्ज घेणाऱ्यांची संख्या ही तुलनेने अधिक आहे.

**आलेख क्र. २**




आलेख क्र. २ मध्ये दूध उत्पादकांनी त्यांचा व्यवसाय सुरू करण्यासाठी विविध ठिकाणांहून घेतलेल्या कर्जाची टक्केवारी दर्शविली आहे. त्यानुसार ३० % दूध उत्पादकांनी कर्ज घेतले नाही तर सर्वात जास्त कर्ज हे दूध डेअरीमार्फत घेण्यात आले असून त्याचा आकडा २३.३३ % आहे.

**दूध उत्पादकांची शेतजमीन धारण**

दूध उत्पादक व त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या शेतजमिनीविषयी माहिती खालील पत्रकात दाखविली आहे.

**तक्ता क्र. ९**

| अनु. क्र. | दूध उत्पादकांची शेतजमीन धारण | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | शेतजमीन आहे | ७६.६६% |
| २ | शेतजमीन नाही | २३.३४% |
| | एकूण | १००% |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

तक्ता क्र. ९ मध्ये दूध उत्पादकांच्या शेतजमिनीविषयी माहिती दर्शविली आहे, याप्रमाणे ७६.६६% दूध उत्पादकांकडे शेतजमीन आहे; तर २३.३४% दूध उत्पादकांकडे शेतजमीन नसल्याचे दिसून येते. यावरून असे दिसून येते की, शेतजमीन असणाऱ्या शेतकऱ्याकडे दूध उत्पादनाचा स्त्रोत आहे, त्याचबरोबर असे देखील आढळून आले की, दूध उत्पादक स्वतःची शेतजमीन असेल तर जनावरांच्या चाऱ्यावर होणारा अतिरिक्त खर्च टाळून नफा वाढवता येतो. त्याचबरोबर २३.३४% दूध उत्पादक जे आहेत ते दूध व्यवसायाला त्यांचा प्रमुख उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून पाहतात. यातून असे दिसून येते की, दूध व्यवसाय हा अधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अजून वाव आहे व याकडे प्रमुख व्यवसाय म्हणून पाहणे गरजेचे आहे.

शेत जमीन धारण केलेल्या दूध उत्पादकांचा दूध व्यवसाय आणि त्यांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन तक्ता क्र. १० मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता क्र. १०**

| अनु. क्र. | प्राधान्य | प्राधान्य टक्केवारी |
|---|---|---|
| १ | दूध व्यवसाय आणि शेती व्यवसाय हे दोन्ही एकत्र करणे अधिक चांगले आहे. | ९१.३० % |
| २ | दूध व्यवसाय हा शेती पेक्षा अधिक चांगला आहे. | ८.६९ % |

**स्त्रोत -** प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षणातून संकलित.

तक्ता क्र. १० वरुन असे लक्षात येते की, शेती असणाऱ्या दूध उत्पादकांना त्याच्या अनुभवानुसार दूध व्यवसाय आणि शेती व्यवसाय हे दोन्ही एकत्र करणे अधिक चांगले आहे की दूध व्यवसाय हा शेती पेक्षा अधिक चांगला आहे, अशी विचारणा केली असता दूध व्यवसाय आणि शेती व्यवसाय हे दोन्ही एकत्र प्राधान्य देणाऱ्या शेतकऱ्यांची टक्केवारी ९१.३० % इतकी आहे; तर दूध व्यवसाय हा शेतीपेक्षा अधिक चांगला आहे, असे प्राधान्य देणाऱ्या शेतकऱ्यांची आकडेवारी ८.६९ % आहे. यावरून असे दिसून येते की, शेतीला जोड व्यवसाय म्हणून दूध व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

**प्रमुख निष्कर्ष :**

एकंदरीत सदर अभ्यासातून निघालेले काही प्रमुख निष्कर्ष खालीलप्रमाणे-

१. मोठ्या प्रमाणात म्हणजे जवळपास ३० % दूध उत्पादकांनी दूध व्यवसाय सुरू करण्यासाठी कोणतेही कर्ज घेतले नाही. त्यांनी वैयक्तिक खर्चामधून हा व्यवसाय सुरू केला आहे. अल्प व्याजदराने कर्ज मिळत नसल्याने व तारण नसल्याने कर्ज घेऊन त्यांना त्यांचा व्यवसाय वाढवण्यात अडचणी निर्माण होत आहे. दूध व्यवसाय करण्यास इच्छुक असणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जपुरवठा होत असला तरी भूमिहीन शेतमजुरांना या कर्जपुरवठ्याचा लाभ घेता येत नाही.

२. अभ्यास क्षेत्रात पायाभूत सुविधांची कमतरता आहे. जसे की, वाहतूक व्यवस्था, जनावरांना योग्य खाद्यान्न, शीतगृहे यांसारख्या सुविधांचा अभाव दिसून येतो.

३. अभ्यासादरम्यान असे आढळून आले की, ३-५ जनावरांची संख्या असणारे दूध उत्पादक हे संख्येने जास्त आहेत, त्यांची जनावरांची धारण क्षमता ही खूप कमी आहे.

४. अभ्यासादरम्यान असे दिसून आले की, दूध व्यवसायाशी संबंधित कामामध्ये अजूनही मानवी श्रमाचा वापर केला जातो, त्यामुळे बरीच कामे करण्यास वेळ लागतो व त्यामुळे अधिक श्रमाचा वापर होऊन देखील उत्पादकांचे प्रमाण अल्प राहते. यांत्रिकीकरणामुळे कमी श्रमाचा वापर करून अधिक उत्पन्न मिळवता येणे शक्य होते.

५. दूध उत्पादनाची विक्री करत असताना दूध उत्पादक हे सहकारी संस्थेला दूध विक्री करण्यास प्रथम पसंती देत असल्याचे दिसून येते. या अभ्यासादरम्यान असे दिसून आले की शासकीय दूध संकलन हे या क्षेत्रामध्ये होत नाही.

६. पीक पद्धतीमध्ये बदल झाल्याकारणाने हिरव्या चाऱ्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्याचबरोबर सुका चारा देखील मिळत नाही. परिणामी, जनावरांच्या चाऱ्याच्या किमतीमध्ये वाढ होत आहे. अभ्यासादरम्यान असे दिसून आले की, शेतजमीन असणाऱ्या दूध उत्पादकांची संख्या ही ७६.६६ % इतकी आहे. ते शेतीमधील चाऱ्याचा वापर दूध उत्पादनासाठी करू शकतात; परंतु शेतजमीन नसणाऱ्या दूध उत्पादकांना चाऱ्यावर होणारा हा अतिरिक्त खर्च परवडणारा नसतो.

७. दूध व्यवसाय आणि शेती व्यवसाय हे दोन्ही एकत्र करणे अधिक चांगले आहे असे मत ९१.३०% दूध उत्पादकांनी व्यक्त केले आहे. याचा अर्थ शेतकऱ्यांना शेती सोबत दूध व्यवसाय करणे हे जास्त सोयीचे वाटते.

**उपाययोजना**

१. अभ्यासातून असे आढळून आले की दूध व्यवसाय हा अजूनही जुन्या व परंपरागत पद्धतीनेच केला जातो. त्यामध्ये बदल करण्यासाठी तो व्यवसाय आधुनिक पद्धतीने कसा केला जाईल यासाठी शासनाने उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर दूध व्यावसायिकांना योग्य प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

२. अधिक लोकांना दूध व्यवसायाकडे प्रोत्साहित करण्यासाठी दूध उत्पादकांना दूध उत्पादनासाठी आवश्यक असणारे भांडवल कमी व्याजदराने व अल्प तारणावर उपलब्ध करून द्यावे; जेणेकरून दूध व्यावसायिकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी प्राधान्य मिळेल.

३. अभ्यास क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधांची कमतरता दिसून आली, ती दूर करून दूध उत्पादकांना प्रोत्साहित करण्यासाठी अल्पदरामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

४. दूध उत्पादन वाढून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी सरकारने दूध व्यवसाय वाढीसाठी विशेष उपाययोजना करणे व त्यांची स्थानिक पातळीवर योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. दूध उत्पादकांना दिली जाणारी दुधाची किंमत ही योग्य असावी, त्यासाठी दूध उत्पादकांचा दूध उत्पादनावर खर्च देखील लक्षात घेणे गरजेचे आहे.

५. जिल्ह्यातील वाढत्या दूध उत्पादनात वापरात येणाऱ्या जनावरांच्या वाढत्या संख्येनुसार पशुवैद्यकीय सुविधांमध्ये देखील वाढ करणे आणि

ती रास्त किमतीमध्ये उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**सारांश**

सोलापूर जिल्ह्यातील दूध उत्पादनाचे आर्थिक विश्लेषण करत असताना जी प्राथमिक माहिती संकलित केली त्यावरून असे लक्षात आले की, दूध व्यवसायामुळे दूध उत्पादकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे. त्याच बरोबर त्यांच्या आर्थिक उत्पन्नाची पातळी देखील वाढली आहे. आर्थिक उत्पन्नातील वाढीमुळे त्यांचे राहणीमान सुधारले आहे त्याच बरोबर इतर सुधारणा जसे मुलांचे शिक्षण, शेतीतील सुधारणा असे काही बदल झाले आहेत. शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालनाला महत्त्वाचे स्थान आहे, त्याशिवाय पशुपालन हा दुग्धव्यवसायाचा पाया असल्याने शेतकरी उत्पन्न मिळविण्यासाठी पशुपालन करतात. परंतु फक्त शेतीचा जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसायाकडे न पाहता एक स्वतंत्र उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून त्याकडे पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याचबरोबर या अभ्यासामध्ये असे दिसून आले की, शेती करणाऱ्या दूध व्यावसायिकांची संख्या ही अधिक आहे; परंतु दुध व्यवसायाकडे प्रमुख उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून पाहणाऱ्या लोकांची संख्या वाढणे गरजेचे आहे. या दृष्टिकोनामुळे लोकांचे उत्पन्न वाढून त्यांना एक चांगला उत्पन्नाचा स्त्रोत प्राप्त होऊ शकतो.

**संदर्भग्रंथ सूची**

१. सोलापूर जिल्हा सामाजिक आणि आर्थिक पाहणी अहवाल - महाराष्ट्र शासन, २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८.

२. सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित सोलापूर यांचे वार्षिक अहवाल, २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८.

३. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन वार्षिक अहवाल. २०१६-१७ व २०१७-१८.

४.- Animesh Banergee, "Rising challenges a Small Holders Dairying : India".

५. Annual Report, NABARD National Bank for Agriculture and Rural Development (various yearly reports).

६. Department of Animal Husbandry, Dairying and Fisheries.

७. National Dairy Development Board (NDDB) Annual Reports, www.nddb.gov.in (various yearly reports).

८. "Opportunities and Challenges in The Indian Dairy Industry'' : www.nabard.org

९. Study on Improvement in Rural Livelihoods through Dairy Farming : www.nird.org.in

(**टीप :** संशोधक श्रीमती मोनाली मोहन नारायणकर यांचे हा लेख लिहिताना सहकार्य मिळाले. याबद्दल लेखकाकडून त्यांचे आभार.)

◆

ज्यांनी लोकांच्या हितासाठी व्यापार केला त्याची मला माहिती नाही.

**- ॲडम स्मिथ**

# दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धी संकल्पना व वास्तव

**उमेश मधुकर राजदेरकर** †

दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धीची (Immiserizing Growth) संकल्पना डॉ. जगदीश भगवती यांनी सन १९५८ मध्ये मांडली. या संकल्पनेनुसार आर्थिक वृद्धी सुरू झाल्यानंतर देशाची आर्थिक परिस्थिती पूर्वीपेक्षा अधिक कमकुवत होते व आर्थिक वृद्धी झाल्याने देश पूर्वीपेक्षा अधिक गरीब होतो. ज्यावेळी देशाची आर्थिक धोरणे निर्यात करणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन देणारे असते, आर्थिक वृद्धीची प्रक्रिया ही निर्यात केंद्री असते त्यावेळी अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होते. दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धी या संकल्पनेची पुढील गृहीतके आहेत.

१) आंतरराष्ट्रीय व्यापारात दोन देश अ व ब समाविष्ट आहेत.

२) अ देशात आर्थिक वृद्धी सुरू झालेली आहे; तर ब देशात आर्थिक वृद्धीची प्रक्रिया सुरू झालेली नाही.


३) दोन वस्तू क्ष व य यांचा व्यापार करण्यात येतो. त्यापैकी क्ष निर्यात करण्यात येणारी; तर य ही आयात करण्यात येणारी वस्तू आहे.

४) देशात पूर्ण रोजगाराची स्थिती आहे. तांत्रिक प्रगती तटस्थ मानण्यात आलेली आहे.

५) विपुल श्रमपुरवठा हे आर्थिक वृद्धीचे मुख्य कारण आहे. उत्पादन घटक दोन्ही देशांत गतिशील आहेत.

आकृतीत $AA_1$, हा मूळ उत्पादन शक्यता वक्र आहे. आणि $T_1$, ही व्यापारशर्ती दर्शविणारी रेषा आहे. B बिंदू उत्पादनाचा समतोल दर्शवितो. तर $C_1$, हा बिंदू उपभोगाचा समतोल दर्शवितो. या ठिकाणी व्यापारशर्ती दर्शविणारी $T_1$, रेषा ही समाज समवृत्ती वक्राला $I_1$ स्पर्श करते. अ देश BP एवढी 'अ' वस्तूची $I_2$ निर्यात करतो व $C_1P$ एवढी 'य' वस्तूची आयात करतो. आर्थिक वृद्धी घडून आल्याने आणि श्रमाचा पुरवठा वाढल्याने उत्पादन शक्यता वक्र उजवीकडे सरकतो तो $AA_2$, असा होतो. परिणामी, श्रम प्रधान वस्तू क्ष ची किंमत 'य' वस्तूच्या किमतीच्या तुलनेने घसरते वा कमी होते. परिणामी, व्यापारशर्ती दर्शविणारी रेषा $T_2$ हिचा उतार कमी होतो. नवीन उत्पादन शक्यता वक्रापाशी उत्पादन $B_1$, या बिंदूपाशी निश्चित होते; तर उपभोग $C_2$ या बिंदूपाशी निश्चित होतो. या ठिकाणी व्यापारशर्ती रेषा $T_2$, $I_1$, या समवृत्ती वक्राला स्पर्श करते. अशा प्रकारे आर्थिक वृद्धी घडून आल्यावर $B_1$ $P_1$ एवढी 'क्ष' वस्तूची निर्यात होते व $C_2$ $P_1$ एवढ्या 'य' वस्तूची आयात होते.

†संचालक. मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
आजीव सभासद क्र.: १४०९ , भ्रमणध्वनी : ९४०३७७४५२५ , ई-मेल : umeshrajderkar28@gmail.com




आयात वस्तूच्या उत्पादनात आर्थिक वृद्धीमुळे वाढ झालेली आहे. परंतु त्याचबरोबर या आयात वस्तूच्या उपभोगात घट झालेली आहे. कारण वस्तूची किंमत वाढली आहे. उत्पादनात वाढ झालेली असली तरी देशाला व्यापारशर्ती प्रतिकूल बनल्या व त्यामुळे उपभोगाचा बिंदू वरच्या समवृत्ती वक्रावरून खालच्या समवृत्ती वक्राकडे आला. परिणामी, ग्राहकांचे समाधान कमी झाले. त्यांच्या कल्याणात घट झाली. आर्थिक वृद्धी होऊनही कल्याणात घट घडवून आणणारी दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धी अ या देशात अनुभवास आली.

दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धीच्या बाबतीत दोन शक्यता आहेत.

१) अ देशाची निर्यात स्थिर व्यापारशर्तीच्या परिस्थितीत एकदम वाढणे.

२) एखादा देश एवढा मोठा, प्रचंड आकारमानाच्या, आर्थिक क्रियांच्या बाबतीत मोठा असणे की अशा देशाने निर्यातीत वाढ घडवून आणण्याचा प्रयत्न हा व्यापारशर्ती प्रतिकूल बनवतो.

दारिद्र्यकारी आर्थिकवृद्धी ही अपवादात्मक स्थिती मानली तरी अशी स्थिती आपल्याला अनुभवास येत आहे का याचा विचार करणे आवश्यक आहे.

भारताच्या संदर्भात दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धी अनुभवास येत आहे का याचा विचार करू?

१) भारताचा जागतिक व्यापारातील निर्यातीचा वाटा १.६८% इतका आहे. तर आयातीचा वाटा २.४८% इतका आहे. एवढा अल्प वाटा असताना देशाची आर्थिक वृद्धी निर्यातकेंद्री आहे असे मानणे व त्यामुळे दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धी अनुभवास येत आहे, असे म्हणणे चुकीचे ठरेल. वास्तविक पाहता दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धीच्या संकल्पनेचा मतितार्थ भिन्न आहे. ही संकल्पना आपल्याला याहून बरेच काही मार्गदर्शन करते. जागतिक व्यापारात जर आपण केवळ परकीय चलन मिळवून देणाऱ्या उद्योगांच्या विकासावर लक्ष केंद्रित केले तर उत्पादन वाढ होऊनही किंमत घटल्याने अशा प्रकारच्या दारिद्र्यकारी आर्थिक

वृद्धीचा प्रत्यय आपणास येऊ शकतो. भारताची विविध उत्पादनाची निर्यात पुढील प्रमाणे आहे. शेती १२.८%, यंत्रनिर्मित उत्पादने ७०.५%, इंधन व खाण उत्पादन १३.८% व अन्य२.५% तर आयातीचा विचार केला तर शेती उत्पादने ८.३ %, इंधन व खाण उत्पादने ३०%, यंत्रलक्षणे वस्तू ५१.७% व अन्य १०.२%.

म्हणजेच भारतातील आयात व निर्यात होणाऱ्या वस्तूंमध्ये क्षेत्रनिहाय वैविध्य आहे. त्यामुळे भारताला निर्यातकेंद्री धोरण राबविल्याने दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धी अनुभवास येण्याची शक्यता नाही.

२) भारताने आर्थिक वृद्धी निर्यातकेंद्री क्षेत्रांवर अवलंबून न ठेवता शेती, कुटीर व मध्यम उद्योगांच्या तसेच पायाभूत उद्योगांच्या विकासाकडे प्रारंभापासून लक्ष दिलेले आहे. परंतु निर्यातीच्या संदर्भात ज्या वस्तू उत्पादनाच्या क्षेत्रातून आपली जास्त निर्यात होते त्या क्षेत्राचा विकास निर्यातमुळे व्हावा, अशी अपेक्षा करणे गैर ठरणार नाही. तसे प्रत्यक्षात झाले आहे का हे पाहणे आवश्यक आहे. प्रथम आपण प्राथमिक क्षेत्राचा विचार करू.

भारताच्या निर्यात व्यापारात अन्नधान्य, खनिजे, यंत्रसामग्री, मसाले, खते, खाद्य तेल, वाहतुकीची साधने, यंत्रे व यंत्राचे सुटेभाग आदि वस्तूंचा समावेश होतो. प्राथमिक क्षेत्रात निर्माण होणाऱ्या वस्तुंचा एकूण निर्यात व्यापारात मोठा वाटा आहे. त्यातील एकूण रोजगार व उत्पन्न वृद्धी मोठी असणे आवश्यक आहे. उदा. १९६१ मध्ये ५९६ द. ल. डॉलर एवढी निर्यात शेती व संबंधित उत्पादनांची करण्यात आली. सन १९९०-९१ मध्ये ६०९२.७६ कोटी रुपयांची, सन २०००-२००१ मध्ये त्यात २८९०९.३० कोटी रुपये इतकी वाढ झाली.

प्राथमिक क्षेत्रातील निर्यात वाढल्याने या क्षेत्रातील रोजगार मात्र फारसा वाढला नाही. १९६१ मध्ये ७२.३ टक्के लोक प्राथमिक क्षेत्रात काम करत होते. २०१७ मध्ये हे प्रमाण ४२.७४ इतके कमी झाले. म्हणजेच शेती क्षेत्रातील उत्पादन वाढीचा व शेती उत्पादनांच्या निर्यात वाढीचा लाभ त्या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना झाला नाही. उलट त्यांचा रोजगार गेला, प्राथमिक क्षेत्रातील रोजगार कमी होणे, हे अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचे लक्षण मानले जाते. परंतु भारतासारख्या विशाल शेतीप्रधान देशात शेती क्षेत्रातील रोजगार कमी होणे हे अत्यंत धोकादायक व ग्रामीण भागातील दारिद्र्याची समस्या गंभीर करणारी बाब आहे.

**द्वितीय क्षेत्र** - द्वितीय क्षेत्राच्या विकासासाठी सरकारने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून नियोजनबद्धरीतीने प्रयत्न केले. लघु, कुटीर, मध्यम तसेच पायाभूत उद्योगांची उभारणी करण्यात आली. उद्योगांकडून करण्यात येणाऱ्या निर्यातीचे प्रमाण देखील मोठे आहे. द्वितीय क्षेत्राचा भारताच्या निर्यात व्यापारात उद्योग क्षेत्राचा वाटा २३ % इतका आहे. या निर्यात योगदानाचा रोजगार निर्मितीवर फारसा परिणाम झालेला नाही. सन २००७ मध्ये २०.६२ टक्के श्रमिक उद्योग क्षेत्रात कार्यरत होते. २०१७ मध्ये त्यात २३.५९ % इतकी वाढ झाली. परंतु भारतातील उद्योग क्षेत्रात उत्पादनाच्या मानाने व निर्मितीच्या मानाने रोजगारातील वाढ सौम्य राहिलेली आहे. किंबहुना निर्यात वाढ आणि रोजगार निर्मिती यातील संबंध नकारात्मक होत असल्याचे आढळून येत आहे. भारतातील उद्योग क्षेत्रातून निर्यात होणाऱ्या उत्पादनात भांडवलप्रधान उत्पादनांचा मोठ्या प्रमाणावर समावेश करण्यात आलेला आहे. जसे रसायने, यंत्रनिर्मित वस्तू इत्यादी. यामुळे जरी निर्यात वाढली तरी त्याचा रोजगार निर्मितीवर सकारात्मक परिणाम होत नाही व त्यामुळे निर्यात प्रधान उद्योगात काम करणाऱ्या श्रमिकांना निर्यात वाढीचा उत्पन्न व अन्य सुविधांच्या संदर्भात लाभ होत नाही. आंतरराष्ट्रीय व्यापारात सन २०१२ ते २०१७ या काळात ५५.८% पासून ४१.१% पर्यंत घट घडून

आलेली आहे. उद्योग क्षेत्रात याचा परिणाम घडून आलेला आहे.

**३) सेवा क्षेत्र -** भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाटा सेवा क्षेत्रामुळे वाढला. सन २००१ मध्ये सेवा क्षेत्राचा वाटा ३.४% इतका होता जो औद्योगिक क्षेत्राच्या तुलनेने दुप्पट होता; सन २०१७ मध्ये त्यात ५८.२ % इतकी वाढ झाली.

सन २००१ व २००४-०५ या काळात सेवा क्षेत्रातील रोजगार २२% नी वाढला; पण याच काळात सेवा क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पनातील वाटा ४४% इतका होता. म्हणजे उत्पन्नातील वाटा वाढूनही श्रमिकांना लाभ झालेला नाही. २००९-१० मध्ये २५% श्रमिकांना सेवा क्षेत्रात रोजगार मिळाला ज्यावेळी सेवाक्षेत्राचे राष्ट्रीय उत्पन्नातील योगदान ५५% इतके होते.

म्हणजेच देशाच्या निर्यातीत जास्त प्रमाण असणाऱ्या उद्योगातील श्रमिकांना वाढत्या निर्यातीचा लाभ होत नाही.

**व्यापारशर्ती -** देशाच्या व्यापारशर्तीतील सुधारणा ही व्यापारापासून देशाला होणारा लाभ दर्शविते. भारताच्या व्यापारशर्ती या प्रतिकूल राहिलेल्या आहेत. सन २०१७ मध्ये व्यापारशर्ती निर्देशांक ७१.१०% इतका होता, तो सन २०१८ मध्ये ७८.६९% इतका वाढला. सन २००० मध्ये तो १००% इतका वाढला तर २०१५ मध्ये ५७.९०% इतका कमी झाला. व्यापारशर्तीतील सुधारणा ही देशातील उद्योगांच्या त्यातल्या त्यात निर्यातक्षम उद्योगांच्या वाढीसाठी फार आवश्यक असते. कच्च्या मालाची निर्यात व पक्क्या मालाची आयात, पेट्रोलियम पदार्थाची वाढती आयात, निर्यात क्षमता असणाऱ्या उद्योग व उत्पादनांची पुरेसे संशोधन न होणे इत्यादी कारणांमुळे व्यापारशर्ती प्रतिकूल बनतात व व्यापारातील तूट वाढते. सन २०१८-१९ मध्ये भारताची व्यापारतूट १७६ बिलियन डॉलर्स इतकी १५.३% वाढण्याची शक्यता आहे. एप्रिल २०१९ मध्ये भारताची निर्यात ०.६% वाढली. मात्र आयात मात्र ४.५% वाढली.

यावरून असे स्पष्ट होते की,

१) दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धीची संकल्पना जरी केवळ निर्यातकेंद्री उद्योगांशी निगडित असली तरी एकूणच आर्थिक विकास धोरणात उद्योगांना समान प्राधान्य द्यावे, औद्योगिक विकास समतोल पद्धतीने साध्य करावा, असे ती स्पष्ट करते. निर्यातकेंद्री उद्योगांवर लक्ष केंद्रीत करून परकीय व्यापारावर आर्थिक विकास अवलंबून ठेवला तर त्यामुळे दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धी अनुभवास येते.

२) प्रत्येक देश सहजपणे परकीय चलन प्राप्त करून देणाऱ्या उद्योगांच्या विकासास प्राधान्य देतो. त्याकरिता अशा उद्योगांना देशात विकासासाठी पोषक वातावरण, कर सवलत, अनुदाने आदि सवलती देण्यात येतात. भारतात देखील 'विशेष आर्थिक क्षेत्र' (SEZ) विकसित करण्यात आले. परंतु असे करताना परकीय व्यापारास त्या उद्योगांची निर्यात वस्तू किंवा सेवा यांचे स्थान कितपत महत्त्व टिकवून ठेवेल, याचा विचार करणे अत्यावश्यक आहे. दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धीची संकल्पना हे स्पष्ट करते की, बदलत्या व्यापारी व आर्थिक जीवनात स्पर्धेच्या व नवोन्मेषाच्या युगात निर्यात प्रधान उद्योगांचे महत्त्व नेमके किती राहील, याचा विचार करणे आवश्यक आहे. भारतात आज विशेष आर्थिक क्षेत्रातील अनेक उद्योग बंद पडले आहेत. त्यावरील पायाभूत सोयी पुरविण्याकरिता सरकारने केलेली गुंतवणूक वाया गेलेली आहे.

३) भारताच्या संदर्भात दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धीचा अनुभव येत आहे. शेती क्षेत्रातील उत्पादनाच्या निर्यातीत वाढ होत आहे. परंतु त्याचा लाभ शेतात गुंतलेल्या शेतकऱ्यांना, शेतमजुरांना, भूधारकांना होत नाही. शेती, आर्थिकदृष्ट्या किफायतशीर नसल्याने व अंतर्गत बाजारात वाढत्या उत्पादनामुळे शेतमालाचे

भाव पडतात. परिणामी शेतमाल उत्पादनाचा खर्च भरून निघत नाही. वाहतूक खर्च देखील भरून निघत नाही. परिणामी शेतमाल फेकून द्यावा लागतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही गंभीर समस्या बनली आहे.

२) भारतातील उद्योगक्षेत्राने निर्यातीत केवळ भांडवल प्रधान वस्तूंच्या निर्यातीस प्राधान्य दिल्याने उद्योगात काम करणाऱ्या श्रमिकांना लाभ होत नाही. त्याकरिता कुटीर, लघु उद्योगातील उत्पादनांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

३) भारताने सेवाक्षेत्राला निर्यातक्षम उद्योग म्हणून मोठे प्राधान्य दिले आहे. सेवाक्षेत्राचा एकूण निर्यातीत मोठा वाटा आहे. पण निर्यातकेंद्री सेवाक्षेत्राच्या विकासामुळे, अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे रोजगार निर्मितीवर विपरित परिणाम झाला आहे. सेवाक्षेत्राचे वाढते योगदान रोजगाराचे प्रमाण वाढवू शकलेले नाही. या ठिकाणी दारिद्र्यकारी आर्थिक वृद्धीचा प्रत्यय आलेला आहे.

४) भारताच्या प्रतिकूल व्यापारशर्ती ही केवळ भारताचीच नव्हे तर सर्व विकसनशील देशांची मोठी समस्या आहे. विकासासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू व सेवांची आयात करावी लागणे आणि हे प्राप्त करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या निर्मितीसाठी कच्चा माल व प्राथमिक वस्तूंची निर्यात करणे या दुष्टचक्रात विकसनशील अर्थव्यवस्था सापडल्या आहेत. जागतिकीकरणामुळे ही समस्या अधिकच गंभीर बनली आहे. विकसित राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांच्या धोरणावर लक्ष ठेवून असतात मात्र जेव्हा स्वतःचे आर्थिक हित धोक्यात येते तेव्हा एकमेकांच्या वस्तूंवर जकाती लावण्यास कमी करत नाही. या सर्व रचनेत विकसनशील राष्ट्रांवर मोठा दबाव पडत आहे.

**संदर्भ**


१) Mishra S. K., Puri V. K.(1999), Indian Economy, Mumbai, Himalayan Publishing House.

२) www.india terms of trade data


◆


**निवेदन : अर्थसंवाद वर्गणी**

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ ग्रंथालये यांच्यासाठी त्रैवार्षिक वर्गणी रु. १०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. १५००/- आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 094720110000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.

**डॉ. राहुल शं. म्होपरे**

विद्यापीठ क्वार्टर्स नं. डी-३४, सायबर समोर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर. पिन : ४१६ ००४. भ्रमणध्वनी : ०९९२३८७९०२०

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# भारतातील आरोग्यावरील खर्चाचे विश्लेषण

**रामदास यशवंतराव माहोरे** †

**प्रस्तावना**

आरोग्याच्या अर्थशास्त्रात आरोग्यावरील खर्च हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. आरोग्याच्या खर्चाची आरोग्य संवर्धनात भूमिका अभ्यासण्यासाठी प्रस्तुत विषयाची मांडणी केली आहे.१९९०च्या मानव विकास अहवालात मानव विकास निर्देशांकाचे मापन करताना शिक्षण, आरोग्य आणि दरडोई उत्पन्न या तीन निर्देशांकाचा विचार करण्यात आला होता. आरोग्य आणि आर्थिक विकास यामध्ये संबंध आढळून येतो. मानवी जीवनाची गुणवत्ता आरोग्याच्या स्थितीवर अवलंबून असते. जगातील विविध राष्ट्रांत, भारतातील विविध राज्यांत आणि एकाच राज्यातील विभिन्न जिल्ह्यात आरोग्याच्या दर्जात बरीच विषमता आढळून येते. आरोग्याला मानवी भांडवल मानले जाते. आरोग्य अहस्तांतरणीय आहे. पैशाद्वारे आरोग्याचा विनिमय करता येत नाही. श्रीमंतांचे आरोग्य चांगले नसेल तर त्याची गरिबांकडून खरेदी करता येत नाही.

रोगाचा अभाव म्हणजे चांगले आरोग्य होय. रोग निवारणासाठी जास्त प्रमाणात खर्च करावा लागतो. आरोग्य अधिक मौल्यवान असून त्याच्या संवर्धनाची उपचार पद्धती गरिबांसाठी आव्हानात्मक ठरत आहे. भारतीय वैद्यकीय संघटनेच्या अहवालानुसार, क्षय रोगामुळे देशासाठी होणारा वार्षिक अप्रत्यक्ष खर्च ३०० कोटी रुपये; तर प्रत्यक्ष खर्च ३० कोटी रुपये आहे. या रोगामुळे दरवर्षी १० कोटी श्रम दिवसांची हानी होते.

आरोग्याची मागणी आणि पुरवठा यामध्ये बरीच विसंगती आढळते. आरोग्याची मागणी रुग्णांद्वारे केली जाते. आरोग्याच्या सेवांचा पुरवठा डॉक्टर, परिचारिका, दंतवैद्यकीय आणि इतर कर्मचाऱ्यांद्वारे केला जातो. मागणी व पुरवठा करणाऱ्यांच्या उद्दिष्टात भिन्नता आढळते. कार्यक्षमता व समता यांच्या संदर्भात विचार करता सार्वजनिक खर्चाला कोणताही पर्याय आढळत नाही.

गरीबांना आरोग्य खर्चासाठी प्रसंगी पशुधन किंवा शेतीची विक्री करावी लागते. त्यामुळे भूमीहिनांचा वर्ग निर्माण होतो. त्यांच्या भविष्यकालीन उत्पन्नाची शाश्वती राहत नाही. आरोग्य सेवांसाठी रुग्णांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च करावा लागतो. अप्रत्यक्ष खर्चात वैकल्पिक खर्चाचा समावेश होतो. रुग्ण जेवढे दिवस रुग्णालयात भरती असतो तितके दिवस त्याला मजुरी मिळत नाही. हा त्यांच्या उपचारावरील अप्रत्यक्ष खर्च होय. रुग्णांची काळजी जर कुटुंबातील व्यक्ती घेत

† माजी प्राध्यापक व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागप्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
आजीव सभासद क्र.: ३२०, भ्रमणध्वनी : ९८२२७०६१९१, ई-मेल : drrymahore@yahoo.com

असतील तर प्रत्येक दिवसाचे प्रचलित वेतन दरानुसार असणारे वेतन याप्रमाणे एकूण दिवसांची होणारी मजुरी आरोग्य खर्चात विचारात घेतली पाहिजे. कारण रुग्णांची सेवा करणाऱ्याला तितके दिवस बाहेर काम करता येत नाही. काही रुग्णालयात उच्च तंत्रज्ञानावर आधारित अद्यावत उपकरणे व यंत्रसामग्रीवर खर्च केला जातो. त्यामुळे आरोग्य निगेचा खर्च वाढतो.

भारतात राबविण्यात येणाऱ्या सार्वजनिक आरोग्य कार्यक्रमांवरील खर्च व आरोग्य सेवेसाठी केलेली गुंतवणूक हे घटक राष्ट्राच्या विकासाला प्रेरणा देणारे आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अभ्यासानुसार, २००६ ते २०१५ या कालखंडात आकस्मिक मृत्यू आणि असंसर्गजन्य रोगामुळे वाढलेल्या मृत्यूदरामुळे भारताला स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाची २३७ अब्ज डॉलरची हानी झाली. यावरून हे लक्षात येते की, आरोग्य सेवांवरील खर्च इतर प्रकारच्या गुंतवणुकीपेक्षा अधिक परिणामकारक गुंतवणूक आहे. भारतात दरवर्षी ३०.०७ लाख लोक आरोग्य सेवांवरील वाढत्या खर्चामुळे दारिद्र्यरेषेखाली ढकलले जातात. गरीबांसाठी त्यांचे आरोग्य ही एक उत्पादक मालमत्ता असते. गरीब व्यक्ती आजारी पडल्यास त्याच्या उत्पन्नाची हानी होते. आरोग्यसेवा वरील अतिरिक्त खर्चाचा भार वाढल्यामुळे तो कर्जबाजारी होतो.

सार्वजनिक आरोग्यावरील खर्चाची सार्वत्रिक बांधिलकी असली तरी सरकारला काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. वैयक्तिक आरोग्यसेवा, आपत्कालीन सेवा आणि लोकसंख्येवर आधारित सार्वजनिक आरोग्य यावरील वित्तीय तरतूद अपुरी असल्यामुळे यावरील खर्चाची वाटणी करताना मोठी समस्या निर्माण होते. जागतिक आरोग्य खर्चाच्या संदर्भात विचार केला तर जागतिक आरोग्य खर्चापैकी भारताचा खर्च फक्त एक टक्का आहे. जागतिक लोकसंख्येच्या १७ टक्के लोकसंख्या भारतात वास्तव्य करते. लोकांच्या आरोग्यावर होणारा खर्च गेल्या तीन दशकांपासून स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ १ टक्केच्या आसपास आहे.

भारतातील आरोग्यावरील दरडोई सार्वजनिक खर्चाचा विचार करता प्रारंभी आरोग्यावरील दरडोई सार्वजनिक खर्च फारच कमी होता. नंतर त्यात वाढ झालेली दिसून येते. १९५०-५१ मध्ये तो फक्त ०.६१ रुपये होता. १९५५-५६ मध्ये १.३६ रुपये, तर २०१५-१६ मध्ये तो १११२ रुपये पर्यंत वाढला. (पाहा : तक्ता क्र. १)

**भारतातील राज्यनिहाय आरोग्यावरील दरडोई खर्च**

भारतातील विविध राज्यांत आरोग्यावरील दरडोई खर्चात बरीच विषमता आढळते. प्रमुख राज्यांचा विचार करता आरोग्यावरील दरडोई खर्च गोवा राज्यात सर्वात जास्त म्हणजे ३,६४३ रुपये होता. या राज्यात आरोग्यावरील खर्चाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १.३४ टक्के होते. प्रमुख राज्यांपैकी आरोग्यावरील सर्वात कमी खर्च बिहारमध्ये ४९१ रुपये होता. या राज्याचा स्थूल राज्य उत्पन्नाशी आरोग्यावरील खर्च १.३३ टक्के होता. आरोग्यावरील स्थूल दरडोई खर्च हिमाचल प्रदेशात २,६६७ रुपये; तर जम्मू आणि काश्मीरमध्ये २,३५९ रुपये होता.

ईशान्येकडील राज्याचा विचार करता या राज्यांमधील आरोग्यावरील दरडोई खर्च इतर राज्यांच्या तुलनेत सर्वात जास्त होता. ईशान्येकडील राज्यांपैकी आरोग्यावरील दरडोई खर्च मिझोराममध्ये सर्वात जास्त म्हणजे ५,८६२ रुपये होता. अरुणाचल प्रदेशात ५,१७७ रुपये, सिक्कीममध्ये ५,१२६ रुपये होता. ईशान्येकडील राज्याचा आरोग्यावरील दरडोई सरासरी खर्च २,८७८ रुपये होता. यापेक्षा मिझोराम, अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम मध्ये तो जास्त होता. ईशान्येकडील राज्यांच्या सरासरी दरडोई खर्चाच्या तुलनेत मणिपूर, मेघालय,

**तक्ता क्र.१**

**भारतातील आरोग्यावरील दरडोई सार्वजनिक खर्च**

| अनु. क्र | वर्ष | दरडोई खर्च रुपयात |
|---|---|---|
| १ | १९५०-५१ | ०.६१ |
| २ | १९५५-५६ | १.३६ |
| ३ | १९६०-६१ | २.४८ |
| ४ | १९६५-६६ | ३.४७ |
| ५ | १९७०-७१ | ६.२२ |
| ६ | १९७५-७६ | ११.१५ |
| ७ | १९८०-८१ | १९.३७ |
| ८ | १९८५-८६ | ३८.६३ |
| ९ | १९९०-९१ | ६४.८३ |
| १० | १९९५-९६ | ११२.२१ |
| ११ | २०००-०१ | १८४.५६ |
| १२ | २००४-०५ | २४२ |
| १३ | २००९-१० | ६२१ |
| १४ | २०१३-१४ | ९१३ |
| १५ | २०१५-१६ | १११२ |

स्त्रोत- National Health Profile, GOI 2009 to 2018

नागालँड आणि त्रिपुरा राज्यांचा आरोग्यावरील दरडोई खर्च कमी होता. ईशान्येकडील राज्यांमध्ये आरोग्यावरील खर्चाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण २.७६ टक्के होते. या तुलनेत मिझोराम, अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि मणिपूर मध्ये हे प्रमाण ईशान्यकडील राज्याच्या सरासरीपेक्षा जास्त होते; तर त्रिपुरा, मेघालय आणि सिक्कीम मध्ये हे प्रमाण कमी होते.

केंद्रशासित प्रदेशाचा विचार करता आरोग्यावरील सरासरी दरडोई खर्च ३,१३७ रुपये होता. या तुलनेत अंदमान आणि निकोबार मध्ये सर्वात जास्त म्हणजे ६,२०१ रुपये होता. लक्षद्वीपमध्ये तो ६,०१८ रुपये होता. पुडुचेरी मध्ये ३,३४० रुपये होता. केंद्रशासित प्रदेशाच्या सरासरी दरडोई खर्चाच्या तुलनेत चंदीगढ, दादरा व नगर हवेली आणि दीवदमणमध्ये आरोग्यावरील सरासरी दरडोई खर्च कमी होता. अंदमान निकोबार मध्ये या प्रदेशाच्या स्थूल उत्पन्नाशी तुलना करता आरोग्यावरील खर्चाचे प्रमाण ५.२३ टक्के होते.

२०१५-१६ मध्ये भारताचा आरोग्यावरील सार्वजनिक खर्च १११२ रुपये होता. स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी आरोग्यावरील खर्चाचे प्रमाण १.०२ टक्के होते. याचा अर्थ भारतात आरोग्यावरील मासिक सार्वजनिक खर्च ९३ रुपये; तर प्रतिदिन ३ रुपये होता.

राष्ट्रीय सरासरीशी तुलना करता गोवा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, दिल्ली, गुजरात, हरियाणा कर्नाटक, केरळ, पंजाब, तामिळनाडू, तेलंगणा, आसाम, छत्तीसगड, राजस्थान आणि उत्तराखंडमध्ये

दरडोई सार्वजनिक खर्च जास्त होता. ईशान्येकडील राज्ये आणि सर्व केंद्रशासित प्रदेशात आरोग्यावरील दरडोई सार्वजनिक खर्च राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त होता. उर्वरित राज्यांमध्ये तो कमी होता. प्रगत महाराष्ट्रात आरोग्यावरील दरडोई सार्वजनिक खर्च राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी होता. (पहा : तक्ता क्र. २)

**राज्याचा आरोग्यावरील एकूण सार्वजनिक खर्च**

काही राज्यांचा आरोग्यावर एकूण सार्वजनिक खर्च लोकसंख्येशी तुलना करता कमी आहे. केंद्रशासित प्रदेशातील सार्वजनिक आरोग्यावरील खर्च इतर राज्यांच्या तुलनेत जास्त आहे. उत्तर प्रदेशात आरोग्यावरील खर्च सर्वात जास्त असला तरी दरडोई खर्च कमी आहे. (पहा : तक्ता क्र.२)

**आरोग्य खर्चाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण**

भारतातील सार्वजनिक आरोग्य खर्चाचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण २०१५-१६ मध्ये १.०२ टक्के होते. यापेक्षा आंध्र प्रदेश, गुजरात, हरियाणा, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, पंजाब, तामिळनाडू, तेलंगणा आणि दिल्लीमध्ये ते कमी होते. इतर राज्य व केंद्रशासित प्रदेशात आरोग्यावरील खर्चाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त होते. (पहा : तक्ता क्र.२)

**ॲलोपॅथी डॉक्टरांचे प्रमाण**

१००० व्यक्तींसाठी एक डॉक्टर असे प्रमाण जागतिक आरोग्य संघटनेने ठरविले आहे. या प्रमाणाची पूर्तता अरुणाचल प्रदेश, गोवा, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम आणि सर्व केंद्रशासित प्रदेशात झालेली आहे. इतर राज्यात मात्र डॉक्टरांची कमतरता आहे. १००० व्यक्तींसाठी एक डॉक्टर निकषांची पूर्तता करणे काही राज्यांना कठीण आहे. या प्रमाणाची पूर्तता करण्यासाठी भारताला सहा वर्षे लागतील. एमबीबीएसच्या जागांचा राज्यनिहाय विचार करता बिहारला या निकषांची पूर्तता करण्यासाठी ५२ वर्षे; तर झारखंडला ८८ वर्षे लागतील. (पहा : तक्ता क्र.२)

**प्रति खाटे मागे लोकसंख्या**

जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषानुसार १०५० लोकसंख्येला रुग्णालयात एक खाट उपलब्ध असली पाहिजे. भारतात हे प्रमाण १८४४ आहे. या निकषाप्रमाणे अरुणाचल प्रदेश, गोवा, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, केरळ, मेघालय, मिझोराम, सिक्कीम, तामिळनाडू, त्रिपुरा, अंदमान व निकोबार, दादरा व नगर हवेली, दिल्ली, लक्षद्वीप आणि पुदुचेरी मध्ये खाटांची उपलब्धता आहे. इतर राज्य व केंद्रशासित प्रदेशात खाटांची कमतरता आहे. (पहा : तक्ता क्र.२)

**ग्रामीण भागातील एका वेळेचा दरडोई आंतर रुग्णालयीन खर्च**

रुग्ण दवाखान्यात भरती झाल्यानंतर ग्रामीण भागात जो एकूण एका वेळेचा खर्च होतो त्यात राज्यनिहाय बरीच तफावत आढळते. पुरुष आणि स्त्रिया यांच्यावर दरडोई खर्चात राज्यनिहाय बरीच तफावत आहे. हा खर्च दोन प्रकारचा असून यात औषधांवरील खर्च आणि औषधेतर खर्चाचा समावेश होतो.

ग्रामीण भागाचा विचार करता भारतातील दरडोई आंतररुग्णालयीन खर्च १६,९५६ रुपये, पुरुषावरील दरडोई खर्च १९,७२७ रुपये; तर स्त्रियांवरील दरडोई खर्च १४,१३६ रुपये होता. राष्ट्रीय सरासरीशी तुलना करता ग्रामीण भागातील आंतररुग्णालयीन खर्च गोवा, गुजरात, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, मध्य प्रदेश, मणिपूर, राजस्थान, त्रिपुरा, उत्तराखंड आणि दादरा व नगर हवेली मध्ये दरडोई प्रतिआंतररुग्णालयीन खर्च जास्त होता. इतर राज्यात व केंद्रशासित प्रदेशात तो एकूण राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी होता. महाराष्ट्रातील दरडोई आरोग्यावरील प्रति रुग्णालयीन खर्च राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी होता.

पुरुषांवरील दरडोई प्रति आंतररुग्णालयीन खर्चाचा विचार करता राष्ट्रीय सरासरीपेक्षा गुजरात, हिमाचल

**तक्ता क्र. २**
**राज्यनिहाय आरोग्यावरील सार्वजनिक खर्च व आरोग्यसेवांची उपलब्धता**

| राज्य / केंद्र शासित प्रदेश | दरडोई सार्वजनिक खर्च (रु . मध्ये) | आरोग्यावरील एकूण सार्वजनिक खर्च (रु.कोटी मध्ये) | प्रक्षेपित लोकसंख्या २०१५-१६ (कोटी मध्ये) | आरोग्यावरील खर्चाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण | ॲलोपॅथी डॉक्टरांची संख्या | एका डॉक्टर मागे लोकसंख्या | प्रति खाटे मागे लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | १०१३ | ५०१३ | ४.९५ | ०.८२ | ५११४ | १०१८९ | ३८१९ |
| अरुणाचल प्रदेश | ५१७७ | ६७३ | ०.१३ | ३.२९ | ५४९ | २४१७ | ५५२ |
| आसाम | १५४६ | ४९९२ | ३.२३ | २.२१ | ६०६८ | ५३९५ | १९१४ |
| बिहार | ४९१ | ५०६७ | १०.३३ | १.३३ | ३५७६ | २८३९१ | ८६४५ |
| छत्तीसगढ | १३५४ | ३४८० | ५.२८ | १.३३ | १६२६ | १५९१६ | २६४७ |
| गोवा | ३६४३ | ७२९ | ०.२ | १.३४ | ५२१ | ३८८३ | ६७१ |
| गुजरात | ११८९ | ७४३२ | ६.२५ | ०.७२ | ५४७५ | ११४७५ | १९४६ |
| हरियाणा | ११९९ | ३०५५ | २.७३ | ०.६३ | २६१८ | १०१८९ | २४९६ |
| हिमाचल प्रदेश | २६६७ | १८९४ | ०.७१ | १.६८ | १५१७ | ४६३९ | ५७७ |
| जम्मू व काश्मीर | २३५९ | २९२५ | १.२४ | २.४६ | ४०५८ | ३०६० | १०६६ |
| झारखंड | ८६६ | २८९१ | ३.३४ | १.२५ | १७९३ | १८५१८ | ३०७९ |
| कर्नाटक | ११२४ | ६९८० | ६.२१ | ०.६९ | ५०४७ | १३५५६ | ९७९ |
| केरळ | १४६३ | ५२०७ | ३.५६ | ०.९३ | ५२३९ | ६८१० | ९३९ |
| मध्य प्रदेश | ७१६ | ५५३५ | ७.७३ | १.०४ | ४५९३ | १७१९२ | २६६१ |
| महाराष्ट्र | १०११ | १२०६६ | ११.९४ | ०.६ | ६९८१ | १६९९६ | २३०६ |
| मणिपूर | २०६१ | ५३६ | ०.२६ | २.७९ | १०९९ | २३५८ | १७५६ |
| मेघालय | २२२३ | ६२३ | ०.२८ | २.४ | ५८५ | ४७९१ | ६२९ |
| मिझोराम | ५८६२ | ६४५ | ०.११ | ४.२ | ४३७ | २४५८ | ५३८ |
| नागालँड | २४५० | ५८८ | ०.२४ | २.९७ | ४३७ | ५३८६ | १२५२ |
| ओडिशा | ९२७ | ३९२१ | ४.२३ | १.१९ | ३३५९ | १२७४४ | २३१२ |
| पंजाब | ११७३ | ३४०० | २.९ | ०.८७ | २९९२ | ९८१७ | १६३८ |
| राजस्थान | १३६० | ९८५८ | ७.२५ | १.४४ | ७२२७ | १०९१६ | २२९१ |
| सिक्कीम | ५१२६ | ३०८ | ०.०६ | १.८१ | २६८ | २४३७ | ४१९ |
| तामिळनाडू | १२३५ | ८५४३ | ६.९२ | ०.७४ | ७२३३ | ९५४४ | ८९९ |
| तेलंगणा | १३२२ | ४६२६ | ३.५ | ०.८२ | ४१२३ | ९३४३ | १८०३ |
| त्रिपुरा | २१८३ | ८२९ | ०.३८ | २.४१ | १२७३ | ३०३८ | ८७५ |
| उत्तर प्रदेश | ७३३ | १५८७२ | २१.६४ | १.४२ | १०७५४ | १९९६२ | २९०४ |
| उत्तराखंड | १७६५ | १८७१ | १.०६ | १.०६ | १३४४ | ७९११ | १२३३ |
| पश्चिम बंगाल | ७७८ | ७२३९ | ९.३१ |  | ८८२९ | १०४११ | ११७० |
| अंदमान व निकोबार | ६२०१ | ३१० | ०.०५ | ५.२३ | ७२ | ७६५३ | ५१३ |
| चंदीगड | २२२४ | ३७८ | ०.१७ | १.३२ | १४१ | १२६२४ | २२८८ |
| दादरा व नगर हवेली | २४५१ | ९८ | ०.०४ |  | ९८ | ४४५९ | ७४२ |
| दमण व दीव | २०७३ | ६२ | ०.०३ |  | ५९ | ५५९३ | १३२१ |
| दिल्ली | १९९२ | ४१८३ | २.१ | ०.७६ | ९१२१ | २२०३ | ८२४ |
| लक्षद्वीप | ६०१८ | ६० | ०.०१ |  | २९ | २६९९ | २६३ |
| पुडुचेरी | ३३४० | ५३४ | ०.१६ | २.१३ | ७०० | २३८४ | ३८७ |
| भारत | १११२ | १४० | ०५४ | ११४ | ९६९ | ११०८२ | १८४४ |

**स्रोत-**National Health Profile - 2018

प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, राजस्थान आणि उत्तराखंडमध्ये तो जास्त होता; इतर राज्यात दरडोई खर्च राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी होता.

महिलांवरील दरडोई प्रति आंतररुग्णालयीन खर्चाचा विचार करता राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त खर्च असणारी राज्ये म्हणजे छत्तीसगड, गोवा, गुजरात, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, मणिपूर, राजस्थान, त्रिपुरा, उत्तराखंड आणि दादरा नगर हवेली.(GOI, 2009 to 2018)

**शहरी भागातील एका वेळेचा आंतररुग्णालयीन दरडोई खर्च**

रुग्ण दवाखान्यात भरती झाल्यानंतर शहरी भागात जो एकूण आंतररुग्णालयीन दरडोई खर्च होतो त्यात राज्यनिहाय बरीच तफावत आढळते. पुरुष आणि स्त्रिया यांच्यावर होणाऱ्या आंतररुग्णालयीन दरडोई खर्चात सुद्धा राज्यनिहाय बरीच तफावत आढळून येते. शहरी भागाचा विचार करता भारतातील एका वेळेचा दरडोई आंतररुग्णालयीन खर्च २६,४५५ रुपये होता. ग्रामीण भागाच्या तुलनेत हा खर्च जास्त आहे. पुरुषावरील दरडोई आंतररुग्णालयीन सरासरी खर्च ३०,४५० रुपये होता. हा ग्रामीण भागातील खर्चापेक्षा जास्त आहे. भारतातील शहरी भागात स्त्रियांवरील एका वेळेचा आंतररुग्णालयीन दरडोई खर्च २२,५११ रुपये होता.

भारतातील शहरी भागातील एका वेळेच्या आंतररुग्णालयीन दरडोई खर्चाशी तुलना करता आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, गोवा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, मणिपूर, राजस्थान, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, अंदमान निकोबार आणि दादरा व नगर हवेली मध्ये एका वेळेचा आंतररुग्णालयीन दरडोई सरासरी खर्च जास्त होता. इतर राज्य व केंद्रशासित प्रदेशात तो एकूण राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी होता. महाराष्ट्रातील शहरी भागातील एका वेळेचा आंतररुग्णालयीन दरडोई खर्च राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी होता.

भारतात शहरी भागातील पुरुषांवरील एका वेळेच्या आंतररुग्णालयीन दरडोई खर्चाची तुलना करता राष्ट्रीय सरासरीपेक्षा आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, हिमाचल प्रदेश, गोवा, जम्मू आणि काश्मीर, महाराष्ट्र, राजस्थान, तेलंगणा, उत्तराखंड, पश्चिम बंगाल आणि दादरा व नगर हवेली मध्ये तो खर्च जास्त होता. इतर राज्य व केंद्रशासित प्रदेशात शहरी भागात पुरुषांवर एका वेळेचा आंतररुग्णालयीन दरडोई खर्च राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी होता. भारतातील शहरी भागातील महिलांवरील एका वेळेच्या आंतररुग्णालयीन दरडोई खर्चाची राष्ट्रीय सरासरीशी तुलनाकरता आसाम, गोवा, हिमाचल प्रदेश, मणिपूर, मिझोराम, पंजाब, राजस्थान, उत्तराखंड, पश्चिम बंगाल, आणि अंदमान व निकोबार मध्ये दरडोई खर्च जास्त होता. इतर राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशात महिलांवरील एका वेळेचा आंतररुग्णालयीन दरडोई खर्च राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी होता. वरील विवेचनावरून असे दिसून येते की, बऱ्याच राज्यांमध्ये शहरी भागात महिलांवरील एका वेळेचा आंतररुग्णालयीन दरडोई खर्च पुरुषांच्या तुलनेत कमी आहे.(GOI, 2009 to 2018)

**केंद्र सरकारचा आरोग्यावरील खर्च**

केंद्र सरकारच्या आरोग्य योजनेचे ३,२४,७८३ सभासद आहेत. यात केंद्र सरकारचे कर्मचारी, निवृत्तीवेतनधारक, आजी-माजी खासदार आणि स्वातंत्र्य सैनिक इत्यादींचा समावेश होतो. या योजनेचे सभासद शुल्क पगाराच्या श्रेणीनुसार ५० ते ५०० रुपये आहे. २०१०-११ मध्ये या योजनेवरील खर्च १,२९६ कोटी रुपये होता. तो २०१३-१४ पर्यंत १८३९ कोटी रुपयांपर्यंत वाढला. २०१४-१५ पर्यंत या खर्चात १७९९ कोटी रुपयापर्यंत घट झालेली दिसते. त्यानंतर २०१५-१६ आणि २०१६-१७ मध्ये हा खर्च वाढलेला आहे. तो अनुक्रमे १९७७ कोटी रुपये आणि २२३८

कोटी रुपये होता. २०१०-११ मध्ये या योजनेचे ३२ लाख लाभार्थी होते. २०१३-१४ मध्ये लाभार्थ्यांची संख्या ३७ लाख होती. २०१४-१५ मध्ये ती २८ लाखापर्यंत कमी झाली. २०१५-१६ आणि २०१६-१७ मध्ये लाभार्थ्यांची संख्या अनुक्रमे २९ लाख आणि ३१ लाख होती. या योजनेवरील दरडोई खर्च २०१०-११ मध्ये ४०५० रुपये होता. तो २०१६-१७ मध्ये ७२१९ रुपयांपर्यंत वाढला. या कालावधीत दरडोई खर्चात सतत वाढ झालेली दिसून येते.

**कर्मचारी राज्य विमा योजना**

कर्मचारी राज्य विमा योजनेअंतर्गत ज्या कर्मचाऱ्याने विमा काढला असेल त्याला व त्याच्या कुटुंबातील सदस्याला वैद्यकीय फायदे मिळतात. विमाधारकाला प्राथमिक, दुय्यम आणि गौण क्षेत्रातील उपचार पद्धतीचे फायदे मिळतात. वैद्यकीय निगेचे फायदे निवृत्त कर्मचारी तसेच स्थायी अपंगत्व असलेल्या विमाधारक व्यक्तींना वार्षिक १२० रुपयांचा हप्ता भरून प्राप्त होतात. कर्मचारी राज्य विमा योजना ही अंशदायी योजना आहे. १ मे २०१० रोजी ज्यांचा मासिक पगार पंधरा हजार रुपयांपर्यंत होता त्यांनाच या योजनेचा फायदा मिळतो. मणिपूर, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश आणि मिझोराममध्ये ही योजना अस्तित्वात नाही. दिल्ली आणि चंदीगढ मध्ये ही योजना लागू करण्यात आली. या योजनेमध्ये ३.१९ कोटी कुटुंबांनी विमा काढलेला आहे. यात २.९३ कोटी कर्मचारी समाविष्ट आहेत. या योजनेचा फायदा १२.४ कोटी लाभार्थ्यांना झाला आहे. २००९ मध्ये वैद्यकीय लाभावरील खर्च १२७२.९३ कोटी रुपये होता. २०१७ मध्ये हा खर्च ६२५६.५७ कोटीपर्यंत वाढलेला आहे. या खर्चात दरवर्षी वाढ झालेली दिसून येते. २००९ मध्ये लाभार्थ्यांची संख्या ५.०२ कोटी होती. ती २०१७ मध्ये १२.४ कोटीपर्यंत वाढली आहे. लाभार्थ्यांच्या संख्येत सतत वाढ झाली आहे. या योजनेवरील प्रति लाभार्थी खर्च २००९ मध्ये २५४ रुपये होता; तो २०१७ मध्ये ५०५ रुपयांपर्यंत वाढला. दरवर्षी दरडोई खर्च वाढलेला असून फक्त २०१७ मध्ये लाभार्थी वाढल्यामुळे कमी झाला आहे.

**राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना**

भारत सरकारच्या श्रम आणि रोजगार मंत्रालयाने ही योजना १ ऑक्टोबर २००७ रोजी सुरू केली. या योजनेचा उद्देश म्हणजे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना आरोग्य विम्याद्वारे आरोग्याच्या सोयी प्रदान करणे होता. गरीब कुटुंबांतील रुग्ण दवाखान्यात भरती झाला तर त्याचा खर्च आरोग्य विम्यातून केला जातो. भारतातील २९ राज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेशात ३,६३,३२,४७५ सक्रिय स्मार्ट कार्डे आहेत. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना ज्या रोगासाठी दवाखान्यात भरती करणे आवश्यक असते त्यासाठी त्यांना ३० हजार रुपयांपर्यंत मदत मिळते. विम्याच्या या मदतीसाठी वयाची कोणतीही मर्यादा नाही. एका कुटुंबातील पाच व्यक्तींना या योजनेचा फायदा मिळतो. यात पती, पत्नी आणि तीन आश्रितांचा समावेश होतो. या योजनेसाठी लाभार्थ्यांना फक्त ३० रुपये नोंदणी शुल्क भरावे लागते. विम्याचा हप्ता केंद्र व राज्य सरकारद्वारे भरला जातो. उपचारासाठी खासगी किंवा सार्वजनिक रुग्णालयाच्या निवडीचे स्वातंत्र्य लाभार्थ्यांना असते. राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना रोखरहित योजना असून लाभार्थ्यांना फक्त स्मार्ट कार्ड जवळ बाळगावे लागते. २००८-०९ मध्ये भारत सरकारने या योजनेवर १०३ कोटी रुपये खर्च केला होता. २०१२-१३ पर्यंत या योजनेवरील खर्च १००२ कोटी पर्यंत वाढत गेला. परंतु यानंतर मात्र या योजनेवरील खर्चात सतत घट झाली. २०१३-१४ मध्ये या योजनेवरील खर्च ८८८ कोटी रुपये होता. तो २०१४-१५ मध्ये ५५१ कोटी रुपयांपर्यंत कमी झाला. २०१५-१६ मध्ये तो ४९९

कोटी रुपये होता; तर २०१६-१७ मध्ये ४६७ कोटी रुपये पर्यंत कमी झाला.

**आयुष्यमान भारत योजना**

पंतप्रधान मोदी यांनी १५ ऑगस्ट २०१८ रोजी आयुष्यमान भारत योजना सुरू करण्याचे जाहीर केले होते. या योजनेचा ५० कोटी लाभार्थ्यांना फायदा होणार आहे. यात १०.७४ कोटी कुटुंबांना संरक्षण मिळेल. यामुळे राष्ट्रातील लोकांना आरोग्यविषयक संरक्षण प्राप्त होणार आहे. प्रति कुटुंब प्रतिवर्ष पाच लाख रुपये विमा कवच मिळणार असून लाभार्थ्यांना दुय्यम आणि गौण क्षेत्रात आरोग्याच्या सोयींचा लाभ घेता येतो. आयुष्यमान भारत योजने अंतर्गत १.५ लाख आरोग्य वेलनेस केंद्रांची स्थापना केली जाणार आहे. समाजातील गरीब लोकांना या योजनेचे फायदे मिळतील. या योजनेच्या अंमलबजावणीकरिता वार्षिक ११,००० कोटी रुपयाची आवश्यकता आहे. प्रत्येक कुटुंबाचा आरोग्य विमा काढण्याचा खर्च ११०० रुपये येणार आहे.

ही योजना 'मोदी केअर' या नावाने ओळखली जाते. विरोधकांनी या योजनेवर बरीच टीका केली होती. त्यांनी म्हटले होते की ही योजना कार्यान्वित करण्यासाठी निधीची कमतरता भासेल. या योजनेमुळे दहा लाख लोकांना आरोग्य विमा आणि विमा क्षेत्रात रोजगार मिळेल असे जाहीर करण्यात आले होते. विम्यावरील ६० टक्के खर्च केंद्र सरकार आणि ४० टक्के खर्च राज्य सरकारला करावा लागेल. आयुष्यमान भारत ही जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना आहे. या योजनेत १३०० प्रकारच्या रोगांवर उपचार केले जाणार आहेत. भारतात सार्वजनिक आरोग्याच्या अपुऱ्या सोयी आहेत. ही योजना योग्यरित्या राबविण्यात यावी म्हणून २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात २४ नवीन वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना केली जाईल, असे अर्थमंत्र्यांनी म्हटले होते. २०१५ मध्ये पंतप्रधान यांनी प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना जाहीर केली. या योजनेत अपघाती मृत्यूसाठी २ लाख रुपयांच्या जोखमीचा विमा काढला जाणार आहे. यासाठी वार्षिक ३३० रुपये विम्याचा हप्ता ठरविण्यात आला आहे. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अपघाती मृत्यूसाठी जाहीर करण्यात आली होती. या योजनेचा वार्षिक हप्ता १२ रुपये असून विम्याचे कवच दोन लाख रुपये आहे.

आयुष्यमान भारत योजनेमुळे स्वतःच्या खिशातून होणारा खर्च कमी होणार आहे. २०१६ मध्ये आरोग्यासाठी नवीन आरोग्य संरक्षण योजना सुरू करण्यात आली. यामध्ये एक लाख कुटुंबांचा अंतर्भाव होता. ज्येष्ठ नागरिकांना ३० हजार रुपयांचा अतिरिक्त फायदा जाहीर केला होता.२०१६-१७ मध्ये पंतप्रधानांच्या जनऔषधी योजनेअंतर्गत ३००० औषधांची दुकाने उघडण्यात आली.

**भारतातील आरोग्यावरील वित्तप्रबंधन**

सर्वांना आरोग्याच्या सोयी प्रदान करण्याच्या दृष्टीने आरोग्य वित्तप्रबंधनाचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. आरोग्य वित्तप्रबंधनात तीन बाबींचा विचार केला जातो. अ) आरोग्यावरील वित्तीय तरतुदीत वाढ करणे. (ब) कुटुंबाच्या वित्तविषयक अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने खाजगी खर्चात कपात करणे. (क) आरोग्यावरील निगेचा अशा रीतीने उपयोग करणे की ज्यामुळे कार्यक्षमता आणि समतेला चालना मिळू शकेल.

**आरोग्यावरील खर्चाच्या दृष्टीने खालील बाबी महत्त्वाच्या आहेत-**

१. २०१५-१६ मध्ये आरोग्यावरील एकूण सार्वजनिक खर्च १,४०,०५४ कोटी रुपये होता. यापैकी वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील खर्च ७८.०७ टक्के होता. कुटुंब कल्याणावरील खर्चाचे प्रमाण १२.०६ टक्के होते व इतर खर्च ८.७ टक्के होता.

२. २०१५-१६ मध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी

सार्वजनिक आरोग्यावरील खर्चाचे प्रमाण १.०२ टक्के होते. २००९-१० पासून या प्रमाणात महत्त्वपूर्ण बदल झाला नाही.

३. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेच्या ७१ व्या फेरी नुसार जानेवारी २०१३ ते जून २०१४ या काळात दवाखान्यात भरती असलेल्या प्रति रुग्णाचा सरासरी खर्च ग्रामीण भागात १४,९३५ रुपये; तर शहरी भागात २४,४३६ रुपये होता.

४. वरील कालखंडात आरोग्य सर्वेक्षणानुसार सरकारी दवाखान्यात जन्मलेल्या बालकांवरील दरडोई खर्च ग्रामीण भागात १,५८७ रुपये; तर शहरी भागात २,११७ रुपये होता.

५. २०१६-१७ मध्ये आरोग्य विम्याचा फायदा ४३ कोटी लोकांना मिळाला होता. एकूण लोकसंख्येशी हे प्रमाण ३४ टक्के होते. ज्यांना विम्याचा लाभ मिळाला त्यापैकी ७९ टक्के लोकांना सार्वजनिक विमा कंपन्यांची मदत झाली.

६. भारतातील आरोग्यावरील दरडोई खर्च इतर देशांच्या तुलनेत फार कमी आहे.

**सार्वजनिक आरोग्य खर्च तीन बाबींवर केला जातो**

अ) वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य

ब) कुटुंब कल्याण

क) इतर

**अ) वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य**

वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील खर्चात खालील बाबींचा समावेश होतो. २०१५-१६ मध्ये वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यावरील खर्च ९५८२८ कोटी रुपये करण्यात आला होता. या खर्चाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे दिसून येते.

१. शहरी आरोग्यसेवा (ॲलोपॅथी)- यामध्ये संचालन आणि प्रशासन, राज्य कर्मचारी विमा योजना, केंद्र सरकारच्या आरोग्य योजना, वैद्यकीय भांडारगृहे, विभागीय औषधी निर्माण, शालेय आरोग्य योजना, आणि इतर आरोग्य योजना वरील खर्च समाविष्ट होतो. यावरील खर्चांचे प्रमाण ३९ टक्के होते.

२. ग्रामीण आरोग्य सेवा (ॲलोपॅथी)- यात आरोग्य उपकेंद्रे, पूरक आरोग्य केंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने आणि इस्पितळे तसेच इतर आरोग्य खर्चाचा समावेश होतो. या खर्चांचे प्रमाण २५ टक्के होते.

३. शहरी आणि ग्रामीण आरोग्य सेवा (इतर प्रकारच्या) - यामध्ये ॲलोपॅथीव्यतिरिक्त आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, सिद्धा, योग आणि निसर्गोपचार इत्यादी वरील खर्चाचा समावेश होतो. यावरील खर्चाचे प्रमाण ७ टक्के (शहरी ५ टक्के व ग्रामीण २ टक्के) होते.

४. वैद्यकीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण- यात ¼ JIPMER½ तसेच लेडी हार्डिंग वैद्यकीय महाविद्यालयासारख्या संस्थेतील वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षण यावरील खर्चाचा समावेश होतो. यावरील खर्चाचे प्रमाण १२ टक्के होते.

५. सार्वजनिक आरोग्य - यामध्ये संचालन आणि प्रशासन, प्रशिक्षण, आरोग्यावरील प्रतिबंध आणि नियंत्रण, अन्नभेसळ प्रतिबंध, औषधी नियंत्रण, लसींची निर्मिती, सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, सार्वजनिक आरोग्य शिक्षण, सार्वजनिक आरोग्य प्रसिद्धी आणि इतर खर्चाचा समावेश होतो. यावरील खर्चांचे प्रमाण १३ टक्के होते

६. सामान्य खर्च- यामध्ये आरोग्य सांख्यिकी आणि मूल्यमापन, आंतरराष्ट्रीय सहकार्य व इतर खर्चाचा समावेश होतो. यावरील खर्चांचे प्रमाण ४ टक्के होते.

७. वसुलीची कपात - वसुलीपासून प्राप्त उत्पन्नाचे सर्व खर्चाच्या बाबतीत समायोजन केले जाते.

ब) कुटुंबकल्याण - कुटुंबकल्याण विभागाद्वारे विभिन्न खर्च केला जातो. यात माता आरोग्य, बालरोग, शिक्षण आणि संसूचन, आंतरराष्ट्रीय मदत गटाशी सहकार्य, ग्रामीण आरोग्यसेवा, ग्रामीण व शहरी कुटुंब कल्याण सेवा, वाहतूक, स्थानिक संस्थांना मदत व इतर प्रकारच्या खर्चांचा समावेश होतो.

क) इतर खर्च- यामध्ये केंद्र व राज्य सरकारद्वारे केल्या जाणाऱ्या इतर खर्चांचा समावेश होतो. केंद्र सरकारद्वारे संरक्षण मंत्रालय, श्रम आणि रोजगार मंत्रालय, रेल्वे, विज्ञान आणि तंत्रज्ञान, खाणी आणि पोष्ट विभाग यावरील आरोग्य खर्चाचा समावेश होतो. राज्य सरकारद्वारे केल्या जाणाऱ्या खर्चात वर दर्शविलेल्या केंद्र सरकारच्या विभागा व्यतिरिक्त उर्वरित विभागावरील खर्चाचा समावेश होतो.

वर दिलेल्या तीन प्रकाराव्यतिरिक्त आरोग्य खर्चांत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन तसेच राष्ट्रीय शहरी आरोग्यमिशन आणि आरोग्यासाठी लागणाऱ्या मनुष्यबळावरील खर्चाचा समावेश होतो.

**२०१५-१६ मध्ये कुटुंबकल्याणावरील राज्यांचा सार्वजनिक खर्च**

२०१५-१६ मध्ये कुटुंबकल्याण वरील राज्यांचा सार्वजनिक खर्च १६७१३.९ कोटी होता. या खर्चांत

१. संचालन आणि प्रशासन

२. प्रशिक्षण

३. संशोधन आणि मूल्यमापन

४. ग्रामीण कुटुंबकल्याण सेवा

५. शहरी कुटुंबकल्याण सेवा

६. माता व बालकांचे आरोग्य

७. स्थानिक संस्थांना मदत

८. इतर प्रकारच्या सेवा

९. अनुसूचित जातीजमातीसाठी आदिवासी क्षेत्र विशेष घटक योजना इत्यादींचा समावेश होतो.

आरोग्य खर्चामध्ये खाजगी खर्चांचे स्थान महत्त्वपूर्ण मानले जाते. अनेक वर्षांपासून स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी सार्वजनिक खर्चांचे प्रमाण स्थिर राहिले आहे. खासगी क्षेत्रावर जर आरोग्यसेवाबाबत सर्वसामान्य जनता अवलंबून असेल तर त्यांना पुरेशा प्रमाणात आरोग्य सोई उपलब्ध होऊ शकत नाहीत. याचा आरोग्याच्या निष्पत्तीवर प्रतिकूल परिणाम घडून येतो. आरोग्याच्या अपुऱ्या सुविधांमुळे श्रमिकांच्या उत्पादकतेत आणि सामाजिक कल्याणात घट होते. त्याचा भविष्यकालीन आर्थिक विकासावर विपरित परिणाम घडून येतो. आरोग्यावरील खर्चाच्या प्रमाणात आर्थिक सुधारणानंतरच्या काळात बदल झाला नाही. बाजाराच्या अपयशामुळे आरोग्यनिगेसाठी सरकारी हस्तक्षेपाची गरज आहे. रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्धतेसंबंधी पुरेशी माहिती नाही. कोणकोणत्या पर्यायी आरोग्यसेवा उपलब्ध आहेत याची रुग्णांना माहिती नसल्यामुळे ते आपल्या आरोग्याचा दर्जा टिकवून ठेवू शकत नाही.

**राष्ट्रनिहाय आरोग्यावरील दरडोई खर्चांत विषमता**

आरोग्यावरील दरडोई खर्च अमेरिकेत सर्वात जास्त आहे. संपूर्ण जगाचा विचार करता आरोग्याच्या खर्चात बरीच विषमता आहे. (पहा : तक्ता क्र.३) विकसित देशांमध्ये आरोग्यावरील खर्च जास्त आहे. अमेरिकेमध्ये आरोग्य खर्चाचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण १९६० मध्ये ५ टक्के होते. १९७० मध्ये ते ६.९ टक्क्यांपर्यंत वाढले.१९८७ मध्ये हे प्रमाण ८.९ टक्के होते.१९९० मध्ये १२.१ टक्के, २००० मध्ये १३.१ टक्के, २०१० मध्ये १७.४ टक्के आणि २०१९ मध्ये १७.८ टक्के होते. अमेरिकेतील आरोग्य खर्चाचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण सतत वाढले आहे. परंतु भारतात या प्रमाणात वाढ झाली नाही.

भारतातील आरोग्यावरील दरडोई सार्वजनिक खर्च व खाजगी खर्चाचा विचार करता अनेक राज्यांत बरीच विषमता दिसून येते. खाजगी खर्चाचे प्रमाण जास्त

**तक्ता क्र. ३**

**प्रमुख देशांचा आरोग्यावरील दरडोई सार्वजनिक खर्च २०१६**

| अनु. क्र | देश | आरोग्यावरील दरडोई सार्वजनिक खर्च (डॉलर मध्ये) | स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | बेल्जियम | ४१४९.३९ | १०.०४ |
| २ | ऑस्ट्रिया | ४६८८.२८ | १०.४४ |
| ३ | ऑस्ट्रेलिया | ५००२.३६ | ९.२५ |
| ४ | डेन्मार्क | ५५६५.५९ | १०.३५ |
| ५ | फ्रान्स | ४२६३.३६ | ११.५४ |
| ६ | जर्मनी | ४७१४.२६ | ११.१४ |
| ७ | जपान | ४२३३.०३ | १०.९३ |
| ८ | लुक्झेम्बर्ग | ६२७१.४४ | ६.१६ |
| ९ | नेदरलँड | ४७४२.०३ | १०.३६ |
| १० | नार्वे | ७४७७.९० | १०.५० |
| ११ | स्वित्झर्लंड | ९८३५.९६ | १२.२५ |
| १२ | स्वीडन | ५७१०.५९ | १०.९३ |
| १३ | कॅनडा | ४४५८.२१ | १०.५३ |
| १४ | अमेरिका | ९८६९.७८ | १७.०७ |
| १५ | इंग्लंड | ३९५८.०२ | ९.७६ |
| १६ | श्रीलंका | १५३.१० | ३.८९ |
| १७ | जगतिक सरासरी | १०२६.२४ | - |

स्रोत - KFF Analysis of OECD and National Health Expenditure Data for USA

असल्यामुळे या खर्चाचा भार गरीबांवर पडतो. भारतीय राज्यघटनेनुसार आरोग्याचा समावेश समवर्ती सूचीमध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य प्रदान करण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारांची आहे. साधारणपणे केंद्र सरकारद्वारे ३३ टक्के आणि राज्य सरकारद्वारे आरोग्यावर ६७ टक्के खर्च करण्यात येतो. आरोग्य सेवेत राज्यनिहाय ग्रामीण-शहरी विषमता आढळून येते. आरोग्यावरील सार्वजनिक खर्च आणि आरोग्य निष्पत्ती यामध्ये प्रत्यक्ष संबंध आढळून येत नाही. परंतु आरोग्यावरील खर्चामुळे सरासरी आयुर्मान वाढते आणि मृत्युदरात घट होते. आरोग्य सोयीमुळे सरासरी आयुर्मानात वाढ झाली आहे.

**पंचवार्षिक योजना काळातील खर्च**

पंचवार्षिक योजना काळात आरोग्यावरील खर्च वाढत गेला. १९५०-५१ मध्ये हा खर्च ६५.३ कोटी रुपये होता. तो बाराव्या पंचवार्षिक योजना काळात ३०००१८ कोटीपर्यंत वाढला आहे. आरोग्यावरील एकूण खर्चाचे प्रमाण वरील कालखंडात ३.३ टक्के वरून

**तक्ता क्र. ४**

**पंचवार्षिक काळातील आरोग्यावरील खर्च**

| अनु. क्र. | कालावधी | आरोग्यावरील खर्च (आकडे कोटी रु.) | एकूण खर्चांशी प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पहिली पंचवार्षिक योजना | ६५.३ | ३.३ |
| २ | दुसरी पंचवार्षिक योजना | १४५.८ | ३.१ |
| ३ | तिसरी पंचवार्षिक योजना | २५०.८ | २.९ |
| ४ | वार्षिक योजना (१९६६-६९) | २१०.६ | ३.२ |
| ५ | चौथी पंचवार्षिक योजना | ६१३.५ | ३.९ |
| ६ | पाचवी पंचवार्षिक योजना | १२५२.६ | ३.१ |
| ७ | वार्षिक योजना (१९७९-८०) | ३४१.६ | २.८ |
| ८ | सहावी पंचवार्षिक योजना | ३४१२.२ | ३.८ |
| ९ | सातवी पंचवार्षिक योजना | ६८०९.४ | ३.१ |
| १० | वार्षिक योजना (१९९०-९१) | १७४५.८ | २.९ |
| ११ | वार्षिक योजना (१९९१-९२) | १८९८.८ | २.९ |
| १२ | आठवी पंचवार्षिक योजना | १४१०२.२ | ३.२ |
| १३ | नववी पंचवार्षिक योजना | ३५२०४.९५ | ४.१ |
| १४ | दहावी पंचवार्षिक योजना | ५८९२०.३ | ४.० |
| १५ | अकरावी पंचवार्षिक योजना | १४०१३५.० | ६.५ |
| १६ | बारावी पंचवार्षिक योजना | ३०००१८.० | - |
| १७ | २०१७-१८ | ५०२००.१६ | - |
| १८ | २०१८-१९ | ५८३२६.३७ | - |

**टीप-** पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून १९९१-९२ पर्यंतचे आकडे प्रत्यक्ष खर्चांचे आहेत. उर्वरित आकडे तरतुदीचे आहेत.

६.५ टक्क्यांपर्यंत वाढले (पहा : तक्ता क्रमांक ४)

### वाढती लोकसंख्या आणि आरोग्यावरील खर्च

वाढत्या लोकसंख्येमुळे आरोग्य सेवेची मागणी वाढते. सध्या भारताची लोकसंख्या १३० कोटी असून लोकसंख्या वाढीचा दर १.६ टक्के आहे. २०३० मध्ये भारताची लोकसंख्या चीनपेक्षा जास्त राहील असे प्रक्षेपित करण्यात आले आहे. २०५० मध्ये लोकसंख्या १६० कोटी वाढण्याची शक्यता आहे. २०२५ पर्यंत ज्येष्ठ नागरिकांची संख्या १८.९ कोटी राहील म्हणजे २००४ च्या तुलनेत ती संख्या तिप्पट राहील. ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढल्यामुळे आरोग्यनिगा सेवेवरील भार वाढतो. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य खर्चांत वाढ करावी लागते.

### वैद्यकीय पर्यटन

वैद्यकीय पर्यटनामुळे भारताच्या आरोग्यनिगा क्षेत्राला चालना मिळाली आहे. भारतात औषधोपचारासाठी विदेशातून रुग्ण येतात. विदेशातील आरोग्य खर्चाच्या तुलनेत भारतातील आरोग्य खर्च

बराच कमी आहे. भारतातील खासगी दवाखान्यांमध्ये अद्ययावत सोयी आहेत. अमेरिकेच्या तुलनेत भारतातील शल्यचिकित्सेवरील खर्च फक्त१० टक्के आहे. हृदयरोग चिकित्सा, गुडघे प्रतिस्थापन, डोळ्यांच्या शस्त्रक्रिया, अस्थिव्यंग शस्त्रक्रिया इत्यादींसाठी विदेशातील काही रुग्ण भारतात येतात.

**दूर वैद्यकीय सेवा**

भारतात दूर वैद्यकीय सेवांचा विकास होत आहे. जास्तीत जास्त तज्ञ डॉक्टर शहरात राहतात. त्यामुळे लोकांना पुरेशा प्रमाणात आरोग्याच्या सोयी मिळत नाही. अनेक खाजगी दवाखान्यांनी दूर वैद्यकीय सेवा प्रदान करणे सुरू केले आहे. अनेक खाजगी रुग्णालय सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर विकसित झाले आहेत. यात नारायणा हृदयालय, अरविंद रुग्णालय, शंकरा नेत्रालय यांचा समावेश होतो.

**आरोग्यनिगेसाठी आधारभूत संरचनेचा विस्तार**

वैद्यकीय पर्यटन तसेच वाढत्या लोकसंख्येचा विचार करता आरोग्यनिगेच्या आधारभूत संरचनेवर मोठया प्रमाणात भांडवल गुंतवणूक करावी लागेल. जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषाच्या पूर्ततेसाठी खाटांच्या संख्येत पाचपट वाढ करावी लागेल. सरकारला जास्त प्रमाणात गुंतवणूक करणे शक्य होत नसल्यामुळे या क्षेत्रात खाजगी गुंतवणूकदारांना बऱ्याच संधी उपलब्ध आहेत.

विशेषतः रुग्णालयांचा विकास सार्वजनिक खाजगी भागीदारी पद्धतीने केला तर लोकांना उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा उपलब्ध होतील. ओक्हार्ट रुग्णालय समूहाने हार्वर्ड मेडिकल इंटरनॅशनल सोबत भागीदारी करून भारतात विशेषतः रुग्णालये स्थापन करण्याचा प्रयत्न केला आहे. जीवनशैलीच्या रोगांमध्ये होणारी वाढ आणि वैद्यकीय पर्यटन यामुळे गौण क्षेत्रात रुग्णालयांचा तीव्र गतीने विकास होऊ शकेल.

भारतात वैद्यकीय क्षेत्रात मनुष्यबळाची कमतरता आहे. त्यामुळे त्या प्रमाणात आरोग्यावर कमी खर्च होतो. मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा भार वाढतो. त्यामुळे रुग्णांना पुरेशा सोयी उपलब्ध होऊ शकत नाही. जागतिक आरोग्य संघटनेच्या २०११ च्या अहवालानुसार भारतातील आरोग्यनिगा खर्चात वाढ करणे गरजेचे आहे, असे नमूद करण्यात आले आहे. भारतात आरोग्यक्षेत्रात 'दुहेरी भाराची समस्या' निर्माण झाली आहे. एका बाजूने ग्रामीण जनतेला संसर्गजन्य रोगांचा सामना करावा लागतो; तर दुसऱ्या बाजूने वाढत्या शहरीकरणामुळे जीवनशैलीत बदल झाल्यामुळे वेगवेगळ्या आजारात वाढ झाली आहे.

डॉ. श्रीनाथ समितीने २०१७ पर्यंत आरोग्यावरील खर्चात दुपटीपेक्षा जास्त वाढ करण्याची शिफारस केली होती. परंतु स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले सार्वजनिक खर्चाचे प्रमाण वाढलेले नाही. भारतातील आरोग्यनिगा उद्योग ५४०८६ लाख कोटी रुपयांचा झाला आहे.

**लठ्ठपणामुळे आरोग्याच्या भांडवलाचा दर्जा खालावतो**

लठ्ठपणामुळे रक्तदाब वाढतो. हृदयरोग, मधुमेह तसेच कर्करोगाची भीती असते. अमेरिकेतील रोगनियंत्रण केंद्राच्या २०११ च्या अहवालानुसार पुढील बाबी स्पष्ट होतात. अमेरिकेतील ३३ टक्के प्रौढ व्यक्ती आणि १७ टक्के मुले यांचा समावेश लठ्ठ गटात करण्यात आला होता. अमेरिकेत १९८० ते २००८ या काळात प्रौढांच्या लठ्ठपणाचा दर दुप्पट झाला; तर मुलांच्या लठ्ठपणाच्या दरात तीनपट वाढ झाली.

**लठ्ठपणाचे आर्थिक विवेचन**

मानवी शरीराला ऊर्जेसाठी अन्नाची आवश्यकता असते. व्यक्तीने किती कॅलरीज उपभोगल्या यावरच व्यक्तीचे वजन अवलंबून असते. लठ्ठपणाच्या आर्थिक सिद्धांतानुसार वाढलेले वजन हे व्यक्तीच्या विवेकपूर्ण निवडीचा परिणाम असते. कमी शारीरिक हालचाल आणि अन्नाचा जास्त उपभोग यांमुळे लठ्ठपणा वाढतो.

अन्नाच्या प्रकारावरून कॅलरीजमध्ये फरक पडतो. शीघ्र तयार होणाऱ्या खाद्य पदार्थांमुळे वजनात जास्त वाढ होते तर आरोग्यदायी खाद्य पदार्थांमुळे कमी कॅलरीज प्राप्त होतात. आरोग्यावरील गुंतवणुकीच्यादृष्टीने लठ्ठपणावरील गुंतवणूक वाईट होय. अमेरिकेत २००६ मध्ये अशा व्यक्तींचा आरोग्यावरील दरडोई खर्च साधारण वजनाच्या व्यक्तींपेक्षा ४२ टक्के जास्त होता. लठ्ठपणामुळे एकंदर वैद्यकीय खर्चात वाढ होते. कावले (२००४) यांनी लठ्ठपणाचा वेतनावरील परिणाम अभ्यासला. लठ्ठपणामुळे उत्पादकता कमी होते. उपभोक्त्यांना शीघ्र उपभोगाच्या वस्तू अधिक प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे लठ्ठपणा वाढला. लोकांना लठ्ठपणाचा वास्तविक व्यय माहीत नसल्यामुळे जास्त प्रमाणात कॅलरीजचा वास्तविक व्यय वाढतो.

**चांगल्या आरोग्याचे फायदे**

१. आरोग्य चांगले असेल तर आनंदी जीवन जगता येते.
२. आजारपणाचे दिवस कमी असतील तर त्यामुळे जास्त वेळ काम करता येते.
३. आरोग्यसंपन्न व्यक्ती अधिक कार्यक्षम असतात त्यामुळे ते जास्त काम करून जास्त उत्पन्न मिळवितात.
४. त्यांच्या सरासरी आयुर्मानात वाढ होते आणि जास्त काळ जीवन जगता येते.

**शिफारशी**

- लोकांना आरोग्याच्या जास्तीत जास्त सोयी उपलब्ध करून देण्याच्यादृष्टीने आरोग्य विम्याची योग्य अंमलबजावणी केली पाहिजे.
- आरोग्यावरील सार्वजनिक खर्च राज्याच्या लोकसंख्येनुसार वाढविण्यात यावा.
- ग्रामीण व शहरी भागात डॉक्टरर्स, परिचारिका आणि तंत्रज्ञाच्या नेमणुका करण्यात याव्यात.
- आधारभूत संरचनेवरील गुंतवणुकीत वाढ करावी.
- आयुष उपचार पद्धतीवरील सार्वजनिक खर्चांत वाढ करावी.
- वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्यात यावीत.
- संसर्गजन्य रोगांचा समावेश आरोग्य धोरणात करावा.
- ग्रामीण आरोग्य अभियानात ३० वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्तींचा विचार केला जात नाही. तरुणांमध्ये हृदयरोग, मधुमेहसारख्या आजारांचे प्रमाण वाढत आहे.
- सामुदायिक आरोग्य केंद्रात विशेषतः डॉक्टरांची कमतरता आहे. त्यामुळे आरोग्य सेवा कोलमडली आहे. म्हणून डॉक्टरांची नेमणूक करण्यात यावी.
- गेल्या तीन दशकात सरकारी आरोग्य सेवेचे निष्क्रिय खासगीकरण झाले आहे. सरकारी आरोग्य सेवेवरील अर्थसंकल्पीय तरतूद वाढविण्यात यावी.
- राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेनुसार सामान्य जनतेचा ७० टक्केपेक्षा जास्त खर्च औषधे, तपासण्या आणि बाह्यरुग्ण सेवेवर होतो. पण आयुष्यमान योजनेत यांचा समावेश नाही. ९० टक्के आजारांवर उपचार देऊ शकणारी प्राथमिक आरोग्य व्यवस्था बळकट करण्यात यावी.

वरील शिफारशींची योग्य अंमलबजावणी झाली तर गरीबांना आरोग्याच्या चांगल्या सोयी उपलब्ध होऊ शकतील.

**संदर्भ-**


१. Cawley John (2004), “The Impact of Obesity on Wages”, Journal of Human Resourses, University of Wisconsin Press, pp. 451-474.
२. GOI. (2009 to 2018). *National Health Profile*. New Delhi: Government of India, Central Bureau of Health Intellignece, Directorate of Health Services, Ministry

of Health & Family Planning.

३. GOI (2012), "Twelfth Five Year Plan", Planning Commission, Government of India, New Delhi.

४. GOI (2015), "Economic Survey", Ministry of Finance, Government of India, New Delhi.

५. GOI (2019), "Healthy States Progressive India", NITI Aayog, the World Bank and Ministry of Health and Family Welfare, Government of India, New Delhi.

६. IMA (2012), "Investing our Future: The Global Fund to Fight AIDS, TB and Malaria", Indian Medical Association, New Delhi.

७. Musgrave Philip (2004), "Health Economics in Development", the World Bank, Washington D. C.

८. Philips Ceri J., (2005), "Health Economics: an Introduction for Health Professionals", Blackwell Publishing Ltd. Oxford, UK.

९. Ramados A. S. (2008), "Medical and Health Care Facility Plagued", http://drabhinandan.blogspot.com

१०. Reddy K. N. (1992), "Health Expenditure in India", working paper no. 14 NIPFA, New Delhi.

११. Sen A. S. and Basu R. N., (1968), "The Economics of Health, Health Division, Planning Commission, Government of India.

१२. The Hindu, (2011), "Investing in Health", New Delhi.

१३. TOI, (2019), "82% shortfall in specialists puts healthcare on sick bed", Times of India, Nagpur, July 1.

१४. TOI, (2019), "Why India has both a glut and acute shortage of doctors", Times of India, Nagpur, August, 8.

१५. World Health Organsation (2003), "World Health Report", World Health Organisation, Switzerland.

१६. http://indianhealthfoundation.org

१७. दैनिक लोकमत (२०१९), 'भारतात ६ लाख डॉक्टर व २० लाख नर्स यांची उणीव', दैनिक लोकमत, नागपूर, जून २८.

१८. दैनिक महाराष्ट्र टाइम्स, नागपूर, 'वाढत्या वजनामुळे गंभीर आजार' २४ ऑगस्ट २०१९.

१९. मोरे अभिजित (२०१९), 'सर्वांना आरोग्य सेवा कशी मिळेल', दैनिक महाराष्ट्र टाइम्स, नागपूर, जून २८.

◆

चलनवाढ ही नेहमीचीच आणि सार्वत्रिक आर्थिक घटना असते.

**- मिल्टन फ्रिडमन**

# महाराष्ट्रातील महिलांची सद्यस्थिती व आव्हाने

**सुभाष पाटील** †

**प्रास्ताविक**

महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर प्रगतीशील नियोजनकाळात अनेक आर्थिक, सामाजिक, राजकीय व तांत्रिक परिवर्तने झालीत. विशेषत: १९९१ नंतर या परिवर्तनांनी जास्तीचा वेग घेतला आणि त्याचा प्रभाव निरनिराळ्या सामाजिक संस्था, सामाजिक वर्ग व गटांचे परस्परसंबंध, राजकारण आणि सामाजिक मूल्यसरणी यांच्यावरही झालेला दिसतो. जसे हे परिवर्तन मानवी संसाधनात पुरुषांच्या बाबतीत आहे तसेच ते महिलांच्याही बाबतीत आहे. आज आर्थिक व सामाजिक विकास प्रक्रियेत पुरुषांच्या बरोबरीने महिलांचाही सहभाग वाढतो आहे. कुशल कामगार, तंत्रज्ञ, तज्ञ व्यवस्थापक, उत्तम प्रशासक व संघटक, यशस्वी व्यावसायिक, उद्योजकता यांबाबतीत महिलांचा ठसा उमटतो आहे. साधारणपणे १९७० पर्यंत महिलांचे स्थान 'चूल आणि मूल' इथपर्यंत मर्यादित होते. त्यामुळे महिलांच्या प्रश्नांना फारसे गांभीर्याने घेतले गेले नाही. मात्र १९७० मध्ये ईस्थर बोसरप या महिला अर्थशास्त्रज्ञाचा 'महिला आणि आर्थिक विकास' हा ग्रंथ प्रकाशित झाला आणि महिलांच्या श्रमाचा आर्थिक विकासासाठी कशा पद्धतीने उपयोग करून घेता येईल, प्रचलित विकास प्रक्रियेचे महिलांवर कोणते परिणाम होत आहेत या अनुषंगाने महिलांच्या प्रश्नाच्या अभ्यासाला चालना मिळू लागली. १९७० च्या दशकात बुखारेस्ट येथे संपन्न झालेल्या जागतिक लोकसंख्या परिषदेत महिलांच्या सक्षमीकरणाचा मुद्दा प्रभावीपणे पुढे आला. १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेची मेक्सिको येथे परिषद संपन्न झाली आणि त्यात १९७५ ते १९८५ हे महिलांचे दशक तसेच १९७५ हे 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' जाहीर करण्यात आले होते. तद्नंतरच्या काळात महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना भारतात आणि राज्यात सुरू झाल्या आहेत. सद्यस्थितीत महिलांबाबत सकारात्मक बदल होत असले तरी आजही प्रत्यक्षात मात्र मानवी जीवनाच्या आर्थिक व सामाजिक पातळीवरील प्रत्येक क्षेत्रात महिलांचे स्थान पुरुषांच्या तुलनेत दुय्यम का जाणवते याचा ऊहापोह होणे आवश्यक आहे. प्रस्तुत लेखातून महाराष्ट्रातील महिलांची सद्यस्थिती अभ्यासणे आणि प्रचलित काळातील आव्हानांचा आढावा घेणे, हे प्रमुख उद्देश आहेत. साधारणत: हा आढावा मानव संसाधन, ग्रामीण विकास आणि आरोग्यविषयक स्थिती या अंगांनी घेतला असून, तो पूर्णत: वर्णनात्मक आहे आणि

† प्राध्यापक व विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, कर्वे पथ, पुणे
आजीव सभासद क्र. : ११६० , भ्रमणध्वनी : ९८५०४३४५८९ , ई-मेल : subhash.patil09@rediffmail.com

त्यासाठी दुय्यम आधारसामग्रीचा जसे - लेख, संदर्भग्रंथ, अहवाल, विविध संकेतस्थळ यांचा संदर्भ घेतला आहे.

**मानव संसाधन आणि महिला**

मानव संसाधन ही राष्ट्रीय संपत्ती असून आर्थिक विकास आणि नियोजनाच्या प्रगतीबाबत मानव संसाधन विकासाचा सर्वांगीण अभ्यास महत्त्वपूर्ण आहे. कारण विकासाचा उद्देश मानवी जीवनमानाचा स्तर उंचावणे हा आहे. आर्थिक विकासाची परिणती मानव विकासात झाली पाहिजे, अशी अपेक्षा आज धरली जाते. मानव संसाधन विकास प्रोत्साहित करण्यात स्वातंत्र्य, आर्थिक सुविधा व संधी आणि सामाजिक सुरक्षितता महत्त्वाची मानली जाते. महाराष्ट्र शासनाने २००२ मध्ये राज्याचा पहिला मानव विकास अहवाल सादर केला. लिंगाधारित विकास निर्देशांक आणि महिला सक्षमीकरण मापक गणनेसाठी आवश्यक माहिती या अहवालात उपलब्ध आहे. मानव संसाधन बाबतीत महाराष्ट्र राज्य हे भारतातील एक प्रगत आणि अग्रगण्य राज्य मानले जाते. १९६१ ते २०११ या कालावधीत महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ३.९५ कोटी वरून ११.२३ कोटीपर्यंत वाढली. एकूण लोकसंख्या वाढत असताना मात्र पुरुषांच्या तुलनेने महिलांचे प्रमाण कमी होताना दिसते आहे. १९६१ मध्ये हे प्रमाण ४८.३५ टक्के एवढे होते ते २०११ मध्ये ४८.१७ टक्के एवढे झाले. याच कालावधीत ग्रामीण महाराष्ट्रात ते ५१.२१ टक्के वरून ४८.७९ टक्के पर्यंत; तर नागरी महाराष्ट्रात ५२.५५ टक्के वरून ४७.४५ टक्के पर्यंत कमी झाले. शिवाय ही तफावत ० ते ६ वर्षे वयोगटातील लोकसंख्येच्या बाबतीत अधिकच जाणवते. या कालावधीत सामान्य लिंग गुणोत्तर देखील ९३६ वरून ९२५ पर्यंत; तर बाल लिंग गुणोत्तर ८८३ पर्यंत कमी झाले आहे. १९६१ मध्ये जवळपास १३ लाखांनी महिलांची संख्या कमी होती, ती २०११ पर्यंत ४१ लाखांनी कमी झाली.

पुरोगामी महाराष्ट्रात पुरुषप्रधान समाज व्यवस्था, हुंडाबळीचा सामाजिक अभिशाप, गर्भजल परीक्षेचा दुरुपयोग, महिलांचे अनारोग्य, गरिबी, बेरोजगारी या कारणांमुळे मुलींची संख्या दिवसेंदिवस कमी होताना दिसते आहे. महाराष्ट्राच्या भविष्यकालीन पिढीसाठी ही चिंतनीय बाब आहे. १९६१ ते २०११ या ५० वर्षांत महाराष्ट्र राज्याने साक्षरता प्रसारात ३५ टक्के वरून ८२ टक्के पर्यंत मजल मारली. याच कालावधीत पुरुष साक्षरतेचे प्रमाण ४९ टक्के वरून ८८ टक्के पर्यंत; तर महिला साक्षरतेचे प्रमाण १९ टक्के वरून ७५ टक्केपर्यंत वाढले आहे. एकूण साक्षरता प्रमाणात २.३४ पटीने, पुरुष साक्षरता प्रमाणात १.८० पटीने; तर महिला साक्षरता प्रमाणात ३.९४ पटीने वाढ झाली, ही समाधानकारक बाब आहे. मात्र ग्रामीण भागातील पुरुष साक्षरता आणि महिला साक्षरता या मधील तफावतीचे प्रमाण आजही मोठे आहे.

महिलांचे सरासरी आयुर्मान पुरुषांच्या मानाने सर्वसाधारणपणे जास्त असते. १९७०-७५ या कालावधीत ते अनुक्रमे भारतात ५३.३ वर्षे व ५४.५ वर्षे इतके होते. गेल्या काही वर्षांत हा फरक थोडा कमी झाला आहे. २०१०-१४ या कालावधीत भारतात ते महिला व पुरुषांच्या बाबतीत अनुक्रमे ६९.६ वर्षे व ६६.४ वर्षे इतके; तर महाराष्ट्रात ते अनुक्रमे ७३.६ वर्षे व ६९.९ वर्षे इतके आहे. भारताच्या तुलनेत महाराष्ट्रातील सरासरी आयुर्मान अधिक आहे. सर्वसाधारणतः महिला या शारीरिकदृष्ट्या अधिक काटक असतात, असे समजले जाते. तरीही ० ते ४ वर्षांपर्यंतच्या आणि १५ ते ३५ वर्षांच्या महिलांचा मृत्युदर पुरुषांच्या मृत्युदरापेक्षा जास्त आहे. नागरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात जन्मदर आणि मृत्युदराचे प्रमाण जास्त आहे. जन्मदर आणि मृत्युदर कमी करण्याच्या प्रयत्नांना यश येण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील महिलांचा समाजातील दर्जा

उंचावण्याची व त्यांना सक्षम करण्याची गरज आहे.

## ग्रामीण विकास आणि महिला

ग्रामीण विकास ही आर्थिक विकासाची पूर्वअट समजली जाते. नागरी महाराष्ट्रापेक्षा ग्रामीण महाराष्ट्राची आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये भिन्न आहेत. शिवाय आर्थिक विकासातील महिलांचा सहभागही तितकाच भिन्न आहे. १९६१ ते २०११ या कालावधीत महाराष्ट्र राज्याची ग्रामीण लोकसंख्या प्रमाण ७१.७८ टक्के वरून ५४.७७ टक्के पर्यंत कमी झाले आहे. वाढत्या नागरीकरणामुळे आणि औद्योगिकरणामुळे स्थलांतराचे प्रमाण वाढले असून महाराष्ट्रात कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमशक्तीचे प्रमाण कमी होत आहे.२०११ मध्ये महाराष्ट्रात श्रमिक दल सहभाग दर ग्रामीण भागात महिलांच्या संदर्भात ३८.९ टक्के; तर पुरुषांच्या संदर्भात ५८.२ टक्के इतका होता, तर नागरी भागात तो महिलांच्या संदर्भात १७.२ टक्के; तर पुरुषांच्या संदर्भात ५६ टक्के इतका होता.

व्यावसायिक वा क्षेत्रीय पातळीचा विचार करता महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येपैकी ५२.७ टक्के लोकसंख्या कृषी क्षेत्रात कार्यरत आहे. कृषी मजुरांमध्ये पुरुषांचे प्रमाण २१ टक्के; तर महिलांचे प्रमाण ४० टक्के म्हणजे जवळपास दुपटीने जास्त आहे.२०११ मध्ये महिलांचा कार्य सहभाग दर ३१.१ टक्के असून एकूण महिला कामगारांचे प्रमाण ग्रामीण भागात ४२.५ टक्के; तर नागरी भागात १६.८ टक्के व राज्य स्तरावर ३१.१ टक्के आहे. ग्रामीण भागातील महिला कामगारांमध्ये ८१ टक्के मुख्य कामगार आणि १९ टक्के सीमांत कामगार आहेत. तर हेच प्रमाण नागरी भागात अनुक्रमे ८५ व १५ टक्के आहे. २०११- १२ मध्ये महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात स्वयंरोजगार करणाऱ्या महिलांचे प्रमाण ५३.४ टक्के, नियमित वेतन / पगारदार महिलांचे प्रमाण ३.१ टक्के; तर हंगामी महिला श्रमिकांचे प्रमाण ४३.३ टक्के होते; तर नागरी भागात ते प्रमाण अनुक्रमे ३३.१ टक्के, ५४.२ टक्के आणि १२ टक्के होते. विकासाच्या संदर्भात कोणत्याही समाजात पुरुषांना आणि महिलांना समान संधी उपलब्ध नाहीत. महिलांचे ६६ टक्के काम अनुत्पादक स्वरूपात असते. राज्याच्या जमाखर्चात त्याची नोंद होत नाही. जर अशा अनुत्पादक स्वरूपाच्या कामाचे मूल्य काढल्यास राज्याच्या उत्पन्नात किती तरी कोटी रुपयांची भर पडेल.

ग्रामीण भागात कृषी हा महत्त्वाचा उद्योग असल्यामुळे बहुतांश (जवळपास ९५ टक्के) ग्रामीण महिला असंघटित क्षेत्रात कार्य करतात. त्यांना कोणत्याही प्रकारची सामाजिक सुरक्षिततेच्या सवलती जसे- कामाचे ठराविक तास, अधिक उत्पन्न, हक्काची रजा, निवृत्तीवेतन इत्यादी सवलती प्राप्त होत नाहीत. एवढेच नव्हे; तर कृषीमधील कामाच्या बाबतीत महिला व पुरुष असा भेद केला जातो. ग्रामीण अर्थव्यवस्थेत व्यवसायांची व कामांची अत्यंत गुंतागुंतीची उतरंड आहे. या उतरंडीत सर्वात शेवटी महिलांच्या श्रमांचा समावेश होतो. कृषी क्षेत्रातील श्रमाच्या बाबतीत अधिकाधिक उत्पादक कामे पुरुषांच्या वाट्याला येतात. उदा. शेतीसाठी जमीन तयार करणे, उत्पादित मालाची विक्री करणे इत्यादी; तर महिलांच्या वाट्याला अनुत्पादक कामे येतात. जसे - शेतातील गवत काढणे, पेरणी करणे, पिकांचे संरक्षण करणे, गुरे सांभाळणे, वेचणी करणे इत्यादी. एवढेच नव्हे; तर शेती कामाबद्दल दिला जाणारा मोबदला देखील महिलांना कमी; तर पुरुषांना जास्त असतो. उदा. १९९३-९४ च्या अभ्यासानुसार, प्रति दिवसाला दिला जाणारा सरासरी मजुरी दर महाराष्ट्रात पुरुषांसाठी रुपये १९.५४; तर महिलांसाठी रुपये १२.१७ इतका होता. २००९ -१० या वर्षात तो अनुक्रमे रुपये २९३.७६ व रुपये १६४.५१ इतका होता. वास्तवत: पुरुषांपेक्षा महिलांना अधिक तास काम करावे लागते.

वर्षभरातील एकूण कामाचे दिवस अभ्यासता,

विविध अभ्यासांमधून असा निष्कर्ष निघतो की, पुरुषांसाठी कामाचे दिवस जास्त; तर महिलांसाठी कमी असतात. उदा. महिला श्रमिक सांख्यिकीय रूपरेखा २०१२-१३ नुसार, महाराष्ट्र राज्यात पुरुषांसाठी कामाचे दिवस १,९९,१६६ हजार; तर महिलांसाठी २१,२०५ हजार इतके होते. हंगामी रोजगारात महिलांची संख्या जास्त असते. थोडक्यात ग्रामीण भागात महिला सदासर्वकाळ काम करीत असतात. परंतु त्यांचे श्रम अदृश्य राहतात. बिनमोलाची किंवा घरगुती उत्पादनाचा भाग असल्याने उदा. शेती, पशुपालन, हातमाग, घरातून केली जाणारी कामे इत्यादींचे मोजमापच होत नाही. त्यामुळे प्रत्यक्षात काम करीत असताना सुद्धा महिला 'कामकरी' म्हणून गणल्या जात नाहीत. अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण प्रचंड आहे. त्यामुळे त्यांची अदृश्यता वाढते. शिवाय त्यांचे श्रम हलक्या दर्जाचे आणि कमी वेतनाचे मानले जातात आणि शेवटी त्यांच्या मिळकतीवर त्यांचा हक्क नसतो. आजही महिलांचे काम 'पूरक' म्हणून पाहण्याचा आणि कमी लेखण्याचा दृष्टिकोन प्रचलित आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रात २० टक्के कुटुंबांच्या प्रमुख महिला असून म्हणजे किमान ३ कोटी कुटुंबांसाठी तरी महिलाच 'कर्ता' आणि 'कारभारी' आहेत. महत्त्वाचे म्हणजे महिला आपल्या कमाईच्या जवळपास ९० टक्के भाग आपल्याच कौटुंबिक कामांसाठी खर्च करतात, एवढेच नव्हे; तर त्यांच्या मिळकतीने कौटुंबिक उत्पन्नात भर पडते. महिला जे घरकाम करतात, ते उत्पादक काम असले तरी त्या कामांची गणना राष्ट्रीय उत्पादनात होत नाही. 'ऑक्सफॅम' च्या अंदाजानुसार, महिलांच्या सर्व बिनपगारी कामांचा समावेश केला तर महिलांची रोजगारातल्या सहभागाची पातळी २० टक्के वरून ८० टक्के पर्यंत वाढू शकते.

अलीकडील काळात महिलांच्या बेरोजगारीचा टक्का वाढत चालला आहे. 'बिझिनेस स्टॅण्डर्ड' या आर्थिक नियतकालिकेने राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालाची प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, ग्रामीण भागातील १५ ते २९ वर्ष वयोगटातील तरुण महिलांमधील बेरोजगारीचे प्रमाण २०१७-१८ मध्ये १३.८ टक्के पर्यंत वाढले आहे. २०११-१२ या वर्षात ते ४.८ टक्के इतके होते. गेल्या काही वर्षांत महिलांची बेरोजगारी झपाट्याने वाढत असल्याचे चित्र आहे. भारतामध्ये रोजगारात सहभागी होणाऱ्या महिलांचे प्रमाण नेहमीच कमी राहिले आहे. किंबहुना गेल्या काही दशकांत त्याला उतरती कळा लागली आहे. काम करणाऱ्या महिलांच्या प्रमाणानुसार जगातल्या १८७ देशांत भारताचा क्रमांक १६८ वा आहे. ग्रामीण भागात महिलांमधील बेरोजगारी वाढण्यामागे आर्थिक व नैसर्गिक संकटे, न परवडणारी शेती, वाढते नागरीकरण, शेतीचे बिगर शेती क्षेत्रात होणारे रूपांतरण, आवश्यक कौशल्याचा अभाव, शिक्षणाला अनुरूप रोजगाराचा अभाव ही मुख्य कारणे आहेत. महिलांमध्ये रोजगारासाठी स्थलांतर करण्याची प्रक्रिया आज वाढताना दिसते. घरेलू कामगार, बांधकाम मजूर यांच्यात स्थलांतरित महिलांचे प्रमाण जास्त आहे. परंतु निवारा, पाणी, स्वच्छतागृह, शिधावाटप, आरोग्य व्यवस्था या नागरी सुविधांचा अभाव, अस्थायी स्वरूपाचा रोजगार, शोषण, सामाजिक सुरक्षिततेचा अभाव या मुख्य समस्या आहेत. वाढत्या महिला लोकसंख्येचे रूपांतर सक्षम श्रमदलात करणे हेही एक आव्हान आहे.

### महिला आणि आरोग्य

राज्याच्या प्रगतीचा एक अत्यावश्यक घटक म्हणजे राज्यातील सर्व वयोगटातील सर्व व्यक्तींचे उत्तम आरोग्य होय. शिक्षणाबरोबरच आरोग्य या घटकाचा लोकसंख्येच्या गुणात्मकतेवर थेट परिणाम होतो. म्हणून मानवी विकास निर्देशांक तयार करताना साक्षरता दर आणि सरासरी आयुर्मान या दोन घटकांना खूप महत्त्व आहे. राज्याराज्यांमधील मानवी निर्देशांकात भिन्नता

असण्याचे मुख्य कारण म्हणजे तेथील शैक्षणिक व आरोग्यविषयक स्थितीतील तफावत हे होय. यासाठी लोकांची विशेषत: महिलांची आरोग्यविषयक स्थिती आणि उपलब्ध आरोग्यविषयक सुविधा समाधानकारक असली पाहिजे. नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'नॅशनल हेल्थ प्रोफाईल - २०१८' या अहवालानुसार, जन्मदर, मृत्युदर, अर्भक मृत्युदर कमी झाला आहे. महिला व पुरुषांचे आयुर्मान वाढले आहे. प्लेग, कॉलरा, हिवताप या जुन्या रोगांचे निर्मूलन झाले असून, त्याजागी स्वाईन फ्ल्यू, चिकन गुनिया, डेंग्यू इत्यादी विषाणूजन्य रोगांचे प्रमाण वाढले आहे. जीवनशैलीतील बदलांमुळे मधुमेह, हृदयरोग, किडनीदोष, पक्षाघात, श्वसनासंबंधीचे विकार इत्यादींमध्ये वाढ झाली आहे.

हेल्दी स्टेटस्, प्रोग्रेसिव्ह इंडिया: रिपोर्ट ऑन रँक ऑफस्टेटस् अँड युनियन टेरीटरीज २०१८ च्या अहवालानुसार, आरोग्य निर्देशांकाबाबत महाराष्ट्राला तिसरे स्थान प्राप्त झाले आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील आरोग्यविषयक स्थिती समाधानकारक असली तरी लोकसंख्याविषयक सर्व घटकांचा विचार करता पुरुष आणि महिला यांतील लिंगभेद स्पष्ट होतो. शिवाय प्रदेशनिहाय, जिल्हानिहाय आणि ग्रामीण व नागरी भागनिहाय तफावत दिसून येते. महिलांचे आरोग्य हे त्यांच्या भावनिक, धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि भौतिक कल्याण संबंधित घटकांशी निगडित आहे. महिलांच्या स्थितीशी संबंधित संशोधनावरून असे निदर्शनास येते की, शिक्षण आणि आरोग्य या दोन्ही पातळीवर महिलांचे स्थान दुय्यम ठरते. पुरुषप्रधान संस्कृती प्रभावामुळे महिलांना मर्यादित स्वातंत्र्य असते. या घटकांचा विपरित परिणाम त्यांच्या आरोग्यावर आणि कल्याणावर होतो.

महाराष्ट्रातील महिलांच्या आरोग्याशी संबंधित मुख्य समस्या म्हणजे १) जननक्षम आरोग्य, २) पोषणविषयक स्थिती, ३) लिंगभेद आणि ४) संसर्गजन्य आजार इत्यादी होत. महाराष्ट्रात १९७१ ते २०१६ या कालावधीत जन्मदराचे प्रमाण दरहजारी ३२.२ वरून १५.९ म्हणजे निम्म्याने कमी झाले आहे तर मृत्युदराचे प्रमाण १२.३ वरून ६.९ पर्यंत कमी झाले आहे. एकूण जननक्षमता दर २०१६ अखेर ग्रामीण भागात १.९ आणि नागरी भागात १.६ इतका आहे. जन्मदर आणि मृत्युदराचे प्रमाण उत्तरोत्तर कमी होत असले तरी माता, बाल आणि उपजत मृत्यू व अर्भक मृत्यूंची संख्या आजही खूप मोठी आहे. उदा. १ जानेवारी २०१६ ते ३१ जून २०१९ या कालावधीत ही संख्या जवळपास ८० हजार इतकी होती. जिल्हा, शिक्षण, धर्म, जात आणि वास्तव्याचे ठिकाण यागणिक जन्मदर पातळीत भिन्नता आढळते. विवाहाचे वय कायदेशीरपणे महिलांकरिता १८ वर्षे असले तरी त्याआधीच विवाह होण्याचे प्रमाण १७ टक्के इतके आहे. पर्यायाने जननक्षमतेचे प्रमाण जास्त आहे. माता मृत्युदर आणि वाढते असाध्य आजाराचे प्रमाण हे विषय उच्च जननक्षमतेशी संबंधित आहेत. प्रसुतीवेळेस मृत्यू पावणाऱ्या मातांची संख्या आजही दर लाखामागे ६१ इतकी आहे. गरोदर काळात आरोग्यविषयक सुविधांचा लाभ घेण्यास ग्रामीण महिला फारशा उत्साही दिसत नाहीत. असंघटित क्षेत्रात कार्यरत महिलांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते.

अपुरा व कमी पोषक आहार ही एक आरोग्याशी संबंधित मुख्य समस्या आहे. आदिवासी समाजात कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याने अर्भक मृत्युदर व माता मृत्युदराचे प्रमाण जास्त आहे. केवळ आर्थिक संपन्नता हे लोकसंख्येच्या उत्तम आहारविषयक स्थितीचे कारण ठरत नाही. महाराष्ट्र राज्यात दरडोई उत्पन्न जास्त असतानाही ग्रामीण आणि नागरी भागातील जवळपास निम्म्या कुटुंबांना त्यांच्या आहारातून निर्धारित उष्मांक प्राप्त होत नाहीत. परिणामी, कुपोषित लोकांचे प्रमाणही जास्त आहे. ६ ते ५९ वर्षे वयोगटातील ५३.८ टक्के

महिला, ४९.३ टक्के गरोदर महिला; तर १५ ते १८ वर्षे वय असणाऱ्या ५१.४ टक्के महिलांमध्ये रक्ताची कमतरता (ॲनेमिया) आहे. तसेच या वयोगटातील ४१ टक्के महिलांचे वजन पोषक आहाराअभावी कमी आहे.

लिंगभेदाचे प्रमाण प्राचीन काळापासून ते आजतागायत सुरूच आहे. गर्भपातामध्ये मुलींची संख्या अधिक आहे. स्त्री-भृणहत्याचे प्रमाण सातत्याने वाढते आहे. परिणामी ० ते ६ वर्षे वयोगटातील लिंग गुणोत्तर झपाट्याने कमी होत आहे. मुले व पुरुषांच्या तुलनेत मुली आणि महिलांचा आहार अपुरा व अयोग्य असतो. जोस यांच्या अभ्यासानुसार, अपुरा व अयोग्य आहाराची समस्या अविवाहित महिलांपेक्षा विवाहित महिलांमध्ये जास्त आहे. ग्रामीण भागात आणि आर्थिक व सामाजिकदृष्ट्या गरीब वर्गात तर हा फरक अधिक तीव्रतेने जाणवतो. लिंगभेदाचा थेट परिणाम महिलांच्या आरोग्यावर परिणामी त्यांच्या उत्पादनक्षमतेवर आणि उत्पादकतेवर होतो.

संसर्गजन्य आजार ही एक मुख्य समस्या असून यात प्रामुख्याने मलेरिया, क्षयरोग, एच.आय.व्ही. इत्यादींचा समावेश होतो. यात महिलांचे प्रमाण ६० टक्के आहे. स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्यात उदासीन असलेल्या महिलांमध्ये लैंगिक संसर्गजन्य आजारांचे प्रमाण जास्त आहे. केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र राज्यात पुरुषांमध्ये हे प्रमाण ३५ टक्के; तर महिलांमध्ये ६५ टक्के इतके आहे. गरिबी, आर्थिकदृष्ट्या परावलंबी, रूढी व परंपरांचा पगडा, शिक्षणाचा अभाव, जाणीवेचा अभाव यांमुळे आजारपणाचे प्रमाण वाढताना दिसते. संसर्गजन्य आजारामुळे मृत्युमुखी होण्यात महिलांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे.

महाराष्ट्रात उपलब्ध आरोग्यविषयक सुविधा व त्यांची गुणवत्ता समाधानकारक नाही. राज्यात सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रांत वैद्यकीय सेवा दिली जाते, परंतु ८० टक्के आरोग्यसेवा ही खासगी क्षेत्राकडून घेतली जाते. एक हजार लोकसंख्येसाठी एक डॉक्टर हे जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमाणानुसार, महाराष्ट्रात १.१३ लाख डॉक्टर हवेत. प्रत्यक्षात शासकीय रुग्णालयात कार्यरत डॉक्टरांची संख्या ६७५५ इतकी आहे. शासकीय रुग्णालयांमध्ये मनुष्यबळ आणि इतर साधनांच्या अभावामुळे ८० टक्के रुग्ण खासगी वैद्यकीय सेवा स्वीकारतात. खासगी आरोग्य सेवेकडे बहुसंख्य गरीब व कनिष्ठ मध्यम वर्गातील रुग्ण ती परवडत नसतानाही जातात. अकारण महागडी, अनेकदा अशास्त्रीय उपचार देणारी, फसवणूक करणारी, सुमार दर्जाची सेवा हे खासगी सेवेतील दोष वाढत गेले आहेत. यावर शासनाचे पूर्णपणे नियंत्रण असायला हवे. खासगी वैद्यकीय सेवांचा खर्च अधिक असल्याने ग्रामीण भागातील गरीब गटातील महिला वर्ग अशा सेवांचा लाभ घेऊ शकत नाहीत. राज्याच्या आरोग्यावरील सार्वजनिक खर्च २०१५-१६ च्या एकूण उत्पन्नाच्या मानाने केवळ ०.२३ टक्के इतका नगण्य आहे. तसेच आरोग्य व्यवस्थेतील भ्रष्टाचार, राजकारण, डॉक्टरांवर होणारे हल्ले, औषध खरेदीतील दिरंगाई आणि शासकीय रुग्णालयातील डॉक्टर, विशेष तज्ज्ञ डॉक्टर व इतर सेवकांची प्रचंड कमतरता आहे. राज्यातील जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, महिला रुग्णालये व अन्य रुग्णालये मिळून एकूण केवळ २६३५३ खाटांची संख्या आहे. एकंदरीतच सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. याचा विपरित परिणाम महिलांच्या आरोग्यावर होतो. महिलांच्या निरोगी आणि सदृढ आरोग्यासाठी नागरी भागासोबतच ग्रामीण भागात सार्वजनिक आरोग्य सेवा वाढविणे, फिरते दवाखाने, वैद्यकीय अधिकारी व आरोग्य सेवकांची नेमणूक करणे, खासगी आरोग्य सेवांच्या वाढत्या किमतीवर नियंत्रण ठेवणे, स्वस्त किमतीत औषधांचा पुरवठा करणे आणि वैद्यकीय

संशोधनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. याकरिता राज्यातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी धोरणात्मक बदल करणे गरजेचे आहे. केंद्र सरकारने एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या २.५ टक्के रक्कम आणि राज्य सरकारने महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात आरोग्यावरील खर्चात किमान पाच टक्के पर्यंत वाढ करण्याची नितांत गरज आहे.

**सारांश**

१ मे, २०२० रोजी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ६० वर्षे पूर्ण होतील. या कालावधीत महाराष्ट्र राज्याने विविध क्षेत्रांत भरीव कामगिरी केली आहे. तरीही विकासाचा मोठा पल्ला आपणास साध्य करावयाचा आहे. दरडोई उत्पन्न, औद्योगिकरण, नागरीकरण, मानव संसाधन विकास यांबाबत महाराष्ट्राची कामगिरी अन्य राज्याच्या तुलनेत उल्लेखनीय आहेच. परंतु राज्यांतर्गत विकासात प्रदेश, जिल्हा, ग्रामीण व नागरी आणि महिला व पुरुष या पातळीवर भिन्नता जाणवते. आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक व कौटुंबिक पातळीवर ही भिन्नता आजही काही प्रमाणात आहे. ग्रामीण विकास प्रवाहात महिलांचे स्थान अधिकच दुय्यम जाणवते. आज सर्वाधिक नकारात्मक परिणाम ग्रामीण महिला आणि मुलींना सोसावे लागत आहेत. महिलांसाठी रोजगाराच्या संधी वाढत नाहीत. बेरोजगारी, कमी वेतन व आत्यंतिक दारिद्र्य या समस्यांनी महिला ग्रस्त आहेत. या समस्यांच्या निराकरणासाठी महिलांच्या कार्याकडे व त्यांच्या उत्पादनक्षमतेकडे सकारात्मक पद्धतीने पाहणे व त्या अनुषंगाने धोरणांची अंमलबजावणी होणे महत्त्वाचे आहे. महिला लोकसंख्येचे रूपांतरण सक्षम श्रमशक्तीमध्ये करण्यासाठी त्यांना शिक्षित आणि सक्षम करणे गरजेचे आहे. सार्वजनिक आणि खाजगी आरोग्य व्यवस्था आणि महिला व पुरुषांचे आरोग्य यांतील विषमता कमी करण्यासाठी ग्रामीण भागात आरोग्य सेवा वाढविणे आवश्यक आहे. त्याकरिता महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात आरोग्यावरील खर्चात वाढ करण्याची नितांत गरज आहे. तरच महिला आरोग्यसंपन्न होतील आणि आरोग्यसंपन्न महिला राज्याच्या प्रगतीला हातभार लावतील. प्रस्तुत लेखात मानव संसाधन, ग्रामीण विकास आणि आरोग्य स्थिती या अंगाने महाराष्ट्रातील महिलांची सद्यस्थिती व आव्हाने अभ्यासली आहेत. या शिवाय सामाजिक, राजकीय, शैक्षणिक , सांस्कृतिक इत्यादी अंगाने स्वतंत्रपणे अभ्यास करता येईल.

**संदर्भ**


१. आचार्य संदीप (२०१८), 'आरोग्याची ऐशीतैशी' दैनिक लोकसत्ता, २२ मे २०१८.
२. भागवत, रेगे व पलसाने ( १९९४), 'स्त्री जीवनाची गुंतागुंत', विकास अध्ययन केंद्र, मुंबई.
३. जहागिरदार दि. व्यं. (संपादक) (२०१२), 'महाराष्ट्र: ५० वर्षांतील आर्थिक विकासाचा धांडोळा', सेंटर फॉर ईकॉनॉमिक ॲण्ड सोशल स्टडीज, अमरावती.
४. कुलकर्णी सुमती (२०१९), 'ती देशाला उद्धारी' दैनिक लोकसत्ता, चतुरंग, १३ जुलै २०१९, पृ.६.
५. मोघे किरण (२०१९), 'कोण म्हणतं टक्का वाढला?' दैनिक लोकसत्ता, चतुरंग, १८ मे २०१९, पृ. ६.
६. पंडित नलिनी (२०१६), 'स्त्रिया आणि आर्थिक विकास', अर्थविचार, खंड १, मराठी अर्थशास्त्र परिषद अध्यक्षीय भाषणे, संपादक पुजारी आ. गो., पृ.२९५ ते ३२४.
७. पानसरे गोविंद (संपादक)(२०१५), 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी...पर्यायी दृष्टिकोन', श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर
८. पाटील जे. एफ.(संपादक) (२०१०), 'सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था', सकाळ प्रकाशन, पुणे.

९. पाटील सुभाष आणि नगराळे विरेंद्र (२००३), 'ग्रामीण विकासात स्त्रियांचे स्थान', यशदा-यशमंथन, ऑक्टोबर-डिसेंबर २००३, वर्ष ४, अंक ३, पृ. ३९ ते ४२.

१०. पाटील सुभाष (२०१६), 'भारतातील आरोग्यविषयक सद्यस्थिती', अर्थमीमांसा, जुलै-डिसेंबर २०१६, खंड ९, अंक २, पृ. २० ते २८.

११. पाटील सुभाष आणि कवळे तृप्ती (२०१८), 'महाराष्ट्रातील आरोग्यविषयक सद्यस्थिती आणि आव्हाने' अर्थात, मराठी अर्थशास्त्र परिषद ४२ वे राष्ट्रीय अधिवेशन स्मरणिका, पृ. १८७ ते १९३.

१२. श्रीवास्तव सतीश (२०१९), 'देशातील अत्यवस्थ आरोग्य व्यवस्था' दैनिक लोकसत्ता, २२ फेब्रुवारी २०१९, पृ.७.

१३. Economic Survey of Maharashtra 2018-19, Directorate of Economics and Statistics, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai.

१४. Healthy States Progressive India- Report on the Ranks of States and Union Territories - Health Index, June 2019 published by NITI Ayog, The World Bank and Ministry of Health and Family Welfare, Government of India.

१५. India - National Family Health Survey (NFHS-4) 2015-16, Ministry of Health and Family Welfare, Government of India.

१६. National Health Profile 2018, 13th Issue, Central Bureau of Health Intelligence, Directorate General of Health Services, Ministry of Health and Family Welfare, Government of India.

१७. Statistical Profile on Women Labour 2012-2013, Labour Bureau Ministry of Labour and Employment, Government of India.

◆

शिक्षण हे सामाजिक न्यायाचे एक साधन आणि
आर्थिक विकासाचे मूलभूत चल आहे.

**- केविन रुड**

नवनिर्मिती हे एक इंजिन आहे, जे नावीन्य आणते. नवनिर्मितीमुळे आर्थिक वाढ होते. चला सर्वजण नवनिर्मिती करुया.

**- एडिथ विडर**

# महाराष्ट्रातील बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक : वस्तुस्थिती आणि विशिष्ट समूहाचा दारिद्र्य निर्देशांक काढण्याची गरज

**नंदकुमार बाबुराव बोधगिरे †**

**प्रस्तावना**

दारिद्र्य निर्मूलन करणे, तसेच व्यक्तीच्या शिक्षण, आरोग्य व राहणीमानात सुधारणा घडवून आणणे हे उद्दिष्ट्य साध्य करण्याचा प्रयत्न प्रत्येक देश पातळीवर व राज्य पातळीवर सरकार व खासगी संरचनेमार्फत वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून केला जात असल्याचे आपणास दिसून येते. मागील दोन शतकापासून आपण दारिद्र्याचे मोजमाप करत आहोत आणि केलेल्या मोजमापावर आपण धोरणे ठरवित आहोत. तरी पण सध्याची देशासमोरील व राज्यासमोरील आव्हाने लक्षात घेता दारिद्र्य नष्ट करण्यामध्ये आपण अयशस्वी ठरलो आहोत. भारत अजूनही शिक्षण, आरोग्य, दरडोई उत्पन्न, पायाभूत सुविधा व राहणीमान या घटकांमध्ये विविध राज्यांमधील क्षेत्रीय असमानतेचा सामना करीत आहे. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा क्षेत्रीय असमानता असलेला देश आहे. जागतिक संपत्ती अहवालानुसार, जगातील ९५ टक्के संपत्ती ही ५ टक्के श्रीमंत वर्गाकडे आहे. याचाच अर्थ असा आहे की, मागील दोन दशकांपासून दारिद्र्याचे मोजमाप योग्य रीतीने झालेले नाही. भारतात गरीब हा आणखी गरीब होत आहे तर श्रीमंत आणखी श्रीमंत होत आहे. यामध्ये सर्वसमावेशक विकास दिसून येत नाही. यावरून आपण असे म्हणू शकतो की, मागील दोन दशकांपासून समाजातील गरिबी व विषमता अद्यापही संपुष्टात आलेली नाही. मग प्रश्न असा उद्भवतो की, मागील दोन शतकांपासून आपण दारिद्र्याचे पूर्णपणे निर्मूलन का करू शकलो नाहीत. याची दोन कारणे असू शकतात ती पुढीलप्रमाणे -

१) दारिद्र्याचे मोजमाप चुकीच्या पद्धतीने केले जात आहे.

२) दारिद्र्य दूर करण्यासाठी निर्माण केलेल्या योजना पूर्णपणे अयशस्वी आहेत.

थोडक्यात, विश्लेषण करायचे झाले तर, सुरुवातीला दारिद्र्य हे उपभोगावर व उत्पन्नावर मोजले जात होते. समजा, उत्पन्नावर आधारित दारिद्र्य मोजत असताना आपण कुटुंबातील उत्पन्न मिळविणाऱ्या व्यक्तीचे उत्पन्न हे एकूण कुटुंबाचे उत्पन्न असे गृहीत धरतो. कुटुंबातील इतर सदस्य जसे लहान बालक, पत्नी, वृद्ध आई-वडील यांना गृहीत धरत नाही; परंतु

†सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख (उपयोजित अर्थशास्त्र) सामाजिकशास्त्रे संकुल स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. आजीव सभासद क्र. : १४४७, भ्रमणध्वनी : ९९६०६०६५९९, ई-मेल : n99bodhgire@gmil.com

सूत्रामध्ये मात्र एकूण उत्पन्न / एकूण लोकसंख्या ही माहिती घ्यावी लागते. उदा. समजा 'अ' या कुटुंबात तीन सदस्य आहेत व 'ब' या कुटुंबात सहा सदस्य संख्या आहे व दोन्ही कुटुंबाचे उत्पन्न महिना ९०,०००/- रु. आहे, तर 'अ' या कुटुंबातील व्यक्ती प्रत्येकी ३०,०००/- रु. आपल्या उपभोगावर खर्च करू शकतो. पण 'ब' कुटुंबातील व्यक्ती १५,०००/- रु. प्रत्येकी उपभोगावर खर्च करू शकतो. म्हणजेच सदस्य संख्या जास्त असल्याकारणाने 'अ' व 'ब' कुटुंबातील राहणीमानात फरक जाणवतो. 'अ' कुटुंब जितके शिक्षण, आरोग्य व राहणीमानावर खर्च करते तितके 'ब' कुटुंब करू शकत नाही. येथे दोन्ही कुटुंबांचे उत्पन्न जरी सारखे असले तरी 'ब' कुटुंबाच्या राहणीमानचा दर्जा 'अ' कुटुंबापेक्षा कमी आहे. काळाच्या ओघात राहणीमान या घटकाचा समावेश दारिद्र्य मोजमापासाठी केला जावा असे सुचविण्यात आले. परंतु राहणीमानाची माहिती संकलित करण्यासाठी अनेक घटकांचा विचार करावा लागतो व त्या घटकाची माहिती देश पातळीवर, राज्य पातळीवर उपलब्ध असेलच असे नाही, म्हणून मानव विकास अहवालाचा आधार घेऊन शिक्षण, आरोग्य व राहणीमान या घटकावरून किती लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत हे ढोबळ मानाने सांगण्यात आले. एकंदरित दारिद्र्याचे मोजमाप करत असताना शिक्षण, आरोग्य व राहणीमान हे तीन मुख्य घटक यासोबत इतर उपघटक विचारात घेऊन दारिद्र्य मोजमाप करण्याचा विचार पुढे आला. त्यालाच (Multidimensional Poverty Index) असे म्हणतात. ही संकल्पना ऑक्सफर्ड विद्यापीठातील अर्थशास्त्र संशोधन केंद्राच्या संचालिका सबीना अलकिरी यांनी प्रथम २०१० मध्ये मांडली. Oxford Poverty and Human Initiative या केंद्रामार्फत पहिला जागतिक बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमांतर्गत मानव विकास अहवालाकरिता तयार करण्यात आला. ही संकल्पना मुख्य तीन घटक व यातील दहा उपघटकावर आधारित आहे. ते खालीलप्रमाणे -

१) शिक्षण : शालेय वर्षे, शाळेतील उपस्थिती.

२) आरोग्य : बाल मृत्यूदर, कुपोषित बालक.

३) राहणीमान : विद्युत पुरवठा, पिण्याचे पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, घरावरील छत, भिंत, फरशी, इंधनाचा वापर, स्वतःची जिंदगी. (संपत्ती)

बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक तीन पद्धतीने काढता येऊ शकतो, असे सांगितलेले आहे. या तीन पद्धती मोजमाप करण्याच्या उद्देशावर आधारित आहेत. पद्धती पुढीलप्रमाणे -

१. सार्वत्रिक उपाय

२. ग्रुप विशिष्ट उपाय

३. एकत्रित उपाय

परंतु या निर्देशांकाचा वापर करून राज्य पातळीवर, तालुका पातळीवर, गाव पातळीवर दारिद्र्याचे मोजमाप केलेले नाही. म्हणून दारिद्र्याचे मोजमाप करत असताना समाजातील विशिष्ट घटक, गट (समूह) विचारात घेऊन प्रत्येक व्यक्तीचे दारिद्र्य अभ्यासले तर खरोखरच एकूण दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या व्यक्तीची आकडेवारी प्राप्त होईल व त्यानुसार नियोजन करणे सोपे जाईल. अलीकडे आपण सर्वच धोरणांमध्ये सर्वसमावेशक विकासाला (Inclusive growth) प्राधान्य देत आहोत. सर्वसमावेशक घटकात वंचित घटक, महिला, आदिवासी, बालक, सीमांत मजूर शेतकरी इ. गट येतात. या सर्व घटकांना विचारात घेऊन Group Specific Poverty या पद्धतीचा उपयोग करून दारिद्र्याचे मोजमाप केले तर आपण दारिद्र्याच्या दुष्ट चक्रातून बाहेर पडू. अन्यतः अजून काही शतके वेगवेगळी मापके वापरून मोजमाप केले

जाईल; परंतु वास्तविक स्थितीत बदल होणार नाही. सध्या महाराष्ट्र राज्याचा विचार केला असता, जर आपण बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक लक्षात घेतला, तर आपणास लक्षात येईल की, समाजातील दुर्लक्षित घटक जसे आदिवासी महिला, बालक, शेतमजूर यांचे शिक्षण, आरोग्य व राहणीमान फारसे सुधारलेले नाही.

**अभ्यासाची व्याप्ती**

बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक केवळ जागतिक स्तरावर काढण्यात आलेला आहे. म्हणून केवळ महाराष्ट्र राज्यातील शिक्षण, आरोग्य व राहणीमानाची परिस्थिती वेगवेगळे अहवाल व दुय्यम सामग्रीच्या आधारे वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**उदिष्ट्ये**

१. दारिद्र्याचे मोजमाप करत असताना विचारात घेतलेले निर्देशांक कितपत योग्य आहेत, हे समजून घेणे.
२. शिक्षण, आरोग्य व राहणीमानात महाराष्ट्र राज्याची वास्तविक परिस्थितीचा अभ्यास करणे.
३. दारिद्र्याचे मोजमाप कसे केले जावे हे सूचविणे.

**संशोधन पद्धती**

विषयाची उद्दिष्ट्ये विचारात घेऊन वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. संशोधकाने द्वितीय सामग्रीमध्ये विविध अहवाल, संशोधन पत्रिका, आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील संदर्भ पुस्तके, संकेतस्थळे इ. माध्यमातून माहिती संकलित केलेली आहे.

वरील विश्लेषणामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे आपण महाराष्ट्रातील शिक्षण, आरोग्य व राहणीमानाची वास्तविक परिस्थिती जाणून घेणे आवश्यक आहे. यामधून आपणास लक्षात येईल की, कोणता घटक विकासापासून वंचित आहे व कोणत्या घटकाचे दारिद्र्य कोणत्या पद्धतीने अभ्यासणे गरजेचे आहे. सुरुवातीला आपण महाराष्ट्रातील शिक्षणाच्या स्थितीचा अभ्यास आढावा घेवू या -

**शिक्षणाची स्थिती**

१२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये शिक्षणाला अधिकाधिक महत्त्व देण्यात आले. ज्याद्वारे जलद आणि सर्वसमावेशक विकास साध्य करता येईल. समाजातील सर्वच सामाजिक घटकामध्ये विकास घडवून आणण्याचे उद्दिष्ट्य ठरविण्यात आले. २०११ च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्र राज्याचा साक्षरता दर ८२.९ टक्के आहे. त्यामध्ये पुरुष साक्षरता दर ८९.८ टक्के व महिला साक्षरता दर ७५.५ टक्के आहे. राज्यातील साक्षरता दर जरी सुधारलेला असला तरी जिल्ह्यातील साक्षरता दरामध्ये असमानता आहे. उदा : नंदुरबार जिल्हा. या जिल्ह्याचा एकूण साक्षरता दर एकूण लोकसंख्येच्या ६३ टक्के आहे. विशेषतः महिला साक्षरता दर ५३.९ टक्के आहे. म्हणजे या जिल्ह्यातील ५० टक्के महिला निरक्षर आहेत. नंदुरबार जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा म्हणून ओखळला जातो. २००७-८ मधील ६४ व्या फेरीतील (NSS) राष्ट्रीय नमुना सर्वेनुसार, अनुसूचित जमातीच्या वर्गाचे (ST) साक्षरता दर इतर सामाजिक वर्गानुसार लक्षात घेतला तर तो कमी असलेला आपणास दिसून येतो. महाराष्ट्रातील DISE-District Information System for Education ने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार २००७ ते २०१२ च्या दरम्यान प्राथमिक शाळेत झालेला प्रवेश ४ टक्के व माध्यमिक शाळेतील प्रवेश १६ टक्केनी वाढलेला आहे. प्राथमिक शिक्षण हे अधिकतर सरकारी शाळांमधून मोफत व सक्तीचे दिले जाते. परंतु, माध्यमिक शिक्षण हे प्रामुख्याने खाजगी शाळांमधून दिले जाते. शालेय शुल्क सरकारी शाळांपेक्षा अधिक असल्याकारणाने समाजातील आदिवासी, भटके विमुक्त जमाती वर्गातील मुले शिक्षणापासून वंचित राहत

असलेले निदर्शनास येते. राष्ट्रीय सर्वेक्षण (NSS) २००९ नुसार, आदिवासी भागातील मुलांचा उपस्थिती दर हा कमी दिसून आलेला आहे. शाळाबाह्य मुलांचे प्रमाण १.३ टक्के आहे. ११.६ टक्के आदिवासी मुले, ज्याचे वय ६-१३ वर्षे आहे यांची प्राथमिक व माध्यमिक शाळातील उपस्थिती शाळाबाह्य आहे. विशेषत १४ ते १६ वयोगटातील मुले शाळाबाह्य अधिक आहेत. धुळे, नंदुरबार, जळगाव व नाशिक या जिल्ह्यांतील मुले अधिक प्रमाणात शाळाबाह्य आहेत. हे जिल्हे आदिवासी जिल्हे म्हणून ओळखले जातात. १८.८ टक्के मुले मजुरी व तत्सम कामात गुंतलेली आहेत. विशेषतः अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील शाळाबाह्य मुलांचे प्रमाण सर्वाधिक ५४.५३ टक्के असल्याचे सदर अहवालानुसार जाणवते.

वरील विश्लेषण थोडक्यात नमूद केल्यास असे दिसून येते की, तुलनेने महिला साक्षरता दर कमी आहे. आदिवासी जिल्ह्यातील साक्षरता दर कमी आहे. सर्वसामान्य घटकातील मुलांना माध्यमिक शिक्षण खाजगी असल्याकारणाने शालेय शुल्क परवडत नाही. त्यामुळे ते शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत. आदिवासी मुलांचे शाळा बाह्य असल्याचे प्रमाण जास्त आहे. अशा प्रकारे महाराष्ट्रातील शैक्षणिक स्थितीचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**आरोग्याची स्थिती :**

सुदृढ आरोग्य हे विकसित देशाचे वैशिष्ट्य आहे. देशाची आरोग्य क्षमता वाढविण्यासाठी परवडणारी आणि चांगल्या प्रतीची आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली पाहिजे. ११ व्या पंचवार्षिक योजनेनुसार मुख्यतः गरीब, विशेषाधिकारीत आणि ग्रामीण लोकांचे आरोग्य सुधारण्याकडे लक्ष केंद्रीत केले गेले. ११ व्या योजनेत वैयक्तिक व सार्वजनिक आरोग्य सेवा, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, सुविधा, स्वच्छतेचे ज्ञान व आहार देण्याच्या चांगल्या गोष्टींचा समावेश असलेल्या व्यापक दृष्टिकोनाचा निर्णय घेण्यात आला.

११ व्या योजनेत असे स्पष्ट केले गेले आहे की, प्रत्येक महिलांना आहार संबंधित गोष्टींबद्दल ज्ञान, मुलांना योग्य आहार, काळजी घेण्याच्या पद्धतीबद्दल ज्ञान घेणे आवश्यक आहे. ही योजना सूक्ष्म पोषक तत्त्वांची कमतरता, आरोग्य सेवांमध्ये अपुरे प्रवेश यावर प्रतिबिंबित करते. ११ व्या पंचवार्षिक योजनेत पुढील चार निर्देशांक, योजना कालावधी अखेरीस साध्य होणार आहेत, याकडे लक्ष वेधले आहे.

१. ०-६ वर्षे वयोगटातील मुलांच्या आरोग्यात सुधारणा करणे.
२. बालमृत्यू दर - (IMR) कमी करणे.
३. MMR माता मृत्यू दर कमी करणे.
४. एकूण प्रजनन दर (TFR) नियंत्रित करणे.

'स्टेट ऑफ ब्युरो ऑफ हेल्थ इंटलिजन्स स्टॅटीटिक्स २०१०' नुसार राष्ट्रीय स्तरावर जन्मदराच्या प्रमाणामध्ये जरी घट झालेली असली तरी विविध जिल्ह्यांमध्ये मात्र असमानता आहे. उदा. सिंधुदुर्ग (११.१) व नंदुरबार (२०.१). ठरविलेल्या जन्मदारापेक्षा कमी जन्मदर असलेले जिल्हे खालीलप्रमाणे आहेत. चंद्रपूर, गोंदिया, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व वर्धा इत्यादी. पुणे व ठाणे जिल्ह्यामध्ये बाल मृत्यूदर ५.५ पेक्षा कमी आहे व इतर ठिकाणी जास्त आहे. महाराष्ट्रात Child Sex Ratio हा महत्त्वाचा विषय आहे. महाराष्ट्रात २००१-२०११ च्या दरम्यान बीड जिल्ह्यात Child Sex Ratio सर्वांत जास्त ८३० इतका होता. रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यात लिंग गुणोत्तर चांगले आहे. बालमृत्यू व कुपोषित बालकांचे प्रमाण आदिवासी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आहे. २००५-०६ च्या ( N.F.H.S-3) च्या सर्वेक्षणानुसार, १३.८ टक्के मुली १५ ते १९ वर्षे वयोगटातील माता/गर्भवती आहेत. त्यापैकी शहरी

भागातील ९.३ टक्के आणि ग्रामीण १८.९ टक्के आहेत. एकूण १३.८ टक्के पैकी अनुसूचित जातीमध्ये १९.४ टक्के; अनुसूचित जमातीमध्ये २१.१ टक्के व इतर मागासवर्गातील ७.५ टक्के माता गर्भधारणा झाल्या आहेत.

**राहणीमान :**

१. घरावरील, छतावरील वापरण्यात येणारे साहित्य: महाराष्ट्रातील धुळे (३६.२ टक्के), जळगाव (२३.९), अहमदनगर (१५.३) आणि नंदुरबार (१३.९ टक्के) येथील लोक अजुनही गवत, बांबू, तट्टे आणि चिखल इ. साधनांचा उपयोग करतात.

२. घरातील फरशीऐवजी वापरण्यात येणारे साहित्य : महाराष्ट्रातील गोंदिया (७८.२ टक्के), नंदुरबार (७४ टक्के), वाशिम (६४.६ टक्के), भंडारा (६५.७ टक्के), गडचिरोली (६५.८ टक्के), हिंगोली (६४.७ टक्के) येथील लोक अजूनही शेण, चिखल हे साधन घरातील जमिनीसाठी उपयोग करतात.

३. घरातील भिंतींना वापरण्यात येणारे साहित्य : महाराष्ट्रातील धुळे (४३.९ टक्के), अमरावती (४५.३ टक्के), गोंदिया (७३.१ टक्के) आणि गडचिरोली(४८.१ टक्के) येथील लोक अजूनही चिखल व विटांचे तुकड्यांचा घरातील भिंती बनवण्यासाठी वापर करतात.

४. आंघोळीसाठी व सांडपाण्यासाठी व्यवस्था : महाराष्ट्रातील गडचिरोली (४२.५ टक्के), गोंदिया (३९.८ टक्के), नंदुरबार (३४.५ टक्के) येथील लोकांकडे अजूनही आंघोळीसाठीची व सांडपाण्याची व्यवस्था उपलब्ध नाही.

५. स्वयंपाकासाठी इंधन : महाराष्ट्रातील गडचिरोली (८३.९ टक्के), गोंदिया(८२.८ टक्के), वाशिम (७६.४ टक्के), भंडारा (७६ टक्के), सिंधुदुर्ग (७२.८ टक्के), व रत्नागिरी (७०.५ टक्के), येथील लोक स्वयंपाकासाठी अजूनही लाकूड हे इंधन म्हणून वापर करतात.

६. विद्युत पुरवठा : महाराष्ट्रातील नंदुरबार (२.४ टक्के), धुळे (१.५टक्के), जळगाव (१.७ टक्के), नांदेड (१.८ टक्के), उस्मानाबाद (१.९ टक्के), येथील लोकांकडे अजूनही वीजपुरवठा झालेला नाही. या व्यतिरिक्त महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चांगली नाही.

वरील सर्व घटकांचे थोडक्यात विश्लेषण केलेले आहे. यातून आपणास महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत असणाऱ्या राहणीमानाची दयनीय अवस्था प्रकर्षाने जाणवते व विशेषत: गडचिरोली, गोंदिया, धुळे, नंदुरबार, नांदेड, हिंगोली या जिल्ह्यांत शिक्षण, आरोग्य व राहणीमान या तिन्ही घटकांच्या बाबतीत मागासलेपण जाणवते. विशेष म्हणजे हे आदिवासी बहूल जिल्हे म्हणून ओळखले जातात. अशा प्रकारे महाराष्ट्रातील शिक्षण, आरोग्य आणि राहणीमान या तीन घटकांचे सामाजिक वस्तुस्थितीचे स्वरूप लक्षात येते.

**निष्कर्ष**

सुरुवातीला दारिद्र्याचे मोजमाप हे आहारात कोणते पदार्थ किती प्रमाणात उपभोगात घेतले जातात, यावर आधारित होता. त्यानंतर शहरी व ग्रामीण भागातील लोकांसाठी कमीत कमी कॅलरीजमध्ये प्रमाण ठरवून निर्देशांक काढले गेले त्यानंतर उत्पन्नावर आधारित निर्देशांक शोधण्यात आला. परंतु, एखाद्या व्यक्तीच्या उत्पन्नात, शैक्षणिक दर्जा व आयुर्मानात वाढ झाली याचा अर्थ विकास झाला असे होत नाही; हे सिद्ध झाले म्हणून २०१० मध्ये बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाची संकल्पना पुढे आली व यामध्ये व्यक्तीचे

शिक्षण, आरोग्य व राहणीमान हे फक्त तीन मुख्य घटक विचारात घेऊन १० उपघटक ठरवून हा निर्देशांक काढण्यात आला. तरीही सध्या हा निर्देशांक जागतिक स्तरावर व देशपातळीवर तयार करून ठरविण्यात आलेला आहे. परंतु प्रादेशिक, राज्य, गाव पातळी, तालुका पातळी, जिल्हा पातळीवर अजूनही काढण्यात आलेला नाही. जर या संकल्पनेचा वापर करून दारिद्र्य निर्देशांक काढला तर आपणास दारिद्र्याची तीव्रता लक्षात येईल.

बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाचे मोजमाप तीन पद्धतीने करता येते. यामध्ये दोन महत्त्वाचे टप्पे आहेत. एक बहुआयामी निर्देशांक गाव, तालुका पातळीवर निर्देशांक काढणे व दुसरे म्हणजे Group Specific Measure या पद्धतीचा उपयोग करून दारिद्र्य निर्देशांक काढणे.

आपण महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण, आरोग्य व राहणीमान याविषयीचा थोडक्यात अभ्यास केला असता आपणास असे दिसून येते की, आदिवासी जिल्हे हे शिक्षण, आरोग्य व राहणीमान या बाबतीत फारसे चांगले नाहीत. म्हणून दारिद्र्य वाढत असताना आपण केवळ आदिवासी महिला किंवा आदिवासी पुरुष, बालक यांचा वेगळा निर्देशांक काढला तर दारिद्र्याचे योग्य मोजमाप करता येईल व योग्य धोरण ठरविण्यास मदत होईल. अन्यथा दारिद्र्य मोजमापाची मापके बदलत राहतील; पण दारिद्र्य मात्र कमी होणार नाही.

**संदर्भग्रंथ यादी**


1) Alkire S., James, E. Foster, Suman Seth, Maria Emma Santos, Jose M. Roche and Poala Ballon, Multidimensional poverty Measurement and Analysis OPHI working pasper No. 8 Oxford Poverty & human development Institute OPHI University of Oxford 8180 ISBN 978-19-0719-475-7.
2) Addis Ababa Accord (2015). Accord of the Third International Conference on Financing for Development, Revised Draft, 6 May.
3) Alkire, S. (2018). 'The Research agenda on multidimensional poverty measurement: Important and as-yet unanswered questions.' OPHI Working Paper 119, University of Oxford.
4) Alkire, S. and Foster, J. (2011). 'Counting and multidimensional poverty measurement', Journal of Public Economics, vol. 95 97-8), pp. 476-487.
5) Alkire, S., Foster, J., Seth, S., Santos, M.E., Roche, J. M. and Ballon, P. (2015). Multidimensional Poverty Measurement and Analysis. Oxford: Oxford University Press.
6) Alkire, S. and Robles, G. (2017). 'Global Multidimensional Poverty Index 2017' OPHI Briefing 47, University of Oxford.
7) Alkire, S. and Ballon, P. (2012). Understanding Association across Deprivation Indicators in Multidimensional Poverty. Paper presented at the Research Workshop on 'Dynamic Comparison between Multidimensional Poverty and Monetary Poverty'. OPHI, University of Oxford.
8) Alkire, S. and Santos, M. E. (2010). 'Acute Multidimensional Poverty: A New Index for Developing Countries'. OPHI Working Paper 38, Oxford University; also published as Human Development Research Paper 2010/11.
9) Alkire, S. and Santos, M. E. (2014). 'Measuring Acute Poverty in the Developing World: Robustness and Scope of the Multidimensional Poverty Index'. World Development, 59: 251–

274.
10) Alkire, S., Foster, J. E., Seth, S., Santos, M.E., Roche, J.M. and Ballon, P. (2015). Multidimensional Poverty 38. Measurement and Analysis: A Counting Approach. Oxford: Oxford University Press.
11) Bosmans, K., Decancq, K. And Ooghe, E. (2015). 'What do normative indices of multidimensional 45? Inequality really measure?' Journal of Public Economics, vol. 130, pp. 94–104. 46.
12) Chakravarty, S. and Lugo, M. A. (2016). 'Multidimensional indicators of inequality and poverty', in (M.D. Alder, M. D. and Fleurbaey, M. (eds.), The Oxford Handbook of Wellbeing and Public Policy, pp. 246– 50. 285, New York: Oxford University Press.

## Reports and Websites:

1) Annual Report of Public Health Department as on April 2012.
2) ASER; NGO, (Pratham 2005 to 2011).
3) Data from DISE (District Information System for Education (Mehta 2004 to 2009 ; NUEPA 20011 b, 2012 b).
4) DLHS (District Level Household Survey-3 2007-08.
5) Evaluation Report on Integrated Child Development Services, Planning Commission, GoI, March 2011.
6) Directorate of Census Operations Maharashtra (1951, 1961, 1971, 1981, 1991, 2001, 2011)
7) Maharashtra Human Development Report 2012, Towards Inclusive Human Development, published by Yashwantrao Chavan Academy of Development Administration, Rajbhavan Complex, Baner Road, Pune
8) SHSRC (2009) for IMR and Planning Commission (2007) for PCDDP 2006-07.
9) UNICEF (2011), Fact Sheet of Maharashtra State, Coverage Evaluation Survey, 2009
10) 64th round of Nantional Sample Survey (2007 to 2012)
11) www.maha-arogya.gov.in
12) www.mahasdb.maharashtra.gov.in
13) www.rchiips.org/nfhs

◆

## निवेदन - अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना आवाहन करण्यात येते की, अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखांवर आपण ५० ते १०० शब्दांची आपली प्रतिक्रिया संपादकांकडे पाठवावी. याबरोबरच आपण अर्थशास्त्रीय विनोदी चुटकुले तसेच अर्थशास्त्रीय प्रबोधनात्मक लहान गोष्टी देखील पाठवू शकता. निवडक योग्य प्रतिक्रिया, अर्थशास्त्रीय विनोदांना व प्रबोधनात्मक अर्थशास्त्रीय गोष्टींना अर्थसंवादमधून प्रसिद्धी देण्यात येईल.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

## ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (2335) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२. **शोधनिबंधाची प्रत अथवा सीडी पोष्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाइल व त्याचीच PDF केलेली फाइल) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** पेपरबरोबर संपादकांना शोधनिबंध पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. शोधनिबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. शोधनिबंधात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पुढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, (२०१०). (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे

नॅकद्वारे मुल्यांकनात व पुर्ण मुल्यांकनात 'अ' दर्जा प्राप्त
केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे 'अ' दर्जा प्राप्त

1964-2014 celebrating Golden Jubilee BHARATI VIDYAPEETH Founder Hon'ble Dr. Patangrao Kadam

## अभिजीत कदम इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड सोशल सायन्सेस

## विजापूर रोड, सोलापूर

## आयोजित

# मराठी अर्थशास्त्र परिषदेंचे ४३ वे राष्ट्रीय अधिवेशन

## दिनांक ३२ ऑक्टोबर, ०१ व ०२ नोव्हेंबर २०१९

**अधिवेशनाचे स्थळ**

**अभिजीत कदम इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड सोशल सायन्सेस,**
भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुल, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४
संपर्क : ०२१७-२३०२२०१६ /२३००५४८
ई मेल : akim@bharatividyapeeth.edu
http://akim.bharatividyapeeth.edu



Dr. Patangraoji Kadam
Founder- Bharati Vidyapeeth, Pune
Founder Chancellor- Bharati Vidyapeeth
(Deemed to be University), Pune

**COURSES OFFERED**

- PG COURSES : M.B.A., M.C.A. , M.S.W
- UG COURSES: B.B.A., .B.C.A

**डॉ. व्ही. एस. मंगनाळे**
कार्याध्यक्ष
मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४३ वे राष्ट्रीय अधिवेशन
मो.नं. ७९७२६१२४९८

**डॉ. पी. पी. कोठारी**
स्थानिक कार्यवाह
मो.नं. ९९२३३०३९१३

**डॉ. ए. बी. नदाफ**
स्थानिक सह कार्यवाह
मो.नं. ९४२२६४९३०९

